# धनंजयराव गाडगीळ जन्मशताब्दी विशेषांक




# अर्थसंवाद

जुलै-सप्टेंबर, 2000
भारतीय सौर आषाढ-भाद्रपद, 1922
खंड 24, अंक 2

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिद्धये ।
शोधचर्चाविवादार्थं संवादोऽयं प्रवर्तितः ॥

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

खंड 24, अंक 2

जुलै – सप्टेंबर, 2000

● **प्रमुख संपादक**

रवीन्द्र दोशी

● **सल्लागार मंडळ**

(2000 - 03)

माधव दातार
सुहास सहस्त्रबुद्धे
मुक्ता जहागीरदार
सर्जेराव ठोंबरे

● **संपादकीय पत्रव्यवहार**

रवीन्द्र दोशी
'मानसगंगोत्री'
526/1, सूर्यवंशी लेआऊट,
प्लॉट नं. 3, 'एलोरा गार्डन'
अपार्टमेंटस् समोर, सम्राट नगर,
कोल्हापूर-416 008
दूरध्वनी :
(0231) 690963

## अनुक्रमणिका

101 धनंजयराव गाडगीळ : भारतीय विचारशील अर्थशास्त्रज्ञांचा आदर्श
*देवदत्त दाभोलकर*

110 सामाजिक – आर्थिक अभ्यासासाठी संशोधन पद्धती व सर्वेक्षणाच्या तंत्राचा विकास : गाडगीळांचे योगदान
*द.पां. आपटे*

119 गाडगीळ यांचे 'सहकारी लोकराज्य'
*स.ह. देशपांडे*

131 गाडगीळांचे नियोजनविषयक विचार
*शि.ना. माने*

145 गाडगीळ आणि उद्योगीकरण
*माधव दातार*

156 संशोधक गाडगीळ
*सुलभा ब्रह्मे*

171 गाडगीळ आणि गोखले अर्थशास्त्र संस्था
*लतिका अरगडे / संजीवनी मुळ्ये*

185 गाडगीळांच्या सहकारविषयक दृष्टिकोनामागे फलप्रामाण्यवाद प्रभावी होता काय ?
*राम देशपांडे / रवीन्द्र दोशी*

192 गाडगीळ :समन्वयवादी अर्थशास्त्रज्ञ
*दि.व्यं. जहागीरदार*

202 हिंदी अर्थशास्त्राचा पाया
*धनंजय रामचंद्र गाडगीळ*

211 धनंजय रामचंद्र गाडगीळ : व्यक्तिपरिचय

# मराठी अर्थशास्त्र परिषद


कार्यकारी मंडळ

(2000 - 01)

**अध्यक्ष**

भालचंद्र मुणगेकर

**कार्याध्यक्ष**

व्यं. सु. पाटणकर

**कार्यवाह – खजिनदार**

आ. गो. पुजारी

**प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'**

रवीन्द्र दोशी

**सदस्य**

गुरुशांतप्पा हरकूड
कालिदास जोशी
श्रीहरी मिसाळ
सुधाकर अंभोरे
पांडुरंग गावडे
संपत गंभीरे
शरणाप्पा मानकरी
गोविंद हडप
कैलास पाटील
अरुणा सावंत
शमा दलवाई
राजू झाडबुके


**• कार्यालयीन पत्रव्यवहार**

(वर्गणी पाठविणे, सदस्यत्वाची नोंदणी करणे, 'अर्थसंवाद' वितरणाविषयी पत्रव्यवहार, इत्यादी)


डॉ. आ. गो. पुजारी,
कार्यवाह - खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
किल्ला भाग, मंगळवेढा (जि. सोलापूर) 413 305
(दूरध्वनी : 02188 - 20556)


**• परिषदेचे प्रमुख कार्यालय**


मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा / सेंटर फॉर दि स्टडी ऑफ सोशल चेंज, एम. एन. रॉय ह्यूमन डेव्हलपमेंट कँपस, फ्लॅट क्र. 6 'एफ' ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूलजवळ, सरकारी वसाहत इमारत क्र. 323 समोर, बांद्रे (पूर्व), मुंबई 400 051.


**• वर्गणी**

*(अ) परिषदेचे सदस्य*
(1) आजीव सदस्य : रु. 800 (एकरकमी)
(2) साधारण सदस्य : रु. 150 (वार्षिक)
(3) संस्था सदस्य :
शैक्षणिक संस्था : रु. 150 (वार्षिक)
व्यावसायिक संस्था : रु. 200 (वार्षिक)
(*परिषदेच्या सदस्यांना 'अर्थसंवाद' त्यांच्या वर्गणीतच दिला जातो.)
*(आ) 'अर्थसंवाद' वर्गणीदार*
ग्रंथालये : रु. 150 (वार्षिक)
*(इ) वर्षगणना :* 1 एप्रिल ते 31 मार्च
* वर्गणी मनी ऑर्डरने वा डिमांड ड्राफ्टने 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने कार्यवाहांकडे पाठवावी ; संपादकाकडे पाठवू नये.


**• 'अर्थसंवाद' साठीच्या अनुदानाबद्दल आभार :**

(1) पश्चिम विभागीय केन्द्र, भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, मुंबई.
(2) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. (टीप : म.रा.सा.सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकामधील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असतीलच असे नाही.)

# संपादकीय

भारतातील, विशेषत: महाराष्ट्रातील, ज्येष्ठ आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अर्थशास्त्रज्ञ धनंजय रामचंद्र गाडगीळ यांचे 2000-01 हे जन्मशताब्दी वर्ष आहे. या निमित्ताने वेगवेगळ्या स्तरावर गाडगीळांच्या एकंदर योगदानाबद्दल विचारमंथन व्हावे आणि नव्या पिढीला त्यांच्या वैचारिक वारशाची गंभीरपणे जाणीव व्हावी यासाठी विविध प्रकारे उपक्रमांचे आयोजन करणे समयोचित ठरेल. याच भूमिकेतून 'अर्थसंवाद'चा 'धनंजयराव गाडगीळ जन्मशताब्दी विशेषांक' काढण्याचे ठरविले. हा अंक वाचकांच्या हाती देण्यात मला मनस्वी आनंद वाटतो. यामध्ये एक वैयक्तिक ऋणानुबंधही गुंतलेला आहे. मला स्वत:ला पुणे विद्यापीठात एम.ए.च्या वर्गात शिकताना 1958-60 या कालखंडात गाडगीळांचा विद्यार्थी होण्याचे भाग्य लाभले होते. यास्तव नी.वि. सोवनी यांच्यात शब्दात मलाही 'माझे गुरू धनंजयराव गाडगीळ' असे उच्चारताना विशेष धन्यता वाटते. गाडगीळ तेव्हा **'Organisation of Production and Labour'** असा एक अनिवार्य अभ्यासविषय शिकवीत. त्यामध्ये बराचसा भाग कृषी अर्थशास्त्राचा होता. त्याचबरोबर राष्ट्रीय उत्पन्न, श्रम आणि उद्योग यांच्याशी संबंधित काही भाग होता. विशेष म्हणजे, गाडगीळ हे त्यांच्या नेहमीच्या व्यापात अतिव्यस्त असून देखील आपले शिकविण्याचे तास चुकणार नाहीत याबद्दल विशेष दक्ष असत. ठरलेल्या वेळेत वर्गात हजर आणि सलग दोन तासांचे व्याख्यान. विषयाच्या मांडणीत नेमकेपणा, काटेकोरपणा ठेवतानाच विचार नि:संदिग्ध असतील याची ते काळजी घेत. त्यांच्या अनुभवातील उदाहरणांनी विषयाचा विस्तार व विश्लेषण वास्तवाच्या पातळीवर राखत. कुठेही विनोदाची झालर नसे. विद्वत्तापूर्ण व्याख्यानांची ती मेजवानी असे. अर्थात त्या दृष्टीने त्याकडे पाहिल्यासच.

अर्थशास्त्रज्ञ म्हणून आपली भूमिका वठविताना, प्राप्त परिस्थितीत, सैद्धान्तिक मांडणीच्या जंजाळात गुंतून राहण्याऐवजी हिंदुस्थानच्या कळीच्या प्रश्नांना हात घालून त्यांच्या सोडवणुकीचे मार्ग दाखविणे आणि वेळप्रसंगी संबंधित उपक्रमांत सक्रिय सहभागी होणे अशी बव्हंशी फलप्रामाण्यवादी दृष्टी त्यानी आजन्म राखली. याकरिता सामाजिक सर्वेक्षणातून जरूर ती माहिती उपलब्ध करून घेऊन तिच्या शास्त्रशुद्ध विश्लेषणातून सामाजिक - आर्थिक सुधारणांचा आकृतीबंध ते तयार करीत. अशा तऱ्हेने काम करण्याच्या इराद्यानेच गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या स्थापनेत त्यानी पुढाकार घेतला एवढेच नव्हे तर तब्बल 36 वर्षे या संस्थेच्या संचालकपदी राहून उपयोजित संशोधन पद्धतीच्या आधारावर होत असणाऱ्या संशोधन उपक्रमांचे नेतृत्व केले आणि त्यासाठी नामवंत संशोधकांची पिढी घडविली. यातूनच एक मान्यताप्राप्त संशोधन संस्था म्हणून गोखले अर्थशास्त्र संस्थेची ख्याती सातासमुद्रापलीकडे पोचविली.

ब्रिटिशांच्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या चौकटीत आर्थिक सत्तेचे केन्द्रीकरणच होण्याला वाव असल्यामुळे आर्थिक-सामाजिक विषमतेची दरी रुंदावत चालली होती. यामध्ये विशेषत: ग्रामीण जनतेची परवड होत होती. हे चित्र कसे पालटता येईल याचाच ध्यास गाडगीळानी घेतला होता. त्यादृष्टीने त्यानी सहकाराच्या माध्यमातून परिवर्तन घडवून आणण्याचा विचार आपल्या इंग्रजी-मराठी लेखनातून, सरकारला सादर केलेल्या निवेदनांतून, व्याख्यानांतून, सभा-संमेलनांतून व सरकारी समित्यांच्या अहवालातून सातत्याने मांडला. एवढ्यावरच न थांबता वेळप्रसंगी त्याना मूर्त स्वरूप देण्यासाठी स्वत: विविध सहकारी संस्थांचे नेतृत्व केले. उत्पादकांच्या सहकारी संस्था या ग्रामीण परिवर्तनाच्या प्रयत्नांना गती देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतील असा त्यांचा ठाम विश्वास होता. यातून प्रवरा सहकारी साखर कारखान्याचा जन्म

झाला आणि लवकरच सहकारी साखर कारखानदारीचे राष्ट्रीय धोरण बनले. प्रवरा साखर कारखान्याचे दीर्घकाल चेअरमन म्हणून काम करताना असे उपक्रम कसे चालवावेत याचा त्यानी आदर्श घालून दिला. (तो मोडण्यातच आजकालचे साखर सम्राट धन्यता मानतात ही गोष्ट अलाहिदा !)

सहकारी पतपुरवठ्याची संस्थात्मक चौकट त्यानीच साकारली. लहान आकाराच्या शेतीचा प्रश्न सुकर करण्यासाठी सहकारी शेतीबद्दल ते आग्रही होते. विनोबा भाव्यांच्या भूदान व ग्रामदान चळवळीने गाडगीळ खूप प्रभावीत झाले होते. त्यातही ग्रामदानाच्या प्रयोगात काही काल त्यानी बरीच रुची दाखविली होती. हिंदुस्थानातील ग्रामीण भागाच्या विकासासाठी प्राधान्येकरून शेती व्यवसायात सुधारणा होण्याची नितांत गरज त्याना वाटली होती. त्याकरिताच भूसुधारणा कार्यक्रम, भूमीहीन शेतमजूर, जमिनीचा आकार व व्यवस्थापन, सहकारी संस्थांची स्थापना, ग्रामीण उद्योगीकरण, इत्यादी विषयांना त्यानी हात घातला. त्यासंबंधी अर्थपूर्ण संशोधन केलेच परंतु त्याचबरोबर विशिष्ट प्रकारच्या संस्था उभारणीला चालना देऊन आरंभीच्या कालात त्यांचे नेतृत्वही केले. त्यामुळे गाडगीळ हे 'कृतीशील संशोधक' होते असे म्हटल्यास गैर ठरू नये.

गाडगीळांचे लेखन व कृतीशील सहभाग यांचा स्पर्श हिंदुस्थानच्या राजकीय घडामोडींना आणि शिक्षण क्षेत्रालाही झालेला होता याचा विसर पडू नये. त्यामुळे ते 'राजकीय विचारवंत' आणि 'शिक्षणतज्ज्ञ'ही होते. भारतीय नियोजनाच्या कार्यात त्यानी मोलाची कामगिरी बजाविली आहे.

गाडगीळांच्या व्यक्तिमत्वाला आणि त्यांच्या वैचारिक – कृतीशील जीवनाला विविध अंगे होती. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने त्यांच्या या विविध पैलूंचा परिचय नव्या पिढीला झाला पाहिजे याबद्दल कुणाचेही दुमत होऊ नये. यातीलच एक पाऊल म्हणजे 'अर्थसंवाद' चा हा विशेषांक. ध्यानात घेण्याजोगी गोष्ट म्हणजे, स्वतः गाडगीळानी आपल्या आयुष्यात 45 वर्षांच्या कालखंडात खूप लिहिले, परंतु त्यांच्याविषयी मात्र फारच थोडे लिहिले गेले. तेही प्रामुख्याने त्यांच्या मृत्यूपश्चात. ही उणीव भरून काढण्याचा या विशेषांकाचा लहानसा प्रयत्न आहे. गाडगीळांच्या विचारासंबंधी तसेच त्यांच्या व्यक्तिमत्वासंबंधी समीक्षा स्वरुपाचे लेख लिहून देण्यासाठी मान्यवरांना विनंती केली. त्यानी ती सहजपणे मान्य केली. त्यांच्या चिकित्सक लेखांच्या आधारावर हा अंक साकारला आहे. सर्व लेखकांना मनःपूर्वक धन्यवाद.

महत्त्वाचे म्हणजे, या अंकाच्या संपादनाच्या कामात गोखले अर्थशास्त्र संस्थेचे विद्यमान संचालक विकास चित्रे तसेच गाडगीळांच्या कन्या सुलभा ब्रह्मे यांची विविध प्रकारे खूप मदत झाली. त्यांच्या मुक्त सहकार्यामुळेच या अंकाची जडणघडण परिणामकारक स्वरुपाची होऊ शकली आहे. या दोघांचाही मी ऋणी आहे.

अंकाचे मुखपृष्ठ तयार करण्यात आर्च ग्राफिक्सचे सुहास मिरगुंडे यानी दाखविलेली कल्पकता आणि मजकुराच्या संगणित्रीय जुळणीचे काम उत्साहाने व जाणीवपूर्वक करणारे त्यांचे सहकारी सुहास येरूडकर यामुळे या अंकाला आकर्षकपणा व उठावदारपणा आला आहे. त्यांचा मी आभारी आहे.

'अर्थसंवाद' चा हा विशेषांक अभ्यासकांना उपयुक्त ठरेल असा माझा विश्वास आहे.

**रवीन्द्र दोशी**

*प्रमुख संपादक*

# धनंजयराव गाडगीळ : भारतीय विचारशील अर्थशास्त्रज्ञांचा आदर्श

देवदत्त दाभोलकर *

*("आदर्श हे ताऱ्यांसारखे असतात; आपण त्यांच्यापर्यंत कधीच जाऊन पोहोचू शकत नाही ; परंतु जीवनसागरावरील आपल्या प्रवासाची दिशा ते आपणाला दाखवीत असतात." - एक आंग्ल वचन)*

**विचारशील**

लेखाच्या प्रारंभीच माझ्या मनात असलेली 'विचारशील' ही संकल्पना स्पष्ट करणे उचित होईल. तशी मी अन्यत्र काही प्रमाणात केलेलीही आहे. बुद्धिमंत, विचारवंत असा भेद आपण सर्वच जाणतो. शास्त्रज्ञ बुद्धिमान असतो, विचारवंत असतोच असे नाही. आइन्स्टाईन जगात सर्वात बुद्धिमान तर होतेच परंतु विचारवंतही होते. त्याहीपलीकडे जाऊन मानवतेची चिंता करणारे विचारशीलही होते. जगाच्या इतिहासात प्रथम ज्ञात असलेले आणि अजूनही जीवनमरणाने प्रथम स्थानावरच राहिलेले सॉक्रेटीस यांच्यापासून विचारशीलांचे हे गोत्र सुरू होते. या गोत्रात (किंवा जातकुळीत म्हणा वाटले तर) समाविष्ट होण्याचा अधिकार धनंजयराव गाडगीळ यांचा निश्चितपणे होता.

सामान्यपणे ज्याना आपण 'विचारवंत असे म्हणतो त्यांचे बुद्धी हे भांडवल असते, अभ्यास हे शस्त्र असते आणि विचारांची, भूमिकांची मांडणी हे त्यांचे कार्य असते. एवढेच काम करणारे विचारवंत आणि आपल्याकडे येईल त्या अशीलाची भूमिका कुशाग्र बुद्धीने आणि न्यायाधीशही चकेल अशा पद्धतीने मांडणारा वकील यांची जातकुळी एकच. कोणत्याही प्रलोभनाच्या आहारी न जाता वा कोणत्याही दडपणाला बळी न पडता आपली भूमिका निर्भयपणे मांडत

* भूतपूर्व कुलगुरू, पुणे विद्यापीठ.

राहणारा तो प्राथमिक स्तरावरचा विचारशील. हाही आपण एकदा घेतलेल्या भूमिकेच्या बंधनात अडकून पडू शकतो. त्याच्याहून वरच्या स्तराच्या विचारशीलाची प्रवृत्ती आपली स्वत:चीही एकदा घेतलेली भूमिका सिद्धान्तनाच्या व अनुभवाच्या निकषांवर परतपरत तपासून पाहण्याची असते. निष्पक्ष, निर्वैर, निर्भय अशी त्याची वृत्ती असते. तो एकाकी असणे अटळ असते. धनंजयरावांची प्रथमपासूनची वाटचाल या दिशेची होती.

## प्रलोभनांच्या पलीकडे

धनंजयराव अगदी तरुण वयापासून ते जीवनाच्या अखेरीपर्यंत आर्थिक प्रलोभनांच्या पलीकडे होते. लोकमान्य टिळकांचा त्यांच्यावर प्रभाव होता आणि इंग्लंडला ICS होण्यासाठी जाताना (ही त्यांच्या वडिलांची इच्छा होती; धनंजयरावांची मुळीच नव्हती)त्यानी बरोबर *गीतारहस्य* नेले होते. ICS न होता ते परतले. त्यानंतर मुंबई राज्य शासनात असिस्टंट सेक्रेटरी म्हणून मासिक तीन हजार रुपये पगारावर वर्षभर नोकरी केली. ती आपण होऊन सोडून सुरत येथे मासिक तीनशे रुपये पगारावर प्राचार्य म्हणून पाच वर्षे त्यानी काम केले. 1930 मध्ये तेथून निघून 'गोखले अर्थशास्त्र संस्था' या नव्याने स्थापन होत असलेल्या संस्थेचे संचालकपद त्यानी स्वीकारले आणि 1965 मध्ये निवृत्त होईपर्यंत समर्थपणे सांभाळले. थोडक्यात सांगायचे तर, ' The rest is history' अर्थशास्त्र संशोधनात गोखले अर्थशास्त्र संस्थेला भारतात अग्रगण्य व जगात मानाचे स्थान त्यानी प्राप्त करून दिले.

## चतुरस्त्र कार्यक्षेत्र

आर्थिक सिद्धान्तनाच्या क्षेत्रात त्यानी आपला वेळ घालविला नाही. हे त्यांच्या नावडीमुळे झाले की भारतीय आर्थिक परिस्थितीच्या प्रत्यक्ष अध्ययना विषयी त्याना वाटणाऱ्या निकडीमुळे झाले हे मला सांगता येणार नाही. ''राजकारणाचे प्रश्न नसते तर मी गणिताचा प्रोफेसर झालो असतो'' या टिळकांच्या भूमिकेप्रमाणेच त्यांची भूमिका होती का ? भारतीय आर्थिक प्रश्नांचा सखोल वस्तुनिष्ठ अभ्यास करणारी इतर मंडळी असती तर ते अर्थशास्त्रातील सिद्धान्तनाच्या संशोधनाकडे वळले असते का ? ज्या एकनिष्ठ दमदारपणे त्यानी भारतातील आर्थिक प्रश्नांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला त्यामुळे त्यांच्या 'सिद्धान्तना'विषयींच्या आकर्षणाविषयीच अनेकांच्या मनात शंका निर्माण होत असे एवढे मात्र खरे.

मग यात 'चतुरस्त्रता' कोठे आली ? सोवनी यानी धनंजयरावांचे वर्णन 'सव्यसाची' असे केले आहे. सिद्धान्तन व प्रत्यक्ष रचना या दोन्ही क्षेत्रांत सारखीच गती आणि मती असणारे असे ते सव्यसाचित्व नव्हते. (अशा सव्यसाचित्वाचे सर्वोत्तम उदाहरण केन्स हे आहे. ते अर्थशास्त्रात सव्यसाची तर होतेच परंतु इतर क्षेत्रांतही अष्टपैलू होते.) धनंजयरावांची चतुरस्त्रता वेगळ्या स्वरुपाची होती.

आर्थिक प्रश्नांच्या त्यांच्या संशोधनात अतिविशिष्टता (over-specialization) नव्हती. जे जे प्रश्न त्याना भारताच्या दृष्टीने निकडीचे व महत्त्वाचे वाटले त्यांचा त्यांचा अभ्यास त्यानी हाती घेतला किंवा त्या क्षेत्रातील संशोधनाला आपल्या संस्थेमार्फत चालना दिली. प्रश्नांच्या निवडीतील विविधता एवढेच या चतुरस्त्रतेचे मर्यादित स्वरूप नाही. समाजकारण, शिक्षण, सहकार, राज्यघटना, भाषावार प्रान्तरचना, विकेन्द्रीकरण, ग्रामदान, लोकशाही समाजवाद, आदी अनेक विषयांत त्याना रस होता. त्यांचे विवेचन तर ते करीतच परंतु त्यात कृतिशीलपणे सहभागीही होत. याचा तपशील 'अर्थसंवाद' च्या वाचकाना देण्याचे कारण नाही. ज्याना हवा असेल त्याना *Making of the Man* या प्रकाशनातील त्यांच्या लेखनाच्या व त्यानी भूषविलेल्या सुमारे शंभर पदस्थानांच्या यादीत सहज मिळू शकेल.

या चतुरस्त्रतेला आणखी एक महत्त्वाचे अंग होते. धनंजयराव हे केवळ वरच्या वर्तुळात वावरणारे उच्चभ्रू विचारवंत नव्हते. वैचारिक आदानप्रदानात आंतरराष्ट्रीय

मान्यता असलेले आणि जनसामान्यांतही तितक्याच सहजपणे मिसळणारे असे ते विचारशील होते. हे एक वेगळेच सव्यसाचित्व आहे. महाराष्ट्रात तरी मला ते जे.पी. नाईक, लक्ष्मणशास्त्री जोशी, वि.म. दांडेकर अशा अन्य तिघांतच आढळले.

## वादातीत ?

धनंजयरावांच्या विषयीची ही सर्व मांडणी वादातीत आहे असे म्हणता आले असते तर मला बरे वाटले असते परंतु ती तितकी वादातीत नाही याची मला जाणीव आहे. तिचा काही विचार करणे आवश्यक आहे कारण 'विचारशील' या त्यांच्याविषयी माझ्या मनात असलेल्या बिरुदाशी ते संबंधित आहे.

या वादविषयक भूमिकांचा तपशील शोधत बसण्याचे कारण नाही ; कारण, ती मांडणी नी. वि. सोवनी यांच्या *माझे गुरु धनंजयराव गाडगीळ* या 1974 मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकात करण्यात आली आहे (प्रकाशक : देशमुख आणि कंपनी). माझ्या खालील मांडणीत धनंजयरावांच्या विषयी आदर आहे त्याचप्रमाणे सोवनी यांच्याविषयीही समादराचीच भावना आहे. परखडपणा हा गोखले अर्थशास्त्र संस्थेचा वारसा माझ्यापर्यंत अल्पसाच पोचला आहे. (1950 च्या आसपास मी गोखले अर्थशास्त्र संस्थेत यावे असे धनंजयरावानी सुचविले होते. माझा पिंड (व कुवतही) संशोधनाची नसल्यामुळे आणि महाविद्यालयीन वातावरणात मी अधिक रमत असल्यामुळे मी संस्थेत येऊ शकत नसल्याचे पत्र त्याना लिहिले. माझा निर्णय त्याना योग्य वाटत असल्याचे त्यानी सौजन्यपूर्वक पत्राने मला कळविले.

सोवनी निःस्पृहपणे आपली मते मांडतात आणि शब्द व विधाने यांच्या नेमकेपणाविषयी त्यांच्याबद्दल माझ्या मनात असूया आहे. आपल्या पुस्तकाच्या आरंभ पृष्ठावर सोवनी यानी एक संस्कृत श्लोक दिला आहे. तो त्यानी स्वतःच व अवधानपूर्वक रचला आहे हे स्पष्ट आहे. तो श्लोक असा :

प्रज्ञावान् अर्थशास्त्रज्ञ : मेधावी अर्थकारणी ।
त्यागी नेता गुरुश्रेष्ठ : सव्यसाची धनंजयः ॥

सव्यसाचित्वाविषयी वर काही मी म्हटले आहे. त्या विशेषणाचा मोह 'धनंजयः'विषयी लिहिताना होणे हे स्वाभाविकही आहे. अर्थशास्त्रज्ञ व अर्थकारणी असा स्पष्ट निर्देश केला हेही उचित असे सव्यसाचित्व म्हणता येईल. 'प्रज्ञावान्' व 'मेधावी' हे दोन्ही शब्द सोवनीनी वापरले याचा मला विशेष आनंद झाला. माझ्या कल्पनेप्रमाणे 'मेधावी' हा बुद्धिमान विचारवंत व 'प्रज्ञावान्' हा खरा विचारशील. असो.

या पुस्तकाचा पहिला भाग 'व्यक्ती' हा धनंजयरावांच्या निधनानंतर दोन तीन महिन्यांत लिहिला गेला आहे. या लेखनाविषयीची आपली भूमिका सांगताना सोवनी लिहितात: '' ही समीक्षा प्रखर असेल, क्वचित मूर्तिभंजकही असेल, परंतु प्रामाणिक आहे. ती स्वतः गाडगीळांच्या परंपरेतीलच आहे हे येथे आग्रहाने सांगू इच्छितो.'' (पृ.11)

'' गाडगीळांच्या मृत्यूने एका ध्येयवादी उदात्त जीवनाचा अंत झाला,'' असे सोवनी यानी आधीच्या पृष्ठावर सांगितले आहे. सर्वचजण या विधानाशी सहमत होतील.

सोवनी यांचे दुसरे एक विधानही सर्वांना मान्य होईल असे आणि विचारशीलाच्या कल्पनेशी मिळते जुळते असेच आहे. सोवनी लिहितात :

'' तथापि पढिक पांडित्य हे त्यांचे ध्येय नव्हते. पंडिताच्या तज्ज्ञ भूमिकेवरून देशाचे आर्थिक व सामाजिक धोरण ठरविण्यात आपणास अप्रत्यक्ष रीतीने भाग घेता येईल म्हणून पांडित्याकडे एक साधन म्हणून ते पाहत होते. पढिक पांडित्य जीवितकर्तव्य म्हणून अंगिकारणे आणि देशाच्या कारभाराचे धोरण ठरविण्याची आकांक्षा बाळगणे या काहीशा परस्परविरोधी वृत्ती खऱ्या, पण त्या त्यानी जन्मभर आपल्या उराशी बाळगल्या. आपण राजकीय सत्तेचा व नेतृत्वाचा लोभ न

धरता बहुजन पुढाऱ्यांच्या मागे उभे राहून, त्यांना सल्ला देऊन देशाच्या धोरणाची जडणघडण करावयाची हे गाडगीळांनी विचारपूर्वक ठरविलेल्या भूमिकेत अनुस्यूतच होते. त्याला अनुसरून कोणत्याही राजकीय पक्षाचे सभासदत्व न स्वीकारता फक्त तज्ज्ञ सल्लागाराची भूमिका घेऊन कोणाही राजकीय अगर सामाजिक कार्यकर्त्याला व पुढाऱ्याला विनामूल्य, निरपेक्ष आणि निःपक्षपाती सल्ला द्यावयाचा असे धोरण गाडगीळांनी विचारपूर्वक आखले. विचारपूर्वक काढलेल्या निष्कर्षाप्रमाणे त्यांनी स्वतःचे वर्तन ठेवले'' (पृ. 23).

धनंजयरावांच्या विषयीच्या लेखनात या स्वरुपाच्या ज्या एका घटनेचा निर्देश मला कुठे आढळला नाही परंतु जिचा मी साक्षी आहे तिच्याविषयी काही लिहिणे येथे उचित होईल. 1960 नंतरच्या दशकातील ही घटना आहे. समाज प्रबोधन संस्था 1960 च्या आसपास स्थापन झाली. शंकरराव देव यांची प्रेरणा त्या संस्थेमागे होती. त्या संस्थेशी मी संबंधित होतो. निवडणूक काळासाठी राजकीय पक्षांनी एक आचारसंहिता मान्य करावी असा प्रयत्न करावयाचा होता. धनंजयरावांनी पूर्ण सहकार्य दिले आणि गोखले अर्थशास्त्र संस्था त्या प्रयत्नात सहभागी झाली म्हणून ती सफल होऊ शकली. भाटघर येथे महाराष्ट्रातील सर्व पक्षांचे नेते व अपक्ष विचारवंत यांचे दोन दिवस चर्चासत्र होऊन सर्वमान्य आचारसंहिता तयार झाली. '*भाटघर आचारसंहिता*' म्हणून तिचा निर्देश करण्यात येतो. या बैठकीला शंकरराव देव, कॉम्रेड डांगे, यशवंतराव चव्हाण, मधु लिमये, बी.सी. कांबळे, शंकरराव मोरे, लक्ष्मणशास्त्री जोशी, दि.के. बेडेकर, अ.भि.शहा आदी उपस्थित होते. ही बैठक आयोजित आणि यशस्वी करण्यात धनंजयरावांचा फारच मोठा वाटा होता. हे सर्व त्यांच्या भूमिकेशी अत्यंत सुसंगत होते.

## 'विचारशील' नियोजन

संशोधन, संशोधनाचे उपयोजन, व्यावहारिक रचनेचे प्रवर्तन, यातून दारिद्र्याचे निराकरण आणि आर्थिक समतेची प्रस्थापना ही धनंजयरावांची विचार-आचारसूत्री असल्यामुळे नियोजनविषयक चिन्तनात आणि कार्यवाहीत त्यांना साहजिकच निरंतर रस असे. स्वातंत्र्यपूर्व कालातही कॉंग्रेस पक्षाने आपली 'राष्ट्रीय नियोजन समिती' स्थापन केली होती आणि विविध अभ्यासगट तयार केले होते. त्या समितीच्या कामात धनंजयरावांचा सहभाग होता. स्वातंत्र्य संपादनानंतर तर तो अधिकच वाढला.

सोवनी लिहितात : '' दुसऱ्या योजनेच्या जडणघडणीत गाडगीळांनी फार प्रामुख्याने भाग घेतला ; इतका की, दुसरी पंचवार्षिक योजना म्हणजे आपली योजना असे ते मानीत...... ती योजना त्यांचा मानबिंदू झाली होती'' (पृ. 31).

पहिल्या पंचवार्षिक योजनेविषयी धनंजयरावांचे परखड मत ''खऱ्या अर्थाने हे नियोजनच नव्हे'' असे होते (गाडगीळ,ध.रा. *पंचवार्षिक योजनेचे समीक्षण,* 1951). या पार्श्वभूमीवर नंतर मिळालेली संधी त्यांना स्वाभाविकपणेच स्वागतार्ह व उत्साहदायक वाटली असणार. त्यावेळचे त्यांचे उद्‌गार सोवनींनी उद्‌धृत केले आहेत. धनंजयराव सोवनींना म्हणाले :

''अर्थशास्त्रज्ञांना आतापर्यंत कधीही नव्हती एवढी धोरण ठरविण्याची संधी आता आली आहे. ही संधी तर साधली पाहिजेच. परंतु भविष्यकाळाकडे नजर देऊन ही अनुकूलता कशी टिकेल याकडे लक्ष दिले पाहिजे'' (पृ. 30). यासाठी तरुण अर्थशास्त्रज्ञांनी पुढे आले पाहिजे अशी धनंजयरावांची अपेक्षा होती.

आज काल इतका अनुकूल राहिलेला नाही. सोवनींचे विधान मान्य करावयाचे तर धनंजयरावांनी नियोजन आयोगाची सूत्रे हातात घेतली त्याचवेळी नियोजन आयोगाचा पूर्वीचा दरारा राहिलेला नव्हता आणि ते नखदन्तगलित झाले होते. (पुढे राजीव गांधींनी तर "Look at that bunch of jokers" असा नियोजन आयोगाच्या सदस्यांचा उपहासात्मक निर्देश केला.)

राजकीय परिस्थिती प्रतिकूल आहे याची जाण धनंजयरावांना होती. त्यांच्या उपाध्यक्ष पदाच्या पहिल्याच वर्षात मी एका अन्य समितीच्या कामानिमित्त दिल्लीला गेलो होतो. सांगलीच्या चिंतामणराव वाणिज्य महाविद्यालयाचा मी तेव्हा प्राचार्य होतो. आमच्या महाविद्यालयात धनंजयरावांनी व्याख्यान द्यावे अशी विनंती मला त्यांना करावयाची होती. जे.पी. नाईक यांचा आधार घेऊन मी धनंजयरावांना त्यांच्या कार्यालयात भेटलो. धनंजयरावांनी माझी विनंती अगत्यपूर्वक मान्य केली.(पुढे तो योग आला नाही हा भाग वेगळा.) त्यावेळी नियोजनाच्या सफलतेविषयींची त्यांच्या मनातील साशंकता त्यांनी स्पष्टपणे बोलून दाखविली. त्यांचे नेमके शब्द मला अजूनही आठवतात. (पुण्यात त्यांच्यासाठी झालेल्या शोकसभेत मी त्यांचा उच्चारही केला होता.) धनंजयराव म्हणाले होते : "It is a very difficult situation but there is no situation that cannot be saved. But you must have the will to save it. All of them are perfect escapists with the exception of Morarji."

राजकीय निर्धाराचा अभाव हे भारताचे गत अर्धशतकातील जवळजवळ व्यवच्छेदक लक्षणच बनले आहे. या ढिसाळ परिस्थितीचे मूळ मात्र केवळ नेतृत्वात शोधून भागणार नाही. समाजाच्या सर्व स्तरातील परिस्थिती याला कारणीभूत आहे असे मला आता वाटते. धनंजयराव या निष्कर्षापर्यंत येऊन पोहोचले होते असे मला वाटत नाही. परंतु त्यांना सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय अंगांचे भान होते आणि सार्वत्रिक सर्वांगीण समाजप्रबोधन हे विचारशीलांचे कर्तव्य आहे अशी त्यांची धारणा होती. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याविषयींचा त्यांचा आदरभाव आणि त्या दोघांनाही परस्परांविषयी वाटणारा जिव्हाळा हे यांचे एक स्पष्ट गमक आहे. धनंजयरावांच्या कन्या सुलभा ब्रह्मे यांनी आपल्या लेखात निवृत्तीनंतर रयत शिक्षण संस्थेच्या कार्यात अधिक वेळ देता येईल अशी धनंजयरावांची निवृत्तीकडे पाहण्याची दृष्टी होती, असा निर्देश केला आहे तोही या संदर्भात महत्त्वाचा आहे.

**सर्वस्व पणाला**

इतकी बिकट परिस्थिती असताना धनंजयरावांनी नियोजन आयोगाचे उपाध्यक्षपद का स्वीकारले ? विचारशीलांपुढे (कृतिशील विचारवंतांपुढे) सतत उभी ठाकणारी अशी ही समस्या आहे. रॉबर्ट फ्रॉस्टनी या परिस्थितीचे वर्णन केले आहे :

" How difficult it is to remain from being a king when it is in you and in the situation. And this is half the trouble with the world. Or more than half, I am half-inclined to say."

नेपोलियनच्या कालखंडात "I alone can save England and no one else can" या आत्मविश्वासाने व निर्धाराने यंगर पिटनी (Younger Pitt) वयाच्या चोविसाव्या वर्षी इंग्लंडचे पंतप्रधानपद स्वीकारले होते. धनंजयरावांचे भारतीय आर्थिक संकटाविषयींच्या संदर्भात असेच निदान होते/असावे. त्रयस्थ म्हणून विचार केला तरीही त्यांच्याहून अधिक समर्थ अशा अर्थशास्त्रज्ञाची निवड त्या जागेसाठी होणे अशक्यप्राय होते.

अशा परिस्थितीत सूत्रे हाती घेणे याला आत्मविश्वास म्हणावे की अहंकार म्हणावे ? या संदर्भात, आत्मविश्वास व अहंकार यामधील सीमारेषा सूक्ष्म असते या स्वरुपाचे विधान सोवनी यांनी केले आहे. त्यांच्या विवेचनाचा कल ही सूक्ष्मरेषा धनंजयरावांना सांभाळता आली नाही असा दिसतो. अशा विषयींचा निर्णय 'प्रमाणमन्तः करण प्रवृत्तयः' या पद्धतीनेच करावा लागतो. अन्तःकरणप्रवृत्ती अध्ययनविषय व्यक्तीची व अभ्यासकाचीही. माझा कल धनंजयरावांना या सूक्ष्म सीमारेषेचे आत्मभान होते आणि ही सीमारेषा अहंकाराच्या दिशेने ओलांडून जाऊ नये अशी त्यांच्यातील विचारशीलाची आंतरिक मनःप्रकृती होती.

*Making of the Man* मध्ये या संदर्भात वि.म.

दांडेकर यानी लिहिलेला परिच्छेद मला पूर्णपणे मान्य आहे. दांडेकर लिहितात :

" It is against this background that Professor Gadgil has accepted the responsibility of the deputy chairmanship of the planning commission. He is aware that there lies an uphill task ahead and that the task is as much political as it is economic. He is also aware of the hostility with which his appointment will be received in certain quatrers. He is also aware that he has much reputation to lose. Nevertheless, he has accepted the task with a sense of national dedication and he has not taken it up lightly. In this his chief advantages are his profound knowledge of the Indian economy at all levels, his enduring faith in a system of social values and goals, and above all, his pragmatism. He makes a sharp distinction between his role as a sharp critic of Government's social and economic policies and his role as a person charged with the responsibility of actively shaping these policies. It would puzzle many as to how he has been able to maintain this distinction" (पृ. 22).

दांडेकराना वरील शेवटच्या वाक्यात पडलेल्या कोड्याचे एक उत्तर मला सुचते. धनंजयरावांच्या विचारशील या माझ्या मनातील प्रतिमेला ते मिळतेजुळते आहे. रवीन्द्रनाथांच्या कर्ण-कुन्ती संवादात कर्ण (पांडवांच्या बाजूला त्याने यावे या कुन्तीच्या विनंतीला) नकार देताना एकच आशिर्वाद कुन्तीला मागतो : ''धनलोभाने, यशलोभाने वा राज्यलोभाने मी माझ्या कर्तव्यापासून प्रणश्रयाने च्युत होणार नाही एवढाच केवळ एक आशिर्वाद तू मला दे.''

धनंजयरावाना धनाचा लोभ नव्हता, सत्तेचा, राजपदाचाही नव्हता याला त्यांचे संपूर्ण जीवन स्पष्ट साक्ष आहे. या दोन्ही लोभांपेक्षा 'यशलोभ' हा अधिक आकर्षक व तीव्र असू शकतो. हा लोभही त्याना नव्हता हे दांडेकरांच्या "He is also aware that he has much reputation to lose," या वाक्यावरून स्पष्ट होते. देशकालपरिस्थितीत हे आव्हान आपण स्वीकारले पाहिजे या वृत्तीनेच त्यानी ते पद स्वीकारले.

नंतर जे घडले आणि जो ताण त्याना सहन करावा लागला त्या संदर्भात तर या कर्तव्यपूर्तीसाठी त्यानी आपले प्राणही पणाला लावले होते, असे म्हणावे लागेल. त्या एकूण घटनेविषयी कोणी लिहिले आहे असे माझ्या वाचनात नाही. परंतु तो एक महत्त्वाचा अभ्यासाचा विषय होऊ शकेल. धनंजयरावांच्या मन:प्रकृतीच्या मानसशास्त्रीय विश्लेषणाच्या दृष्टीने आणि त्या कालखंडातील भारतीय आर्थिक-राजकीय ताणतणावांच्या सम्यक् आकलनासाठीही. या घटनेचा हिमगिरी आज इतिहाससागरात तरंगत आहे. त्याचे सूचक टोक पाहावयाचे असल्यास *Writings and Speeches of Professor D.R. Gadgil on Planning and Development (1967-1971), (Ed. A.R. Kamat, 1973)* हा ग्रंथ पाहावा. त्यात नियोजन मंडळाच्या अध्यक्ष म्हणून पंतप्रधान इंदिरा गांधींनी धनंजयरावांची केलेली भलावण आहे त्याला त्यावेळीच धनंजयरावानी दिलेले उत्तर आहे.

यानंतर चारच दिवसांनी धनंजयरावाना आपला राजीनामा सादर करावा लागला. ग्रंथाच्या प्रस्तावनेतही "The inclusion of the Prime Minister's Tribute needs neither explanation nor apology, एवढाच निर्देश आहे. हिमगिरीचे हे टोक आहे.

तीन दशकांचा काल आता उलटला आहे. या घटनेचा सखोल अभ्यास आता झाला पाहिजे. धनंजयरावाना त्यातून न्याय मिळेल आणि भारताच्या आर्थिक इतिहासाच्या एका महत्त्वपूर्ण कालखंडाचे ते उपयुक्त अध्ययनही ठरेल.

## अर्थशास्त्रज्ञांचा आदर्श

अर्थशास्त्रज्ञ हा समाजमनस्क असला पाहिजे. ही नामवंत अर्थशास्त्रज्ञांची प्रथमपासूनची धारणा आहे. गांधीजींनी कार्यकर्त्यांना दिलेला मंतरलेला ताईत ("I will give you a talisman .....") आल्फ्रेड मार्शलनी त्यांनी देण्याच्या आधीच उचललेला होता. मार्शल यांनी लिहिले आहे : ''एकदा मी बाजारात गेलो असताना एका दीनदरिद्री दुःखी माणसाचे चित्र माझ्या नजरेला आले. मी ते विकत घेतले आणि माझ्या अभ्यासिकेत लावले. जेव्हाजेव्हा अर्थशास्त्राच्या अभ्यासाचा मला कंटाळा येई तेव्हातेव्हा मी त्या चित्राकडे पाही. माझा अभ्यास कदाचित या माणसाचे दुःख कणभर तरी कमी करावयास काम करील असे मनात येऊन मी पुन्हा अभ्यासाकडे वळे,'' अशा आशयाचे ते विधान आहे.

धनंजयरावांना असे चित्र अभ्यासिकेत लावण्याची गरज नव्हती; ते सदैव त्यांच्या मनात ते वागवीत असत. त्यासाठी त्यांनी भारतातील आर्थिक प्रश्नांचा वस्तुनिष्ठ, शास्त्रशुद्ध अभ्यास केला आणि आर्थिक व्यवहारात महत्त्वाचे प्रयोगही केले. सहकार क्षेत्रातील त्यांचे कार्य हे त्यांच्या सर्वांगीण विचारशीलतेचे सर्वोत्कृष्ट उदाहरण आहे. जनसामान्यांचा उद्धार व्हावा, लोकशाहीची पाळेमुळे खोलवर रुजावीत, ग्रामीण भाग समर्थ व स्वावलंबी व्हावा ही त्यांच्या प्रयत्नामागची प्रेरणा होती. त्यांनी मार्गदर्शन केले, आवश्यक तेथे व आवश्यक तितकाच पुढाकार घेतला, ग्रामीण नेतृत्व विकसित होण्यासाठी स्वतःमागे राहून मदत केली. ही सर्व विचारशीलतेचीच लक्षणे आहेत.

आपल्या प्रयत्नाने वाढीस लागलेल्या अशा प्रयत्नाचे ते परखड परीक्षणही करू शकत ही धनंजयरावांची विशेषता होती. सहकार क्षेत्राविषयीही 1967 मध्ये त्यांनी लिहिले :

''प्रगतीबरोबर अनेक नवीन समस्याही उत्पन्न झाल्या आहेत. प्रगत राज्यांत मोठ्या सहकारी संस्था या सामाजिक व आर्थिक सत्तांची केंद्रस्थाने बनल्यासारख्या झाल्या आहेत. त्यामुळे सत्तेचे केन्द्रस्थान काबीज करणे किंवा ताब्यात ठेवणे याकरिता होणाऱ्या उलाढाली आणि त्यातून निर्माण होणारे अनिष्ट प्रघात यांचा उपसर्गही सहकारी संस्थांस पोहोचू लागला आहे. सहकारी लोकराज्य निर्मितीकरिता संघासंघांत आणि स्तरास्तरांत पूर्ण सहकार्य हवे ही गोष्ट अजून अनेक संस्थाचालक व संघचालक यास पटली आहे असे दिसत नाही. शिवाय आर्थिकदृष्ट्या लवकर यशस्वी झाल्यामुळे तत्त्वाचा विसर पडावा असे अनेक ठिकाणी होताना दिसते. यश सुलभतेने मिळाल्यामुळे कार्यक्षमतेवरील कटाक्षही ढळलेला दिसतो. या सर्व समस्यांवर एकच उपाय म्हणजे शिक्षण आणि चिंतन यावर भर देणे, सहकारी तत्त्वे, त्यांचे व्यावहारिक स्वरूप, सहकारी लोकराज्य निर्मितीकरिता सर्वत्र आवश्यक वृत्ती व पथ्ये याविषयी सतत विचार व चर्चा होणे आणि त्यांचे शिक्षण मिळणे हे अत्यावश्यक आहे. संचालक व सभासद, सेवक व तंत्रज्ञ, सर्वांसच तात्त्विक, तांत्रिक व व्यावहारिक शिक्षण योग्य प्रमाणात सतत मिळत राहण्याची दक्षता घेतली पाहिजे.''

''एका दृष्टीने नवीन समस्या ही प्रगतीचीच लक्षणे आहेत असे मानावयास हरकत नाही. झपाट्याने जी वाढ झाली त्यातूनच त्या निर्माण झाल्या; पण याबरोबरच हेही लक्षात ठेवले पाहिजे की, यावर उपाययोजना वेळीच झाली नाही तर सहकाराची प्रगती खुंटेल अगर काही विकृती त्यातून निर्माण होईल. हा धोका टाळण्यासाठी सतत झटणे हे आपणा सर्वांचे आद्य कर्तव्य आहे'' (गाडगीळ, ध.रा. *सहकारी लोकराज्य*, प्रस्तावना).

हा उतारा मला या लेखाच्या संदर्भात अनेक दृष्टींने महत्त्वाचा वाटतो. याचे तपशीलवार विवरण मी करत नाही आणि 'अर्थसंवाद'च्या वाचकांसाठी तसे करणे आवश्यकही नसेल अशी मला आशा आहे. विचारशीलांच्या भूमिकेचे यात अप्रत्यक्षपणे परंतु स्पष्टपणे दिग्दर्शन आहे. धनंजयरावांच्या विचारवंताच्या भूमिकेपलीकडे जाणाऱ्या विचारशीलतेच्या भूमिकेचेही

यात स्पष्ट प्रतिबिंब उमटलेले आहे.

यानंतर धनंजयरावांनी नियोजन आयोगाचे उपाध्यक्षपद लवकरच स्वीकारले. ही प्रस्तावना त्यांनी दि. 18 फेब्रुवारी, 1967 रोजी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू असताना लिहिली. केवळ सहा सात महिन्यांचेच अंतर मध्ये आहे. धनंजयरावांची तत्कालीन विचारधारा समजून घेण्याच्या दृष्टीनेही या प्रस्तावनेचे महत्त्व मला वाटते.

## एक कोडे

म्हटले तर हे एक कोडे आहे, म्हटले तर नाही. Gokhale Institute of Politics and Economics नंतर 'गोखले अर्थशास्त्र संस्था' अशी मर्यादित का झाली असावी असे हे माझ्यापुढील कोडे आहे. याची सहज काही उत्तरे अनेकांना सुचणे शक्य आहे, तशी ती मलाही सुचतात; परंतु त्यांनी माझ्या मनाचे समाधान होत नाही.

संस्था गोपाळ कृष्ण गोखले यांचे नामाभिधान धारण करणारी. गोखले हे त्यांच्या पिढीतले विचारशीलांचे गुरू. उदारमतवादी, प्रखर राष्ट्रनिष्ठ, लोकशाही वृत्तीचे, त्यागी व नेमस्त वृत्तीचे. हे गुण त्यांनी आपले गुरू न्यायमूर्ती रानडे यांच्याकडून घेतले. उलट दिशेने महत्त्वाची घटना ही की महात्मा गांधींनी गोखले यांना आपले राजकीय गुरू म्हणून प्रकटपणे स्वीकारले. ''ही प्रतारणा का करता, तुम्ही तर खरे टिळक पंथाच्या वृत्तीचे '' असा आक्षेप गांधीजीवर घेतला गेला त्यावेळी गांधीजींना दुःख झाले आणि त्यांनी पुन्हा एकदा आपल्या भूमिकेचे पुनरुच्चारण आणि विवरण केले.

त्याचे येथे महत्त्व काय ? महत्त्व हे की, या नावाच्या स्वीकारात सार्वजनिक जीवनातील सर्व शाखांतील क्षेत्रांचे सूचन होते. धनंजयरावांना स्वतःच्या जीवनकार्यात ते मान्य होते. संस्थेची घटना ठरविण्यात धनंजयरावांचा महत्त्वाचा सहभाग होता, असलाच पाहिजे. त्यामुळे Politics हा संस्थेच्या नामाभिधानातील शब्द सहजगत्या आणि काहीशा अनवधानाने आला असे तर म्हणता येणार नाही. 'Political economy' या अर्थशास्त्रासाठी पूर्वी वापरल्या जात असलेल्या अभिधानाच्याही पलीकडे जाणारा आशय Politics and Economics या स्पष्ट शब्दरचनेत आहे.

हे सर्व असताना संस्थेची वाढ केवळ अर्थशास्त्राच्याच दृष्टीने एकांगी अशी कशी झाली ? इतकी की, मराठीत 'गोखले अर्थशास्त्र संस्था' असाच तिचा संस्थेने केलेल्या निर्देशातही निर्देश होऊ लागला. यामागे काही विचारमंथन झाले असल्यास मला माहीत नाही आणि ते कोणत्या स्वरुपाचे आणि कसे होऊ शकेल याची कल्पनाही करता येत नाही. सामाजिक व राजकीय अंगे ही आर्थिक समस्येच्या आकलनाच्या व उकल करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची असतात याचे स्पष्ट भान धनंजयरावांना असतानाही असे कसे घडले ? त्या तोलामोलाचे त्या शाखांतील तज्ज्ञ उपलब्ध नव्हते म्हणून हे असे झाले असेल काय ? एकूण साधन-उपलब्धींच्या मर्यादात आणि अर्थशास्त्रात अध्ययनाने वेगाची स्वयंगती घेतल्यानंतर राज्यशास्त्र मागे राहिले आणि ते शेवटी पूर्णपणे बाजूलाच पडले असे घडले असेल काय ? या समस्यांना उत्तरे शोधण्याचा प्रयत्न कधीच का झाला नाही ? आंतरविद्याशाखीय (inter-disciplinary) अध्ययनाचा जो head start संस्थेने नामकरण विधीपासून मिळविला होता तो हरपला एवढी गोष्ट मात्र खरी.

## विनम्र अभिवादन

धनंजयरावांचे दर्शन करडे आणि पाहणाऱ्याच्या मनात दरारा निर्माण करणारे असे. 'Suffer fools gladly' अशी त्यांची वृत्ती नव्हती आणि ते करण्यासाठी वेळही नव्हता. माझ्यासारख्याला ते 'अधृष्यश्चाभिगम्यश्च' या कोटीचे होते. जवळ जावेसे तर वाटे परंतु हिम्मत तर होत नसे. मी, अ.भि. शहा, ग.प्र. प्रधान त्यावेळी तरुण होतो. आम्हा तिघांशीही त्यांचे वागणे आपुलकीचे, वडीलकीच्या स्नेहाचे होते.

विद्यापीठात अभ्यास मंडळाच्या बैठकीसाठी बाहेर गावाहून प्राध्यापक येतात त्याला जोडून या प्राध्यापकांची वैचारिक चर्चात्मक बैठकही घेता येईल अशी कल्पना मी त्यांच्यासमोर मांडली ती त्यानी तात्काळीच स्वीकारली आणि तिचा काही प्रयोगही करून पाहिला. तसेच आम्ही तिघांनी प्राध्यापक संघटनेच्या वतीने 'Integrated Lectures Series' पुण्यात आयोजित केली होती. तिलाही त्यानी उत्साहाने पाठिंबा दर्शविला. त्या मालेत स्वत: अस्खलित मराठीत काही व्याख्यानेही दिली. विविध विद्याशाखांच्या प्राध्यापकांनी आपापल्या शाखेचा सुजाण श्रोत्यांना परिचय करून द्यावा अशी त्या मालेची योजना होती. त्या मालेला प्रतिसादही चांगला मिळाला. सुमारे चाळीस व्याख्याने झाली. दीडदोनशे लोकांची उपस्थिती असे.

एक माझा काहीसा वाह्यात विनोदही त्यानी कौतुकाने स्वीकारल्याचे माझे ज्येष्ठ सहकारी व स्नेही टी.एस. जोशी यानी मला सांगितले. सहज गप्पात धनंजयरावांच्या नावाच्या मागे डॉ. ही उपाधी लावली जाते हे कितपत योग्य आहे असा विषय निघाला होता. मी म्हणालो : D.R. गाडगीळांच्या बाबत हा प्रश्नच उपस्थित होऊ शकत नाही. "He has the initial advantage." टी.एम. जोशींनी हा विनोद पुढे धनंजयरावांच्या कानी घातला होता. या अशा त्यांच्या वृत्तीमुळे धनंजयरावांपासून दूर राहिले तरी ते जवळचे वाटत.

असो. धनंजयरावांच्या विषयी लिहावे तितके थोडेच होईल. त्यांच्या विद्वत्तेइतकीच त्यांची विचारशीलता मला आदरणीय आणि अधिक आकर्षक व प्रेरणादायी वाटते.

शेवटी कालिदासाच्या एका श्लोकाचा मुक्त अनुवाद करून हा लेख संपवितो.

गुणमहात्म्य तुझे गाता, गुणांचा पार ना दिसे ।
श्रमलो, नुरले त्राण, आता मी मूक होतसे ।।

कालिदास व धनंजयराव दोघेही मला क्षमा करतील अशी मला आशा आहे.

## संदर्भ टीपा

(टीप : हा लेख मुख्यत्वेकरून व्यक्तिगत अनुभवांवर व निरीक्षणावर आधारित आहे. ते असे :

(1) माझे अत्यंत अल्प व्यक्तिगत अनुभव.

(2) सोवनी, नी.वि., *माझे गुरू धनंजयराव गाडगीळ.*

(3) Dandekar, V. M., *Dhananjaya Ramchandra Gadgil : Making of the Man*, गोखले अर्थशास्त्र संस्था.

(4) ब्रह्मे, सुलभा, धनंजयराव गाडगीळ-जन्मशताब्दी निमित्त, लेख, प्रकाशन : *धनंजय* या रयत शिक्षण संस्थेच्या धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा या संस्थेचे वार्षिक, एप्रिल, 2000.

(5) धनंजयराव गाडगीळ यांचे ग्रंथ, लेख, आदी.)

**'अर्थसंवाद' पूर्वीच्या वर्षांचे अंक**

'अर्थसंवाद' चे 1992-93 पासून पुढील वर्षांचे मर्यादित अंक उपलब्ध आहेत. ज्या व्यक्ती, संस्था आणि ग्रंथालयांना या वर्षांचे प्रत्येकी चार अंकांचे संच पाहिजे असतील त्यानी कार्यवाहांकडे प्रत्येक वर्षासाठी रु. 100/- पाठवून मागणी करावी. मर्यादित संच उपलब्ध असल्याने 'प्रथम येणाऱ्यास प्रथम संधी' यानुसार अंक पुरविले जातील.

**आ. गो. पुजारी**
**कार्यवाह – खजिनदार**

# सामाजिक - आर्थिक अभ्यासासाठी संशोधन पद्धती व सर्वेक्षणाच्या तंत्राचा विकास : गाडगीळांचे योगदान

द.पां. आपटे ※

गाडगीळांच्याबरोबर काम करण्याची, त्यांच्यापासून शिकण्याची संधी मला योगायोगानेच मिळाली. वास्तविक मी वाणिज्य शाखेचा पदवीधर. 1949 मध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नाव नोंदविण्याचे मी ठरविले. त्यावेळच्या अभ्यासक्रमानुसार एम.कॉम. पदवीसाठी पहिल्या भागाकरिता प्रबंध लिहावा लागे. यासाठी गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या ग्रंथालयाचा उपयोग होईल आणि त्याबरोबर संस्थेत काम करण्याची संधी मिळाली तर नंतरच्या कालात त्या अनुभवाचा फायदा मिळेल असा विचार करून एप्रिल 1949 मध्ये मी संस्थेमध्ये कामावर रुजू झालो. पहिली चार वर्षे वि.म. दांडेकर यांच्याबरोबर, विशेषकरून 1951-52 मध्ये, रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या भारताच्या ग्रामीण भागातील पत पाहणीच्या कामात मी भाग घेतला. त्यानंतर पुणे शहराच्या पुनर्पाहणीमध्ये नी.वि. सोवनी यांच्याबरोबर काम केले. 1954 ते 1959 मध्ये संस्थेमधून काहीजण पुणे विद्यापीठाच्या पदवीपूर्व शिक्षण केंद्रावर (म्हणजे स.प. महाविद्यालयामध्ये) शिकवावयास जात असू. गाडगीळ, सोवनी, दांडेकर व सौ. दांडेकर आणि न.वि. नामजोशी यांच्याबरोबरच, बी.ए. अर्थशास्त्र अभ्यासक्रमातील एक विषय शिकविण्यासाठी, गाडगीळांच्या सांगण्यावरून, मीही शिकविण्यामध्ये सहभागी झालो. या पाच वर्षांच्या कालामध्ये माझा गाडगीळांशी मर्यादित संबंध होता. मात्र विविध संशोधन प्रकल्पांच्या आराखड्यांवरून खर्चाचे अर्थसंकल्प करणे, संस्थेने हाती घेतलेल्या विविध प्रकल्पांचे प्रगतीसंबंधीचे व खर्चाचे अहवाल तयार करून प्रकल्पासाठी देणगी देणाऱ्यांना पाठविणे, संस्थेचा वार्षिक अर्थसंकल्प, वार्षिक हिशोब व वार्षिक सभेची तयारी करणे यासारख्या कामांमुळे मला अधूनमधून

※ *अध्यक्ष, प्रोफेसर यामातो कावाकामी फौंडेशन, पुणे आणि भूतपूर्व कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे.*

गाडगीळाना भेटावे लागे. 1951 नंतर संस्थेची हळूहळू वाढ होऊ लागली. त्यापूर्वी आम्ही जेमतेम पंधराजण संस्थेच्या पटावर असू.

1954 मध्ये केन्द्रीय कृषी मंत्रालयाने संस्थेमध्ये कृषी अर्थशास्त्र संशोधन केन्द्र निर्माण करून त्यासाठी वार्षिक अनुदान देण्यास सुरुवात केली. पंचवार्षिक योजनांच्या अमलबजावणीमुळे आर्थिक बदल ग्रामीण भागात कशामुळे होतात, बदल कसे घडून येतात, त्याचा फायदा कोणाला मिळतो याबरोबरच जे फायद्यापासून वंचित राहतात त्याची कारणे यासारख्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी एक संशोधन प्रकल्प या केन्द्रामध्ये सुरुवातीस घेतला. या कामासाठी केन्द्रीय कृषी मंत्रालयाने जी समिती नेमली होती तिचे गाडगीळ सभासद होते. त्या सुमारास संचालकाना मदतनीस (पी.ए.टू डायरेक्टर) म्हणून काम करण्याची जबाबदारी माझ्यावर पडली. काही ना काही कामासाठी गाडगीळाना परगावी जावे लागे. त्यामुळे त्यांच्या गैरहजेरीत या प्रकल्पाच्या कामाची जबाबदारी मला सांभाळावी लागे. 1954-55 ते 1958-59 या पाच वर्षात दरवर्षी महाराष्ट्र व कर्नाटकातील पाच-सहा जिल्ह्यांमध्ये सर्वेक्षणाचे काम हाती घेण्यात येई. त्यासाठी एम.ए. अर्थशास्त्र पदवी घेतलेल्यांची संशोधन सहायक म्हणून नेमणूक करण्यात येत असे. दरवर्षी कामासाठी कोणते जिल्हे निवडावयाचे, त्या जिल्ह्यातील कोणती गावे अभ्यासाला योग्य ठरतील यासंबंधीची माहिती गोळा करणे, संशोधन सहायकांना प्रशिक्षण देणे, जेथे त्यांचे काम चाले त्या गावांना भेटी देऊन त्यांच्या कामाची प्रगती, त्यामध्ये येणाऱ्या अडचणी व शंकांचे निरसन करणे, जर त्यामध्ये काही त्रुटी असतील तर त्या दाखवून देणे हे काम मी पाहात असे. वर्षभर काम झाल्यावर प्रश्नावलीमध्ये गोळा केलेल्या माहितीचे व आकडेवारीचे वर्गीकरण करण्याचे त्याबरोबरच अहवाल लेखनाचे काम हाती घेण्यात येई. त्या कामाकडेही मला लक्ष पुरवावे लागे.

या काळातच, 1958 मध्ये संस्थेचा कुलसचिव म्हणून, माझ्या संमतीने गाडगीळानी माझी निवड केली. त्यामुळे आमच्यात जास्तच जवळीक निर्माण झाली. माझा सहभाग जास्त करून सर्वेक्षणाच्या कामामध्ये असल्याने प्रस्तुत लेखनासाठी 'सामाजिक-आर्थिक संशोधन पद्धती आणि सर्वेक्षणाच्या तंत्राचा विकास करण्यामध्ये गाडगीळांचे योगदान' हा विषय निवडला आहे. गाडगीळांच्या बरोबर काम करताना जे अनुभव आले, त्यानी केलेल्या संशोधन पद्धतींचा वापर आणि सर्वेक्षण तंत्राचा आपल्या देशातील परिस्थितीला अनुरूप असा विकास करण्यामध्ये त्यांचे योगदान यासंबंधी काही माहिती वाचकांपुढे सादर करण्याचे मी ठरविले.

लेखाच्या सुरुवातीच्या भागात गाडगीळांचे व्यक्तिमत्व सादर केले आहे, कारण त्यांचे काम विविधस्पर्शी होते. सामाजिक-राजकीय-आर्थिक-सांस्कृतिक समस्यांवर तोडगा काढण्यासाठी ठोस मते, योजना मांडण्यासाठी संबंधित विषयाचे पूर्ण आकलन, वाचन करून, आकडेवारी मिळवून तिचे वर्गीकरण-विश्लेषण करून घेणे आवश्यक असते. जर आकडेवारी उपलब्ध नसेल तर ती गोळा करावी लागते. संशोधनाचे काम समृद्ध व्हावयाचे असेल तर तरुण संशोधकांना गाडगीळांच्या विविध कामांचा परिचय करून देणे उपयुक्त ठरेल म्हणून काहीशा तपशीलात त्याबद्दल लिहिले आहे. अनुसंधात्याचे व्यक्तिमत्व, शिक्षण, अनुभव, पोशाख व त्यांचेमध्ये कोणते गुण असावे हे गाडगीळांच्या उदाहरणावरून शिकावयास मिळते.

गाडगीळांचा जन्म 10 एप्रिल, 1901 रोजी झाला. वयाच्या सोळाव्या वर्षी केंब्रिज विद्यापीठात प्रवेश मिळवून त्यानी एम.लिट. पदवी मिळविली. 1850-1914 *या कालातील हिंदुस्थानचा आर्थिक विकास* हा विषय त्यानी प्रबंधासाठी निवडला. हा ग्रंथ प्रकाशित झाल्यापासून आजवर या विषयावरचा प्रमाणभूत ग्रंथ म्हणून मानला जातो. 1923 मध्ये भारतात परत आल्यानंतर काही काळ सरकारी नोकरी व त्यानंतर सुरत येथील महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून काम करण्यात गेला. त्यानंतर 1930 साली गोखले

अर्थशास्त्र संस्थेचे पहिले संचालक म्हणून त्यानी जबाबदारी स्वीकारली. पाश्चिमात्य देशात सामाजिक-आर्थिक संशोधन पद्धतींचा भरपूर विकास झाला होता. या विषयावर काही अनुभवी संशोधकांनी ग्रंथ प्रकाशित केले होते. या पद्धती आपल्या देशामध्ये जशाच्या तशा वापरणे शक्य नव्हते. म्हणून भारतातील भौगोलिक, आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा विचार करून, वेगवेगळ्या विषयांचा अभ्यास करण्यासाठी योग्य अशा संशोधन पद्धती गाडगीळांनी विकसित केल्या. खास करून सर्वेक्षण पद्धतीच्या विकासातील त्यांचे योगदान मला महत्त्वाचे वाटते. खरे तर त्यानी या विषयावर एखादा ग्रंथ लिहिला असता तर तो खूपच मौल्यवान व उपयुक्त ठरला असता. दुर्दैवाने असा ग्रंथ लिहिला गेला नाही. संस्थेमध्ये 1954 पासून संशोधन कामाचे शिक्षण देण्यासाठी एक वर्षाचा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. त्यामध्ये गाडगीळ 'संशोधन पद्धती ' हा विषय शिकवीत असत. त्यावेळी किंवा सर्वेक्षणाच्या संदर्भातील चर्चेच्या काही वेळी डोळे मिटून, मान किंचित मागे ठेऊन ते बोलत असत. ऐकताना आम्हाला असे वाटे की ज्या भागाविषयी, ज्या समाजाविषयी ते बोलत आहेत तो भौगोलिक-राजकीय प्रदेश, त्याचा इतिहास, तेथील शेती व पिके, समाज आणि संस्कृती याचा चलत चित्रपट त्याना दिसत असावा. तरुण संशोधकांना ते आवर्जून सांगत की, संशोधन करण्यासाठी केवळ एखाद्या विषयावर वाचन केन्द्रित न करता ज्या क्षेत्रातील विषयाचे संशोधन करावयाचे त्या प्रदेशाचे भौगोलिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक अशा विविध विषयांवरील वाङमय वाचणे अत्यंत आवश्यक आहे. संशोधकाला अशा विशाल बैठकीची आवश्यकता असते. जर त्यांचे वाचन समृद्ध नसेल तर त्यांचे हातून अर्थपूर्ण संशोधन होऊ शकणार नाही.

शिक्षणासाठी पावसहा वर्षे परदेशात राहिले तरी भारतात आल्यावर त्यानी पाश्चात्य पोशाखाचा त्याग केला. धोतर, गळाबंद लांब कोट व थोडीशी उंच काळी टोपी या पोशाखातच ते नेहमी असत. त्यांची ऊठबस ग्रामीण आणि नागरी समाजातील विविध घटकांबरोबर असे. शेतकऱ्यांशी चर्चा करताना ते त्यांच्याबरोबर सतरंजीवर बसून, समरस होऊन चर्चा करीत. त्याना समजेल अशा सोप्या भाषेत ते बोलत. इंग्लंडमध्ये शिकत असतानाच शुद्ध मराठीमध्ये लेख लिहिण्यास त्यानी सुरुवात केली. सर्वेक्षणासाठी जी प्रश्नावली वापरावयाची ती मराठीमध्ये छापलेली. संशोधनावरील अहवाल इंग्लिशमध्ये प्रसिद्ध केले, त्याबरोबरच सुरुवातीच्या कालातील काही अहवाल त्यानी मराठी भाषेत लिहून प्रसिद्ध केले. संशोधकाने पोशाख कसा करावा, समाजामध्ये कसे वागावे, ज्यांच्याशी चर्चा करावयाची त्यांची शैक्षणिक पातळी व समजण्याची कुवत लक्षात घेऊन त्यांच्याबरोबर कसा संवाद साधला पाहिजे, यासारख्या अनेक गोष्टी आम्ही त्यांच्यापासून शिकलो. तरुण संशोधकांशी बोलताना ते सांगत की, उत्तरदाते अशिक्षित असले तरीही ते जो व्यवसाय करतात त्याबद्दल त्याना तुमच्यापेक्षा जास्त माहिती असते. त्यांच्यापासून तुम्हाला शिकण्यासारखे पुष्कळ असते. त्यामुळे प्रश्नावली भरत असताना त्याना मोकळेपणाने बोलू द्यावे आणि त्यातील उपयुक्त, महत्त्वाची माहिती संशोधकाने लक्षात घ्यावी. अहवाल लेखन करताना ढिसूळ विधाने करू नयेत. जी आकडेवारी उपलब्ध असेल, जी खरी माहिती मिळाली असेल त्यावर आधारीत विधाने करावीत. ऐकीव माहिती पारखून घ्यावी आणि स्वतःची मते किंवा राजकीय मते बाजूला ठेवावी असे त्यांचे सांगणे असे.

ते वयाने इतरांपेक्षा मोठे आणि प्रकांड पंडित होते, तरीसुद्धा अशिक्षित किंवा कमी शिकलेल्या शेतकऱ्यांच्या बरोबर चर्चा करताना, सहकारी साखर कारखान्यांचे महत्त्व पटवून देताना, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये विविध राजकीय पुढाऱ्यांशी आणि जनतेशी बोलताना, आणि अशाच कितीतरी इतर प्रसंगी त्यानी संबंधितांच्या समवेत बैठकीवर बसून सोप्या मराठी भाषेमध्ये त्यांच्याशी संवाद साधला. भाषावार प्रांतरचनेमध्ये आणि भारतीय भाषांच्या विकासासाठीच्या चळवळीतही त्यांचा सहभाग होता. भारतीय भाषांच्या संदर्भात राष्ट्रीय पातळीवर एक चर्चासत्र पुण्यामध्ये

आयोजित करण्यात त्यानी पुढाकार घेतला. 1945 च्या सुमारास पश्चिम महाराष्ट्रामध्ये दुष्काळ पडला. त्याची प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेण्यासाठी आणि दुष्काळग्रस्तांना साहाय्य करण्यासाठी त्यानी 'पुणे जिल्हा दुष्काळ निवारण समिती' स्थापन केली. त्यावेळी मी महाविद्यालयीन विद्यार्थी होतो. माझ्या दोन मित्रांसह पुणे जिल्ह्यातील इंदापूर-भिगवण जवळच्या चारपाच खेड्यांतून आम्ही जरूर ती माहिती गोळा करून समितीला दिली. 1957 मध्ये बाबासाहेब आंबेडकरांच्या आदेशावरून, विशेषकरून महार समाजातील, अनेकांनी बुद्ध धर्माचा स्वीकार केला. त्याना 'नवबौद्ध' असे संबोधण्यात येऊ लागले. या बदलामुळे खेड्यांतील दैनंदिन जीवनावर, विशेषत: महार, मांग इत्यादींच्या, गावरहाटीत दूरगामी परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली. त्यांचे विचार आणि अडचणी समजाऊन घेण्यासाठी त्यांच्या प्रतिनिधींची बैठक गाडगीळानी आमच्या संस्थेत आयोजित केली. भूदान चळवळ, कोयना धरण प्रकल्प, तंबाखूपासूनचा कर्करोग यासारख्या विषयांचा अभ्यास हाती घेतला. 1960 साली जिल्हा परिषदांची निर्मिती झाल्यावर पंचायत समित्या व जिल्हा परिषदांच्या पदाधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण व चर्चासत्रे आयोजित केली. गाडगीळांबरोबरच दांडेकरांचाही या कामात मोठा सहभाग होता. 12 जुलै, 1961 रोजी पानशेतचे धरण फुटल्यामुळे पुणे शहरातून वाहणाऱ्या मुठा नदीचे पाणी आजूबाजूच्या घरांत शिरले. अनेक माणसे मेली. कच्ची घरे आणि त्यातील सामान पाण्याबरोबर वाहून गेले. राहिलेल्या घरांतील धान्य, कपडे, कागदपत्रे व इतर साधनसंपत्तीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. पूरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी तातडीने कारवाई करणे आवश्यक होते. म्हणून गाडगीळानी पुढाकार घेऊन संस्थेमध्ये चर्चासत्र आयोजित केले. हे सर्व तपशीलात नमूद केले आहे, कारण शिक्षक - संशोधकांचे कार्य समाजाभिमुख असले पाहिजे हे मला आवर्जून लक्षात आणून द्यावयाचे आहे.

महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना अहमदनगर जिल्ह्यामध्ये लोणी गावाजवळ उभा करण्यात त्यांचा प्रमुख सहभाग होता. त्या कारखान्याचे पहिले चेअरमन म्हणून त्यानी जबाबदारी स्वीकारली. संचालक मंडळाच्या काही बैठका गाडगीळांच्या सोयीसाठी संस्थेमध्येच आयोजित केल्या जात. थोडे विषयांतर. आजही माझ्या डोळ्यांपुढे विठ्ठलराव विखे उभे राहतात. मातीने तांबूस झालेले धोतर आणि कोट, डोक्याला पांढरा कोशा आणि पायामध्ये जाड चपला. बैठक सकाळी दहाचे सुमारास सुरू व्हावयाची. जेवणाच्या सुट्टीत गाडगीळ घरी जात. सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीच्या मुख्य इमारतीच्या सभोवतालच्या वरांड्याकडे पाठ नसलेली दोनचार बाके असत. धुवट फडक्यामध्ये बांधून आणलेली भाकरी खायला विठ्ठलराव एका बाकावर बसत. खाणे झाल्यावर तिथल्याच माठामध्ये भरून ठेवलेले पाणी पीत. आजकालच्या 'पंचतारांकित' संस्कृतीचा त्यावेळी जन्म झालेला नव्हता.

गाडगीळांच्या कार्यात सामाजिक बांधिलकी होती. विविध स्तरांवरील कार्यकर्त्यांशी त्यांचा संबंध होता. नवीननवीन उद्भवणाऱ्या प्रश्नांवर उपाययोजना करण्यासाठी ते सामाजिक, राजकीय पुढाऱ्यांच्या मदतीने पावले टाकीत. भाऊराव पाटलांच्या रयत शिक्षण संस्थेशी आणि व्यक्तिश: भाऊरावांशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता. पुणे विद्यापीठाच्या स्थापनेत त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. पुणे विद्यापीठ स्थापन होण्यापूर्वी मुंबई विद्यापीठाचे पदव्युत्तर केन्द्र संस्थेतच होते. संस्थेने अर्थशास्त्रातील अनेक विषयांवर दोन दशके केलेले काम विचारात घेऊन गोखले अर्थशास्त्र संस्था म्हणजेच पुणे विद्यापीठाचा अर्थशास्त्र विभाग असे समीकरण झाले. मात्र राज्यशास्त्र विषयामध्ये शिकविण्याचे किंवा संशोधनाचे फारसे काम संस्थेने न केल्यामुळे विद्यापीठामध्ये राज्यशास्त्र विषयाच्या विभागाची स्थापना करण्यात आली.

आणखी एका गोष्टीचा उल्लेख मला आवश्यक वाटतो. केंब्रिजमधील वातावरणात शिक्षण घेतल्याने

आणि संशोधन केल्याने तेथील पद्धतीचा त्यांच्यावर खोल ठसा उमटला होता. आमच्या संस्थेमध्ये संशोधन करणारे व शिकविणारे सुमारे चाळीसजण, त्यांच्या जोडीला माहिती गोळा करणारे, वर्गीकरण करणारे, ग्रंथालयात काम करणारे आणि इतर असे सुमारे शंभर कर्मचारी असत. गाडगीळांना भेटण्यामध्ये काही अडचण नसे. त्यांना काही वाचावयास दिले तर त्यांच्या सोयीनुसार ते तारीख व वेळ सांगत. दिलेल्या मुदतीपूर्वी वाचून आणि त्यावरील महत्त्वाचे मुद्दे लिहून ते तयार ठेवीत. चर्चेसाठी, सल्ल्यासाठी वेळ ठरवून भेटता येत असे. संस्थेतील कर्मचाऱ्यावर एखाद्या प्रकल्पाचे काम सोपविले तर सुरुवातीलाच ते प्रकल्पाची उद्दिष्टे, आराखडा, इत्यादींसंबंधी चर्चा करीत असत. प्रकल्पाचे काम सुरू झाल्यावर जर काही शंका, अडचणी असतील, काही चर्चा करावयाची असेल तरच संशोधकांनी त्यांना भेटावयाचे. ते स्वतःहून कोणालाच हटकत नसत किंवा कोणाच्याही खोलीत जात नसत. संशोधकांना संपूर्ण स्वातंत्र्य, मात्र प्रत्येकाने सोपविलेले काम जबाबदारीने, वेळेत पार पाडावे ही अपेक्षा. अपवाद एकच. संक्रान्तीच्या निमित्ताने ते आवर्जून प्रत्येक कर्मचाऱ्याला त्याच्या कामाच्या जागी भेटून तीळगूळ देत असत.

आता या लेखाचा मुख्य विषय. गाडगीळांना संशोधनाची, विशेषकरून शेती अर्थशास्त्र, सहकारी चळवळ आणि ग्रामीण विकास या विषयातील संशोधनाची, खास आवड होती. ज्यावेळी गोखले अर्थशास्त्र संस्थेची स्थापना करण्याचे ठरले त्यावेळी 'संशोधन कसे करावयाचे याचे प्रशिक्षण देऊन संशोधकांना तयार करावयाचे' हे संस्थेचे एक प्रमुख उद्दिष्ट होते. जेव्हा संस्थेची वाढ होऊ लागली आणि शासकीय खात्यांमध्ये व अन्य संस्थांमध्ये विविध विषयांवरील संशोधनाचे काम हाती घेण्यात येऊ लागले त्यावेळी प्रशिक्षणाची आवश्यकता प्रकर्षाने जाणवली. म्हणून 1954 मध्ये फोर्ड फौंडेशनच्या आर्थिक साहाय्याने संस्थेमध्ये प्रशिक्षणाचा एक वर्षाचा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. त्यामध्ये जे विषय शिकविले जात त्यात सामाजिक - आर्थिक संशोधनाचे शास्त्र आणि सर्वेक्षणाचे तंत्र या विषयावर गाडगीळ व्याख्याने देत असत, याचा उल्लेख याआधी मी केला आहे. त्यांच्या दीर्घ अनुभवामुळे त्यांची व्याख्याने महत्त्वपूर्ण आणि ऐकाविशी वाटणारी अशी होत असत. ती ध्वनिमुद्रित करून पुस्तकरूपाने प्रसिद्ध करावी असे आमच्या मनात होते, परंतु काही ना काही कारणामुळे ते काम पुरे झाले नाही. नीळकंठ रथ यानी गाडगीळांच्या हाताखाली पुणे विद्यापीठाच्या पीएच.डी. पदवीसाठी प्रबंध लिहिला. सुमारे 1955 सालाच्या आधीच्या जवळजवळ शंभर वर्षातील शेती अर्थशास्त्र विषयातील संशोधनात्मक कामाचा, विशेषकरून त्यासाठी जी संशोधन पद्धती वापरली त्याचा, समीक्षात्मक अभ्यास रथानी केला. माझ्या मते भारतामधील या विषयावरील तो एकमेव व उत्कृष्ट निबंध आहे. संस्थेच्या ग्रंथालयात त्याची प्रत आहे. दुर्दैवाने, तो प्रसिद्ध करण्याचे त्यानी मनावर घेतले नाही.

गाडगीळांनी संस्थेमध्ये विविध संशोधन विभाग स्थापन केले. शेती अर्थशास्त्राबरोबरच नागरी जीवनाचा अभ्यास, पुणे, कोल्हापूर, सोलापूर या शहरांच्या सामाजिक-आर्थिक सर्वेक्षणाचे प्रकल्प, ग्रामीण भागातील सामाजिक प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी एक स्वतंत्र विभाग, लोकसंख्याविषयक अभ्यास, उद्योगांचा आर्थिक अभ्यास, निविष्टी-उद्‌दिष्टी विश्लेषणाचा विभाग, आर्थिक इतिहास, आर्थिक भूगोल यासारख्या विभागांची स्थापना त्यांच्या कारकिर्दीत झाली. सुरुवातीच्या वर्षांमध्ये त्यानी पुणे शहर - परिसर व महाराष्ट्रात सर्वेक्षण प्रकल्प हाती घेतले. (आजही ज्यांना संशोधन करण्याची इच्छा असेल त्यांना त्यांच्या परिसरात अभ्यासासाठी नक्कीच चांगला विषय सापडू शकेल.) मराठी भाषेमध्ये गाडगीळानी त्यावरील काही अहवाल प्रसिद्ध केले. (प्रकाशन पहिले - *पुणे जिल्ह्यातील फळांची पैदास व विक्री*, 1936 व प्रकाशन दुसरे - *महाराष्ट्रातील मोटार वाहतूक*, 1936). मराठी भाषेमध्ये त्यानी व सोवनी यानी 1930 ते 1950 दरम्यान भारताच्या मुख्य आर्थिक प्रश्नांचे यथायोग्य

विस्तृत विश्लेषण करणारे लेख लिहिले. (संस्थेचे तिसरे प्रकाशन, *आर्थिक घडामोडी (1930-50)*, आणि चौथे प्रकाशन, *पंचवार्षिक योजनेचे समीक्षण,* 1951 मध्ये गाडगीळांनी प्रसिद्ध केले. *आर्थिक घडामोडींमध्ये* गाडगीळ यांचे पुढील विषयांवरील लेख समाविष्ट केलेले होते: (1) सुवर्णमानपद्धती ; (2) प्रचलित मंदीची कारणमीमांसा; (3) चांदीच्या भावातील चढउतार ; (4) सार्वराष्ट्रीय आर्थिक संबंधाची सद्यःस्थिती ; (5) हिंदी कंपन्यांची 'मॅनेजिंग एजन्सी' ऊर्फ व्यवस्थापक मंडळ पद्धती; (6) आर्थिक व्यवहाराचे नियोजन ; (7) मुंबई प्रांताची धान्य परिस्थिती कशी सुधारेल ? (8) युद्धकालीन नियंत्रणे व युद्धोत्तर योजना; (9) महाराष्ट्र विभाग सहकारी परिषद, पुणे - अध्यक्षीय भाषण ; (10) आपले आर्थिक धोरण व राजकीय भवितव्य, (11) हिंदी अर्थशास्त्राचा पाया. या विषयांवरून त्यांचे संशोधन-लेखन किती विविधस्पर्शी होते हे लक्षात येते.

भारतातील परिस्थितीला अनुरूप अशी संशोधन पद्धती विकसित करण्यामध्ये त्यांचा मोठा सहभाग आहे. त्यांनी संशोधन पद्धतीच्या संदर्भात जे प्रयोग केले ते इतर संशोधकांच्या व संस्थांच्या तुलनेत खूप वेगळे होते. मात्र गाडगीळांनी केलेले प्रयोग व संशोधन पद्धती यशस्वी झाल्याचे लक्षात आल्यावर त्या पद्धतींचा इतरांनी स्वीकार केला. त्याची दोन ठळक उदाहरणे. शेती व्यवसायाचे सर्वेक्षण कसे करावयाचे याचे संशोधनशास्त्र परदेशामध्ये 1930 पूर्वीच विकसित झाले होते. भारतात असे संशोधन करण्यासाठी योग्य त्या पद्धतीचा , सर्वेक्षण तंत्राचा विकास करण्यासाठी 1935 साली गाडगीळांनी सातारा जिल्ह्यातील वाई तालुक्यातील शेती धंद्याचा अभ्यास करण्याचा प्रकल्प हाती घेतला. शेतकऱ्यांच्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीने दररोज केलेल्या कामाचा तपशील, जमिनीच्या ज्या तुकड्यावर पिके लावली त्या प्रत्येक तुकड्यावर रोज किती तास घरच्या माणसांनी (पुरुष, स्त्रिया व मुले व यांची स्वतंत्र नोंद), मजुरांनी तसेच बैलजोडीने केलेले शेतीचे काम, घरचे बी - बियाणे, खते, फवारणीसाठीची औषधे, रोख आणि धान्य रूपाने दिलेली मजुरी, वाटा म्हणून जमीन मालकाला दिलेल्या शेती उत्पादनाचा तपशील, शेती मालाच्या विक्रीसाठी वाहतूक दलाली, इत्यादी खर्च तपशील आणि विक्रीतून शेतकऱ्याच्या हातात पडलेली निव्वळ रक्कम, जनावरांपासून दूध, खते, कोंबड्यांपासून अंडी व त्यांची विक्री, तसेच शेळ्यांपासून मिळालेले उत्पन्न, परसबागेतील भाजी विकून घरच्या महिलांना मिळालेले पैसे, शेतीच्या भांडवली व इतर खर्चासाठी घेतलेल्या कर्जाचा व परतफेडीचा तपशील, राहणीमानाचा अभ्यास करण्यासाठी घरातील वापरातील वस्तू, वेळोवेळी केलेली पैशांची गुंतवणूक, सालदाराला दिलेला मेहनताना, कपडालत्ता, जेवणखाण, तंबाखू, इत्यादी खर्च, अशा असंख्य लहानमोठ्या बाबींचा जमाखर्चाच्या वह्यांमध्ये नोंद करण्यासाठी त्यांनी समावेश केला. प्रश्नावली करताना सर्वांगीण विचार करून आवश्यक तेवढ्या तपशीलात माहिती मिळविण्यासाठी जरूर त्या प्रश्नांचा समावेश केला पाहिजे असे त्यांचे सांगणे असे. दैनंदिनीची वही रोज भरावयाची आणि त्यातील माहिती खातेवार दुसऱ्या वहीमध्ये लिहावयाची ; त्यासाठी खतावणी तयार केली. 1955 च्या सुमारास केन्द्रीय कृषी मंत्रालयाने शेतीधंद्याचा अभ्यास हाती घेतला. खासकरून महत्वाच्या पिकांचा उत्पादन परिव्यय काढण्यासाठी जो प्रकल्प हाती घेतला आणि देशाच्या विविध भागांतील संस्थांमार्फत सर्वेक्षणाचे काम हाती घेतले त्यासाठी गाडगीळांनी तयार केलेल्या जमाखर्चाच्या वह्या, बारीकसारीक बदल करून, वापरण्याचा निर्णय केन्द्रीय कृषी मंत्रालयाने घेतला.

1944 च्या सुमारास गोदावरी आणि प्रवरा कालवा प्रकल्पावर जी भांडवली गुंतवणूक झाली आणि त्यापासून मिळणारा महसूल आणि या प्रकल्पामुळे रोजगार, उत्पादन, व्यापार वाहतूक या क्षेत्रांत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष काय व किती फायदे झाले आणि मोठे धरण बांधून त्यातील पाणी शेतीसाठी देण्याच्या प्रकल्पाचे कोणते आर्थिक परिणाम झाले याचा अभ्यास गाडगीळांनी हाती घेतला आणि लाभ-परिव्ययाचे गणित करण्याची पद्धती विकसित केली. 1957-58 पासून

नियोजन आयोगाने या तऱ्हेचे जे संशोधन प्रकल्प मंजूर केले त्यामध्ये गाडगीळ यांनी केलेल्या संशोधन पद्धतीचा व विश्लेषण पद्धतीचा प्रामुख्याने वापर करण्यात आला.

वीस वयोगटातील आणि सातवीपर्यंत शिकलेले आणि ज्यांनी शेती स्वतः केली किंवा घरची शेती असल्यामुळे शेतीच्या कामाची ज्यांना माहिती होती असे तरुण सर्वेक्षणाच्या कामासाठी निवडले. त्यांना प्रशिक्षण दिले आणि त्यांचे काम व अनुभव विचारात घेऊन वाई येथील सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाल्यावर त्यांना संस्थेच्या नोकरीमध्ये कायम ठेवले. ग्रामीण भागात काम करावयाचे तर ज्यांना त्या परिसराची ओळख आहे, जे तेथे राहून काम करू शकतील अशा योग्य व्यक्तींची, त्यांना पदवी नसली तरीही, निवड करण्याची पद्धती संस्थेने स्वीकारली. अन्य संस्थांमध्ये मात्र पदवीधर नेमण्याचे धोरण ठेवल्यामुळे ग्रामीण भागातील सर्वेक्षणाच्या कामामध्ये त्रुटी राहून जात असत.

नागरी भागातील संशोधनासाठीही गाडगीळांनी एक वेगळीच पद्धती अवलंबिली. पुणे शहराचे 1935 मध्ये सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण हाती घेतले. त्यासाठी शहराच्या विविध भागांतील सुमारे साडेचार हजार कुटुंबियांकडून प्रश्नावलीचा वापर करून माहिती गोळा करावयाची होती. पुणे नगरपालिकेने प्रत्येक पेठेतल्या घरांना दिलेल्या क्रमांकानुसार, त्यासंबंधीच्या दप्तरावरून, नमुन्याची निवड केली. नगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील शिक्षक ज्या शाळेत शिकवावयाचे त्या परिसराची त्यांना ओळख असल्यामुळे सर्वेक्षणासाठी निवडलेली घरे घर क्रमांकावरून शोधणे अवघड जाणार नाही असा विचार करून आवश्यक तेवढे शिक्षक सर्वेक्षणाच्या कामासाठी घेतले. त्यांना प्रशिक्षण दिले आणि उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये त्यांच्याकडून प्रश्नावली भरण्याचे काम पुरे करून घेतले. प्रश्नावली भरण्याच्या कामाबद्दल भरलेल्या प्रश्नावल्यांच्या संख्येनुसार वेतन दिले. 1954 मध्ये हाती घेतलेल्या पुणे शहराच्या पुनर्पाहणीसाठीही विविध भागांतील प्राथमिक शाळेतील शिक्षकांना प्रश्नावली भरण्याच्या कामात संस्थेने सहभागी करून घेतले. थोडक्यात सांगावयाचे तर कामाचे स्वरूप, प्रकल्पाची उद्दिष्टे, त्यासाठी वापरावयाची प्रश्नावली आणि परिसर हे सर्व विचारात घेऊन प्रामाणिकपणे काम करू शकणाऱ्यांची निवड करता आली तर ती निवड योग्य व उपयुक्त ठरेल. त्यासाठी पदवीधर किंवा उच्च शिक्षण घेतलेल्यांची निवड करण्याचा आग्रह धरण्याची आवश्यकता नाही, ही गाडगीळांची भूमिका. मात्र सरकारी खात्यात किंवा अन्य संस्थांमध्ये किमान दहावी पास झालेल्या आणि शक्यतो पदवीधरांना घेण्याचे धोरण त्या कालात स्वीकारले गेले. ग्रामीण भागात जे वाढले नाहीत आणि परिसर परिचित नाही अशा सुशिक्षित अनुसंधात्यांना नेमल्यामुळे सर्वेक्षणाचे काम अपेक्षेइतके समाधानकारक होत नसे.

केन्द्रीय मंत्रालयाने ग्रामीण भागातील सामाजिक - आर्थिक बदलांचा अभ्यास करण्याचे सुचविले त्यावेळी इतर तीन संस्थांनी 'निर्हेतूक नमुना पद्धती' स्वीकारली. परिणामी, सर्वेक्षणासाठी लहानमोठी गावे राज्यातील वेगवेगळ्या, दूरवरच्या भागातून निवडली गेली. काही अतिलहान, तर काही खूप मोठी. काही दुर्गम भागातील, तर काही शहराच्या सीमेवरील. अशा गावांचे सर्वेक्षण करण्याचे काम त्यामुळे वेळ घेणारे आणि अवघड झाले. त्याहीपेक्षा महत्त्वाची बाब अशी की, अशा सर्वेक्षणाला प्रकल्पाच्या उद्दिष्टाला उत्तरे मिळण्याची शक्यता खूपच कमी होती. प्रथम सर्वेक्षण केल्यानंतर पुन्हा त्याच गावी पाचदहा वर्षांनी पुनर्सर्वेक्षण करण्योच ठरले होते. मात्र सर्वेक्षणाच्या वेळी अशा गावांत लक्षात येण्याइतपत 'बदल' झाले असण्याची शक्यता कमी होती. आमच्या संस्थेतील प्राथमिक चर्चेत गाडगीळांनी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला. त्यांचे म्हणणे असे की, सर्वेक्षणाचा उद्देश सामाजिक - आर्थिक बदल झाले का, कशामुळे झाले, त्याचा फायदा कोणाला मिळाला, किंवा बदल झाला नसल्यास किंवा बदल होऊनही समाजातील काही घटक वंचित राहिले का, त्यामागची कारणे, इत्यादींचा अभ्यास म्हणून एखाद्या विशिष्ट विकास योजनेमुळे काय बदल होतो, हे पुनर्सर्वेक्षण करताना शक्य होईल. म्हणून

निर्हेतूक नमुना न निवडता, हेतूपूर्वक (purposive) नमुना निवडावा. उदाहरणार्थ, एखाद्या खेड्याच्या जवळपास सहकारी साखर कारखाना उभारण्याचा प्रस्ताव असेल, एखादे धरण बांधण्याची योजना असेल किंवा असे काही बदल घडवून आणणारे घटक असतील तर अशा गावांची निवड करावी. म्हणजे पाचदहा वर्षांनी काय 'बदल' झाले ते कळू शकेल. साधारणपणे हजार - पंधराशे वस्तीचे एक गाव आणि त्याच्या आजूबाजूची दोनचार गावे घ्यावी. मोठ्या गावामध्ये दहावीपर्यंतची शाळा, आठवड्याचा बाजार, सहकारी संस्था, इत्यादी असण्याची शक्यता असल्यामुळे गावातील नागरिक रोजगार, शेतीमालाची खरेदीविक्री, इत्यादी अनेक कारणांनी मुख्य गावाशी कसे जोडले आहेत, मुख्य गावातील शेतकरी व व्यावसायिक यांचे परस्पर संबंध कसे आहेत आणि कोणत्या सामाजिक - आर्थिक कामाच्या संदर्भात लहानमोठ्या गावांचे व्यवहार चालतात हे पाहणे त्यामुळे शक्य होईल.'

दुसरा महत्त्वाचा मुद्दा माहिती गोळा करण्यासाठीच्या अनुसंधात्यांचा. वर्षानुवर्षे सर्वेक्षणाचे काम करण्यासाठी, विंचवाच्या बिऱ्हाडाप्रमाणे त्याना मुलाबाळांसह गावोगावी फिरावे लागे. आमच्या संस्थेतील काही अनुसंधाते दहावीस वर्षे संस्थेच्या सेवेत होते. त्यांची मुले शाळेत शिकत होती. त्यांच्या सोयीसाठी मुख्य गावामध्ये बिऱ्हाड ठेऊन त्या गावातील आणि आजूबाजूच्या गावांतील सर्वेक्षणाचे काम मे महिन्यापासून वर्षभरात करता यावे या दृष्टीने संशोधन प्रकल्पाचा आराखडा, तपशील नक्की करण्यात यावा. यामुळे जरी गावोगावी फिरावे लागले तरी शैक्षणिक वर्षाचा अभ्यासक्रम पुरा करून मुलाबाळांसह दुसऱ्या गावी जाणे अनुसंधात्यांच्या दृष्टीने सोयीचे जाणार होते. या दोन्ही सूचना विचारात घेऊन आमच्या संस्थेने पाच जिल्ह्यांचे काम हाती घेतले. वर्षअखेर जेव्हा चारही केन्द्रांवरील अधिकाऱ्यांची बैठक झाली त्यावेळी इतर तीनही केन्द्रांतील संशोधकांना आमची पद्धती मान्य झाली. कारण निर्हेतूक पद्धतीने निवडलेल्या गावांचे सर्वेक्षण करणे त्याना खूपच अवघड गेले होते. गाडगीळांचा दीर्घ अनुभव आणि विषयानुरूप अशा संशोधन पद्धतीचा स्वीकार करण्याची त्यांची बैठक यामधून व्यक्त होते.

आणखी एक उदाहरण. जिल्हानिहाय विकास योजना आणि प्रादेशिक विकासाच्या योजना कशा कराव्यात यामध्ये गाडगीळांचा पुढाकार होता. पंचवार्षिक योजना आखण्याची सुरुवात दिल्लीमध्ये आणि त्या आखल्यावर केन्द्र सरकारकडून राज्य सरकारकडे आणि राज्य सरकारमार्फत जिल्हे, तालुके व त्यातील गावांमध्ये त्या राबविण्यासाठी सोपविल्या जावयाच्या. या पद्धतीमध्ये प्रादेशिक साधनसंपत्ती काय आहे, स्थानिक गरजा, प्रश्न काय आहेत अशा प्रश्नांचा विचार होत नसे. परिणामी अनेक योजना अपेक्षेइतक्या यशस्वी होत नसत. नियोजनाची प्रक्रिया गावपातळीपासून सुरू करावी, गावातील व परिसरातील परिस्थिती विचारात घेऊन नियोजन केले जावे या विचाराचा गाडगीळांनी पाठपुरावा केला. त्यानी वर्धा जिल्ह्यामध्ये 1960-61 मध्ये जिल्हा नियोजनाचा प्रकल्प हाती घेतला. सुदैवाने नियोजन आयोगाचे सदस्य - सचिव तरलोकसिंग याना गाडगीळांची भूमिका पटली आणि तिचा त्यानी पाठपुरावा केला. वर्धा जिल्ह्यामध्ये दर पाचपंचवीस गावांतील कार्यकर्ते आणि शासकीय शेती, जंगल, सहकार, इत्यादी विविध खात्यांतील कर्मचाऱ्यांना चर्चेसाठी एकत्र आणण्यात येई. त्यामध्ये परस्परातील नैसर्गिक साधनसंपत्ती, रस्ते, सहकारी संस्था, जंगले वाढविणे, दुग्ध व्यवसायाला उत्तेजन देणे यासारख्या अनेक प्रश्नांचा ऊहापोह होई. स्थानिक कार्यकर्ते त्याना काय हवे, त्यांच्या मते त्यांच्या भागाचा आर्थिक विकास कशामुळे होऊ शकेल याबद्दल त्यांचे विचार मांडीत. शासनाच्या कोणत्या योजना आहेत, त्यांचा लाभ या परिसराला कसा मिळू शकेल याची माहिती शासकीय अधिकारी देत. विचारांच्या देवघेवीनंतर अशा तऱ्हेचे चर्चासत्र गट (ब्लॉक), तालुका व अखेर जिल्हा पातळीवर होऊन त्यामधून जिल्ह्याच्या विकासाचा आराखडा तयार करण्याचे तंत्र गाडगीळानी विकसित केले. अशा तऱ्हेचा प्रकल्प गोव्याच्या प्रादेशिक नियोजनासाठी गाडगीळानी हाती घेतला.

भारतामध्ये उद्योग-व्यापारामध्ये पिढीजात काही पेढ्या आहेत. विशेषकरून मारवाडी, गुजराथी व सिंधी उपक्रमींचा त्यामध्ये समावेश आहे. आधुनिक उपक्रमींचा उगम व विकास भारतामध्ये कसा झाला याच्या अभ्यासात गाडगीळाना रस होता. 1950-51 मध्ये त्यानी हा प्रकल्प सुरू केला, परंतु त्या कामाकडे त्याना पुरेसे लक्ष देता आले नाही. जवळजवळ पाचसात वर्षे सर्वेक्षणाचे काम चालू होते. शेवटी गोळा केलेली माहिती, कागदपत्रे बासनात गुंडाळून ठेवली. 1971 मध्ये दिल्लीहून पुण्याला परतल्यावर हा प्रकल्प पुरा करण्याचा त्यांचा विचार होता, पण नियतीला ते मान्य झाले नाही. या विषयाचे संशोधन अपुरेच राहिले.

गाडगीळांच्या योगदानाबद्दल लिहिण्यासारखे, सांगण्यासारखे खूप आहे. जास्त वेळ देऊन या विषयावर लिहिणे आवश्यक आहे, कारण संशोधकांच्या पिढीला त्यांच्या अनुभवापासूनच खूप काही शिकता येईल. शेवटी मला एका महत्त्वाच्या वैशिष्ट्याचा उल्लेख करावासा वाटतो. भारतातील कोणत्याही प्राध्यापकाने जनसामान्यांपर्यंत पोचून ग्रामीण भागात, सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगार व परिसराचा विकास केला नाही. केवळ शिक्षण आणि संशोधन यामध्ये न रमता गाडगीळानी पश्चिम महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनामध्ये क्रान्ती घडवून आणली.

■■■■

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### 'अर्थसंवाद' च्या अंकांतील लेख

'अर्थसंवाद' च्या पूर्वीच्या अंकांतील विशिष्ट लेख कोणाला हवे असतील तर ते मागणीनुसार झेरॉक्स करून देण्याची व्यवस्था केलेली आहे. संबंधिताना झेरॉक्सचा खर्च द्यावा लागेल. आपली मागणी परिषदेचे कार्यवाह-खजिनदार डॉ. आ. गो. पुजारी यांच्याकडे त्यांच्या मंगळवेढ्यावरील पत्त्यावर नोंदवावी.

**प्रमुख संपादक**

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### आजीव सदस्य वर्गणीत वाढ

मराठी अर्थशास्त्र परिषदेची आजीव सदस्य वर्गणी रु. 600/- होती. दिनांक 1 एप्रिल, 1999 पासून ती रु. 800 /- अशी वाढविण्यात आली आहे. परिषदेचे आजीव सदस्य होऊ इच्छिणाऱ्यांनी आजीव सदस्य होण्यासाठी रु. 800/- पाठवावेत. वर्गणीची रक्कम 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने देय अशा डिमांड ड्राफ्टने पाठवावी.

**आ. गो. पुजारी**
**कार्यवाह – खजिनदार**

# गाडगीळ यांचे 'सहकारी लोकराज्य'

स.ह. देशपांडे *

## 1

धनंजयराव गाडगीळ यांनी 1959 साली पंजाब विद्यापीठात 'Towards a Cooperative Commonwealth' या विषयावर तीन भाषणे दिली आणि त्याच शीर्षकाचे त्यांचे पुस्तक 1961 साली प्रसिद्ध झाले. त्याचे मराठी भाषांतर 'सहकारी लोकराज्य' या नावाने 1967 साली प्रसिद्ध झाले.

गाडगीळांनी या पुस्तकात मांडलेली सहकारी लोकराज्याची कल्पना 'सहकारी संस्था,' किंवा 'सहकारी चळवळ' या नावांनी सूचित होणाऱ्या कल्पनेपेक्षा अधिक व्यापक आहे. सहकारी संस्था काही नियमांप्रमाणे चालतात. 'रॉशडेल पायोनियर्स' यांनी ग्राहक सहकाराचा पाया घालताना काही तत्त्वे पुरस्कारली आणि आपल्या नियमावलीत त्यांचा अंतर्भाव केला. नंतर वेगवेगळ्या देशांत, वेगवेगळ्या काळी आणि आर्थिक व्यवहाराच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत सहकारी प्रयोगांचा विस्तार झाला आणि रॉशडेल संस्थापकांनी घालून दिलेल्या नियमांना अनेकदा मुरड घालावी लागली. या तत्त्वांच्या किंवा नियमांच्या मर्यादा गाडगीळांनी विस्ताराने स्पष्ट केल्या आहेत (तिसरे व्याख्यान प्रारंभ) आणि असा निष्कर्ष काढला आहे की, त्यात कोणतेच तत्त्व असे नाही की जे सर्व परिस्थितीत अबाधित राहते. याचा एक अर्थ असा की, प्रत्येक प्रकारच्या सहकारी संस्थेला त्या त्या क्षेत्रातील विशिष्ट परिस्थितीच्या अनुरोधाने आपणाला योग्य ती तत्त्वे ठरवावी लागतील.

दुसरा आणि अधिक महत्त्वाचा आणि येथे प्रस्तुत असलेला अर्थ असा की, संकुचित अर्थाची सहकारी

* भूतपूर्व अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, पुणे.

'तत्त्वे' शिरोधार्य न मानता त्यामागची 'मूल्ये' महत्त्वाची मानली पाहिजेत आणि मग ही मूल्ये केवळ रूढ अर्थाच्या सहकारी संस्थांपुरतीच मर्यादित न राहता समग्र अर्थव्यवस्थेला लागू पडतील. उदाहरणार्थ, ही मूल्ये शासकीय औद्योगिक उपक्रम, खाजगी कंपन्या इत्यादींच्या व्यवहारातही प्रविष्ट करून देता येतील. असे झाले म्हणजे 'सहकारी लोकराज्य' अस्तित्वात येईल.

थोडक्यात, सर्व अर्थव्यवस्थेचे सहकारीकरण असा अर्थ 'सहकारी लोकराज्य' म्हणताना गाडगीळांच्या मनात नाही. सर्व अर्थव्यवस्था सहकारी मूल्यांनी भारून टाकणे असा अर्थ त्यांच्या मनात आहे. अर्थात या अर्थव्यवस्थेत रूढार्थाने ज्याना सहकारी संस्था म्हटले जाते त्यांचे एक क्षेत्र असेलच. पण ते मुख्यतः ज्या धंद्यांमध्ये मूळ घटक लहान आणि दुर्बल असतील त्यांच्यापुरते मर्यादित असेच. आधुनिक उद्योगधंदे आणि सार्वजनिक सेवा (public utilities) यामध्ये सहकाराला वाव असणार नाही. पण ते शासनाच्या नियंत्रणाखाली आणावे लागतील. गाडगीळ म्हणतात, '' ..... सहकाराची भूमिका एकाधिकाराच्या विरुद्ध असल्यामुळे आणि संचालन व मालकी यांची फारकत करण्यावर त्याचा भर असल्यामुळे मोठ्या प्रमाणावरील प्रचंड व्यापाचे सर्व उद्योगधंदे, निदान त्यांचे नियंत्रण, सरकारी कक्षेत राज्यसत्तेच्या हाती ठेवणे सहकार पसंत करील '' (पृ. 75). याठिकाणी मुळातले इंग्रजी शब्द जरा देखले आहेत. "Large-scale oligopolistic undertakings" असे ते आहेत. या शब्दांऐवजी मराठी अनुवादात 'मोठ्या प्रमाणावरील प्रचंड व्यापाचे सर्व उद्योगधंदे' असे शब्द आले आहेत. या दोन्ही शब्दसमूहांच्या अर्थामध्ये भेद आहे हे लक्षात येईल. इंग्रजी शब्दरचनेत oligopolistic म्हणजे 'एकाधिकार-सदृश' धंद्यांचा उल्लेख आहे, तर मराठीत मोठ्या प्रमाणावरील 'सर्व' धंद्यांचा उल्लेख आहे. मराठी भाषांतर नंतरचे आहे आणि त्याचा अंतिम आराखडा स्वतः गाडगीळानी तयार केलेला असल्यामुळे (प्रस्तावना, पृ. 5) मराठीत जे व्यक्त झाले आहे तेच गाडगीळांचे खरे मत आहे असे समजून चालण्यास हरकत नाही. ते मत असे की, सर्व मोठे उद्योगधंदे सरकारी मालकीचे असावेत; निदान त्यांच्यावर सरकारी नियंत्रण असावे. म्हणजे सहकारी लोकराज्यातील अर्थव्यवस्थेचे घटक पुढीलप्रमाणे असतील : लहान व दुर्बल घटकांसाठी सहकारी संस्था आणि फार मोठ्या उद्योगधंद्यांसाठी सरकारी मालकी किंवा निदान नियंत्रण. पण मधल्यांचे म्हणजे जे घटक लहान वा दुर्बल नाहीत पण ज्यांचा व्याप 'प्रचंड' नाही त्यांचे काय ?

या प्रश्नाला स्पष्ट उत्तर सापडत नाही. पण गाडगीळांच्या एकूण प्रतिपादनाचा रोख लक्षात घेता त्यावरही, जरा सैलसे, नियंत्रण असावे असे त्यांचे मत आहे असे म्हणता येईल.

या नियंत्रणाचे स्वरूप काय असेल हे गाडगीळ ज्याना 'सहकारी मूल्ये' म्हणतात त्यांच्या विरूपणाच्या आधारे सांगता येईल. सहकारी मूल्यांविषयी गाडगीळ म्हणतात,

''सहकारावर श्रद्धा असणे याचा अर्थ माणूस केवळ आर्थिक फायद्याच्या हेतूनेच कार्यप्रवण होत नाही हे एक प्रस्थापित सत्य आहे, किंवा तसे होण्याची शक्यता आहे, यावर विश्वास असला पाहिजे. तसेच समूहाबाबत किंवा समाजाबाबत आपली काही कर्तव्ये आहेत याची जाणीव असली पाहिजे व त्यासाठी स्वतःच्या फायद्यावर अगर आकांक्षांवर स्वेच्छेने बंधने स्वीकारून स्वार्थ-साधनाबाबत संयम बाळगण्याची तयारी असली पाहिजे; तसेच आर्थिक प्रलोभनाखेरीज अन्य कारणानेही कार्याला प्रेरणा मिळू शकते, सामाजिक मानमान्यता व समाजसेवेची संधी या गोष्टीही कार्यप्रवणतेच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत आणि आर्थिक प्रलोभने नियमित केली असतानाही अर्थव्यवहार कार्यक्षमतेने चालविता येतो, यावर विश्वास असला पाहिजे.

.....आर्थिक प्रलोभनाबाबतच्या सहकाराच्या विशिष्ट दृष्टिकोनामुळे, तसेच न्याय्य वाटणीच्या तत्त्वावरही सहकाराचा भर असल्यामुळे लाभांशाची वाटणी

समानतेच्या दृष्टीतून करण्याची सहकाराची प्रवृत्ती असते. विशेषत: भांडवलाच्या मालकीतून मोठ्या प्रमाणावर लाभ उद्भवावा हे सहकारास पूर्णपणे अमान्य आहे. समाजामध्ये बचत करण्याची सामुदायिक प्रवृत्ती वाढविण्याचा सहकाराचा प्रयत्न असतो; व्यक्तिगत बचत करणाऱ्यांना मोठ्या लाभाचे प्रलोभन दाखवून बचत वाढविण्याचे धोरण त्यास संमत नाही. खाजगी मालमत्ता नामशेष करण्याचे सहकाराचे धोरण नसले तरी राष्ट्रीय उत्पन्नाचा शक्य तेवढा कमी भाग मालकी हक्कदारास मिळावा असा मात्र आग्रह असतो. शिवाय आर्थिक प्रलोभनाव्यतिरिक्त इतर प्रेरणा आणि सामाजिक कर्तव्याची जाणीव यांच्या सामर्थ्यावर सहकाराचा विकास असल्यामुळे वैयक्तिक वेतनाच्या दरात मोठी तफावत राखणे सहकारात आवश्यक नसते. या सर्वांपेक्षाही शैक्षणिक व सांस्कृतिक मूल्यांवर सहकाराचा जो भर असतो त्यामुळे समाज-गटांची जबाबदारी प्रत्येक व्यक्तीचे केवळ संरक्षणच नव्हे तर गुणोत्कर्ष साधण्याचीही आहे असे सहकार मानतो. यामुळे तो समानतेची वाटचाल करू लागतो.'' (पृष्ठे 71-73). ही सर्व मूल्ये प्रत्यक्ष सहकारी संस्थांत तर असतीलच पण त्यांचा प्रभाव अर्थव्यवस्थेच्या इतर घटकांवरही पडणे अशक्य आहे. तो तसा पडणार तो अर्थातच राज्यसंस्थेच्या आर्थिक धोरणांमधून. हे धोरण काय असणार ?

एक तर वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे अर्थव्यवस्थेचा एक भाग प्रत्यक्ष सरकारी मालकीचा राहणार. पण जेथे मालकी नसेल त्या उद्योगांवर कोणत्या प्रकारचे नियंत्रण राहील ? गाडगीळ या मुद्याची तपशिलात जाऊन चर्चा करीत नाहीत. फक्त एवढेच म्हणतात,

'' सहकाराच्या दृष्टीने विचार करता सरकारचे (इंडस्ट्रीयल फायनान्स कॉर्पोरेशन वा त्यासारख्या इतर मंडळ्या, स्टेट बँक, आयुर्विमा महामंडळ, इत्यादींमार्फत) कर्ज अगर भांडवल देऊन निर्माण केलेली सत्ता..... आधुनिक क्षेत्रातील संपन्न व प्रभावी कंपन्यांचे परिणामकारक नियंत्रण करण्याकरिता वापरली पाहिजे. याबाबतीत सरकारला किमान करता येण्यासारखी गोष्ट म्हणजे या कंपन्यांची हिशेबपद्धती खुली ठेऊन सार्वजनिक तपासणीपद्धत त्याना लागू करण्याकरिता आग्रह धरणे ही होय. त्यामुळे त्यातील मालक, संचालक व व्यवस्थापक यांच्या कोणत्याही समाजविघातक हालचाली ताबडतोब उघडकीस आणून त्याना आळा घालण्याचे सामर्थ्य सरकारला प्राप्त होईल.'' (पृ. 84).

खाजगी धंद्यांच्या नियंत्रणाच्या बाबतीत गाडगीळांनी प्रत्यक्षपणे तरी सार्वजनिक हिशेब तपासणीखेरीज (public audit) दुसरे काही सुचविले नसले तरी त्यांनी प्रचलित शासकीय आर्थिक प्रशासनाच्या शैलीवर जी टीका केली आहे तीवरून आणखी कोणत्या प्रकारची नियंत्रणे त्यांच्या मनात असावीत याचा अंदाज करता येतो.

''भारताच्या घटनेतील राज्यशासनाची मार्गदर्शक तत्त्वे पाहता कल्याणकारी किंवा समाजवादाकडे कल असणारे राज्यशासन त्यामध्ये अभिप्रेत आहे असे दिसते. सत्ताधारी पक्षाच्या राजकीय कार्यक्रमात, तसेच पंचवार्षिक विकास योजनांच्या आराखड्यातही समाजवादी समाजरचना क्रमश: निर्माण करण्याच्या उद्दिष्टांचा उल्लेख करण्यात आला आहे. तथापि प्रत्यक्षात मात्र काही तुरळक बाबतींत सरकारी कक्षेची वाढ करण्यापलीकडे किंवा कामगारांच्या हितसंबंधांचे रक्षण करणारे काही कायदे संमत करण्यापलीकडे दुसरी कोणतीही प्रगती या दिशेने झालेली नाही. याच्या उलट आधुनिक व्यापार-उद्योगाच्या क्षेत्रात मालकी हक्कांचे व सत्तेचे झालेले केंद्रीकरण राष्ट्रीय उत्पन्नाची - विशेषत: नागरी विभागातील - विषम वाटणी, सरकारच्या घोषित नियंत्रण धोरणाची अंमलबजावणी, व्यापारी व नागर वर्गांच्या प्राप्तीचे व नफ्याचे प्रमाण, तसेच त्यांची मिळकत आणि राहणीचे मान ही सर्व लक्षणे अनिर्बंध भांडवलशाही समाजरचनेची अशीच दिसून येतात. 'संमिश्र अर्थरचना' असे जेव्हा म्हणतात तेव्हा ती संमिश्र एवढ्याच अर्थाने असते की, तिचा एक लहानसा

भाग सरकारी कक्षेमध्ये अगर सरकारी मालकीचा असतो. परंतु तिचे प्रत्यक्ष कार्य आणि जीवनमूल्यांचा आणि वागणूकवर्तणुकीचा त्यातून व्यक्त होणारा दर्जा लक्षात घेता प्राथमिक अवस्थेतील असंस्कृत भांडवलदारी अर्थरचनेचाच हा एक प्रकार आहे असे म्हणावे लागते'' (पृ. 76).

यावरून असा निष्कर्ष काढता येईल की, नफा, व्याज, पगार, इत्यादी सर्व प्रकारच्या उत्पन्नांवर मर्यादा अधिक समता (म्हणजे किमान व कमाल उत्पन्नांमधील दरी कमी करणे) आणि खाजगी क्षेत्रातील आर्थिक सत्तेचे विकेन्द्रीकरण (म्हणजेच एकाधिकारी प्रवृत्तींना अटकाव) या दिशांनी खाजगी उद्योगधंद्यांवरील शासकीय नियंत्रणांची वाटचाल झाली तर ती 'सहकारी मूल्यां'च्या दिशेनेही होईल.

गाडगीळांना अभिप्रेत असलेले सहकारी लोकराज्याचे स्वरूप असे आहे. वेगळ्या शब्दांत ते सांगावयाचे तर ते एका विशिष्ट प्रकारच्या समाजवादी समाजरचनेचे आहे. मात्र हा समाजवाद सोव्हिएत समाजवादासारखा सर्वंकष असणार नाही. एक तर, एक क्षेत्र सहकारी संस्थांच्या अखत्यारात असेल. सहकारी क्षेत्रातील उपक्रमी लहान व दुर्बल असले तरी ते मालमत्ता धारण करणारे असतात आणि या अर्थाने सहकार मालमत्तेच्या हक्कांचा आदर करतो. शिवाय आधुनिक औद्योगिक क्षेत्रातही खाजगी मालमत्तेचा हक्क मान्य केलेला असेल, फक्त सरकारी नियंत्रणांमधून त्यांना सहकारी किंवा समाजवादी मूल्ये पाळण्याची सक्ती केली जाईल. एकाधिकारसदृश (oligopolistic) उद्योगांचे बहुधा सरसकट राष्ट्रीयीकरण केले जाईल.

या प्रकारची अर्थव्यवस्था का आवश्यक आहे याची कारणमीमांसाही गाडगीळांनी केलेली आहे. स्पर्धाशील भांडवलशाही अर्थव्यवस्थेवर त्यांचे पुढीलप्रमाणे आक्षेप आहेत. एक, आधुनिक भांडवलशाही स्पर्धाशील राहिलेली नाही. राष्ट्रीय उत्पन्नाची वाटणी आता अधिक समानतेने होते याचे कारण बाजारातील स्पर्धा हे नसून सरकारची आर्थिक धोरणे हे आहे. एफ.एच. नाइट यांच्या *Ethics of Competition* या ग्रंथाचा आधार घेत गाडगीळ सांगतात की, बाजारातील स्पर्धा ही एक 'लढत' किंवा 'खेळ' आहे आणि त्या खेळात भाग घेणाऱ्यांना ती कितीही आकर्षक वाटली तरी सर्वसामान्य जीवन तिच्यावर अवलंबून ठेवणे हे मुळातच 'नैतिकदृष्ट्या' तिरस्करणीय आहे. ''पण नीती-विचार बाजूस ठेवला तरी अनेक असंबद्ध स्वायत्त घटकांच्या स्वाभाविक हालचालींची परिणती नेहमीच समाजहितसाधक होईल हे बुद्धीला पटणे कठीण असल्यामुळे कोणत्या तरी अदृश्य शक्तीचा हात या प्रक्रियेत आहे अशी मांडणी तिच्या समर्थनार्थ अनेकांना करावी लागली आहे '' (पृ. 78). शिवाय, ''स्पर्धाशील समाजव्यवस्था असली तरच तांत्रिक प्रगती करता येते अगर आर्थिक कार्यक्षमता वाढते असेही आज मानण्याचे कारण नाही. अगदी भिन्न अर्थरचना असलेल्या साम्यवादी समाजांनी जी प्रगती करून दाखविली त्यामुळे असला दावा खोटा ठरतो '' (पृ. 31). त्यांच्या मते भारतातील भ्रष्टाचार व लाचलुचपत यांचा उगमही भांडवलशाहीच्या प्रभावात आहे (पृ. 80-81). आपल्या समाजाच्या परंपरागत जीवनमूल्यांमध्ये असल्या स्पर्धात्मक मूल्याचा समावेश कधीही झालेला नाही,'' असेही गाडगीळ सांगतात (पृ. 81). विशेषत: अविकसित देशांच्या दृष्टीने पाहता सहकारी समाजाला पर्याय नाही असे त्यांचे मत आहे. या संदर्भात ते म्हणतात, ''साधनसंपत्तीची विपुलता व नवसाहतीस भरपूर वाव असणाऱ्या समाजात स्पर्धाशील विचारसरणीचे किंवा मनोवृत्तीचे दुष्परिणाम उत्कटपणे दिसत नाहीत. परंतु जेथे लोकसंख्येच्या मानाने साधनसंपत्ती आणि विस्तारसंधी अत्यंत मर्यादित आहेत आणि जो समाज विषमता व विभिन्नता यामुळे परस्परांबद्दल अविश्वास आणि संशय यांनी सतत ग्रस्त आहे अशा समाजामध्ये स्पर्धाशील मनोवृत्तीला व चढाओढीच्या भावनेला उत्तेजन देणे अतोनात धोक्याचे असते'' (पृ. 81).

पण ही स्पर्धाशील भांडवलशाहीवरची टीका झाली. तीमुळे कोणती तरी (समाजवादासारखी) पर्यायी

अर्थव्यवस्था अवश्य आहे एवढेच सिद्ध होते. गाडगीळानी दाखविलेला पर्याय वर म्हटल्याप्रमाणे सर्वंकष समाजवादी स्वरुपाचा नाही. कारण त्यात सहकारी चळवळीला महत्त्वाचे स्थान आहे. तेव्हा गाडगीळ जो विशिष्ट पर्याय पुढे करतात त्यामागची त्यांची कारणमीमांसा काय आहे हे पाहिले पाहिजे. गाडगीळांच्या शब्दांतच ती पाहू.

''अविकसित देशांत, तेथील दारिद्र्याचे प्रमाण व व्याप्ती लक्षात घेता, विकासाच्या सुरुवातीच्या काळात लोककल्याणाच्या किंवा सामाजिक सुरक्षेच्या योजना हाती घेणे व्यवहार्य नसते. पण अशा योजनांच्याद्वारेच मुख्यत: विकसित समाजात उत्पन्नाची फेरवाटणी घडवून आणता येते. भारतासारख्या देशांमध्ये निदान नजीकच्या काळात तरी, या विशिष्ट विषमताविरोधी समाजवादी उपायांचा आपणास अवलंब करता येणार नाही. शिवाय सामाजिक विषमता ही आपल्याकडे विशेषेकरून शेतकरी समाज व औद्योगिक समाज किंवा ग्रामीण समाज व नागर समाज यांच्या दरम्यान आढळून येते. आपल्या देशात छोटे शेतकरी व भूमिहीन शेतमजूर किंवा त्याहूनही स्थायी शेतकरी वर्गात न मिसळलेल्या मागास जमाती, हेच खरे आज वंचित व दलित आहेत. शहरी कामगारवर्ग तत्सम नाही. औद्योगिक कामगारवर्ग स्वत:च्या नवीन पद्धतीच्या संघटना उभारून आपले सामर्थ्य वाढवू शकतो व त्याच्या जोरावर तो राजकीय क्षेत्रातही आपला प्रभाव पाडू शकतो. ग्रामीण भागातील वंचित व दुबळ्या वर्गांना यातले काहीच करणे शक्य नसते. म्हणून सर्वसामान्य समाजवादी कार्यक्रम आपल्याकडे निदान नजीकच्या भविष्यकाळात तरी फारसे महत्त्व पावणे शक्य नाही. या परिस्थितीत साधारणपणे सर्वमान्य असा जो सहकाराचा दुसरा मार्ग त्याची कास धरून आपणांस काय साधता येईल याचा विचार करणे युक्त ठरते'' (पृ. 2).

थोडक्यात, भारतासारख्या अविकसित देशात, आर्थिक विकासाच्या प्रारंभीच्या काळात तरी, उत्पन्न-वितरणाचे समाजवादी म्हणजे लोककल्याण (welfare) व सामाजिक सुरक्षा (social security) यासारखे उपाय योजता येणार नसल्यामुळे दुर्बल घटकांसाठी सहकार एवढेच त्यांच्या सबलीकरणाचे माध्यम उरते.

सहकारामुळे दुर्बल घटकांना नेमके कोणते आर्थिक लाभ होतात याचे गाडगीळानी, या पुस्तकात तरी, विस्ताराने विवेचन केलेले नाही. एका ठिकाणी 'मोठ्या प्रमाणावरील व्यवहाराचे अनेक फायदे' (economies of large-scale production) असा उल्लेख आहे (पृ. 59). पण हे फायदे दुर्बल घटकांच्या व्यवसायांचे अप्रगत तंत्र लक्षात घेता फार असणे शक्य नाही.

पण सहकाराच्या आर्थिक आणि इतर फायद्यांच्या संदर्भात दुसरा एक मुद्दा लक्षात घेतला पाहिजे. तो म्हणजे, गाडगीळांच्या धर्तीचा सहकार उत्स्फूर्त (voluntary) असणार नाही. त्यात सरकारचे उत्तेजन आणि भागीदारी गृहीत धरलेली आहे. मग स्वस्त दराने कर्ज, तांत्रिक सुधारणांना मदत, भागभांडवलात भागीदारी, कदाचित बाजाराची निश्चिती, इत्यादी इतर फायदे लक्षात घ्यावे लागतील. शिवाय सरकारी कार्यक्रम आणि माहिती व सल्ला याना तळातल्या माणसापर्यंत पोहोचविण्याचे कामही सहकारी संस्थांमार्फत होईल (पृ. 68). शिवाय ज्याचा गाडगीळानी उल्लेख केलेला नाही पण जो त्याना अभिप्रेत असावा असा आणखी एक फायदा आहे. तो म्हणजे दुर्बल घटकांचे संघटित सामर्थ्य. सहकारी चळवळीचे जाळे उभे राहिले म्हणजे ती एक हिशेबात घेण्यासारखी सामाजिक शक्ती बनेल आणि (औद्योगिक कामगारवर्गाप्रमाणे) राजकीय क्षेत्रावरही प्रभाव पाडू शकेल.

येथपर्यंत गाडगीळांची सहकारी समाजाची रूपरेषा आणि तिचे त्यानी केलेले समर्थन यांचा आढावा आपण घेतला. आता गाडगीळांच्या विचारांचा परामर्श आपण पुढच्या विभागात घेऊ.

## 2

गाडगीळप्रणीत सहकाराच्या कक्षेत ज्याना ते 'खरे'

दुर्बल व दलित घटक म्हणतात (उदाहरणार्थ, भूमीहीन शेतमजूर आणि स्थायी शेतीत न सामावलेल्या जमाती) त्यांचा समावेश होत नाही हे लक्षात घेतले पाहिजे. जंगल कामगारांचा त्यांनी उल्लेख केला आहे पण तोच एकमात्र अपवाद आहे आणि एकूण ग्रामीण कामगार वर्गात त्यांची संख्या फार थोडी आहे. त्यामुळे जंगल कामगारांच्या सहकारी सोसायट्या स्थापन झाल्या तरी समाजातील अगदी दुर्बल घटकांचा प्रश्न सर्वसाधारणपणे उपेक्षितच राहतो. ज्यांच्याजवळ शेतजमीन किंवा औद्योगिक अवजारे आहेत अशांचाच, म्हणजे ज्यांच्यापाशी कोणत्या ना कोणत्या उत्पादन-साधनाची मालकी आहे अशांचाच सहकारात समावेश होतो.

ग्रामीण – शहरी असे द्वंद्व विषमतेच्या संदर्भात गाडगीळ अनेकदा मांडतात आणि संपूर्ण शहरी समाजाच्या तुलनेने संपूर्ण ग्रामीण समाज (किंवा शेतकरी समाज) आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहे असे सूचित करतात. सरासरी अर्थाने हे खरे असले तरी ग्रामीण भागातील लहानमोठे किंवा गरीब-श्रीमंत शेतकरी हे भेद लक्षात घेतले पाहिजेत, पण गाडगीळ ते डोळ्याआड करताना दिसतात. मुक्त सदस्यत्व (open membership) या सहकारी तत्त्वाची मर्यादा सांगताना सहकारी पतसंस्थेत सावकार मंडळींना त्या तत्त्वाचा आधार घेऊन प्रवेश देणे अयोग्य ठरेल असे त्यांनी म्हटले आहे (पृ. 54). पण एरवी ग्रामीण भागातील लहान शेतकरी व मोठा शेतकरी असा भेद त्यांनी केल्याचे दिसून येत नाही.

खरे म्हणजे लहान शेतकऱ्यांच्या प्रश्नाचा स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक होते आणि विशेषतः सहकारी चळवळीचा त्यांना कितपत उपयोग होईल याचा विचार करावयास हवा होता. सहकारी शेतीचा पुरस्कार गाडगीळांनी (या पुस्तकात एकदाच पण इतरत्र अनेकदा) केलेला आहे पण तेथेही लहान शेतकऱ्यांच्या वेगळ्या सहकारी शेती संस्था असाव्यात, किंवा केवळ त्यांच्याच शेती संस्था असाव्यात असे म्हटले असावे असे वाटत नाही.

लहान शेतकऱ्याला सबल करण्यासाठी स्वस्त कर्जाचा फारसा उपयोग नाही. एक तर त्याने कर्ज उत्पादकरीत्या वापरले तरी त्याच्या उत्पन्नात त्यामुळे जी भर पडेल ती सर्व त्याच्या पोट भागवण्यासाठीच लागेल आणि अशा स्थितीत तो कर्जफेड करीलच असे म्हणता येत नाही. पण मुख्य धोका असा की, कर्जच तो उपभोगासाठी वापरील, उत्पादनासाठी नाही. अशा अवस्थेत उत्पन्नही वाढणार नाही, मग कर्जफेड तर दूरच. यावर उपाय असा सुचविला जातो की, त्याला खावटीसाठीही कर्ज (consumption loan) द्यावे. पण लहान शेतकऱ्याची प्रच्छन्न बेकारी लक्षात घेता त्याचा सर्व उपभोग (consumption) उत्पादक कामात परिवर्तित होतो असे म्हणता येत नाही. उलट, खावटी कर्जामुळे त्याच्यावरचा कर्जाचा बोजा अधिक वाढेल आणि सहकारी सोसायट्यांच्या थकबाक्या आणखी वाढतील. आजपर्यंतचा एकूण अनुभवही याच प्रकारचा आहे.

असेही जाणवते की, गाडगीळ सहकारी संस्थांच्या अर्थशास्त्राची चर्चा करीत नाहीत. आर्थिकदृष्ट्या कोणत्या परिस्थितीत किंवा कोणत्या प्रकारच्या व्यवहारात सहकारी संस्था कार्यदक्ष ठरू शकतील याचे विश्लेषण गाडगीळांच्या विवेचनात येत नाही.

सहकारी संस्थांचे अर्थशास्त्र अभ्यासताना ज्या समस्यांवर त्या उत्तर शोधू पाहतात त्यांचे स्वरूप नेमके काय आणि त्या कशा तयार होतात यांचाही अभ्यास आवश्यक आहे. उदाहरणार्थ, पतसंस्थांच्या अभ्यासाच्या संबंधात सावकारी व्यवहाराचा अभ्यास केला पाहिजे. असा अभ्यास आपल्याकडे फारसा झालेला दिसत नाही. (बॉटमली यांचे अतिपूर्वेकडील देशांमधल्या सावकारीचे अभ्यास या संदर्भात लक्षणीय आहेत.) सहकारी विक्री संस्थांच्या संदर्भात खाजगी व्यापाराच्या अर्थशास्त्राचा अभ्यास झाला पाहिजे. (ही त्रुटी पुढे उमा लेले, मेलर इत्यादिकांनी भरून काढली.)

औद्योगिक सहकारी संस्थांच्या संदर्भात लहान घरगुती उद्योगांचे भवितव्य काय याचा विचार गरजेचा आहे. (पुढे दांडेकरांनी या विषयावर मोलाचे लेखन केले.) सहकारी ग्राहक सोसायट्यांच्या सदस्यांना बाजार किमतींपेक्षा किती स्वस्तात वस्तू मिळतात ? या संस्थांचा खर्च कमी असेल तर नेमका कोणत्या कारणांमुळे ? अशा अभ्यासांच्या अभावी सहकार ही एक 'श्रद्धा' म्हणून स्वीकारण्यात आलेली आहे काय अशी शंका कधीकधी मनात येते.

एकूण अर्थव्यवस्थेत एक व्यवसाय-संघटन प्रकार म्हणून सहकाराचे स्थान राहीलच. ते कितपत महत्त्वाचे राहील हे त्या संघटना प्रकाराच्या आर्थिक कार्यदक्षतेवर अवलंबून राहील.

सहकारी संस्थांच्या अर्थशास्त्रविषयीच्या दोन मुद्यांचा येथे उल्लेख करतो. अशा संस्थेत मतदानाचा हक्क भाग भांडवलाच्या राशीशी बांधलेला नसून प्रत्येक सदस्याला एकच मत असते. सहकारातील लोकशाहीच्या तत्त्वाला हे अर्थातच धरून आहे. पण त्याचबरोबर हेही खरे की, संयुक्त भांडवली कंपनीमध्ये मतदानाचा हक्क भाग भांडवलाच्या राशीवर अवलंबून असल्यामुळे जशी एक नियंत्रण क्षमता (controlling interest) निर्माण होते आणि या नियंत्रकांचा हेतू आणि कंपनीचा हेतू यांच्यात एकरूपता (identity) निर्माण होते, तशी परिस्थिती सहकारी संस्थेत निर्माण होत नाही. सर्वांचाच उपक्रम म्हणजे कुणाचाच उपक्रम नाही अशी स्थिती प्राप्त होते. परिणामी ज्या कार्यदक्षतेने संस्थेचा व्यवहार व्हावयाला पाहिजे त्या कार्यदक्षतेने तो होत नाही.

ज्या सहकारी संस्थांच्या कामामध्ये सदस्यांचा श्रमपुरवठा अभिप्रेत असतो (उदाहरणार्थ, संयुक्त सहकारी शेती, औद्योगिक सहकारी मंडळ्या, इत्यादी उत्पादकांच्या सहकारी संस्था) त्यात सदस्यांनी केलेले श्रम आणि त्यांना मिळणारे वेतन यांच्यामध्ये तोल राखणे कठीण होते. थोडक्यात, 'प्रलोभनां'ची व्यवस्था अमलात आणता येत नाही. अशा संस्था यशस्वी होणे अपवादात्मक स्थितीतच शक्य आहे. जेथे सदस्यांचा सहभाग मोजता येतो व मोजमापाप्रमाणे किंमत देता येते (उदाहरणार्थ, दूध, कापूस इत्यादी सहकारी विक्री संस्था) अशा संस्थांच्या यशस्वितेची शक्यता अधिक असते.

एकूण, सहकार प्रत्येक क्षेत्रात सारख्याच रीतीने यशस्वी होईल असे समजून चालणार नाही. अर्थशास्त्रीय निकष लावून विशिष्ट क्षेत्रांची सहकारासाठी निवड करावी लागेल. [असे अर्थशास्त्रीय संशोधन होत राहण्याची गरज गाडगीळांनाही पटलेली आहे ; सहकाराचे अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र यामध्ये संशोधन चालू राहिले पाहिजे असे त्यांनी म्हटले आहे (पृ. 51)].

गाडगीळांनी ज्या कालात हे लेखन केले त्या कालात दारिद्र्याच्या मोजमापासाठी दारिद्र्य रेषेच्या संकल्पना, त्या संकल्पनांना अनुसरून दारिद्र्याच्या व्याप्तीचा अंदाज करण्याचे प्रयत्न आणि दारिद्र्य रेषेखालच्या व्यक्तींना केन्द्रस्थानी ठेऊन केलेल्या दारिद्र्यनिर्मूलनाच्या उपाययोजना हे सर्व नंतरच्या कालात सुरू झाले. गाडगीळांनी गरीब आणि श्रीमंत किंवा दुर्बल आणि सबल अशी ढोबळ विभागणी केली आणि लहान शेतकऱ्यांचा प्रश्नही स्वतंत्रपणे चर्चिला नाही याचे हे कारण असावे.

विचाराला हे जे नवीन वळण आहे ते स्वागतार्ह आहे. गाडगीळांच्या विचाराच्या कक्षेतून भूमीहीन शेतमजूर वगैरे जे असंघटित आणि दुर्बल गट निसटले होते ते दारिद्र्यनिर्मूलनाच्या कार्यक्रमांच्या कक्षेत येतात. या सर्व कार्यक्रमांचे फलित काय हा वादाचा विषय आहे आणि ज्या उपाययोजना त्या कार्यक्रमांच्या अंतर्गत येतात त्यातल्या सर्वात प्रभावी कोणत्या यांचा विचार होणे अवश्य आहे. तरीही एकूण धोरणाची दिशा सर्वांत अधिक वंचित असलेल्यांवर केन्द्रित झाली आहे यात शंका नाही.

गाडगीळानी उपस्थित केलेला सर्वात मध्यवर्ती प्रश्न त्यानी चित्रण केलेल्या अर्थव्यवस्थेतील प्रलोभनांविषयीचा आहे. माणसाला क्रियाप्रवण करण्यासाठी केवळ आर्थिक लाभाच्या प्रेरणांशिवाय इतर प्रेरणा अस्तित्वात असतात, किंवा त्या अस्तित्वात आणता येतात असे त्यांचे प्रतिपादन आहे. त्याची सत्यता शंकास्पद आहे.

गाडगीळाना अपेक्षित असलेला सहकारी संस्थेचा सदस्य हा एक 'नवा माणूस' च आहे. श्रमप्रतिष्ठा मानणारा, सामाजिक जबाबदारीचे भान असणारा, इतरांच्या हितासाठी स्वार्थसाधनावर बंधन घालणारा असा हा माणूस आहे. सर्वसामान्य माणूस असा असतो की काय असा प्रश्न आहे. मला वाटते तो तसा नसतो. किंबहुना विशेषत: वंचित किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातून अशा गुणांची अपेक्षा करणे मला स्वप्नरंजनात्मक वाटते. विकसित जगातील सहकारी चळवळींचा आढावा घेऊन स्वत: गाडगीळांनीच असे दाखविले आहे की, सहकार यशस्वी झाली आहे तो अगदी गरीब वर्गात नाही तर मध्यम वर्गात. अर्थात अशा व्यक्तींचा समाजात सर्वस्वी अभाव असतो असे नाही. खरे तर अशी माणसे असतात म्हणूनच समाज चालतो असेही म्हणता येईल. पण ती संख्येने अल्प असतात.

अगदी सर्वसामान्य माणूससुद्धा आर्थिकेतर प्रेरणांमधून कार्यप्रवण होतो पण तो विशेष महत्त्वाच्या किंवा निर्वाणीच्या प्रसंगी. पण अशा ऊर्मी तात्कालिक असतात. त्या त्या प्रसंगापुरत्या कार्यरत होतात. स्थायी संस्थाजीवनाची अशा अस्थिर आणि प्रासंगिक ऊर्मींच्या आधारावर बांधणी करता येत नाही.

पण जी काही माणसे मुळातच समाजप्रवण असतात ती संख्येने अल्प असली तरी एकत्र येऊन एखादे मोठे काम हातात घेऊ शकतात, स्थिर स्वरुपाच्या संस्था निर्माण करू शकतात. मात्र हे ती स्वेच्छेने आणि स्वयंस्फूर्तीने करतात. अशा स्वयंस्फूर्त प्रयत्नांनी ज्या सहकारी संस्था स्थापन होतात त्यांच्यामध्ये गाडगीळ वर्णितात तसले नैतिक वातावरण राहील अशी अपेक्षा करता येते. रॉशडेल पायोनियर्स यांचे सहकाराच्या इतिहासात महत्त्व आहे ते या कारणामुळे आणि याठिकाणी लक्षात घेणे अवश्य आहे की, असा स्वयंस्फूर्त आणि स्वावलंबी सहकार गाडगीळाना अभिप्रेत नाही. त्याना हवा तो सहकार शासनपुरस्कृत आणि शासनाचे आर्थिक साह्य असणारा असा आहे.

उत्स्फूर्त सहकार गाडगीळांच्या चित्रात बसत नाही, कारण तो सार्वत्रिक किंवा मोठ्या व्यापाचा असणार नाही. शेती, लहान उद्योग यांचे सर्व क्षेत्र व्यापील असा तो त्याना हवा आहे. कारण या सर्व क्षेत्रांची आर्थिक प्रगती त्याना हवी आहे, आर्थिक विकासाचे एक प्रभावी साधन म्हणून त्याना सहकारी संस्थांचे जाळे हवे आहे. असे होण्यासाठी शासनाने ते पुरस्कृत केले पाहिजे आणि त्याच्या उभारणीसाठी त्याला आर्थिक मदतीचा हात दिला पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे.

असे सार्वत्रिकीकरण आणि गाडगीळाना अपेक्षित असलेल्या नैतिक प्रेरणा यांच्यात द्वैत असणार हे सहजच लक्षात येईल.

ज्या आर्थिकेतर प्रेरणांवर गाडगीळ जोर देतात त्या सर्वसामान्य माणसात प्रारंभी असणार नाहीत याचे भान त्याना आहे असे सुचविणारे त्यांचे एक विधान आहे. ''..... याबरोबरच असेही सिद्ध होते की, ही समता सहकारपूर्व प्रस्थापित नसून सहकारी व्यवहारातून व प्रयोगातून निर्माण होणारी असते'' (पृ. 73). याचा अर्थ असा होतो की, समता (आर्थिकेतर प्रेरणा) मुळात नसते पण सहकारी संस्थांमधील संस्कारांनी व सवयीने ती अंगवळणी पडते.

एखाद्या सहकारी संस्थेचे सदस्य होणे म्हणजे त्या प्रकारच्या संस्थेसाठी प्रस्तुत असलेल्या सहकारी तत्त्वांच्या आधारावर तयार केलेल्या कायद्याने बांधलेल्या एका संस्थेचे सदस्य होणे. म्हणजे एक प्रकारची नैतिक शिस्त सदस्यांवर येथे लादलेली असणार; स्वेच्छेने स्वीकारलेली नसणार. जी नैतिकता लादलेली असते ती

खरी नैतिकता नसतेच हे याठिकाणी लक्षात घेतले पाहिजे. तिची सवय होऊन माणसे नैतिक आचरण करू लागतील असे समजणे वास्तवाला धरून होणार नाही. सोव्हिएत रशियानेही एक नवा माणूस (New Soviet Man) तयार करण्याचा प्रयत्न केला ; या प्रयत्नांचे काय झाले याचा इतिहास आपल्यासमोर ताजाच आहे.

नवा माणूस तयार करता येतच नाही असे नाही. त्यासाठी त्याच्यावर बालपणापासूनच संस्कार करावे लागतात. असे संस्कार 'युरोपियन' म्हटल्या जाणाऱ्या समूहांनी केले. इस्त्राइलमधले 'किबुटझ्' हे त्याचे अलीकडचे उदाहरण आहे. अशा काही वसाहतीत अगदी जन्मल्या पहिल्या दिवसापासून सहकाराचे, सामाजिकतेचे, श्रमप्रतिष्ठेचे, कर्तव्यभावनेचे संस्कार केले जातात किंवा जात असत असे आता म्हटले पाहिजे, कारण आता बहुतेक वसाहती मोडकळीस आलेल्या आहेत. अशा वसाहतींचा गाडगीळांनीच गौरवाने उल्लेख केला आहे. त्यांनी म्हटले आहे, ''कालांतराने एक अव्यवहार्य ध्येयवाद म्हणून जरी या प्रयत्नांची हेटाळणी होऊ लागली तरी आधुनिक काळातील सुरुवातीचे सहेतुक सामाजिक प्रयोग हेच होते असे मानावे लागते.'' मुळातले इंग्रजी वाक्य याहून अधिक समर्पक आहे. "What were later to be derided as utopias might thus be regarded as amongst the earliest of scientific social experiments in the modern era" *(Towards a Co-operative Commonwealth*, p. 89). यात scientific असा शब्द आहे. आपल्या समाजवादाला 'शास्त्रीय' असे नाव देऊन सहकारी-समाजवादी वसाहतींची स्वप्नाळू (utopian) म्हणून मार्क्सनेच खरे म्हणजे 'हेटाळणी' केली. त्या वसाहतींनाच खरे 'शास्त्रीय सामाजिक प्रयोग' असे गाडगीळ म्हणतात. हे त्यांचे म्हणणे अगदी यथार्थ आहे असे प्रस्तुत लेखकासही वाटते.

मुद्दा असा की, शासकीय समाजवादाच्या चौकटीत किंवा त्याच्या गाडगीळप्रणीत आवृत्तीत नवा माणूस तयार होईल अशी अपेक्षा करता येत नाही.

सहकारात लोकशाही मूल्यांचे संवर्धन होते असे गाडगीळ सांगतात. स्वयंस्फूर्त सहकाराच्या बाबतीत ते खरेही असू शकेल. कारण सहकारी संस्थेत 'एक व्यक्ती – एक मत' असा नियम असतो (जो संयुक्त भांडवली कंपनीत नसतो) आणि सहकारी चळवळीची रचना 'संघ' स्वरुपाची म्हणजे 'फेडरल' असते. पण सरकारी पुरस्कार आणि सरकारी मदत आल्यावर सरकारी वर्चस्व येणार नाही का ? आणि तसे आले तर लोकशाही मूल्याचे काय ? या प्रश्नाला गाडगीळांचे उत्तर असे की, शासनाचा पुरस्कार आणि मदत व शासनाचे वर्चस्व यात तसा काही संबंध नाही. कित्येकदा शासनाची मदत असूनही वर्चस्व नसते आणि कित्येकदा मदत नसूनही वर्चस्व असते. या महत्त्वाच्या प्रश्नाचे गाडगीळ अतिसुलभीकरण करतात असे म्हणणे प्राप्त आहे.

शिवाय भारतातील समाजवादी म्हणविणारे शासन प्रत्यक्षात कशा प्रकारचे आहे हे गाडगीळांनीच सांगितले आहे. या लेखात मागे जो त्यांचा परिच्छेद उद्धृत केला आहे त्यातील शेवटचे वाक्य पुन्हा देण्यासारखे आहे : '' (या अर्थरचनेचे) प्रत्यक्ष कार्य आणि जीवनमूल्यांचा व वागणूकवर्तणुकीचा त्यातून व्यक्त होणारा दर्जा लक्षात घेता प्राथमिक अवस्थेतील असंस्कृत भांडवलदारी अर्थरचनेचाच हा एक प्रकार आहे असे म्हणावे लागते'' (पृ. 76). नुसती भांडवलशाहीच नव्हे तर प्राथमिक अवस्थेतही (Rabber barono ची ?) असंस्कृत भांडवलशाही !

असे शासन लोकशाही मूल्ये (आणि इतर नीतीमूल्ये) यांचा कितपत आदर करील असा प्रश्न मनात उभा राहतो. उलटपक्षी सहकारी चळवळ तिच्या मूल्यांचा शासनावर कितपत प्रभाव टाकील याबद्दलही शंका वाटते. सहकाराच्या अंतर्गत मूल्यांसंबंधीचे विचार मागे सांगून झालेच आहेत.

गाडगीळ आर्थिक प्रेरणा सर्वस्वी नाकारतात असे म्हणणे अन्यायाचे होईल. मात्र इतके खरे की, आर्थिकेतर प्रेरणांना ते अवाजवी महत्त्व देतात.

साहजिकच आर्थिक प्रेरणेवर जोर देणारी स्पर्धात्मक भांडवलाही त्यांना पूर्णपणे नापसंत आहे. त्यांचे म्हणणे असे की, एक तर 'स्पर्धा' (competition) हा प्रकारच आधुनिक भांडवलशाहीत राहिलेला नाही. दुसरे असे की, स्वार्थप्रेरणेवर सर्व अर्थव्यवस्था उभी करणे मुळातच अनैतिक आहे. शिवाय "नीतीविचार बाजूस ठेवला तरी अनेक असंबद्ध घटकांच्या स्वाभाविक हालचालींची परिणती नेहमीच समाजहितसाधक होईल हे बुद्धीला पटणे कठीण असल्यामुळे कोणत्या तरी अदृश्य शक्तीचा हात या प्रक्रियेत आहे अशी मांडणी तिच्या समर्थनार्थ अनेकांना करावी लागली आहे" (पृ. 78). गाडगीळांच्या या टीकेचे समालोचन करू.

आताच्या भांडवलशाहीत स्पर्धा राहिलेली नाही याचा अर्थ पाठ्यपुस्तकात प्रारंभी वर्णिली जाणारी विशुद्ध (pure) आणि पूर्ण (perfect) स्पर्धा आता फारशी राहिलेली नाही एवढाच आहे. या नव्या अर्थव्यवस्थेचे किंवा तिच्या काही अंशांचे चित्रण करू पाहणारी अनेक प्रतिमाने आधुनिक अर्थशास्त्रात उपलब्ध आहेत - अपूर्ण स्पर्धा, एकाधिकारयुक्त (monopolistic) स्पर्धा, द्वयाधिकार (duopoly) अल्पजनाधिकार (oligopoly) इत्यादी. या सगळ्याचा अर्थ असा की, आदर्शवत असणारी विशुद्ध आणि पूर्ण स्पर्धा जाऊन तिच्या जागी स्पर्धेची नवी रूपे अवतरली आहेत. स्पर्धा पूर्णपणे नाहीशी झाली आहे असे नाही. स्पर्धेचा अवरोध करणारी महाशक्ती म्हणजे एकाधिकार (monopoly). पण पूर्ण एकाधिकार क्वचितच अस्तित्वात असतो आणि ज्यांना 'नैसर्गिक एकाधिकार' (natural monopoly) म्हणतात त्यांचे सामाजिकीकरण करण्याची किंवा त्यावर नियंत्रणे घालण्याची सर्व देशांतून पद्धत आहे. बडे उद्योग बाजाराची कोंडी करू शकतात हे खरे आहे ; त्याबरोबरच हेही खरे आहे की, संशोधन आणि विकास (R&D) यासाठी लागणारे धन खर्चण्याची त्यांचीच कुवत असते. शिवाय एकाधिकारावर बंधन घालणारी 'सुप्त' स्पर्धाही असू शकते. म्हणजेच आपण फार किमती लावल्या तर दुसरा कुणी उभा राहील अशी भीती त्यांना असते. एकूण असे वातावरण असल्यामुळे नव्या वस्तू, नव्या सेवा, नवी तंत्रे यांचा शोध घेण्याचे काम भांडवलशाही देशांमधून अविरत चालू आहे आणि जीवनमान सारखे उंचावत आहे.

" अनेक असंबद्ध घटकांच्या स्वाभाविक हालचालींची परिणती समाजहितकारक होईल," हे बुद्धीला पटत नाही असे गाडगीळ म्हणतात. हे घटक जरी स्वतंत्र व असंबद्ध असले तरी त्यांच्या असंख्य निर्णयांचे सुसूत्रीकरण बाजार आणि किंमतयंत्रणा यांच्यामार्फत होते. ॲडॅम स्मिथनी ज्याला 'अदृश्य हात' असे म्हटले तो हाच. काही दैवी, अलौकिक अतींद्रिय शक्ती वरून कुठून तरी अर्थव्यवहाराचे नियंत्रण करते असे त्यांना म्हणावयाचे नव्हते.

बाजारात ज्यांचे सुसूत्रीकरण होते, म्हणजेच ज्यांच्यामध्ये अंतर्गत सुसंगती प्रस्थापित केली जाते, ते सर्व निर्णय अखेरीस समाजहिताचेच असतात असा दावा आधुनिक अर्थशास्त्र करीत नाही. ॲडॅम स्मिथनीही शासकीय हस्तक्षेपाचे क्षेत्र दिग्दर्शित केले आहे आणि मुख्य धारेतील अर्थशास्त्रज्ञांनी शासकीय आर्थिक धोरणांकडे पुरेसे लक्ष दिलेले आहे (पाहा: Lionel Robbins, *Theory of Economic Policy*). काळ आणि परिस्थिती यांना अनुसरून शासकीय हस्तक्षेपाचे क्षेत्र कधी संकोचावे तर कधी विस्तारावे अशा शिफारशी अर्थशास्त्रज्ञांनी केल्या आहेत एवढेच. अर्थात निर्हस्तक्षेपाचा आग्रह प्रारंभीच्या काळी काहीसा टोकाला गेला होता हे खरे आहे पण त्याची प्रतिक्रियाही पुढे उमटली हे लक्षात घेतले पाहिजे.

गाडगीळांचा आणखी एक मुद्दा नीतीविचाराशी संबंधित आहे. बाजारातील स्पर्धा ही स्वार्थसाधकांची एक 'लढाई' किंवा 'खेळ' आहे आणि सर्वसामान्य माणसाचे जीवन त्यावर अवलंबून ठेवणे हे 'नीतीदृष्ट्या तिरस्करणीय' आहे, असे त्यांचे मत आहे.

स्वार्थसाधन ही मुळात एक अनैतिक क्रिया आहे

असे या विचारमार्गाचे गृहीत आहे. त्यासंबंधी विचार करताना असे म्हणावेसे वाटते की, नीतीविचार हा माणसांसाठी असतो आणि माणूस हे काय घटित आहे याच्या आकलनावर त्याची उभारणी करावी लागते. या आकलनात माणसाच्या स्वाभाविक प्रवृत्ती काय असतात याचा विचार अपरिहार्य ठरतो. माणसाला व्यक्तित्व असते, 'अहं'ची जाणीव असते हा त्याचा इतर प्राणिमात्रांपासूनचा वेगळेपणा असतो. म्हणून तो स्व-सुखसाधक असतो. हे सुख अधिकात अधिक असावे असे त्याला साहजिकच वाटते. मानवी जीवनाचाच तो भाग आहे. म्हणून स्व-सुखसाधनाला मुळातच अनैतिक म्हणणे अयोग्य आहे. उलट, असे म्हणणे प्राप्त आहे की, स्वसुखसाधनात मुळातच काही नैतिकता आहे, कारण माणसे पूर्ण स्वार्थत्यागी झाली तर त्याना स्वहत्याच करावी लागेल. अर्थात एका मर्यादेपलीकडे स्वार्थसाधन समाजविघातक होते आणि अशावेळी नैतिक विनियमनाची गरज निर्माण होते हे म्हणणे योग्य आहे. पण स्वार्थ हाच अनैतिक ही भूमिका टोकाची झाली ; स्वार्थ ही मानवी जीवनाची आवश्यक अट आहे हे लक्षात घेऊनच नीतीविचाराचा प्रारंभ केला पाहिजे. समजा, बाजारावर समाजाचे जीवन अवलंबून ठेवणे हे अनैतिक आणि / किंवा अविवेकी (irrational) आहे असे ठरविले तर पर्यायी यंत्रणा कोणती याचा विचार करावा लागतो. ती व्यवस्था सर्वंकष समाजसत्तेशिवाय दुसरी कोणतीही असू शकणार नाही. ती भूमिका गाडगीळही घेत नाहीत हे लक्षात घेण्यासारखे आहे.

तंत्रप्रगतीसाठी स्पर्धेची गरज नाही, साम्यवादी समाजांनीही ती करून घेतली हे गाडगीळांचे म्हणणे विवाद्य आहे. उद्योगीकरणाच्या प्रारंभीच्या कालात नोकरशाही स्वरूपाच्या ढोबळ उपक्रमांनी एक रेटा देता येतो पण पुढे गरजा वाढतात, निविष्टी-उद्दिष्टींचे प्रकार आणि संख्या वाढते, त्यांच्या मागच्या आणि पुढच्या साखळ्या लांबतात, एकूण अर्थव्यवस्थेची गुंतागुंत वाढते आणि त्यांचे समायोजन आणि सुसूत्रीकरण प्रशासकीय उपाययोजनांनी करणे अशक्य होत जाते. साम्यवादी देशांत हे घडत गेल्याची भरपूर नोंद आहे. त्यातूनच 'समाजवादी बाजारा'चे अर्थशास्त्र उदयाला आले. तेही पुरेसे नाही आणि खराखुरा स्पर्धात्मक बाजार स्वीकारण्यावाचून गत्यंतर नाही असे साम्यवादी देशांच्या लक्षात आले. चीनचे आजचे परिवर्तन हे गाडगीळांच्या प्रतिपादनाला पूर्ण नकार देते हे लक्षात यावयाला अडचण पडू नये.

सोव्हिएत रशियाची तांत्रिक प्रगतीही एकांगी होती. प्रथम युद्ध आणि नंतर थंडे युद्ध यांच्या छायेत झालेली प्रगती मुख्यतः त्या युद्धांमधील विजयांच्या उद्देशाने होत होती. उलट, हरघडी लागणारा भरवशाचा थर्मामीटर निर्माण करण्यात सोव्हिएत तंत्रविज्ञान कमी पडत होते असे म्हटले जाते आणि त्या तांत्रिक - औद्योगिक प्रगतीचे सामाजिक - राजकीय अंग लक्षात घेतले तर गाडगीळांना प्रिय असणाऱ्या लोकशाही मूल्यांचाही साम्यवादी देशांत विध्वंस झाला याची आठवण ठेवावी लागते.

भारताच्या पारंपरिक मूल्यसरणीमध्ये 'स्पर्धा' या मूल्याला स्थान नव्हते हा मुद्दाही गाडगीळ आपल्या मताच्या पुष्टीदाखल पुढे करतात. खरे म्हणजे एका काळी जगातल्या सर्व समाजाबद्दल हे खरे होते. बाजार, किंमतयंत्रणा यांचा अर्थव्यवस्थेचे नियामक घटक म्हणून उदय झाला तो तीनचारशे वर्षांपूर्वी. तेव्हा एखादे मूल्य परंपरेत होते की नाही यापेक्षा ते आज उपयुक्त आहे की नाही, प्रगतिपथावर नेणारे आहे की नाही, हा विचार जास्त महत्त्वाचा. तसे पाहिले तर समता, व्यक्तिस्वातंत्र्य, इत्यादी ज्या मूल्यांचा आपण आज अंगीकार केला आहे त्याना आपल्या परंपरेत कसलेच अधिष्ठान नाही.

गरीब देशाला आपल्या साधनसामग्रीचे नियोजन काटकसरीने केले पाहिजे आणि असे होण्यासाठी स्पर्धात्मक भांडवलशाही ऐवजी सहकारी समाजाचाच पाठपुरावा केला पाहिजे असा गाडगीळांचा आणखी एक मुद्दा आहे. 'स्पर्धेचे अपव्यय' (wastes of competition) असतात हे अमान्य करण्याचे कारण नाही. पण

प्रश्न सापेक्ष कार्यदक्षतेचा आणि विकासगामी अर्थव्यवस्थेचा आहे. गाडगीळांचे सहकारी लोकराज्याचे चित्र पाहिले तर असे लक्षात येईल की, शेती आणि लहान उद्योगधंदे यांचे क्षेत्र सहकारी कक्षेत आले तरी एकूण राष्ट्रीय उत्पन्नाचा एक लहान हिस्साच त्याने व्यापला जाईल आणि इतर क्षेत्र प्रत्यक्ष सरकारी नियंत्रणाखाली किंवा मालकीखाली आणि व्यवस्थापनाखाली असेल. शिवाय विकासमान अवस्थेत क्षेत्र विस्तारत जाते. म्हणजेच गाडगीळांची अर्थव्यवस्था समाजवादी म्हटली नाही तरी बहुतांशी राज्यसंस्थावादी (statist) असेल. तिच्यात नोकरशहांचे वर्चस्व असेल आणि अर्थातच भ्रष्टाचारही असेल.

स्पर्धेचे दुष्परिणाम गाडगीळांनी दाखविलेले आहेत ते सर्वस्वी खोटे आहेत असे नाही. पण तिच्या अंतर्गत असलेली गतीशीलता, स्वार्थसाधनातून प्राप्त होणारी जोरकस विकासप्रेरणा, व्यक्तिस्वातंत्र्यातून बहरणारे सर्वगामी कर्तृत्व यांची दखल ते घेत नाहीत.

अशी दखल घेऊन आणि स्पर्धेतून निर्माण होणाऱ्या विकृती टाळीत आपल्याला पुढची वाटचाल करावयाची आहे. राज्यवादी प्रतिमान घ्यावयाचे की स्पर्धाशील बाजाराचे प्रतिमान घ्यावयाचे याचा निर्णय आज आपल्या देशाने बाजाराच्या बाजूने जवळजवळ घेतल्यासारखाच आहे. अशा रीतीने आपण जरी आज नव्या मार्गावर प्रस्थान टाकले असले तरी नवे आर्थिक धोरण ही एक अंशतः अपरिहार्यता आणि अंशतः एक नवी वाट म्हणून आपण स्वीकारल्याचे दिसते. तिचा मूलगामी आणि सर्वांगीण विचार होत असल्याचे दिसत नाही. तसा करताना गाडगीळांनी दाखविलेली विरोधी बाजू आणि पुढे केलेले अर्थव्यवस्थेचे एक वेगळे प्रतिमानही लक्षात घ्यावी लागतील आणि हे काम गाडगीळांनी त्यांना शोभेशा साक्षेपाने अभ्यासपूर्ण रीतीने आणि वैचारिक शिस्तीने केले आहे यात शंका नाही.

## संदर्भ सूची

(टीप : *संपूर्ण लेखात कंसात संदर्भासाठी दिलेले पृष्ठांक मराठी आवृत्तीचे आहेत.*)


1 Gadgil, D. R. (1961), *Towards a Co-operative Commonwealth*, Punjab University Publication Bureau, Chandigadh.

2 गाडगीळ, ध. रा. (1967), *सहकारी लोकराज्य*, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे, मराठी प्रकाशन 12 वे.



## मराठी अर्थशास्त्र परिषद

### वार्षिक वर्गणीत वाढ

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे वार्षिक सदस्य आणि 'अर्थसंवाद' चे वार्षिक वर्गणीदार यांना आम्ही कळवू इच्छितो की दिनांक 1 एप्रिल,2000 पासून वार्षिक वर्गणीमध्ये पुढीलप्रमाणे वाढ करण्यात आली आहे.

(अ) परिषदेचे सदस्य

(1) साधारण सदस्य : रु. 150 (वार्षिक)

(2) संस्था सदस्य : शैक्षणिक संस्था : रु. 150 (वार्षिक)

व्यावसायिक संस्था : रु. 200 (वार्षिक)

(आ) ग्रंथालये : रु. 150 (वार्षिक). सर्व वर्गणीदारांनी या वाढीची नोंद घेऊन 1 एप्रिल, 2000 ते 31 मार्च, 2001 या वर्षासाठीची वर्गणी वाढीव दराने कार्यवाहांकडे पाठवावी ही विनंती.

**आ.गो. पुजारी**
**कार्यवाह–खजिनदार**

# गाडगीळांचे नियोजनविषयक विचार

शि. ना. माने *

तैसें वेळे कृत्य पावे ।
तेथिंचा मंत्रुही आठवे ।
परि व्यर्थ तें आघवें ।
विनियोगेंवीण ॥
*(ज्ञानेश्वरी : अध्याय 17, ओवी 352).*

अनुवाद : योग्य कार्यांचे आचरण ज्ञानाला धरून असेल, ब्रम्हनामही चिंतिले जाईल, उच्चारले जाईल. परंतु विनियोगाचे (उपयोग करण्याचे) ज्ञान नसेल तर सर्व विफल होईल. (उदाहरणार्थ, श्रीकृष्ण अर्जुनाला उद्देशून म्हणतात त्याप्रमाणे तेल, वात आणि अग्नि ही सर्व साधने जवळ असूनही दीप प्रज्वलित करण्याचे ज्ञान नसेल तर अंधारातच राहावे लागेल. प्रकाश प्राप्त होणार नाही.)

ज्ञानाइतकाच त्याचा विनियोग महत्वाचा आहे. निव्वळ 'पढिक पंडित' नव्हे तर 'क्रियावान पंडित' गाडगीळांना सदरच्या ओवीचा मथितार्थ चपखल लागू पडतो. त्यांनी त्यांच्या ज्ञानाचा प्रथम जनहितासाठी सम्यक उपयोग करून प्रकाश दाखविला आणि नंतर ते स्वतः प्रकाशमान झाले.

## गाडगीळांची नियोजित विकास विचारसृष्टी

प्रस्तुत लेखात धनंजयराव गाडगीळांच्या नियोजनविषयक विचारांचा मागोवा घेण्यात आला आहे. विशेषतः 1951 ते 1967 या कालात भारतातील नियोजन आयोगाचा कार्यभाग, नियोजन प्रक्रिया आणि पहिल्या तीन पंचवार्षिक योजना यांच्या संबंधात गाडगीळांनी नियोजन आयोगाच्या अर्थशास्त्रज्ञांच्या पंचसमित्यांना सादर केलेली टिपणे, ज्ञापने आणि

* भूतपूर्व अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद आणि अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक, सातारा.

स्वतंत्र लेख अशा विकीर्ण विचारांवर हा लेख आधारित आहे. गाडगीळांच्या नियोजनविषयक विचारांना योजनेची तयारी, तिच्या धोरणांची मांडणी, त्यांची अमलबजावणी करणाऱ्या केन्द्र व राज्य सरकारांचा कार्यभाग व प्रतिसाद, विकास, वितरण, इत्यादी बाबींचा संदर्भ आहे. एवम त्यांच्या नियोजनविषयक विचारांच्या मागोव्यात नियोजनाशी संबंधित प्रमुख बाबींचा किंवा घटकांचा विचार करणे क्रमप्राप्त आहे.

लेख चार भागात विभागण्यात आला आहे. पहिल्या भागात नियोजन किंवा नियोजित विकास याच्या संबंधातील गाडगीळांच्या दृष्टिकोनाचे ठळक पैलू मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तो प्रयत्न करताना, अर्थातच, 1967 पर्यंतच्या गाडगीळांच्या पहिल्या तीन योजनांसंबंधातील टीका-टिपणांपुरताच मागोवा मर्यादित ठेवण्यात आला आहे. दुसऱ्या भागात चौथ्या योजनेचा स्वतंत्रपणे विचार केला आहे. पहिल्या तीन योजनांवर खरपूस व प्रसंगी खमंग टीका करणाऱ्या गाडगीळांची नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष म्हणून नेमणूक झाली (1967). त्यांच्यावर चौथ्या योजनेचा आराखडा तयार करण्याची नवीन व नाजूक जबाबदारी पडली. योजनांचे टीकाकार गाडगीळांची ती एक सत्वपरीक्षा होती. ती परीक्षा गाडगीळांनी कशी व किती पार केली याविषयी विश्लेषण या भागात केले आहे. तिसऱ्या भागात गाडगीळांच्या नियोजनविषयक दृष्टिकोनातून उपस्थित झालेल्या दोन विवाद्य मुद्यांचा नमुना म्हणून उल्लेख व विचार करण्याचा प्रयत्न केला आहे. चौथ्या आणि अखेरच्या भागात गाडगीळांच्या नियोजित विकास-विचार-धनाच्या स्वरुपातील मौलिक योगदानाची विनम्रपणे नोंद करून या लेखाच्या निमित्ताने त्यांना मानाचा मुजरा अर्पण केला आहे.

## 1

## विकासासाठी नियोजन

विशेषतः 1959-60 पर्यंतच्या भारतातील नियोजनाविषयी गाडगीळांचा विशिष्ट आणि अनन्य असा दृष्टिकोन होता. नियोजन आयोगाला तसेच त्याच्याशी संबंधित अर्थशास्त्रज्ञांच्या पंच समित्यांना गाडगीळांनी जी ज्ञापने व टिपणे वारंवार सादर केली त्यांच्यामध्ये त्यांच्या दृष्टिकोनाचे प्रकर्षाने प्रतिबिंब पडले आहे. सर्वसाधारणपणे जी नियोजन प्रक्रिया विकसित झाली तिच्याविषयी गाडगीळ समाधानी नव्हते. विशेषतः नियोजन प्रक्रिया संमिश्र व व्यापक स्वरूपाची असते. राजकीय-सामाजिक-आर्थिक पायावर ती आधारित असते, असावयाला हवी. योजनाकार किंवा राजकीय नेतृत्व स्थूल किंवा दरडोई राष्ट्रीय उत्पन्नाला जेवढे महत्त्व देतात तेवढे महत्त्व देण्याची वास्तविकपणे गरज नाही. त्यामुळे 'विकासासाठी नियोजन' प्रक्रियेकडे दुर्लक्ष होण्याचा धोका संभवतो. त्या धोक्याकडे लक्ष वेधताना गाडगीळ म्हणतात की, स्थूल किंवा दरडोई राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ आवश्यकच आहे ; परंतु ती पुरेशी नाही. वाढलेल्या उत्पन्नाचे नागरी व ग्रामीण तसेच औद्योगिक व कृषी क्षेत्रात इष्टतम व न्याय्य वितरण झाले किंवा नाही, ही बाब जास्त महत्त्वाची आहे. उत्पादन आणि वितरण यांच्यात विषमतोल निर्माण होता कामा नये. तो विषमतोल, गाडगीळ पुढे म्हणतात, सरकारी विनियमनात्मक कार्यप्रणालीच्या सदोष आणि म्हणून कमकुवत चौकटीचा परिणाम असतो. पहिल्या दोन योजना कालात विकासात जरूर काही समाधानकारक प्रगती झाली. गाडगीळ ती मान्य करतात. परंतु त्या प्रगतीच्या गतीचे सातत्य टिकले नाही अशी पुस्ती ते लगेच जोडतात. त्याचे प्रमुख कारण असे की, ती प्रगती स्वयंपोषणक्षम किंवा गाडगीळांच्या शब्दात 'योग्यरीत्या अभिवृद्धीच्या स्थिर प्रत्याय दराच्या स्वरुपातील' (a fairly constant rate of growth)[1] नसून उसळी किंवा 'उकळी'[2] च्या (spurt) स्वरुपाची होती. ती अल्पकालिक असून तिच्यासंबंधात सरकारचे अपेक्षेप्रमाणे विनियमन असत नाही. आणि अखेर गाडगीळ प्रतिपादन करतात की, तुटीची वित्तव्यवस्था आणि भावफुगवट्याचे दबाव यांच्यावर दोषारोप करून नियोजनाशी संबंधित व असंबंधित सर्व मोकळे होतात. दोष तुटीच्या वित्तव्यवस्थेचा नसून अपरिहार्य परिस्थितीत आश्रय

घ्यावा लागलेल्या तुटीच्या वित्तव्यवस्थेच्या संबंधात वेळीच तसेच परिणामकारक उपाययोजनेच्या अभावात आहे[3] आणि ती उपाययोजना करणे मूलतः सरकारचे काम आहे. अन्नधान्य आघाडी आणि विदेश विनिमय आघाडी यांच्या संबंधातील अशा उपाययोजनांचा अभाव ही गाडगीळानी नोंदलेली दुसरी ठळक उदाहरणे आहेत.

हा झाला गाडगीळांचा स्पष्ट आणि सुव्यक्त दृष्टिकोन. त्यात ध्वनित होणारा दृष्टिकोन पुढीलप्रमाणे विशद करणे शक्य आहे. त्याशिवाय गाडगीळांचा विकासासाठी नियोजन हा दृष्टिकोन पूर्ण होणार नाही. स्थूल किंवा दरडोई उत्पन्नाचे विकासात स्थान काय याविषयी गाडगीळांचे भाष्य आपण पाहिले. ते उत्पन्न विशिष्ट वर्षापुरते सीमित असते. प्रदीर्घ कालात त्यातील वाढ गाडगीळ म्हणतात त्या 'अभिवृद्धीच्या योग्यरीत्या स्थिर प्रत्याय दरातील वाढीवर' अवलंबून असते. अभिवृद्धीची योग्यरीत्या स्थिर प्रत्याय दराची ही संकल्पना आजकाल 'स्वयंपोषणक्षम' म्हणजेच शाश्वत विकास म्हणून संबोधण्यात येणाऱ्या विकासाच्या संकल्पनेशी निगडित आहे आणि या संकल्पनेचा प्रथम वापर *Our Common Future* अहवालात (1987) झाला, असे तिच्या नोंदीवरून स्पष्ट दिसते. तिच्यापूर्वी कित्येक वर्षे गाडगीळानी विकासाच्या संदर्भात वापर केलेल्या अभिवृद्धीच्या योग्यरीत्या स्थिर प्रत्याय दराच्या संकल्पनेत ती ध्वनित तर झाली नाही ना, असा रास्त प्रश्न उपस्थित होतो.

## वार्षिक योजनांची अपरिहार्यता

सुरुवातीच्या तीन पंचवार्षिक योजनांच्या संबंधात जेथे जेथे गाडगीळाना तफावती, त्रुटी किंवा फटी जाणवल्या तेथे तेथे त्यानी टीका केली. परंतु गाडगीळांची भूमिका निखळ, विधायक टीकाकाराची होती. नियोजन आयोग आणि राजकीय नेतृत्व तर त्यांच्या टीकेची लक्ष्ये होतीच. त्याबरोबरच नागरी समाज, बडे खाजगी उत्पादक, व्यापारी आणि सट्टावाले यांच्या संबंधातही त्यानी टीकेचा असूड सकारात्मकपणे वापरला. अहमदाबाद येथील हॅरल्ड लास्की संस्थेत त्यानी 24 मार्च, 1958 रोजी लास्की स्मृती व्याख्यान दिले. भारतातील 'नियोजन आयोगाचा कार्यभाग' हा त्यानी त्यांच्या व्याख्यानाचा विषय निवडला होता.

नियोजन आयोग हे तांत्रिक सल्लागार मंडळ असून त्या मंडळाने योजनेत समाविष्ट सर्व प्रकल्पांच्या तांत्रिक तपासणीची किंवा अभ्यासाची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली पाहिजे, असे गाडगीळांचे मत होते. ते काम अवघड व जोखमीचे आहे हे त्याना मान्य होते. कारण, भारतासारख्या उपखंडात आधारसामग्रीच्या (data) संदर्भातील चित्र धूसर आणि अस्पष्ट होते (आज परिस्थिती तेवढी निराशाजनक नाही). त्या परिस्थितीत योजनेची उद्दिष्टे, खर्चाचे अंदाज आणि प्राकृतिक लक्ष्ये यांच्यात क्वचित ताळमेळ आणि सुसंगती दिसते. म्हणून नियोजन आयोगाला त्याची जबाबदारी टाळता येणार नाही. वरील तीन बाबतीत समन्वय घडविणे तसेच त्यासाठी 'तांत्रिक क्षमता' (technical competence)[4] निर्माण करण्यासाठी विविध अभ्यासगट आणि प्रकल्प हाती घेऊन त्या संबंधात कार्यवाही केली पाहिजे, याविषयी गाडगीळ आग्रही तसेच निग्रही होते. त्याचे त्यानी दिलेले स्पष्टीकरण असे. त्यामुळे योजनेच्या कार्यवाहीच्या पातळीवर वित्तीय लक्ष्ये आणि प्राकृतिक लक्ष्ये यांच्यात जी फट किंवा दरी निर्माण होते ती नष्ट झाली नाही तरी कमी होईल. यासंबंधात गाडगीळानी सुचविलेला उपाय म्हणजे प्रत्येक पंचवार्षिक योजनेची वार्षिक योजनांमध्ये विभागणी करणे. पंचवार्षिक योजनांतर्गत अशा वार्षिक योजना [5] तयार करणे, हे नियोजन आयोगाचे काम असेल. परिणामी उपरिनिर्दिष्ट धूसर परिस्थिती निवळण्यास मदत होते आणि पुढे होत राहील. त्याबरोबरच वित्तीय लक्ष्ये आणि प्राकृतिक लक्ष्ये यांच्यातील दरी कमी होईल, असा गाडगीळाना दृढ विश्वास होता. जाताजाता नियोजन आयोगाला इशारा तसेच राजकीय नेतृत्वाला सुखद धक्का देताना गाडगीळ म्हणतात की, योजनेच्या तांत्रिक क्षमतांच्या पातळीवरील अपयशासाठी राजकारणींना

जबाबदार धरता येणार नाही.[6] याविषयी दुमत होण्याचे कारण नाही. परंतु खरा प्रश्न वेगळाच आहे. आजकाल गाडगीळांना अभिप्रेत वार्षिक योजना किती प्रमाणात तयार केल्या जातात, याविषयी जबरदस्त शंका आहे.

### वास्तवाचे भान

नियोजन आयोगाच्या कार्यभागाविषयीच्या गाडगीळांच्या आणखी एका दृष्टिकोनाचा येथे स्वतंत्रपणे विचार करण्याची गरज आहे. तो दृष्टिकोन आहे योजनेची चौकट (plan frame) आणि योजनेचा अंतिम मसुदा किंवा गाडगीळांच्या शब्दात 'वस्तुनिष्ठ योजना' (real plan) यांच्या आंतरसंबंधाचा. पाठीमागे उल्लेख केलेल्या हॅरॉल्ड लास्की स्मृती व्याख्यानातच गाडगीळांनी निवडलेल्या 'नियोजन आयोगाचा कार्यभाग' या विषयांत योजना चौकट आणि योजनेचा अंतिम मसुदा यांच्यातील आंतरसंबंधाच्या मुद्याला त्यांनी स्पर्श केला आहे. त्याविषयीच्या त्यांच्या चर्चेचा गोषवारा पुढीलप्रमाणे देत आहे. विशिष्ट योजनेच्या चौकटीत प्राकृतिक लक्ष्यांचा समावेश करताना अंतिम मसुद्यातील लक्ष्ये किती प्रमाणात फलद्रूप होतील याविषयी नियोजन आयोगाला क्वचितच भान असते. जर ते भान नसेल तर नियोजन प्रक्रिया विफल ठरते. परिणामी अवाचेसवा दावा करणाऱ्या आणि लोकांच्या अकारण अपेक्षा वाढविणाऱ्या योजना चौकटीला 'महापराक्रमकुशलतेचे (tour de force)[7] पुण्य पदरात पाडून घेता येते इतकेच. परंतु प्रत्यक्षात योजनेच्या अंतिम मसुद्यातील लक्ष्यांच्या संबंधात अनेक अडथळ्यांना तोंड द्यावे लागते. पुढे गाडगीळ मान्य करतात की, योजना चौकट वस्तुनिष्ठ योजनेपेक्षा वेगळी असते. तिचे स्वरूप सोदाहरण आणि चित्रयुक्त (illustrative) असते. तिच्यात समाविष्ट लक्ष्ये कल्पित (notional) असतात. परंतु ती तशी असलीच पाहिजेत असा नियम हवा कशाला ? महत्वाचा प्रश्न आहे अंतिम लक्ष्यांची अमलबजावणी करण्याचा आणि त्यासाठी आवश्यक ठरणाऱ्या अद्यावत आधारसामग्रीचा निरंतर उपयोग करण्याचा. हे काम योजना चौकटीत स्वतःला गुंतऊन ठेवण्यापेक्षा जास्त महत्वाचे आहे, असे गाडगीळांना सूचित करावयाचे असावे.

योजना तयार करताना, म्हणजे विशेषतः तिच्या प्राकृतिक लक्ष्यांचा मसुद्यात समावेश करताना, नियोजन आयोगाने वास्तवाचे भान ठेवले पाहिजे. ते ठेवले नाही तर योजना कशी संकटात सापडते याचे ठळक उदाहरण म्हणजे दुसरी पंचवार्षिक योजना. गाडगीळांनी 'Prospects for the Second Five-Year Plan Period' (1957) आणि 'On Rephasing the Second Five-Year plan' या मथळ्यांचे स्वतंत्र लेख/टिपण लिहून दुसऱ्या योजनेच्या संबंधात विस्तृत चर्चा केली आहे. वास्तवाच्या भानाच्या मर्यादेचे उल्लंघन झाल्यामुळे संकटे कशी निर्माण होतात एवढ्या मर्यादेतच गाडगीळांच्या वरील लेखातील किंवा टिपणातील संदर्भ देऊन आपण हा मुद्दा आटोपता घेणार आहोत.

पहिल्या योजनेच्या यशामुळे (गाडगीळांच्या मल्लीनाथीप्रमाणे 'अनियोजित प्राप्ती') सरकार व योजनाकार यांचा उत्साह वाढला. काही प्रमाणात अल्पसंतुष्टतेची व आत्मसंतुष्टतेची त्यात भर पडली. परिणामी दुसऱ्या योजनेचा आकार पहिल्या योजनेच्या तुलनेत जवळजवळ अडीच पटीने वाढला. विशेषतः सरकारी तसेच खाजगी क्षेत्रांतील मूलभूत उद्योगांवर जास्त जोर देण्यात आला. खरा कळस पुढेच आहे. विशेषतः सरकारी क्षेत्रातील उपक्रम यशस्वी करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रशिक्षित व्यवस्थापकांचा किंवा कर्मचारी वर्गाचा पुरवठा करण्याकडे दुर्लक्ष झाले.[8] दहा दिवसात फोटोग्राफी व पाच दिवसात रेकी, एवढे नियोजन सुलभ असत नाही. दुसरी योजना आकाराने मोठी म्हणून केवळ ती संकटात सापडली, हे गाडगीळ मान्य करीत नाहीत. त्यांच्या दृष्टिकोनातून तिच्या अपयशाचे प्रमुख कारण म्हणजे पुरेशा प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा अभाव.

गाडगीळांची ही मीमांसा स्वीकारली तर दुसऱ्या योजनेचे अपयश हे तिच्या महत्त्वाकांक्षेच्या अरिष्टामुळे निर्माण झाले, हा सार्वत्रिक समज अमान्य करावा

लागतो. कारण, त्यात सरकारच्या निष्क्रियतेवर हेतुत: पांघरुण घालण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. पहिल्या दृष्टिकोणाला व्यवस्थापनक्षमतावादी म्हटले तर दुसऱ्याला परिव्ययवादी म्हणावे लागेल.

## अनियोजित प्राप्ती
(Unplanned achievements)

'Notes on the Government of India's First Five-Year plan' या मथळ्याची टिपणे गाडगीळांनी नियोजन आयोगाला 1951 मध्ये सादर केली. त्यात योजना तयार करणे, वित्तीय व्ययाची लक्ष्ये, प्राकृतिक लक्ष्ये, ती पूर्ण करण्याचे मार्ग, कृषी व जलसिंचन, रोजगारनिर्मिती, इत्यादी बाबींची चर्चा करण्यात आली आहे. त्याप्रमाणेच 'Prospects for the Second Five - Year Plan Period' (1957) या पूर्वी उल्लेख केलेल्या लेखात त्यांनी दुसऱ्या योजनेचा सविस्तर विचार करण्यापूर्वी पहिल्या योजनेच्या फलश्रुतीचा उल्लेख केला आहे. 1951 मधील लेखातील (टिपणांमधील) त्यांचा निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहे : ''अशाप्रकारे व्याप्ती, वस्तुनिष्ठता आणि एकात्मीकरणाचे प्रमाण या सर्व महत्त्वाच्या बाबींसंबंधात आर्थिक विकासाची योजना म्हणून जिच्याकडून उचितपणे अपेक्षा करण्यात यावी (त्या बाबींसंबंधात) ती मोठ्या प्रमाणात अपर्याप्त आहे.''[9] 1957 मधील लेखात गाडगीळांच्या पहिल्या योजनेच्या कथित यशाविषयी विचार करण्यापूर्वी त्यांच्या 1951 मधील टिपणांमधील वरील निष्कर्षाचा संक्षेपात खुलासा करणे जरूर आहे.

1950 मध्ये नियोजन आयोगाची स्थापना झाली. त्यामुळे नियोजन आयोगाला योजना तयार करण्यासाठी सामान्यपणे आवश्यक असलेला पुरेसा अवधी मिळाला नाही. अशा परिस्थितीत योजनेवर नियोजन आयोगापेक्षा सरकारच्या तत्कालीन धोरणांचा जास्त प्रभाव पडणे अपरिहार्य होते. म्हणूनच गाडगीळांनी टिपणांच्या मथळ्यात 'Government of India's' असा सहेतुकपणे शब्दप्रयोग वापरला असावा. एवढ्या खुलाशानंतर आता आपण गाडगीळांच्या 1957 मधील लेखाच्या पहिल्या दोन परिच्छेदांकडे परत वळू. अन्नधान्य उत्पादन, भावफुगवटा, आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंद, अभिवृद्धी दर आणि नियोजित व्ययाची योग्य दिशा या सर्व बाबींचा विचार करताना पहिली योजना यशस्वी ठरली, असे गाडगीळ मान्य करतात. परंतु या तथाकथित यशाची उकल करताना गाडगीळ पुढे म्हणतात,'' कदाचित असे म्हणता येऊ शकेल की, पहिल्या पंचवार्षिक योजना कालातील प्राप्ती मुळीच नियोजित करण्यात आल्या नाहीत.''[10] त्याच्यापुढे जाऊन गाडगीळ त्या प्राप्तींचे श्रेय देशांतर्गत सूज्ञ वित्तीय व राजकोषीय धोरणाला तसेच अनुकूल बहिर्गत घटनांना देतात.

गाडगीळ प्रत्येक शब्द तार्किकता व प्रमाणभूतता यांच्या आधारे निवडून - पाखडून घेतात. वरील विधानातील 'perhaps,' 'may' 'of the First Five-Year plan period' (not of the plan) हे त्याचे दाखले आहेत. काही टीकाकार महत्त्वाच्या विधानांच्या मागील व पुढील संदर्भ ध्यानात घेत नाहीत किंवा तो संदर्भ ध्यानात घेतलाच तर त्याकडे हेतुत: ते दुर्लक्ष करतात. टीकेत एकारलेपण येते. अकारण गोंधळ निर्माण होतो. योजना अभ्यासकांचा तसा गोंधळ झाला आहे. उपरिनिर्दिष्ट विधानाच्या बाबतीत परत तसे घडू नये म्हणून हा खुलासा. योजना कालातील अनुकूल घटक आणि अनियोजित धोरणे असा सूक्ष्म फरक गाडगीळांनी केला आहे. म्हणून योजनेचे यश असे प्रतिपादन करण्याऐवजी योजनाकालाचे यश असे प्रतिपादन करणे शक्य झाले. त्यामुळे गाडगीळांच्या विधानाला बाधा होण्याचे कारण नाही आणि त्यांच्या काही टीकाकारांचा झालेला गोंधळही टळू शकेल.

## उत्पादन – वितरण – विकास

गाडगीळांनी पहिल्या तीन योजना तसेच नियोजन आयोग यांच्याविषयी विपुल आणि व्यासंगपूर्ण लिखाण केले आहे. त्यांच्या धुरिणत्वाखाली तयार करण्यात

आलेल्या चौथ्या योजनेचा (1969-74) पुढे दुसऱ्या भागात स्वतंत्रपणे विचार करण्यात आला आहे. येथे उत्पादन-वितरण-विकास यांच्याविषयीचे गाडगीळांचे विचार एकत्रित मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

कृषी, सहकार, जलसिंचन, किंमत स्थैर्य, आय धोरण, शिक्षण आणि वितरण हे विषय गाडगीळांच्या विशेष आवडीचे होते. अर्थशास्त्रातील विगमनी चिकित्सा पद्धतीवर त्यांचा विशेष भर होता. ते 'पढिक पंडित' होते किंवा ते 'पढिक पंडित' नव्हते, या वादात शिरण्याचे हे ठिकाण नव्हे. खरे तर, तो माझा अधिकारही नाही. परंतु गाडगीळानी विद्यार्थी दशेत स्वीकारलेल्या तसेच रुजविलेल्या आणि जिचा माझे गुरु नी.वि. सोवनी यानी समर्थपणे तसेच समर्पकपणे उल्लेख केला आहे त्या गाडगीळांच्या 'विचारसरणीच्या पाया' चा येथे निर्देश करणे आवश्यक आहे. सोवनी म्हणतात, ''गीतारहस्यातील कर्मयोगाचे तत्त्वज्ञान, आर्थिक व सामाजिक समता, मानवी व्यवहारांच्या नियंत्रणाची शक्यता व आवश्यकता आणि समाजधुरिणांनी हे अमलात आणण्याची शक्यता व आवश्यकता, ही तत्त्वे त्यांनी विचारपूर्वक आपल्या मनात व वैचारिक भूमीत रुजविली होती.''[11] गाडगीळानी निष्ठापूर्वकपणे 'स्वीकारलेल्या' व 'प्रज्ञावान' अर्थशास्त्रज्ञ म्हणून स्वत:मध्ये 'रुजविलेल्या' विचारसरणीवर त्यांचा आर्थिक विकासविषयक दृष्टिकोन साकारला आहे. आणि त्यांच्या नियोजनविषयक विचारांमध्ये त्याचे जागोजागी प्रतिबिंब पडले आहे. त्या दृष्टिकोनात लेखाच्या आरंभी उद्धृत केलेल्या ओवीतील 'परि व्यर्थ तें आघवें । विनियोगेवीण ॥' (विनियोगाशिवाय, म्हणजे सम्यक उपयोगाशिवाय, केलेले काम विफल असते) याचा दाखला किंवा पुरावा मिळतो. विशेषत: गाडगीळांच्या वितरणाच्या उपपत्तीला ओवीचा अन्वयार्थ चपखल लागू पडतो.

उत्पादन, वितरण व विकास या तीन संकल्पना नियोजनाशी संबंधित असून गाडगीळानी त्यांच्या नियोजनविषयक विचारात त्यांचा वारंवार उल्लेख केला आहे. एवढा खुलासा करून उपलब्ध साधनांच्या मर्यादेत गाडगीळांच्या उत्पादन-वितरण-विकास मीमांसेचा विचार करू.

पाठीमागे वेगळ्या मुद्याच्या संदर्भात गाडगीळांच्या दृष्टिकोनाचा केवळ उल्लेख केला. त्यानुसार राष्ट्रीय किंवा दरडोई उत्पन्नात वाढ करण्यापुरते उद्दिष्ट मर्यादित ठेवणारे नियोजन 'समुचित नियोजन असत नाही.' उत्पादनातील किंवा उत्पन्नातील वाढीचे इष्टतम किंवा न्याय्य वितरण केल्यानंतरच वितरण-उत्पादन-वितरण ही चक्रीय प्रक्रिया पूर्ण होते, असा गाडगीळांचा दावा होता. उदाहरण म्हणून नागपूर विद्यापीठात त्यांनी दिलेल्या दीक्षांत व्याख्यानाचा (20 जानेवारी, 1962) उल्लेख करू. व्याख्यानाचा विषय होता *'Socio - economic Situation in India'* या विषयांतर्गत भारतातील उद्योगीकरणाचा परामर्श घेताना शिक्षण, आरोग्य, इत्यादी सार्वजनिक सेवा पुरविण्याकडे हेतुपुरस्सरपणे दुर्लक्ष करून खाजगी क्षेत्राला झुकते माप देणाऱ्या सरकारचा गाडगीळानी खरपूस समाचार घेतला आहे. तसेच सरकारच्या संरक्षणाच्या आश्रयाखाली खाजगी क्षेत्रातील मोठ्या उद्योगांनी बरेच अकल्पित लाभ (windfall gains), आधिक्य आणि माया (margin) जमा केली, असा गाडगीळांचा आक्षेप आहे आणि निवडक भांडवलदारांसाठीच्या विविध सोयी-सवलतींची बरसात करून त्यांचे समर्थन करणाऱ्या सरकारच्या 'वितरणापूर्वी उत्पादन' (production before distribution) धोरणाची गाडगीळांची टीका प्रसिद्ध आहे. या टीकेवरच गाडगीळांची वितरणाची किंवा वितरणात्मक न्यायाची मीमांसा / उपपत्ती आधारित आहे. पुढील दृष्टांत देताना गाडगीळ म्हणतात, '' तुम्ही ज्याचे उत्पादन केले आहे त्याचेच केवळ वितरण करू शकता हे कोंबडी अंडे देते यापेक्षा जास्त खरे नाही.''[12] दुसऱ्या शब्दात, कोंबडीने दिलेल्या अंड्याच्या उत्पन्नातील रास्त किंवा न्याय्य हिस्सा तिच्या देखभालीसाठी किंवा स्वास्थ्यासाठी बाजूला काढल्याशिवाय तिचा दीर्घकाल चरितार्थ (mainte-

nance) चालणार नाही. तिची दीर्घकालातील अंडनक्षमता शाबूत (intact) राहणार नाही. भांडवल शाबूत ठेवण्यासारखीच ही प्रक्रिया आहे. खाजगी क्षेत्रातील मोठ्या उद्योगांवर सोयी-सवलतींची सरकारने केलेली बरसात, त्यांच्या आधारे त्या उद्योगांनी गोळा केलेली माया, सरकारी आश्रयामुळे त्यांच्या कार्यदक्षतेला बसलेली खीळ, संपत्ती व उत्पन्न यांचे वाढत जाणारे केन्द्रीकरण, त्यामुळे वाढणारी विषमता, इत्यादी बाबींचा गाडगीळांच्या वितरणाच्या उपपत्तीशी थेट संदर्भ आहे.

गाडगीळांची उत्पादनाच्या वितरणावरील टीका (म्हणजे त्यांची वितरणाचे उत्पादन ही उपपत्ती) दोन दृष्टिकोनातून लक्षणीय ठरते. एक, त्यांच्या कालात मान्यता पावलेल्या झिरप सिद्धान्ताला (trickle down theory) गाडगीळांनी एका प्रकारे आव्हान दिले. येथे वितरणाला संपूरक असणारा एक अद्यावत संदर्भ देण्याचा मोह अनावर होतो. जागतिक बँकेच्या 1996 पर्यंतच्या विकास अहवालांमध्ये वितरणाला प्राथम्य देणाऱ्या मानवी विकास अहवालांच्या विरोधी सूर होता. परंतु त्यानंतरच्या, व विशेषत: 1999-2000 च्या, जागतिक बँकेच्या ताज्या अहवालात वितरणाला संपूरक फेरबदल मान्य करण्यात आले आहेत. पाठीमागील पन्नास वर्षांमधील विकासाच्या अनुभवाचा मागोवा घेताना अहवाल म्हणतो, ''अभिवृद्धी खालपर्यंत झिरपत नाही ; विकासाने मानवाच्या गरजांबरोबर प्रत्यक्ष:त मुकाबला करावयालाच हवा.''[13] दोन, गाडगीळ हे जास्तीत जास्त अचूक पूर्वेक्षण करणारे द्रष्टे अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांच्या वितरणविषयक दृष्टिकोनाचे, कळत नकळत, प्रतिबिंब 1990 पासून प्रसिद्ध होणाऱ्या मानवी विकास अहवालांमध्ये पडले आहे. उदाहरणार्थ, ''आय आणि मानवी विकास यांच्यात आपोआप निर्माण होणारा दुवा असत नाही.''[14] किंवा ''दीर्घ व निरोगी जीवन जगणे, बुद्धिवंत (माहितीसमृद्ध) असणे आणि सभ्य राहणीमानासाठी मूलभूत गरजांची उपलब्धी,''[15] हे मानवी विकासाचे काही प्रमुख घटक असून आज त्यांना जागतिक स्तरावर मान्यता मिळाली आहे. राष्ट्रीय किंवा दरडोई उत्पन्न अल्प किंवा जास्त हा पूर्वीप्रमाणे मूलभूत प्रश्न नाही. उत्पन्नाचे वितरण किती प्रमाणात न्याय्य आहे हा विकासाचा जास्त आश्वासक निर्देशक आहे. उदाहरणार्थ, 1989 मध्ये 5,220 डॉलर दरडोई उत्पन्नाचा ओमान त्या वर्षात 1,780 डॉलर दरडोई उत्पन्नाच्या कोस्टा रिकापेक्षा न्यून विकसित होता. त्याचे प्रमुख स्पष्टीकरण असे आहे की, अल्प दरडोई उत्पन्नाच्या कोस्टा रिका मधील वितरण व्यवस्था जास्त कार्यदक्ष आणि न्याय्य होती. विमर्शी पद्धतीवर जास्त जोर देणारे गाडगीळ जसे अनुभववादी (empiricist) अर्थशास्त्रज्ञ होते तसे ते द्रष्टे अर्थशास्त्रज्ञही होते.

## 2

### सांजाचा स्वाद सेवनात
(Taste of pudding is in eating)

आतापर्यंत आपण गाडगीळांच्या नियोजनविषयक विचारांचा मागोवा घेतला. तो मागोवा पहिल्या तीन योजनांपुरता मर्यादित होता. आता येथे एका कळीच्या प्रश्नाचा विचार करावयाचा आहे. तो प्रश्न म्हणजे चौथ्या योजनेच्या मसुद्यात (1969-74) गाडगीळ त्यांच्या विचारांची अभिव्यक्ती किती प्रमाणात करू शकले.

नवीन नियोजन आयोग नवीन योजना कोऱ्या पाटीवर तयार करू शकत नाही, या अर्थाचे विधान गाडगीळांनी एका ठिकाणी केल्याचे स्मरते. येथे त्याचा नेमका संदर्भ स्मरत नाही. म्हणून त्या विधानात सूचित पुढील अनुमानांवरच अवलंबून राहणे भाग आहे. अर्थात, गाडगीळांनी हे विधान त्यांनी चौथ्या योजनेच्या संबंधात नियोजन आयोगाचे उपाध्यक्षपद स्वीकारण्यापूर्वी केले आहे एवढे मात्र निश्चित. या विधानात सूचित अनुमाने पुढीलप्रमाणे असू शकतात. एक, पूर्वीच्या नियोजन आयोगाने संबंधित योजनेच्या मसुद्यात प्राप्त परिस्थितीत काही संकेत निर्माण केले असतील, किंवा काही तांत्रिक व्यूह / सूत्रे स्वीकारली

असतील. नवीन मसुदा तयार करताना संकेत, व्यूह आणि सूत्रे यांच्यात परिस्थितीनुसार बदल करण्यास सहजपणे मान्यता मिळेल याची खात्री वाटत नसावी. दोन, प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेत वैयक्तिक व परस्परविरोधी प्रतिनिधित्व करणारे संघ / संघटना असतात. त्यात अस्वाभाविक असे काही नाही. प्रश्न निर्माण होतो तो अशा संघटना किंवा क्षेत्रे नजरेसमोर ठेऊन नवीन प्रस्ताव तयार करण्याचा. विशेषत: योजनेसाठी वित्तीय साधने उभी करण्याविषयीचे प्रस्ताव योजनेच्या यशासाठी जेवढे महत्त्वाचे तेवढेच धोकादायकही ठरतात. एकाच वेळी सर्व दबाव गटांना संतुष्ट करणे कठीण असते. समष्टीय आर्थिक स्थैर्याचा विचार करताना विविध दबाव गटांना कसे तोंड द्यावयाचे किंवा दाखवायचे, हेच नियोजन आयोगाचे प्रमुख काम ठरत असावे आणि तिसरा तर्क आहे नियोजन आयोगाच्या (उपाध्यक्ष, सदस्य, सचिव, इत्यादी) नेमणुकीसंबंधीचा. म्हणजे नेमणूक करताना किंवा उपाध्यक्ष पदावरील व्यक्तीला काढून टाकताना पाळावयाचे नियम आणि सोयीनुसार पाडण्यात आलेले संकेत. अशाप्रकारे नियोजन आयोगाला आपली घटनात्मक जबाबदारी पार पाडताना अनेक अडथळ्यांच्या शर्यतीतून जावे लागते. गाडगीळांच्या कोऱ्या पाटीसंबंधातील हे केवळ माझे तर्क आहेत. ते तर्क करताना गाडगीळांना कदाचित चौथीच गोष्ट सूचित करावयाची असल्यास त्यांचा तो अधिकार कबूल करून चौथ्या योजनेचा आता विचार करू.

सुरुवातीला एका गोष्टीचा खुलासा करावयाला हवा. तो असा की, नियोजन आयोगाचे उपाध्यक्षपद स्वीकारण्यापर्यंत गाडगीळांनी नियोजन आयोग आणि पहिल्या तीन योजना यांच्यासंबंधात विविध बाजूंनी टीकाटिप्पणी केली. त्याअनुषंगाने त्यांनी अनेक मौलिक सूचना केल्या. योजनांच्या जमेच्या बाबींची योग्य शब्दात प्रशंसा केली. त्याबरोबरच, योजना आणि आयोग यांच्या अपयशावर भयविरहित किंवा मेहरनजरविरहित (without fear or favour) अशी सडकून टीका केली. अशा गाडगीळांच्यावर चौथ्या योजनेसाठी नियोजन आयोगाच्या उपाध्यक्षपदाची 1967 मध्ये जबाबदारी पडली. गाडगीळांची ती एक सत्वपरीक्षाच (acid test) होती. नियोजन व विकास क्षेत्रातील एक गाढे अभ्यासक व साक्षेपी टीकाकार गाडगीळ या सत्वपरीक्षेत किती यशस्वी झाले ?

या अवघड व नाजुक प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी चौथ्या योजनेच्या तपशीलातून जाता ढोबळ मानाने योजनेचा दृष्टिकोन व त्याचे प्रमुख घटक, योजनेची प्रमुख उद्दिष्टे व ती सिद्ध करण्याची उपाययोजना, त्यांच्या प्राप्ती (achievements), इत्यादी निवडक बाबींवर मी लक्ष केन्द्रित केले आहे. त्याचे एक प्रमुख कारण आहे ते असे की, 1967 पर्यंत गाडगीळांच्या टीकाटिप्पणीत भारतासारख्या गरीब देशाच्या संदर्भात त्यांनी ज्या बाबी केन्द्रस्थानी मानल्या त्यांचे संक्षेपात विश्लेषण करण्यासाठी उपरिनिर्दिष्ट बाबी पुरेशा ठराव्यात. शिवाय, त्या बाबींपुरते विश्लेषण मर्यादित ठेवल्यामुळे लेखाचा अनावश्यक पसारा टाळता येईल.

गाडगीळांनी केन्द्रस्थानी मानलेल्या आणि ज्यांच्या संबंधात गाडगीळांना कमी-जास्त प्रमाणात त्रुटी जाणवल्या त्यापैकी काही ठळक बाबी पुढे दिल्या आहेत. प्रत्येक बाबीपुढील कंसातील मजकूर गाडगीळांच्या दृष्टिकोनातून त्रुटी/अभाव/दुर्लक्ष दर्शवितो. किंमत स्थैर्य (अभाव), विदेशी विनिमय आघाडी (व्यवस्थापनाकडे अपुरे लक्ष), शेतीमालाचे विपणन आणि त्याची प्रक्रिया (दुर्लक्षित), सरकारी क्षेत्रातील उपक्रमांचे महत्त्व (पुरेशा प्रमाणावरील प्रशिक्षित कर्मचारी वर्ग निर्माण करण्याकडे दुर्लक्ष किंवा त्या संबंधातील निष्क्रियता), वार्षिक योजना (अभाव), शिक्षणाचे विकासातील स्थान (उपेक्षित), खाजगी क्षेत्र (अवाजवी संरक्षण व सोयी-सवलतींची बरसात), खाजगी सेवन (नियोजनाच्या यशासाठी त्यावर वाजवी निर्बंध लादण्याच्या गरजेची टाळाटाळ), वित्तीय विल्हेवार व प्राकृतिक लक्ष्ये यांचा समन्वय (तफावत व फट) आणि कार्यदक्ष वितरण धोरण (उत्पादनाला झुकते माप). अशाप्रकारे, वरील सर्व आघाड्यांवरील

कमीजास्त अपयश, ही एक नित्याची बाब झाली आहे. तसेच त्या अपयशात सिंहाचा वाटा असतो प्रशासनिक अळमटळम (dilly-dallying) आणि राजकीय जंतरमंतर (hocus-pocus) यांचा. या त्रुटी ध्यानात घेऊन नियोजनाची उद्दिष्टे, चौथ्या योजनेचा दृष्टिकोन, त्याचे प्रमुख घटक आणि तिचा आकार यांचा संक्षेपात केवळ उल्लेख करू.

देशाच्या साधनसंपत्तीचा कार्यदक्ष सदुपयोग (exploitation) संघटित करून उत्पादनात वाढ करणे आणि विकासाच्या लाभांचे एकसमान (even) वितरण करून उत्पन्नातील विषमता कमी करणे, ही भारतातील नियोजनाची सर्वसाधारण व मान्यताप्राप्त उद्दिष्टे आहेत. त्यांच्या सिद्धीसाठी आवश्यक असते बुद्धिकौशल्य (growthmanship)

स्थैर्यानिशी अभिवृद्धी व राष्ट्रीय आत्मनिर्भरता, हा चौथ्या योजनेचा दृष्टिकोन (approach) आहे. त्याचे पुढील काही महत्त्वाचे घटक आहेत : (अ) शेतीमालाच्या उत्पादनातील चढ-उतारांविषयी संरक्षक उपाययोजना करणे ; (आ) अन्नधान्यांचा मोठा भावस्थिरक साठा (buffer-stock) निर्माण करणे ; (इ) अन्नधान्यांच्या किमती व किंमत पातळी स्थिर करणे.

अशा प्रकारच्या चौथ्या योजनेच्या आकाराचाही येथे उल्लेख करावयाला हवा. योजनेतील प्रस्तावित एकूण खर्च रु. 24,882 कोटी असून सरकारी क्षेत्रासाठी रु. 15,902 कोटी आणि खाजगी क्षेत्रासाठी रु. 8,980 कोटी अशी त्याची वाटणी करण्यात आली आहे. तसेच कृषी व संलग्न क्षेत्रे आणि उद्योग व खनिजे यांच्यासाठी अनुक्रमे रु. 2,728.18 कोटी व रु. 3,337.71 कोटी खर्चाचे प्रस्ताव होते. कृषी व संलग्न क्षेत्रांसाठीच्या रकमेत जलसिंचन व पूरनियंत्रण यांच्यासाठीच्या प्रस्तावित रु. 1086.57 कोटी खर्चाचा समावेश केला, तर कृषी व उद्योग यांच्यावरील प्रस्तावित खर्चामधील तफावत, पाहिल्या दोन योजनांच्या तुलनेने, कमी करण्यात नियोजन आयोग यशस्वी झाला, असे निदान आकड्यांवरून स्पष्ट होते.

पहिल्या तीन योजनांच्या संदर्भात गाडगीळांचा एक गंभीर स्वरुपाचा आक्षेप होता. पाठीमागे आपण त्याचा उल्लेख केला आहे. योजनेतील नियोजित लक्ष्ये व सिद्धी किंवा प्रत्यक्षातील त्यांची प्राप्ती यांच्यात ताळमेळ नसतो. वित्तीय लक्ष्ये व प्राकृतिक लक्ष्ये यांच्या संबंधातील आवश्यक 'तांत्रिक परीक्षणाचा अभाव' (जे काम नियोजन आयोगाचे आहे) हे त्याचे प्रमुख कारण होते, असे गाडगीळांनी त्यांच्या आक्षेपाचे स्पष्टीकरण केले होते. चौथ्या योजनेत त्यासंबंधात सुधारणा झाली काय, असा प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर दोन भागात विभागून देणे (योजनेची पहिली दोन वर्षे व तिची पूर्ण पाच वर्षे) जास्त सोयीचे ठरते. पहिल्या भागात म्हणजे योजनेच्या पहिल्या दोन वर्षांत गाडगीळ नियोजन आयोगाच्या उपाध्यक्षपदावर होते. तसेच नियोजन आयोगाचे योजनेच्या पहिल्या दोन वर्षांचे मध्यावधी मूल्यन (Mid-term appraisal) उपलब्ध आहे. दुसऱ्या भागात नियोजित लक्ष्ये व प्रत्यक्षातील प्राप्ती यांच्या संबंधातील योजनेच्या संपूर्ण पाच वर्षांतील कार्यसिद्धीचा (performance) आढावा घेतला आहे. तो दोन भागात आढावा घेताना, अर्थातच, पाठीमागे उल्लेख केल्याप्रमाणे गाडगीळांनी केन्द्रस्थानी मानलेल्या बाबींपैकी काही निवडक बाबींवर लक्ष केन्द्रित केले आहे. आता पहिल्या भागाकडे वळू.

योजनाकालात राष्ट्रीय उत्पन्नात (घटकपरिव्ययानुसार निव्वळ राष्ट्रीय उत्पादितात) सरासरी वार्षिक संयुक्त (compound) अभिवृद्धी दरात 5.6 टक्के वाढीचे उद्दिष्ट होते. मध्यावधी मूल्यनानुसार पहिल्या दोन वर्षांत (1969-70 व 1970-71) राष्ट्रीय उत्पन्न अनुक्रमे 5.3 टक्के व 4.8 टक्के वाढले. म्हणजे त्या दोन वर्षांतील एकूण तूट 1.1 टक्के होती. कृषी क्षेत्रातील योजनेत अपेक्षित सरासरी वार्षिक अभिवृद्धी दर 5.0 टक्के होता. प्रत्यक्षात दोन वर्षांत त्यात अनुक्रमे 5.1 टक्के व 5.3 टक्के वाढ झाली. मोठ्या निर्माणी उद्योगाच्या (manufacturing

industry) क्षेत्रातील सरासरी वार्षिक 9.3 टक्के अभिवृद्धी दराचे उद्दिष्ट होते. प्रत्यक्षात दोन वर्षांत अनुक्रमे 5.9 व 3.6 टक्क्यांपर्यंत तो दर घसरला. म्हणजे त्या दोन वर्षांतील सरासरी वार्षिक घट 4.7 टक्के होती. [16]

स्थैर्यानिशी अभिवृद्धी व राष्ट्रीय आत्मनिर्भरता हा योजनेचा दृष्टिकोन होता. किंमत स्थैर्याशिवाय अभिवृद्धी प्रत्यक्षात अर्थपूर्ण ठरत नाही. या भूमिकेतून योजनेच्या पहिल्या दोन वर्षांतील सर्वसाधारण किंमत पातळीतील बदलांचा विचार करू. दुसऱ्या योजनेत घाऊक किंमत निर्देशांक वार्षिक सरासरी 6.0 टक्क्यांनी वाढला. तिसऱ्या योजनेतही तो 6.0 टक्के होता. परंतु 1966-67 मध्ये त्याने 16.0 टक्क्यांपर्यंत उसळी घेतली होती. दुष्काळ व पाकिस्तानबरोबर युद्ध, ही त्याची दोन प्रमुख कारणे होती. त्यांचा येथे उल्लेख करण्याचे कारण असे की, नियोजन आयोगाच्या नियंत्रणाबाहेरील कारणांनी निर्माण झालेल्या सुसाट अतिवृद्धीयुक्त भावफुगवट्याची चौथ्या योजनेला पार्श्वभूमी आहे. मध्यावधी मूल्यनानुसार योजनेपूर्वीप्रमाणे योजनेच्या पहिल्या दोन वर्षांतील किंमत पातळी अन्नधान्य आघाडीवरील दबावातून निर्माण झाली नाही. पुरेशा प्रमाणातील वितरणाची साथ मिळालेल्या अन्नधान्यांच्या समाधानकारक उत्पादनामुळे 1969-70 मध्ये अन्नधान्यांच्या घाऊक निर्देशांकात 3.6 टक्के वाढ झाली. परंतु 1970-71 मध्ये त्यात घट झाली. परंतु पाठीमागे उल्लेख केल्याप्रमाणे त्या दोन वर्षांत औद्योगिक उत्पादन योजनेत अंदाज केल्याप्रमाणे वाढले नाही. शिवाय, त्या दोन वर्षांत वास्तव राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीपेक्षा पैशाच्या पुरवठ्यात दोन पटीपेक्षा जास्त वाढ झाली. त्याचा नक्त परिणाम म्हणून वार्षिक सरासरी घाऊक किंमत निर्देशांकात (सर्व वस्तू) 1969-70 व 1970-71 मध्ये अनुक्रमे 3.7 टक्के व 5.5 टक्के वाढ झाली.[17] याचा अर्थ असा की, योजनेच्या पहिल्या दोन वर्षांत अन्नधान्यांच्या किंमत पातळीत (घाऊक किंमत निर्देशांकात नव्हे) तौलनिक किंमत स्थैर्य निर्माण करण्यात यश मिळाले. परंतु औद्योगिक उत्पादनाच्या आघाडीवरील अपयश मोठे होते. म्हणून अन्नधान्यांच्या किंमत पातळीपुरते मर्यादित किंमत स्थैर्य 'टिकविण्यासाठी अर्थव्यवस्थेतील अतिरिक्त मागणीला लगाम घालावा लागेल, खाजगी सेवन तसेच बिगर-आवश्यक सरकारी खरेदी यांच्यात कपात करावी लागेल, असा नियोजन आयोगाने मध्यावधी मूल्यनात इशारा दिला आहे.[18] केन्द्र व राज्ये यांच्याकडून मिळणाऱ्या प्रतिसादावर या इशाऱ्याचे भवितव्य अवलंबून आहे. त्या भूमिकेतून योजनेच्या संपूर्ण पाच वर्षांत काय घडले, याविषयीचा संक्षेपात आढावा घेण्यासाठी आता पाठीमागे उल्लेख केल्याप्रमाणे दुसऱ्या भागाकडे वळू.

(किंमत) स्थैर्यानिशी अभिवृद्धी हा योजनेच्या दृष्टिकोनातील एक महत्त्वाचा घटक होता. पहिल्या दोन वर्षांत तौलनिक किंमत स्थैर्य निर्माण झाले. परंतु पुढे ते टिकले नाही. योजनेच्या पाच वर्षांचा विचार केला तर सरासरी वार्षिक भावफुगवटा 8.9 टक्के होता. तिसऱ्या योजनेत तो 5.7 टक्के तर पाचव्या योजनेत तो 6.3 टक्के होता. राष्ट्रीय उत्पन्नात सरासरी वार्षिक 5.6 टक्के वाढीचे उद्दिष्ट होते. परंतु पंचवार्षिक वाढ फक्त 3.2 टक्के होती. कृषी क्षेत्रातील सरासरी वार्षिक अभिवृद्धी दर 3.9 टक्क्यांच्या आसपास होता; उद्दिष्ट होते 5.0 टक्के. औद्योगिक उत्पादन सरासरी वार्षिक 5.0 टक्क्यांच्या आसपास राहिले; उद्दिष्ट होते 9.3 टक्के, तिसऱ्या योजनेच्या तुलनेत चौथ्या योजनेत सरकारी क्षेत्रातील गुंतवणूक जवळजवळ दोन पटीने वाढविण्याचे उद्दिष्ट होते. प्रत्यक्षात गुंतवणूक 'संथ गतीने'[19] वाढली. या संदर्भात गाडगीळांचा दृष्टिकोन सावध व स्पष्ट होता. त्याचा त्यांनी पूर्वी उच्चारही केला होता. चौथ्या योजनेच्या मसुद्यात त्याचे प्रतिबिंब पडले आहे आणि एका परीने ते योग्यच होते. सरकारी क्षेत्रात गुंतवणूक वाढविणे एका परीने शक्य व सोपे असते. परंतु त्या क्षेत्रातील उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशासकीय, तांत्रिक व व्यवस्थापकीय कर्मचारी वर्गाची उभारणी / बांधणी करण्याला गाडगीळांनी प्राथम्य दिले. आजकालची सरकारी क्षेत्रातील उपक्रमांची अवस्था

पाहता गाडगीळांचा सावध दृष्टिकोन योग्यच होता. एकंदरीत, असे काही अपवाद वगळता, चौथी योजना अपेक्षेप्रमाणे यशस्वी झाली नाही. परंतु तिचे संपूर्ण अपयश नियोजित नव्हते.

3

## दोन विवाद्य मुद्दे

विशेषत: 1951 ते 1967 या कालात भारतातील नियोजनविषयी लेख, व्याख्याने आणि नियोजन आयोगाला सादर केलेली टिपणे लिहून गाडगीळांनी स्वत:ची मते मांडली. त्यापैकी काही मते विवाद्य ठरली किंवा ठरविण्यात आली. येथे त्यांचा परामर्श घेणे अपरिहार्य ठरते.

(अ) पहिली विवाद निर्माण करणारी बाब शिक्षण व प्रगती (विकास) यांच्या संबंधातील आहे. पाठीमागे उल्लेख केलेल्या दुसऱ्या योजनेच्या फेरप्रावस्थेच्या (rephasing) संबंधातील टिपणात गाडगीळांनी नियोजनातील शिक्षणाच्या 'उपेक्षेवर' नेमके बोट ठेवले आहे. 'तांत्रिक दृष्टीने प्रागतिक समाज' घडविण्यासाठी शिक्षण हे कोणत्याही योजनेचे क्रमांक एकचे उद्दिष्ट असले पाहिजे, असे गाडगीळांचे प्रतिपादन होते. 1958 मधील टिपणात त्यांनी मांडलेले हे मत 2000 मध्येही प्रस्तुत ठरते. म्हणून शिक्षण व विकास यांच्यातील अविभाज्य दुवा स्पष्ट करणाऱ्या गाडगीळांचे द्रष्टेपण विशद करण्याची येथे गरज आहे.

आजकाल शैक्षणिक प्राप्ती (achievement) व आर्थिक विकास (योजनेचे यश) परस्परांशी निगडित असतात. अशा बऱ्याच काही गोष्टी केवळ गृहीत धरून मते मांडली जातात. त्यामुळे गोंधळ निर्माण होतो. ही परिस्थिती केवळ भारतात नसून तिचा कटु अनुभव कमीजास्त प्रमाणात अनेक देशांमध्येही येतो. आज काही देश तेथील मुलांना / मुलींना सकस शिक्षण देऊन त्यांना सक्षम बनवितात. उलट, काही देशांना ते शक्य होत नाही. काही देश सधन असतात तर बरेच देश गरीब राहतात. असे का घडते ? या प्रश्नाचे एका वाक्यातील उत्तर पुढीलप्रमाणे देता येते. शिक्षणाला विकासातील यशाची 'गुरुकिल्ली' समजण्यात येत असले तरी शिक्षणाच्या यशाची गुरुकिल्ली कोणती याचा गरीब देशांमध्ये क्वचितच विचार केला जातो. गाडगीळांनी त्यांच्या उपरिनिर्दिष्ट टिपणात या संदर्भात एक विधान केले आहे. '' दुसऱ्या योजनेत शिक्षणासाठी विल्हेवारींची (allocations) तरतूद करण्यात एक गंभीर चूक झाली.''[20] या विधानाचा हवाला देऊन काही स्वयंघोषित परिव्ययवाद्यांनी / पैसावाद्यांनी असा शोध लावला आहे की, राष्ट्रीय उत्पन्नाशी असलेल्या शिक्षणावरील परिव्ययाच्या गुणोत्तरातील वाढीचे गाडगीळ समर्थक होते. परंतु गाडगीळांच्या विधानाचा हा विपर्यास आहे. तो विपर्यास कसा, याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देता येईल. परिव्ययवाद्यांचा एक कलमी कार्यक्रम प्रसिद्ध आहे. तो म्हणजे उपरिनिर्दिष्ट परिव्यय गुणोत्तरात वाढ करणे. शिक्षणाची गुणवत्ता हे केवळ त्यावरील परिव्ययाचे प्रत्यक्ष फल आहे, अशी त्यांची समजूत झाली आहे. त्यावेळी ते, पाठीमागे उल्लेख केल्याप्रमाणे, बऱ्याच गोष्टी गृहीत धरतात. उदाहरणार्थ गळती, अनुत्तीर्णता व कुंठितता (stagnation) यांच्या स्वरुपातील अपव्यय (waste) शून्य आहे, शिक्षणावरील परिव्ययाचा अधिकतर हिस्सा शिक्षकांच्या पगारावर खर्च होत नाही, शिक्षकांची 100 टक्के उपस्थिती असते आणि ते 100 टक्के इमानदारीने त्यांचे काम करतात, शिक्षितांचा पुरवठा व उद्योगांकडूनची त्यांची मागणी यांच्यातील विषमतोलाच्या जागी समतोल प्रस्थापित झाला आहे, वर्गात विद्यार्थ्यांची 100 टक्के उपस्थिती असते, इत्यादी.[21] या सर्व गोष्टी गृहीत धरून तथाकथित गुणोत्तराचे गाडगीळ समर्थक होते, असे सोयीस्कर विधान करणे हे अन्यायकारक आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, गाडगीळांच्या विधानाला निव्वळ दुसऱ्या योजनेचा संदर्भ आहे आणि त्या संदर्भात शिक्षणासाठी साधनसंपत्तीची विल्हेवार आणि राष्ट्रीय उत्पन्नाशी शिक्षणावरील परिव्ययाचे गुणोत्तर या दोन स्वतंत्र व भिन्न बाबी आहेत. त्याकडे दुर्लक्ष होऊ नये.

(आ) दुसरी विवाद्य बाब लघु व कुटिर उद्योगांविषयीची आहे. भारतीय संदर्भातील त्या उद्योगांचे पारंपरिक महत्त्व ध्यानात घेऊन गाडगीळांनी त्यांचे वारंवार समर्थन केले आहे. येथे त्यांच्या दोन निवेदनांचा उल्लेख करू. पहिले निवेदन भारत सरकारच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेवरील टिपणातील (1951) आहे. आणि दुसरे आहे भारतीय 'नियोजन आयोगाचा कार्यभाग' (1958) या विषयावरील लास्की स्मृती व्याख्यानातील. दुसऱ्या निवेदनाचा प्रथम उल्लेख करू. गाडगीळांच्या मतानुसार पहिल्या योजनेच्या संदर्भात नियोजन आयोगाने एका बाबतीत 'सक्रीय भाग' आणि 'अग्रणी कार्यभाग' कधीही दाखविला नाही. '' ती एक महत्त्वाची बाब होती पारंपरिक लघुप्रमाणावरील कुटिर उद्योगांच्यासाठीच्या संरक्षणाच्या किंवा आरक्षणाच्या क्षेत्राची.''[22] या विधानाचा आधार घेऊन काही टीकाकार गाडगीळांनी सरसकट सर्व लघु किंवा कुटिर उद्योगांच्या आरक्षणाचे निरपवादपणे समर्थन केले, असा निष्कर्ष काढतात. वास्तविक दृष्टिकोनातून ते खरे नाही, अर्थशास्त्रातील सिद्धान्त स्थल-काल-स्थितीसापेक्ष असतात. त्याची गाडगीळांना निरंतर जाण होती आणि त्याची साक्ष गाडगीळांच्या 1951 मधील टिपणातील पहिल्या निवेदनात पटते. मोठ्या प्रमाणावरील किंवा संघटित उद्योगांच्या स्पर्धेमुळे हानी पोहोचणाऱ्या लघु व कुटिर उद्योगांचे पुनर्संघटन करून त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी गाडगीळांनी त्रिसूत्री योजना मांडली आहे. त्यातील क्रमांक 3 च्या सूत्रात पुढील विधान करण्यात आले आहे. ''या उद्योगांचे पुनर्संघटन शक्य आणि किमान कालासाठी टिकाऊ करण्याच्या हेतूने त्यांच्या उत्पादितांच्या आश्रित बाजाराची काही ठरविलेल्या कालासाठी हमी देणे.''[23] या विधानाचा स्पष्ट व सरळ अर्थ असा की, अवतीभोवतीच्या तंत्रविद्येच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून लघु व कुटिर उद्योगांच्या उत्पादितांसाठी गाडगीळांनी निरपवाद आरक्षणाचे कधीही समर्थन केले नाही. गाडगीळ एक थोर व द्रष्टे अर्थशास्त्रज्ञ होते. असे सार्थपणे म्हटले जाते की, जास्तीत जास्त थोर अर्थशास्त्रज्ञ जास्तीत जास्त वादग्रस्त ठरतात. टीकाकारांकडून आणखी एक गोष्ट दुर्लक्षित झाली आहे ती म्हणजे, उपरिनिर्दिष्ट दोन विधानांमध्ये गाडगीळांना अभिप्रेत असलेला सूक्ष्म फरक. 1951 मधील टिपणातील विधानात लघु व कुटिर उद्योगांचा उल्लेख आहे, तर 1958 मधील व्याख्यानातील विधानात फक्त कुटिर उद्योगांचा उल्लेख आहे.

गाडगीळांच्या निधनानंतर (1971) आणि विशेषत: गेल्या पंधरा वर्षांत लघुउद्योगांच्या क्षेत्रात मूलभूत बदल (संरचना, उत्पादन तंत्र, गुंतवणूक, विपणन, व्यवस्थापन, इत्यादी) घडून आले. या संदर्भात एका अव्वल अभ्यासातील प्रमुख निष्कर्षांचा येथे उल्लेख करण्याचा मोह अनावर होतो. तो उल्लेख करण्याचा हेतू असा की, गाडगीळ आधारसामग्रीशिवाय (data) विधान करीत नसत आणि ते विधान करताना इतकी सावधानता बाळगीत की जेणेकरून त्या विधानातून त्यांचे द्रष्टेपण प्रकट होत असे.

इअॅन लिटल, जॉन पेज आणि दीपक मुजुमदार यांचा लघुउद्योगांसंबंधीचा अभ्यासपूर्ण अहवाल 1985 च्या आसपास प्रसिद्ध झाला. त्यात भारतासह तीन देशांतील लघुउद्योगांच्या घाऊक आरक्षणवाद्यांच्या डोळ्यात अंजन घालणारे पुढील काही प्रमुख निष्कर्ष काढण्यात आले आहेत : लघु उद्योगांसाठी आरक्षणाची गरज नाही. कंपन्यांचा आकार व त्यांची श्रमघनता (श्रमाची उत्पादकता) यांच्यात सहसंबंध असत नाही. लहान छानही नाही आणि कुरूपही. ते आहे केवळ अप्रस्तुत. उदाहरणार्थ, रासायनिक व्यवसाय संस्था छोट्या आकाराची असूनही ती भांडवलघन तंत्राचा वापर करणे पसंत करते. उलट, तयार कपडे व्यवसाय संस्था मोठ्या आकाराची असूनही ती श्रमघन तंत्राचा वापर करणे पसंत करते. उद्योगांचा आकार (छोटा किंवा मोठा) महत्त्वाचा नसून त्यांचे स्वरूप आणि त्यांनी वापरलेली तंत्रविद्या महत्त्वाचे असतात.[24] गाडगीळ आज हयात असते तर त्यांची आरक्षणाविषयीची मते या अभ्यासातील निष्कर्षांपेक्षा फार वेगळी आली नसती अशी अटकळ बांधण्यास त्यांच्या 1951 मधील

टिपणातील विधानात पुरेशी जागा आहे.

## 4

## नियोजित-विकास-विचारधन

चौथ्या योजनेचे यश किती, अपयश किती, याविषयी बरीच चर्चा झाली आहे आणि पुढे ती होत राहील. अशा चर्चेत आतापर्यंत भिन्नभिन्न विचार व्यक्त झाले आहेत. येथून पुढे त्यांच्यात आणखी नवीन भर पडेल. परंतु एका मूलभूत गोष्टीच्या संबंधात मतैक्य होऊ शकते. ती गोष्ट म्हणजे, एका बाजूला सुसाध्य (feasible) योजना तयार करणे आणि धोरणांची मांडणी करणे आणि दुसऱ्या बाजूला त्या धोरणांची अमलबजावणी करणे यात मूलभूत फरक आहे. गाडगीळ तो फरक मानणारे होते. पाठीमागे त्याचा उल्लेख करण्यात आला आहे. येथे त्याचा पुरत उल्लेख करण्याचे एक कारण आहे. आतापर्यंतचा सर्वसाधारण अनुभव असा आहे की, नियोजनातील अधिकतर अपयश अमलबजावणीच्या आघाडीवरील अपयश आहे. त्यासाठी विशिष्ट योजनेला किंवा नियोजन आयोगाला संपूर्णपणे जबाबदार धरता येणार नाही. चौथ्या योजनेच्या संदर्भात सांगावयाचे झाल्यास, उत्पन्नाचे वितरण, सार्वजनिक वितरण पद्धती राज्यांतर्गत किंवा आंतरराज्य विषमतोल कमी करण्यासाठी क्षेत्र नियोजन युनिट (Area Planning Unit) विषयीची शिफारस आणि त्याची स्थापना, किंमत पातळीवरील वाढणारे दबाव कमी करण्यासाठी मागणी किंवा पैशाच्या पुरवठ्यावर अंकुश ठेवणे, अकल्पित लाभांच्या स्वरुपात अतिरिक्त माया जमा करणाऱ्या मोठ्या खाजगी उद्योगांवर वाजवी नियंत्रणे घालणे आणि राष्ट्रीय किमान प्रमाणक (norm) निश्चित करून खाजगी सेवनात कपात करणे या चौथ्या योजनेच्या, योजना म्हणून जमेच्या बाजू आहेत. नियोजित विकासासाठी किमान त्यागाची व परिश्रमाची अनिवार्यता असते. गाडगीळांनी ती तत्त्वे आचरणात आणली होती आणि रुजविली होती. चौथ्या योजनेच्या मसुद्यातील नियोजन आयोगाच्या उपरिनिर्दिष्ट धोरणांवर, उपाध्यक्ष म्हणून, गाडगीळांच्या नियोजित विकासविषयक विचारसृष्टीची मुद्रा उमटली आहे. गाडगीळांचे नियोजन विकास विचारधन हे त्यांचे मौलिक योगदान आहे. नियोजन आयोगाने मांडलेल्या वाजवी धोरणांना आणि नवीन उपक्रमांना केन्द्र व राज्ये यांच्याकडून मिळणाऱ्या प्रतिसादावर योजना, विकास आणि पर्यायाने देशाचे भवितव्य अवलंबून आहे. एका बाजूला किंमत स्थैर्याच्या धोरणाचा विधिवत स्वीकार करावयाचा आणि दुसऱ्या बाजूला वास्तव राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीच्या तुलनेत पैशाच्या पुरवठ्यातील दोन पट, तीन पट विस्तार चालऊन घ्यावयाचा हा निव्वळ दुटप्पीपणा आहे. नियोजन, विकास आणि देश या सर्वांना तो घातक आहे. चौथ्या योजनेच्या यशापयशावर चर्चा करताना ही आणि अशा अनेक बाबी नजरेआड राहू नयेत म्हणून हा खुलासा.

## संदर्भ टीपा

*(ऋणनिर्देश : धनंजयराव गाडगीळांचे मूळ लेख, टिपण्या व निवेदने विविध विद्यानिष्ठ नियतकालिकांतून 1951 ते 1966 या कालखंडात प्रसिद्ध झाली आहेत. या सर्वांचे एकत्रीकरण करून गोखले अर्थशास्त्र संस्थेने Planning and Economic Policy in India या शीर्षकाचा ग्रंथ 1972 मध्ये प्रकाशित केला आहे (Studies No. 59). वास्तव प्रस्तुत लेखासाठी मोठ्या प्रमाणावर या ग्रंथाचाच आधार घेतलेला आहे. त्यातील आवश्यक तो भाग वापरण्यास परवानगी दिल्याबद्दल लेखक गोखले अर्थशास्त्र संस्थेचा ऋणी आहे.)*

1 Gadgil,D.R.(1972), ' The Approach to the Third Five -Year plan,' Memorandum submitted to the Panel of Economists, GoI, Planning Commission, August 1959; reproduced in *Planning and Economic Policy in India*, Gokhale Institute of Politics and Economics (GIPE), p. 191.

2 तत्रैव.

3 तत्रैव, पृ. 189.

4 Gadgil, D.R. (1972),' The Role of the Planning Commission in Indian Plan ning,' The Laski Memorial Lecture delivered at the Harold Laski Institute of PoliticalScience, Ahmedabad,March 24,1958; reproduced in *Planning and Economic Policy in India*, GIPE, p.162.

5 तत्रैव. पृ. 164.

6 तत्रैव, पृ. 162.

7 तत्रैव.

8 Gadgil, D.R.(1972), 'Praspects for the Second Five - Year Plan Period' published in *India Quarterly*, vol.13,1957 reproduced in *Planning and Economic policy in India*, GIPE, pp.123-24.

9 Gadgil D. R. (1972), 'Notes on First Five - Year Plan,' Submitted to the Planning Commission, September 1951, published in *Economic Development and Cultural Change*, Chicago, March 1952; reproduced in *Planning and Economic Policy in India*, GIPE, p. 21.

10 Gadgil, D. R. (1972),' Prospects for the Second Five - Year Plan Period,' उपरोक्त, पृ.111.

11 सोवनी, नी. वि. (1974), माझे गुरू धनंजयराव गाडगीळ, देशमुख आणि कंपनी, पृ. 43.

12 Gadgil, D. R. (1972),'Socio - Echomic-Situation in India', Address delivered at the 42 nd convocation of Nagpur University, January 20, 1962; reproduced in *Planning and Economic Policy in India*, GIPE, p. 305.

13 *World Development Report 1999-2000 (Entering the 21st century)*, Oxford University Press, 2000 (foreword), p.1.

14 *Human Development Report, 1990* ( the concept first introduced); reproduced in *Human Development Report,1993*, Oxford University Press, p.11.

15 *Human Development Report* 1999, Oxford University Press, p. 127.

16 *The Fourth Plan Mid-term Appraisal* (1971), vol. I, Gol, Planning Commission, December, pp.1-2.

17 तत्रैव, पृ. 47.

18 तत्रैव, पृ. 48.

19 *Draft Fifth Five-Year Plan (1974-79)*, (1974) Gol, Planning Commission, p.131.

20 Gadgil, D.R.(1972),'On Rephasing the Second Five-Year Plan' Note submitted to the Panel of Economists, Gol, Planning Commission, January 1958 and published in the *Indian Economic Journal*, April 1958, reproduced in *Planning and Economic Policy in India*, GIPE, p. 145.

21 माने, शि. ना. (1997), 'योजनेकडून बाजाराकडे संक्रमण,' *अर्थसंवाद*, एप्रिल-जून, पृ. 79.

22 Gadgil,D.R. (1972), 'The Role of the Planning Commission in Indian Planning,' उपरोक्त पृ. 158.

23 Gadgil, D. R. (1972), ' Notes on First Five-Year Plan,' उपरोक्त पृ.5.

24 'Small is not Beautiful' (1993), *The Economic Times* (leader), October 1,1993.

# गाडगीळ आणि उद्योगीकरण

माधव दातार *

जन्मशताब्दीच्या संदर्भात गाडगीळांच्या कामगिरीचा व त्यांच्या विचारांचा आढावा घेताना काही गोष्टी सुरुवातीलाच नमुद करणे योग्य ठरेल. त्यांच्या इंग्रजी लिखाणाचे चार व मराठी लेखांचे दोन खंड प्रसिद्ध झाले असल्याने गाडगीळांचे बहुतेक सर्व लिखाण आता प्रसिद्ध झाले असावे. त्यांचे सहकारी व समकालीन यानी त्यांचे व्यक्तिमत्व व त्यांची अर्थशास्त्रीय कामगिरी यांचा व्यापक आढावा घेतला आहे. उदाहरणार्थ, सोवनी (1974); डांगे (1971). त्यामुळे त्यांच्याशी वैयक्तिक संबंध न आलेल्या लेखकास गाडगीळांची अर्थशास्त्रीय कामगिरी व व्यक्तिमत्व याबाबत फारसे काही नवे लिहिता येईल असा भ्रम प्रस्तुत लेखकास नाही. गाडगीळांच्या विचारांचे आज परिशीलन करताना वर्तमानाचा संदर्भ असलेल्या समस्यांबाबत त्यांचे विचार समजून घेणे उपयुक्ततावादी दृष्टिकोनातून कदाचित लाभदायक ठरेल.

या लेखाचा विषय निवडताना या उपयुक्ततावादी विचाराबरोबरच दुसरा एक विचार होता. विकासाच्या प्रक्रियेत उद्योगीकरणाचे कळीचे स्थान असल्याने या अंगाने आर्थिक विकासाबाबतचे त्यांचे विचार चांगल्या रीतीने समजाऊन घेता येतील. केम्ब्रिज विद्यापीठास सादर केलेला त्यांचा प्रबंध भारतातील उद्योगांची उत्क्रांती या विषयावर होता (गाडगीळ, 1972). या प्रबंधात अनेक वेळा सुधारणा करून सुधारित आवृत्या प्रकाशित करण्यात आल्या.[1] पुस्तकाच्या शीर्षकात उद्योगीकरणाचा उल्लेख असला तरी यात शेती व इतर क्षेत्रांचाही समावेश केला होता. एका अर्थी हे पुस्तक भारतात इंग्रजी सत्तेचा उदय झाल्यापासूनच्या कालाचा आर्थिक इतिहास होता.[2] पुढे पंचवार्षिकयोजनांची आखणी सुरू झाली त्यावेळेपासून

* भारतीय औद्योगिक विकास बँक, मुंबई.

भारतातील नियोजन प्रक्रिया व औद्योगिक व्यूहाशी त्यांचा संबंध आला तो थेट चौथ्या पंचवार्षिक योजनेची आखणी होईपर्यंत. त्यामुळे भारताची विकास नीती आणि त्यातील औद्योगिक क्षेत्राचे महत्त्व यासंबंधांत त्यांनी वेळोवेळी लिखाण केले. आधुनिक उपक्रमशीलतेची मुळे शोधण्याचे अनेक प्रयत्न त्यांनी स्वातंत्र्योत्तर कालात केले. या प्रयत्नांचा अंतरिम अहवाल 1959 मध्ये प्रकाशित झाला (गाडगीळ, 1959). दुसऱ्या पंचवार्षिक योजनेतील उद्योगीकरणाच्या नीतीचा तिसऱ्या योजनेनंतर, विशेषतः योजना सुटी किंवा वार्षिक योजना कालात, फेरविचार करण्याची निकड जाणवू लागली. ही फेरआखणी चौथ्या पंचवार्षिक योजनेत केली गेली. ही योजना आखली गेली तेव्हा गाडगीळ नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष होते हे सर्वश्रुतच आहे. या पार्श्वभूमीवर उद्योगीकरण हा केन्द्रबिंदू ठेऊन या निबंधाची आखणी केली आहे. निबंधाची विभागणी तीन भागात केली आहे. पहिल्या भागात स्वातंत्र्यपूर्वीच्या कालखंड विचारात घेतला आहे तर दुसऱ्या भागात स्वातंत्र्यानंतरच्या नियोजनबद्ध विकासाच्या कालावर लक्ष केन्द्रित केले आहे. तिसऱ्या भागात वर्तमान संदर्भात गाडगीळांच्या विचारांचा ऊहापोह केला आहे.

1

*भारताची औद्योगिक उत्क्रांती* हे पुस्तक प्रथम 1924 मध्ये प्रसिद्ध झाले. कंपनी सरकारचा अंमल बंद होऊन ब्रिटिश राजवटीला प्रारंभ झाला तेव्हांपासूनच्या, म्हणजे 1860 पासूनच्या, कालाचा हा आर्थिक इतिहास आहे. ब्रिटिश राजवटीचा परिणाम इथल्या शेतीवर व कारागिरांनी चालविलेल्या उद्योगांवर काय झाला या गोष्टीचा या पुस्तकात तपशीलदार विचार केला आहे. माहितीची उपलब्धता मर्यादित होतीच पण ही अडचण तर्कसंगत विश्लेषणाने भरून निघते. विसाव्या शतकाच्या अखेरीस देखील हे पुस्तक प्रथम वाचणे एवढेच नव्हे तर त्याचे पुनर्वाचन हीदेखील एक बौद्धिक मेजवानीच ठरेल.

या पुस्तकाची सुरुवातच मुळी ''एकोणिसाव्या शतकात वाहतुकीच्या क्षेत्रात जी विलक्षण क्रान्ती झाली त्याचा परिणाम म्हणून सर्व जगाचे एका व्यापक बाजारपेठेत रूपांतर होत आहे. ''या शब्दांत होते. इंग्रजी राजवटीला सुरुवात होणे ही महत्त्वाचीच घटना होती. पण या घटनेचा परिणाम सर्व भारतभर पसरण्याची प्रक्रिया अतिशय संथपणे चालली. नवीन राजवटीने जमीन महसुलाच्या पद्धतीत व्यापक बदल केले आणि त्याचे या प्रदेशांच्या अर्थरचनेवर कायमस्वरूपी परिणाम झाले. पण जमीन महसुलाच्या पद्धतीमधील बदल सर्वत्र सारखे नव्हते. ब्रिटिश राजवटीचा प्रमुख परिणाम रस्ते, रेल्वे व जल वाहतूक यामधील बदलांमुळे भिन्न प्रदेशांतील दळणवळण वाढून भारतातील कच्चा माल व भारतीय बाजार पश्चिमेच्या सान्निध्यात आला आणि तेथील उत्पादन व वाटपाच्या पद्धतीचा परिणाम भारतीय व्यापार आणि उद्योग यावर झाला.

वाहतुकीच्या साधनांचा परिणाम निर्यात व्यापारावर तर झालाच पण देशांतर्गत व्यापारावरील परिणामही कमी महत्त्वाचा नव्हता. अंतर्गत व्यापाराच्या सोयी नसल्याने वस्तूंच्या किमतींवर स्थानिक मागणी / पुरवठा यांचा प्रचंड प्रभाव असे. याचा परिणाम भिन्न प्रदेशांतील किमतींमध्ये प्रचंड फरक राहात असे. एखाद्या प्रदेशात दुष्काळ पडला तरी इतर प्रदेशांत पीकपाणी समाधानकारक असेल तर तेथील किमतींमध्ये वाढ होत नसे. वाहतुकीच्या सोयी वाढल्यानंतर या परिस्थितीत होऊ लागलेला फरक अमेरिकेतील यादवीच्या कालात ठळकपणे पुढे आला. यादवीमुळे अमेरिकेतून होणारा कापसाचा पुरवठा खंडित होऊन भारतीय कापसाला मागणी वाढली आणि कापसाच्या किमती प्रचंड प्रमाणात वाढल्या. या वाढीव किमतींचा लाभ शेतकऱ्यांना मिळाला . शेतकऱ्यांनी कापसाची लागवड ज्यादा जमिनीवर केली. स्थानिक मागणी व्यतिरिक्त इतर घटकांचा पीक पद्धतीवर परिणाम होणे ही घटना शेतीचे व्यापारीकरण होण्याची सुरुवात दर्शवीत होती आणि म्हणून महत्त्वाची होती. कापसाचा व्यापार वाढण्यास रेल्वेची मदत झालीच. पण रेल्वे

मजुरांना वाढती मागणी आल्याने मजुरीचे दर वाढण्यास प्रारंभ झाला. शेती क्षेत्राबाहेर मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाल्याने मजुरांचा वर्ग बनण्यास सुरुवात झाली.

वारंवार पडणारे दुष्काळ हा भारतीय शेतीचा स्थायीभाव मानला जाई. दुष्काळ म्हणजे अन्नाचा तुटवडा नसून रोजगाराचा अभाव हे दुष्काळाचे वैशिष्ट्य भारतीय दुष्काळावरील सर्व लेखकांनी नोंदविले आहे असे गाडगीळ नमूद करतात (पृ. 22)[3] पण वाहतुकीच्या साधनांत सुधारणा होईपर्यंत दुष्काळ म्हणजे अन्न व रोजगार या दोहोंचा तुटवडा अशीच परिस्थिती होती. वाहतुकीच्या सुधारणांमुळे हळूहळू दुष्काळाचे स्वरूप बदलण्यास सुरुवात झाली पण दुष्काळाचे ग्रामीण अर्थव्यवहारांवरील दीर्घकालीन दुष्परिणाम कायमच होते. ज्या भागात सिंचनाच्या सोयी वाढत होत्या तिथे लागवडीखालील क्षेत्र वाढलेले आढळले. स्थानिक गरजांनुरूप पिके घेतली जात त्यात दळणवळणाच्या सोयींमुळे बदल होऊ लागले पण पुरेशा सांख्यिकीय माहितीअभावी या बदलांचे नेमके स्वरूप निश्चित करता येणे दुष्कर बनते. सरकारमार्फत शेती सुधारणेचे प्रयत्न सुरू झाले. हे उपाय मर्यादित प्रमाणात तर होतेच आणि त्यांचे स्वरूप मशागतीच्या सुधारित पद्धतींचा प्रसार करणे व शेतकऱ्यांना तकावी कर्जे देणे या पद्धतीचे होते. 1895-1914 या कालात दोन वेळा तीव्र दुष्काळ पडले आणि त्याचा परिणाम गत 15 वर्षांत शेती क्षेत्रात हळूहळू झालेले बदल अवरुद्ध होण्यात झाला. दुष्काळाचा परिणाम दोन पिके घेण्याचे प्रमाण खालावण्यात झाला. व्यापारी पिके घेण्याच्या नवीन पद्धतीला धक्का बसला आणि अन्नधान्याखालील लागवड वाढली.

शेती क्षेत्रात व्यापारीकरण वाढले. दळणवळण सुलभ झाल्याने देशी व विदेशी व्यापाराला चालना मिळाली. शेती उत्पादनाचा मोठा हिस्सा बाजारात येऊ लागला. याची इतर कारणे जमीन महसूल रोख स्वरुपात गोळा करण्याची पद्धत आणि सावकारांची देणी फेडण्याची निकड ही होती. यामुळे हंगामात लगेचच बाजारात धान्य नेणे आवश्यक बनले. ब्रिटिश राजवटीत जमिनींवरील खाजगी अधिकार मान्य झाल्यामुळे शेतकऱ्यांना कर्जे मिळणे सुकर झाले. शेतीमालाच्या बाजारात चढउतार होत असल्याने सावकारांचा नफा खूप वाढला.

एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी नागरी उद्योगांचे प्रमाण अत्यल्प होते. हे उद्योग मुख्यत: कापड व श्रीमंतांकरवी वापरल्या जाणाऱ्या चैनीच्या वस्तू यापुरते मर्यादित होते. याच उद्योगांवर विदेशी स्पर्धेचा विपरित परिणाम झाला. ब्रिटिश सत्तेचा पहिला झटका भारतातील हस्तव्यवसाय व कारागिरांना बसला. याची तीन मुख्य कारणे होती. ब्रिटिशांचे राज्य स्थिरावल्यानंतर देशी दरबारी शहरे खंगली. परकीय सत्तेच्या आगमनाने विदेशी वस्तू व इतर घटकांचा प्रभाव वाढला आणि जास्त प्रगत उद्योगांबरोबर स्पर्धा वाढली. देशी राजेमहाराजे खालसा झाल्यानंतर कलाकुसरीच्या, चैनीच्या वस्तूंच्या मागणीत घट झाली. अशा हस्तव्यवसायांची स्थिती संस्थानांपेक्षा ब्रिटिश मुलुखात अधिक बिकट झाली होती. शिवाय विदेशी आचारविचारांच्या प्रभावामुळे विदेशी वस्तूंचे श्रेष्ठत्व पटल्यामुळे सुद्धा देशी हस्तव्यवसायातील वस्तूंची मागणी लक्षणीयरित्या कमी झाली. या घटकांचा फायदा विदेशी उत्पादकांना झाला यात नवल काहीच नाही. देशी उद्योगांची स्थिती खालावल्यामुळे शेतीवरील श्रमिकांचा भार वाढला आणि शेती क्षेत्रातील स्थित्यंतरावर विपरित परिणाम झाला. नागरी भागातून ग्रामीण भागाकडे उलटा प्रवाह फार मोठा नव्हता. पण एरवी जो प्रवाह नागरी भागांकडे स्थलांतरित झाला असता तो न झाल्यामुळे शेती क्षेत्रावरील भार वाढला.

ब्रिटिश राजवटीचा प्रभाव फक्त देशी उद्योगांचा ऱ्हास होण्यापुरता मर्यादित नव्हता. देशी कच्चा माल व इतर साधनांचा वापर होईल असे नवीन उद्योग सुरू झाले. भारतीय साधनांचा युरोपियनांमार्फत उपयोग होण्याच्या प्रक्रियेचा हा प्रारंभ होता. चहा, कॉफी, नीळ अशा पिकांची लागवड झाली. सर्वत्र घरगुती

हस्तव्यवसायांची जागा ज्या कारखान्यांनी घेतली त्यांच्या उदयालासुद्धा याच कालखंडात सुरुवात झाली. सुती कापड उद्योग या संदर्भात खूप प्रसिद्ध पावला आहे. भारतात छोट्या, घरगुती उद्योगांचे प्राबल्य का आहे असा प्रश्न उपस्थित करून हातमागावर कारागिराना जे उत्पन्न मिळते त्यापेक्षा जास्त वेतन देण्याची शक्यता असल्याशिवाय कारखाना पद्धत सुरू होणे अवघड आहे असा निष्कर्ष काढला आहे. या प्रकारची स्थिती सर्व देशांत आढळते आणि भारतीय अर्थव्यवस्था सामान्य अर्थशास्त्रीय नियमांपलिकडची आहे असे जे प्रतिपादन बऱ्याचवेळा करण्यात येते त्यात फारसा काही अर्थ नाही असे गाडगीळांना वाटते.

पुस्तकाच्या पहिल्या आवृतीत 1914 पर्यंतचाच काल विचारात घेतला होता. भारतात उद्योगांची वाढ मंद गतीने का होते आहे असा प्रश्न उपस्थित करून त्याची जी कारणमीमांसा गाडगीळानी केली आहे ती आजही रास्त ठरते. मुख्य अडचण अर्थातच भांडवलाची होती. वाहतुकीतील प्रगतीमुळे व्यापार करणे अधिक फायदेशीर बनल्यामुळे उद्योगांतील दीर्घकालीन गुंतवणूक कमी आकर्षक ठरते. बँकांनीही व्यापाराला पतपुरवठा करण्याचे धोरण अवलंबिल्यामुळे औद्योगिक प्रगतीला अडसरच निर्माण झाला. भारतात मजुरीचे दर कमी आहेत पण भारतीय मजुरांमधील कमी कौशल्याचा विचार करता भारतीय मजूर स्वस्त आहेत असा निष्कर्ष काढता येत नाही असे नोंदवून शिक्षण व तंत्रशिक्षणाच्या आवश्यकतेवर गाडगीळानी भर दिला. याशिवाय पुरेसे इंधन, विकसित रेल्वे व इतर वाहतुकीची साधने, पोलाद उद्योग व इतर मूलभूत उद्योग हे इतर घटक जलद उद्योगीकरणास आवश्यक आहेत असे नमूद केले आहे. औद्योगिक प्रगतीचा पाया बळकट करावयाचा तर शेती क्षेत्राचीही प्रगती होणे आवश्यक आहे. औद्योगिक प्रगतीसाठी मालाला पुरेशी मागणी असणे आवश्यक असल्याने देशी बाजाराचा विस्तार होणे आवश्यक ठरेल. या सर्व अडचणींच्या पार्श्वभूमीवर भारताची प्रगती मंद गतीनेच होईल असे अनुमान गाडगीळानी केले.

## महायुद्ध कालातील प्रगती

दोन महायुद्धांमधील कालाचा एकत्रित विचार केला तर शेती क्षेत्रात लक्षणीय वा जलद बदल झाले नाहीत. मागणी पुरवठ्यातील बदल वा तौलनिक किमतीमधील बदलांचा परिणाम पीक पद्धतीवर होतच होता पण तो अल्पकालीन स्वरुपाचा होता. पण शेतीतील उत्पादकता किंवा नगदी पिकांचे प्रमाण वा सिंचनाचे प्रमाण वाढणे आणि त्यामुळे शेती उत्पन्नातील वाढ याबाबत लक्षणीय बदल वा सुधारणा झाल्या नाहीत. स्थानिक स्वरुपाचे बदल झाले पण तेवढेच. शेती क्षेत्रातील बदलांमुळे औद्योगिक उत्पादनास देशी बाजार प्राप्त होणे वा आवश्यक कच्चा माल मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणे अशा स्वरुपाचा बदल झाला नाही. साहजिकच अशा बदलांचा परिणामस्वरूप औद्योगिक क्षेत्राला मोठा धक्का मिळू शकला नाही. विविध पिकांचा सुटा विचार केला तर फक्त उसाच्या लागवडीत आणि उत्पादकतेत वाढ झालेली दिसते. उद्योगीकरणास गती मिळावयाची तर देशी बाजाराचा विस्तार शेतीच्या प्रगतीवर अवलंबून राहणार असल्याने शेती क्षेत्राच्या वाढीवरील विविध बंधनांचा ऊहापोह गाडगीळानी केला आहे. त्यात सिंचनाचे अपुरे प्रमाण, वारसा हक्कामुळे जमिनीची लागवड छोट्याछोट्या तुकड्यांत होणे, शेती क्षेत्रावरील कर्जाचा बोजा या समस्यांबरोबरच कसणुकीच्या समस्यांचा उल्लेख आहे. जमीनदारी व कायमधारा पद्धतींमधील कुळांना कसणुकीचे हक्क प्राप्त होण्याचे महत्व गाडगीळानी प्रतिपादन केले आहे. इथे जमिनीच्या विषम वाटपाचा प्रश्न महत्त्वाचा ठरतो, पण गाडगीळ या प्रश्नाला पुरेसे महत्त्व देत नाहीत. याच संदर्भात समस्या सोडविण्यात शासनाची भूमिका किती महत्त्वपूर्ण ठरते हे काँग्रेसची प्रांतिक सरकारे आल्यावर कुळांना संरक्षण पुरविणारे कायदे मंजूर होण्यास प्रारंभ झाला यावरून स्पष्ट होते. शेतीच्या समस्या सोडविण्यासाठी सहकाराचा अवलंब करावा लागेल हा विचार इथे नमूद होतो. पुढील कालात या दिशेने गाडगीळानी महत्त्वपूर्ण प्रत्यक्ष कार्यही केले हे विसरून चालणार नाही.

औद्योगिक क्रान्तीचे पाळणाघर असलेल्या ब्रिटनने भारतीय उद्योगांना चालना मिळेल अशी धोरणे आखली नाहीत, कारण भारतीय अर्थव्यवस्था ब्रिटिश उद्योगांना पूरक ठरावी असाच ब्रिटिश सरकारचा मनोदय होता. पण वाहतुकीच्या क्षेत्रातील बदलांमुळे भारतीय वस्तू इतर बाजारांमध्ये जाणे आणि तिथल्या वस्तू इकडे उपलब्ध होणे याला हळूहळू सुरुवात झाली होती. महायुद्धांच्या कालात देशी उद्योगांना खरी चालना मिळाली. एकतर, युद्धकालात विदेशी व्यापारावर बंधने आली. त्यामुळे कच्च्या मालाची निर्यात होणे बंद झाले आणि देशी उद्योगांना हा माल मिळणे सुलभ झाले. युद्धामुळे विविध वस्तूंना मागणी वाढली आणि युद्ध प्रयत्नांत खीळ बसणे टाळावयाचे तर देशी उद्योगांची किमान वाढ होणे आवश्यक होते हे ब्रिटिश सरकारच्याही लक्षात आले. पहिले महायुद्ध सुरू झाल्यानंतर देशी उद्योगांना प्रथम उठाव मिळाला. वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे नफ्याचे प्रमाण वाढले आणि त्यामुळे नवीन उत्पादनक्षमता निर्माण होण्यास अनुकूल वातावरण बनले. पण महायुद्ध संपल्यानंतर उद्योगांत मंदी निर्माण झाली. युद्धानंतर रुपयाचे विदेशी चलनांतील मूल्य वाजवीपेक्षा जास्त ठेवल्याने भारतीय वस्तूंची इतर बाजारांमधील निर्यात अवघड बनली. या पार्श्वभूमीवर देशी उद्योगांना प्रशुल्क (tariff) संरक्षणाची मागणी पुढे आली. हे संरक्षण देताना ब्रिटिश आयातीवरील प्रशुल्क तुलनेत कमी ठेवण्यात आले होते. दोन महायुद्धांमधील कालात मोठ्या उद्योगांची स्थापना झाली. परंपरागत भारतीय उद्योग कारागिरीवर आधारित घरगुती स्वरुपाचे होते. आधुनिक कारखान्यांची उभारणी मुख्यत्वे दोन महायुद्धांमधील कालात झाली. टाटा स्टील, बाटा, टिनप्लेट यासारख्या पुढे नामवंत ठरलेल्या कंपन्यांची स्थापना या कालात झाली. कापड, ताग, साखर, पोलाद, कोळसा, खनिज तेल यासारख्या क्षेत्रांत गुंतवणूक झाली. प्रशुल्क संरक्षण, सरकारी खरेदीत देशी उद्योगांना प्राधान्य आणि युद्धकालीन मागणी यामुळे मोठ्या उद्योगांची सुरुवात व भरभराट झाली. आपल्या ग्रंथाच्या शेवटी दोन महायुद्धांमधील कालातील उद्योगीकरणाचा आढावा घेताना प्रगतीच्या वेगाबाबत गाडगीळ असमाधान प्रगट करतात हे काहीसे आश्चर्यकारच आहे. या कालखंडातच उद्योगीकरणाकडे बघण्याचा सरकारचा दृष्टिकोन बदलण्यास प्रारंभ झाला. उद्योग हा विषय राज्य सरकारांच्या कक्षेत आला आणि 1935 च्या कायद्यान्वये सत्तारूढ सरकारांनी उद्योगीकरणाला प्रोत्साहक धोरणे राबविण्याचा प्रयत्न करून पाहिला. भांडवलदारांनाही सरकारी हस्तक्षेप व सरकारी सवलती यांचे महत्त्व मान्य झाले होते, त्याचे प्रतिबिंब बाँबे प्लॅनमध्ये आढळून येते. वरील सर्व बाबी गाडगीळांनी नमूद केल्या आहेतच आणि म्हणूनच त्यांचे असमाधान काहीसे आश्चर्यकारक वाटते.

मोठ्या उद्योगांच्या जोडीने दुय्यम (ancillary) स्वरुपात आधुनिक लघुउद्योगांचा उदयही याच कालात सुरु झाला. विजेवर चालणाऱ्या यंत्रमागांची सुरुवातही याच कालातील. या आधुनिक उद्योगांच्या वाढीबरोबरच अटळपणे संघटित कामगार वर्ग अस्तित्वात आला. श्रमिक संघ, त्यांचे लढे व कामगार हितासाठी सरकारने योजलेले उपाय (उदाहरणार्थ, कामाचे तास निश्चित करणे) या बाबी उद्योगीकरणाचे महत्वाचे परिणाम दर्शवितात. या गोष्टींचा समावेश आपल्या अभ्यासविषयात गाडगीळ करतातच. महायुद्धांमधील कालात खूप काही झाले असले तरी भारताची अर्थव्यवस्थेची वाटचाल ब्रिटिशांचे हितसंबंध धोक्यात येणार नाहीत अशाच मार्गाने होत राहिली ही कळीची गोष्ट गाडगीळ विसरत नाहीत हे महत्त्वाचे आहे.

भारताच्या मंद औद्योगिक प्रगतीची जी कारणे पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीतच नमूद केली होती त्या अनुषंगाने स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची औद्योगिक धोरणे आखली गेली. भारताच्या मंद औद्योगिक प्रगतीची जी कारणमीमांसा नंतर पुढे अनेक वेळा होत राहिली ते विश्लेषणही गाडगीळांच्या 1932 च्या निदानाच्या पलीकडे क्वचितच गेले असेल.[4]

## व्यापारी वर्गाचा उदय

भारताच्या आर्थिक इतिहासाशीच संबंधित अजून एक प्रकल्प गाडगीळानी हाती घेतला. उद्योगांचा विकास व्हावयाचा तर उपक्रमशीलतेचा विकास आवश्यक ठरतो. भारतात व्यापार उदिमाशी संबंधित वर्गाचा कसा विकास झाला या उद्देशाने या प्रकल्पाची आखणी झाली. (गाडगीळ, 1959) भारतातील व्यापारांत ब्रिटिश, पोर्तुगीज, फ्रेंच, इत्यादी परकियांचा प्राचीन कालापासून सहभाग असल्याने भारतातील व्यापारी वर्गाचा विकास अभ्यासताना या परकियांचाही समावेश करावयाचे ठरले. पण कलकत्त्यातील अनुभवावरून या प्रकल्पाचा व्याप फक्त भारतीय उपक्रमशीलतेपुरताच मर्यादित ठेवण्यात आला. इ.स. 1750 चे स्वातंत्र्य मिळेपर्यंतच्या कालखंडाचा विचार करणाऱ्या अभ्यासाच्या पहिल्या प्रकरणाचा कच्चा खर्डा 1959 मध्ये प्रकाशित झाला. भारतात विभिन्न कामे विविक्षित जातींनी करावयाची असल्याने या प्रकल्पाचा जातिव्यवस्थेशी संदर्भ येणे अपरिहार्य होते. देशाच्या भिन्न प्रदेशांतील व्यापार, सावकारी या व्यवसायाशी संबंधित जातींचा या खर्डयामध्ये विचार केला आहे. विविध कारागीर जातींचा पण यामध्ये समावेश होणे अपेक्षित होते कारण कारखानदारीचा कारागिरीशी प्रत्यक्ष संबंध येत होता. मात्र कारागिरीशी संबंधित वर्ग संख्येने मोठा होता आणि निरनिराळ्या प्रांतात भिन्न जातींचा समावेश करावा लागला असता. शिवाय व्यापारी वर्गाचे समाजातील प्रतिष्ठेचे स्थान लक्षात घेता उपक्रमशीलतेशी व्यापार करणाऱ्या वर्गाचा जास्त जवळचा संबंध येण्याची शक्यता होती. कारागीर वर्ग वस्तूंच्या उत्पादनासाठी लागणारा परिव्यय व विक्री यासाठी सावकार व व्यापारी यावर सदैव अवलंबून असे. खरे तर यामुळे कारागिरांचे समाजातील स्थान सदैव दुय्यम स्वरुपाचे राहिले. व्यापारी व सावकार प्रसंगी राजास कर्ज देत पण म्हणून व्यापारी वर्गाचे महत्त्व अबाधित नव्हते. शासनाकडून मिळणाऱ्या संरक्षणाचे महत्त्व अनन्य स्वरुपाचे होते. त्यामुळे व्यापारी वर्ग राजा व दरबार यांची मर्जी राखण्याच्या प्रयत्नात असे.

या सर्व कारणांमुळे या प्रकल्पांत फक्त व्यापाराशी संबंधित जातींचा विचार करण्यात आला. उपलब्ध माहितीच्या (अशी माहिती कमी, अपुरी होती हे उघडच होते) आधारे भारतातील निरनिराळ्या प्रांतांत व्यापार उदिमांत आघाडीवर असणाऱ्या जातींचा आलेख सादर केला आहे. महाराष्ट्राचा उल्लेख व्यापारीदृष्टया कुविकसित (retarded) असा केला आहे. बंगालमध्येही स्थानिक लोक व्यापारउदिमात मागे आढळतात. तेथील व्यापारात मारवाडी वर्गाचे प्राबल्य आढळते. पण बंगाली लोकानी युरोपीय व्यापारी वर्गाचा हस्तक अशी भूमिका बजावलेली आढळते. राजकीय अस्थैर्य असल्याने व्यापारी वर्गाने उद्योग क्षेत्रात गुंतवणूक केली नाही. त्यामुळे व्यापारी वर्गाचा विकास होऊनही उद्योग क्षेत्रांत प्रगतीला चालना मिळू शकली नाही. पहिल्या प्रकरणाच्या या खडर्यानंतर मात्र हा प्रकल्प पुढे सरकला नाही असे दिसते.

## 2

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर विकासाचे प्रयत्न नव्या जोमाने सुरू झाले. स्वातंत्र्य मिळविण्याच्या प्रक्रियेतच भारताची भावी वाटचाल कुठल्या मार्गाने व्हावी याबाबत खूप तपशिलाने विचार झाला होता. पुढील मार्गाबाबत एकमत साध्य झाले नसले तरी काही ढोबळ बाबतीत व्यापक सहमती झाली होती. भारताच्या विकासात शासनाची भूमिका कृतिशील असावी आणि शेती क्षेत्रात व्यापक सुधारणा आवश्यक असल्या तरी जलद विकासासाठी उद्योगीकरणाचा मार्ग स्वीकारावा याबाबतही फार मतभिन्नता नव्हती. जलद विकास साध्य करावयाचा तर बाजारावर अवलंबून न राहता नियोजनाचा अवलंब करावा हे देखील बहुतेकांना मान्य होते. मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्याची खाजगी क्षेत्राची क्षमता मर्यादित असल्याने सरकारी क्षेत्रात मोठी गुंतवणूक आवश्यक ठरेल आणि सरकारी क्षेत्राची भूमिका नियोजनाच्या परिणामकारकतेत महत्त्वाची असेल हे उघडच होते.

नियोजनाची प्रक्रिया पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या

आखणीपासून सुरुवात झाली. तेव्हापासूनच या प्रक्रियेशी गाडगीळांचा संबंध आला. नियोजन आयोगाच्या अर्थशास्त्रज्ञ चमूचे (Panel of Economists) ते सदस्य होते. कालांतराने ते नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष झाले आणि चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या आखणीचे काम त्यांच्या अखत्यारीत केले गेले. नियोजनाच्या प्रक्रियेशी असा जवळून व प्रदीर्घ काल संबंध असल्याने निरनिराळ्या योजनांवर व सरकारी धोरणांवर त्यांनी व्यापक लिखाण केले आहे. विकास व उद्योगीकरण हे शब्द या कालात जवळजवळ समानार्थी मानले गेल्याने या निबंधाच्या विषय मर्यादित फक्त उद्योगीकरणाशी संबंधित बाबी विचारात घेणे काहीसे अवघड होईल.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत जलद औद्योगिक अभिवृद्धीसाठी अवजड व भांडवली वस्तूंच्या उत्पादन वाढीस प्राधान्य देण्यात आले. या योजनेचे रशियाच्या विकासनीतीशी खूपच साम्य होते. दुसऱ्या योजनेच्या व्यूहाबाबत अर्थशास्त्रज्ञांमध्ये मतभिन्नता होती ही गोष्ट सर्वश्रुतच आहे. वकील व ब्रह्मानंद यानी उपभोग्य वस्तूंच्या अभिवृद्धीला प्राधान्य देणारे पर्यायी प्रतिमान सुचविले तर या योजनेमुळे तुटीचा वित्तपुरवठा होऊन भावफुगवटा होईल अशी प्रखर टीका बी.आर. शेणॉय यानी केली. दुसऱ्या योजनेच्या व्यूहाबाबत गाडगीळांची तीव्र मतभिन्नता होती असे दिसत नाही. दुसऱ्या योजनेबाबत लिहिताना त्यानी अर्थपूर्ण नियोजनातील अडचणींचा विचार केला. त्या संदर्भात अर्थव्यवस्थेतील भिन्न क्षेत्रांबाबत आवश्यक त्या सांख्यिकीय माहितीचा अभाव ही बाब त्यानी ठळकपणे नोंदविली. याशिवाय योजनेची यशस्वी अमलबजावणी करण्यासाठी (हे विशेषत: खाजगी क्षेत्राबाबत खरे आहे) योजनाआयोगाकडे काहीच साधने नाहीत. प्रशासकीय यंत्रणा योजनेची अमलबजावणी करण्यास कितपत सक्षम ठरेल हाही एक प्रश्नच होता. ब्रिटिशांनी उभारलेल्या प्रशासनास आता लोकशाही चौकटीत विकासाचे प्रकल्प राबविण्याचे आव्हान सोपे नव्हते. नियोजनाकडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोन बदलला पाहिजे याची आवश्यकता त्याना जाणवली होती. सार्वजनिक जीवनात साधेपणा, अवाजवी सरकारी खर्चाला आळा घालणे या गोष्टींचे महत्त्व त्याना जाणवले होते आणि या गोष्टी प्रत्यक्षात आणता येतील का याची चिंताही वाटत होती.

सरकारी क्षेत्रावर सरकारचे प्रत्यक्ष नियंत्रण असल्याने सरकारी क्षेत्राचा योजनेतील सहभाग सुनिश्चित करणे सोपे जाईल. शेती, छोटे उद्योग,कारागीर व सेवा क्षेत्र खाजगी मालकीची आहेत आणि ती तशीच राहतील. छोट्या उत्पादकांचे प्राबल्य असलेल्या या क्षेत्रांचे कार्य बाजारामार्फत होईल. पण आधुनिक क्षेत्रातील मोठ्या उद्योगांवर (एकाधिकारी भांडवल) परिणामकारक नियंत्रण कसे ठेवता येईल हा प्रश्न दुसऱ्या योजनेची आखणी चालू असतानाच गाडगीळानी उपस्थित केला. मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे फायदे मिळवावयाचे तर मोठे उद्योग पत्करावे लागतील. पण भारतातील प्रचलित व्यवस्थापन अभिकरण (Managing Agency) पद्धतीने केन्द्रीकरण मोठ्या प्रमाणावर होते. नियोजनच्या प्रक्रियेत मोठ्या उद्योगांना प्रोत्साहन मिळणे टाळता येणार नाही, कारण मूलभूत व भांडवली वस्तूंची निर्मिती करताना भांडवलप्रधान उद्योगांना चालना मिळेलच. या परिस्थितीत नियोजनाची प्रक्रिया फार महत्त्वाकांक्षी न बनविता बाजाराला अधिक वाव देण्याचा पर्याय संभवत होता. पण गाडगीळांनी योजनेची प्रक्रिया अधिक बळकट करण्याचे, योजनेच्या प्रक्रियेत विशेषज्ञांना अधिक वाव देण्याचा व सरकारकडे जास्त अधिकार देण्याची भूमिका घेतलेली आढळते. एकाधिकारी भांडवलावर नियंत्रण ठेवावयाचे तर सरकारी क्षेत्र अधिक बळकट करून एकाधिकारी भांडवलाला स्पर्धा उत्पन्न करता येईल किंवा एकाधिकारावर सरकारला प्रत्यक्ष नियंत्रणे लादावी लागतील असे विविध पर्याय गाडगीळ सुचवितात.

तिसरी योजना तयार करताना साहजिकच पहिल्या

दोन योजनांचे फलित काय हा चर्चेचा मुद्दा बनला. या चर्चेत सहभागी होताना गाडगीळांनी काहीशी मूलगामी भूमिका घेतली. उत्पन्न वाढीच्या दराबाबत काही टीकाटिप्पणी न करता नियोजनाच्या प्रक्रियेत एकाधिकारी भांडवल अधिक शक्तीशाली झाले असून त्यामुळे उत्पन्न व संपत्तीचे केन्द्रीकरण होत असून उत्पन्नाचे वाटप अधिक विषम बनले आहे असा आक्षेप त्यांनी घेतला. कालौघात ही भूमिका त्यांनी वारंवार मांडली. उद्योगांचे प्रादेशिक विकेन्द्रीकरण आणि उद्योगांतून अधिक रोजगारनिर्मिती या गोष्टींवर त्यांनी वेळोवेळी भर दिला. नियोजनाच्या फलिताबाबत त्यांची ही टिप्पणी उद्योगीकरणाच्या प्रक्रियेशी संबंधित होतीच पण तेवढ्यापुरतीच मर्यादित नव्हती. खाजगी क्षेत्राचे वर्तन नियोजनाच्या अग्रक्रमांशी सुसंगत कसे राहील हा खरा प्रश्न होता आणि एका अर्थी सरकारी क्षेत्राच्या वर्तणुकीशीही संबंधित होता. उदाहरणार्थ, वेतनवाढीचा प्रश्न, कुशल कामगार, अधिकारी व व्यवस्थापक यांच्या वेतनात किती वाढ व्हावी, या उद्योगांची नफा मिळविण्याची क्षमता व सरकारची धोरणे (देशी उद्योगांना आयातीपासून संरक्षण, अनुज्ञप्ती पद्धत, वित्तीय संस्थांपासून वित्तपुरवठा, इत्यादी) यांचा संबंध होताच. त्यामुळे खाजगी क्षेत्रातील वेतनमान बाजाराच्या शिस्तीमुळे मर्यादित राहील असे म्हणण्यात फारसा अर्थ नव्हताच. खाजगी क्षेत्रातील वेतनपातळीचा परिणाम सरकारी क्षेत्रात सक्षम उमेदवारांना आकृष्ट करण्यासाठी तुल्य वेतने द्यावीत अशा मागणीत होणे क्रमप्राप्त होते. विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठीय शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी प्राध्यापकांची वेतने वाढविण्याची सूचना करावी ही गोष्ट गाडगीळांना आश्चर्यकारक वाटली. ही बाब वर्तमान मूल्यव्यवस्था प्रतिबिंबित करते हा त्यांचा निष्कर्ष बरोबरच होता.[5] पण त्यावरचा परिणामकारक उपाय नियोजनाची तांत्रिक प्रक्रिया अधिक बळकट बनविणे वा खाजगी क्षेत्रावर जास्त व्यापक नियंत्रणे लादणे हा होय असे मानण्याला फारसा आधार नव्हता. मूल्यव्यवस्थेशी संबंधित बाबी मूल्यव्यवस्थेत बदल घडवून आणण्याच्या प्रक्रियेशी (आणि ही प्रक्रिया मूलतः राजकीय आहे, असते) निगडित कराव्या लागतील आणि तसे करता येणार नसेल तर नियोजनाची प्रक्रिया अपुरी, दुर्बल राहील ही बाब दुर्लक्षित राहिली. कामाचा मोबदला किती मिळतो यावर कामाची प्रेरणा अवलंबून असेल ही बाब खाजगी, बाजार व्यवस्थेच्या चाकोरीशी सुसंगत होती. ती गाडगीळांना भावली नाही हा बराचसा त्यांच्या आदर्शवादी दृष्टिकोनाचा परिणाम होता. हा आदर्शवाद जर प्रत्येकाला मान्य झाला असता तर योजनांची अमलबजावणी सहजगत्या आदर्श पद्धतीने झाली असती.

भारतीय नियोजनावर वेळोवेळी जी टिपणे लिहिली त्यातून उद्योगीकरणाच्या प्रक्रियेबाबत त्यांनी पुढील मुद्दे सातत्याने मांडले. एकतर एकाधिकारी भांडवलाची शक्ती वाढली आहे त्याचा परिणाम उत्पन्न व संपत्तीचे वाटप अधिक विषम बनण्यात झाला आहे. या विषम वाटपामुळे ज्या वस्तूंना मागणी वाढेल त्या चैनीच्या, श्रीमंत वर्गाच्या वापराच्या वस्तू असतील. उपलब्ध भांडवलाचा वापर अशा मूठभर लोकांच्या गरजांसाठीच होईल. दुसरी गोष्ट, विषम उत्पन्न वाटपामुळे राजकीय पक्षांवर एकाधिकारी भांडवलाचा व एकंदरीत श्रीमंत वर्गाचा प्रभाव वाढेल आणि पक्षांची धोरणे ठरताना या गटांच्या हितांना प्राधान्य दिले जाईल हे लोकशाहीशी विसंगत असेल. त्याबरोबर नियोजनाची प्रक्रिया सर्व लोकांची प्रगती साधू शकणार नाही. तिसरी गोष्ट, उद्योगांचे केन्द्रीकरण होत आहे आणि ते टाळले पाहिजे. उद्योगांचे विकेन्द्रीकरण आणि मध्यम तंत्रविज्ञानाचा उपयोग करून रोजगारनिर्मितीवर भर दिला तरच उत्पन्नाचे व संपत्तीचे विकेन्द्रीकरण साध्य करता येईल असा विचार गाडगीळांनी मांडावयाला प्रारंभ केला.

उद्योगांच्या वाढीतून मोठे उद्योग निर्माण होतात आणि आधुनिक तंत्रविज्ञानाचा वापर करावयाचा तर ते काही प्रमाणात अपरिहार्य ठरेल हे गाडगीळांना मान्य होते. भारताने देशी उद्योगांना संरक्षण देण्याची जी नीती स्वीकारली त्यामुळे या धोरणाचा परिणाम मोठ्या भांडवलदारांची शक्ती वाढण्यात झाला. शिवाय संरक्षण देण्याची पद्धती वस्तुनिष्ठ, विविक्षित उद्योगांसाठी व

मर्यादित कालासाठी संरक्षण देणारी नव्हती. या संदर्भातील जपानच्या वैशिष्ट्यपूर्ण अनुभवाचा ते उल्लेखही करतात. आंतरराष्ट्रीय बाजाराचा परिणामकारक वचक राहिल्याने मोठे उद्योग असले तरी कार्यदक्षता व ग्राहकहित यावरील दुष्परिणाम टाळले जातात ही गोष्ट ते नोंदवितात. पण भारतीय संदर्भात विचार करताना बाजाराचा अप्रत्यक्ष वचक ठेवण्याचा पर्याय न स्वीकारता प्रत्यक्ष नियंत्रणांद्वारे एकाधिकारी भांडवलावर लगाम घालण्याचे प्रस्ताव त्यानी मांडले. कधी हा मार्ग किंमत नियंत्रणाचा असे तर कधी ते कंपन्यांच्या संचालक मंडळांवर आयुर्विमा महामंडळाचे प्रतिनिधी नेमून मोठ्या कंपन्यांच्या निर्णयप्रक्रियेत शासनाचा सहभाग सुचवितात.

ग्रामीण उद्योगीकरणाच्या संदर्भातही, समान आर्थिक विकासासाठी ग्रामीण उद्योगीकरण आवश्यक आहे पण परिणामकारक ग्रामीण उद्योगीकरणासाठी उद्योगीकरणाच्या संपूर्ण नीतीची फेरआखणी आवश्यक ठरेल, केवळ खादी ग्रमोद्योग मंडळावर हे काम सोपवून चालणार नाही अशी त्यांची भूमिका होती. बऱ्याच ग्राहकोपयोगी वस्तूंच्या आधुनिक पारंपरिक ग्रामोद्योगांमध्ये स्पर्धात्मक संबंध असतात. अशा स्थितीत समान उत्पादन कार्यक्रम आखले (असा प्रयत्न काही प्रमाणात वस्त्रोद्योगाबाबत झाला होता) तरच पारंपरिक उद्योगांना त्यांची नियत भूमिका बजावता येईल. पारंपरिक उद्योगांना वर्तमान गरजा व फॅशनप्रमाणे उत्पादन करावयाचे तर रास्त तंत्रविज्ञानाचा वापर करावा लागेल. रास्त तंत्रविज्ञानाचा शोध व प्रसार करावयाचा तर नियोजनाची प्रक्रिया अधिक व्यापक व एकजीव स्वरुपाची बनावयाला हवी अशी त्यांची भूमिका राहिली.

चौथ्या योजनेची आखणी सुरु होण्याच्या सुमारास या योजनेच्या स्वरुपाविषयी जे टिपण त्यांनी बनविले त्यात उद्योगांचा विकेन्द्रीकरण मुद्दा सविस्तर मांडला आहे.[8] काही वस्तूंचे उत्पादन केवळ लघुउद्योगांसाठी राखीव ठेवले जावे ज्यामुळे या उद्योगांना मोठ्या उद्योगांशी स्पर्धा करता येईल असा विचार त्यानी मांडला. लघुउद्योगांच्या विकासामुळे विकासाचा प्रादेशिक समतोल राखला जाईल आणि रोजगारनिर्मितीस चालना मिळून उत्पन्न वाटप समानशील बनविण्यासही मदत होईल असा विचार या शिफारशीमागे होताच. औद्योगिक विकेन्द्रीकरणासाठी संरचनात्मक घटकांची उपलब्धता आवश्यक ठरते म्हणून मागास प्रदेशांतील ठराविक केन्द्रांचा विकास करावा असा विचारही त्यानी मांडला. या अनुषंगाने मागास प्रदेशांत उद्योग काढावे म्हणून एकाधिकार कायद्यातील बंधनांमधून सवलती असे धोरण नंतरच्या वीस वर्षांत अवलंबिले गेले. सरकारी उद्योगांमधील कार्यदक्षता वाढविण्याचा मुद्दाही त्यानी मांडला.

नियोजन आयोगामधील त्यांची कारकीर्द काहीशी लवकर व वादग्रस्त पद्धतीने संपली. नंतर लगेचच त्यांचे निधन झाले. नंतर 1970 च्या दशकात एकाधिकारावर नियंत्रण ठेवणे, लघुउद्योगांना प्रोत्साहन देणे, मागास प्रदेशांत उद्योग स्थापन करणे अशी धोरणे स्वीकारली गेली. त्याला गाडगीळानी पाठिंबा दिला असता काय हे ठरविणे कठीणच होईल. त्यांची आदर्शवादी भूमिका विचारात घेता या धोरणांच्या संदर्भात टीकात्मक विवेचन जास्त संभाव्य ठरते.

3

वर्तमान संदर्भात गाडगीळांच्या विचाराचे महत्त्व काय या प्रश्नाचा विचार करण्यापूर्वी गाडगीळांच्या विचारांबाबत डांगे यानी मांडलेले विचार लक्षात घेणे उपयुक्त ठरेल.

### गाडगीळ व डांगे

गाडगीळांच्या आकस्मिक निधनानंतर ज्येष्ठ साम्यवादी नेते श्रीपाद अमृत डांगे यानी एका पुस्तिकेद्वारे (डांगे, 1971) गाडगीळांच्या पुरोगामी विचारांमुळे प्रस्थापितांनी त्याना नियोजन आयोगाचा राजीनामा देण्यास भाग पाडले असे प्रतिपादन केले. भारताच्या विकासात (मग तो औद्योगिक क्षेत्राचा असो

वा शेती क्षेत्राचा), जमिनीची कसणूक व विषम वाटप, बड्या एकाधिकारी उद्योगसमूहांचे वर्चस्व, उत्पन्न व संपत्तीची विषम वाटणी, यासारख्या संरचनात्मक घटकांचे महत्त्व त्यानी प्रतिपादन केले. या घटकांचा विपरित प्रभाव टाळून विकासाची गती वाढवावयाची तर शासन, सरकारी क्षेत्र व नियोजन या घटकांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. नियोजन ही प्रक्रिया मूलत: राजकीय असल्याने तिच्या यशापयशाचा संबंध राजकारणाशी (म्हणजे राजकीय सत्तेचा उपयोग कोणत्या पद्धतीने आणि कुणाचे हित साधण्यासाठी होतो या प्रश्नाशी) येतो. भारतातील नियोजन प्रक्रियेवर टिप्पणी करताना सरकार व सरकारी क्षेत्राची आवश्यक भूमिका कोणती असावी याची चिकित्सा गाडगीळानी वेळोवेळी केली. असा विचार करताना अर्थशास्त्रज्ञ वर्गसंबंध, शासन संस्थेचे वर्गीय स्वरूप अशा ज्या घटकांकडे सामान्यत: लक्ष देत नाहीत त्याना गाडगीळ वर्ज्य समतजत नसत. या गोष्टीला प्राधान्य देऊन गाडगीळांच्या विचारांच्या संदर्भात लोकशिक्षणाचा प्रयत्न डांगे यानी केला. स्वातंत्र्यपूर्व कालात नफा दडवून कामगारांना वेतनवाढ नाकारण्याचा गिरणी मालकांचा प्रयत्न गाडगीळांच्या विश्लेषणामुळे उघड होऊन त्याना कामगारांची वेतनवाढीची मागणी मान्य करावी लागली होती. कदाचित या घटनेमुळे डांगे याना गाडगीळांचे अर्थशास्त्र इतरांपेक्षा वेगळे भासले/भावले असेल. पण गाडगीळ उपस्थित करतात ते प्रश्न प्रथम राजकीय पातळीवर मान्य व्हावयाला हवेत आणि नंतरच ते विविध धोरणांची आखणी व अमलबजावणी या पातळीवर येतात, ही बाब डांगे यानी लक्षात घेतली नाही. गाडगीळाना राजीनामा द्यावा लागला म्हणून डांगे यानी सरकारवर टीका केली. पण पुढे काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर गरिबी हटाव व इतर कथित्त प्रागतिक धोरणांच्या मुद्यावर डांगे व त्यांचा पक्ष यानी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी याना पाठिंबा दिला होता.

1970 नंतरच्या कालात सरकारी नियंत्रणाचा पुन्हा एकवार प्रयोग करण्याचे काम चालू होते त्याच कालात अशियाई देशांनी वेगळा मार्ग चोखाळावयाला सुरुवात केली होती. बाजार व शासन यांचे विकासात काय स्थान असावे हा प्रश्न कायमच चर्चेचा राहिला. या प्रश्नाचे सर्व ठिकाणी आणि सर्व काळी लागू पडणारे उत्तर सापडवण्याचे प्रयत्न यशस्वी होणार नाहीत. पण या प्रश्नाचे वर्तमानात लागू पडणारे उत्तर शोधण्याचे कठीण काम करावेच लागते. बलवान घटकांची वागणूक सर्वांच्या, विशेषत: दुर्बलांच्या, हिताशी कशी राहील? स्पर्धात्मक वातावरणात बाजार हे काम बव्हशी करतात, हे विसाव्या शतकाच्या अखेरीस मान्य व्हावयाला हरकत नसावी. बाजाराशी सुसंगतरित्या शासनाला यशस्वी हस्तक्षेप करता येण्याची शक्यता कोरिया, जपान, इत्यादी देशांच्या संदर्भात स्पष्ट होते. गाडगीळाना भारतातील बाजार एकाधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेऊ शकतील का याची खात्री वाटली नसावी. मात्र वर्तमान संदर्भात विचार करताना बाजारांचे बदललेले स्वरूप सर्वांनीच लक्षात ठेवावयाला हवे. शासनाच्या हस्तक्षेपाबाबत दुसरा महत्त्वाचा मुद्दा या बाबीच्या राजकीय परिमाणाशी निगडित आहे. हे राजकीय परिमाण अर्थशास्त्रज्ञ लक्षात घेत नाहीत असा आक्षेप घेतला जातो. तो बराचसा खराही आहे. गाडगीळांची भूमिका याबाबतीत आदर्शवादी राहिली असे म्हणता येते. कदाचित आज राजकारण अधिक आदर्शवादी बनविण्याची गरज प्रतिपादन करता येईल.

सध्या ग्राहकोपयोगी वस्तूंच्या आयातीवरील निर्बंध हटविण्याचा प्रश्न किंवा लघुउद्योगांना असणारे आरक्षण चालू ठेवण्याचा प्रश्न याबाबत शासकीय हस्तक्षेप व बाजारांना वचक यात समतोल राखण्याची गरज आहे. बाजारांना अधिक वाव दिला म्हणजे सर्व समस्या सुटतील असे मानण्याला अंधश्रद्धा म्हणावयाचे का वास्तववाद यावर मतभिन्नता होईल. बाजार आदर्श आहेत असे गृहीत धरण्याऐवजी शासनाचा अर्थव्यवहारातील हस्तक्षेप सामान्यांच्या हितानुकूल कसा असेल या प्रश्नाचा विचार ही चांगल्या अर्थशास्त्राची (व चांगल्या राजकारणाचीही) सुरुवात असू शकते. या प्रकल्पात राजकारणाचे स्थान महत्त्वाचे हे विसरून चालणार नाहीच. पण बाजारांच्या कार्यपद्धतींचा अभ्यास करून शासनाच्या धोरणाची

निर्दोष आखणी करणे हे काम अर्थशास्त्रज्ञांचेच आहे याचीही आठवण ठेवावयाला हवी. धनंजयराव गाडगीळांनी ती आयुष्यभर ठेवली होती.

## संदर्भ टीपा

1 हे पुस्तक पहिल्यांदा प्रसिद्ध झाले तेव्हा त्यात 1914 पर्यंतचा काल विचारात घेतला होता. पुढील कालांत हा कालखंड क्रमाने वाढविला गेला आणि शेवटी दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभापर्यंत, म्हणजे 1939 पर्यंत, स्थिरावला. मुख्यत: वेळे-अभावी या पुस्तकाचे पुनर्लेखन करून यापुढील कालखंडाचा समावेश करण्यात आला नाही.

2 *हिन्दुस्थानचा आर्थिक इतिहास, 1850 - 1930* असे एक मराठी पुस्तक गाडगीळांनी 1932 मध्ये प्रकाशित केले. हे पुस्तक केम्ब्रिज प्रबंधाचा अनुवाद आहे असे नमूद केले नाही. पण आधार ग्रंथ म्हणून ज्या चार पुस्तकांचा उल्लेख केला आहे त्यात या प्रबंधाचा समावेश आहे. गाडगीळांच्या या प्रबंधाचा उल्लेख पुष्कळांनी आर्थिक इतिहास असा केला आहे आणि तो सार्थच म्हणावा लागेल.

3 हाच मुद्दा पुढे अमर्त्य सेन यानी entitlement या स्वरुपात मांडला.

4 गाडगीळांचा प्रयत्न प्रथम स्वरुपाचा असल्याने कित्येक घटकांचा त्यानी ढोबळ निर्देश केला. या मुद्यांचा सविस्तर विचार इतरांनी भविष्यात केला. गाडगीळानी मंद औद्योगिक विकासाची बहुतेक कारणे नोंदविली या विधानाने भविष्यातील सविस्तर विवेचनाचे महत्त्व कमी लेखण्याचा इथे उद्देश नाही.

5 पाहा : गाडगीळ (1972), पृ. 94.

6 पाहा : गाडगीळ (1973), पृष्ठे 13-55.

## संदर्भ सूची


1 Gadgil, D. R. (1959), *Origins of the Modern Indian Business Class : An Interim Report,* Institute of Pacific Relations, New York.

2 Dange, S. A. (1971), *Gadgil and the Economics of Indian Democracy,* Peoples Publishing House, New Delhi.

3 Gadgil, D. R. (1972), *The Industrial Evolution of India in Recent Times 1860-1939* (Fifth Editiion), Oxford University Press, Delhi.

4 Gadgil, D.R. (1972),*Planning and Economic Policy in India,* Gokhale Institute of Politics and Economics, Pune.

5 Kamat, A.R.(Ed) (1973), *Writings and Speeches of Professor D. R. Gadgil on Planning and Development 1967-71,* Gokhale Institute of Politics and Economics, Pune.

6 सोवनी, नी. वि. (1974), *माझे गुरू ध. रा. गाडगीळ,* रा.ज. देशमुख, पुणे.

7 Brahme, Sulabha (Ed) (1981), *Writings and Speeches of Professor D.R.Gadgil on Economic and Political Problems,* Gokhale Institute of Politics and Economics, Pune.


■■■■

# संशोधक गाडगीळ

सुलभा ब्रह्मे *

* भूतपूर्व प्रपाठक, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे आणि कार्यवाह, शंकर ब्रह्मे समाज विज्ञान ग्रंथालय, पुणे.

"To understand the organisation and working of social institutions and the actions and reactions of individuals in and towards them, to identify origins and drives or what may be termed social forces, the mechanics or the etiology of social change and to appreciate the possibilities and limitations of deliberately defining goals or directing change become the obvious objectives of social studies. Currently we divide ourselves in certain disciplines into tooll-makers and tool-users, the one are the the oreticians and the others operative in the applied field. However, our material imposes limitations even on the tod-makers and they are constantly facing such dilemmas as the extent of realism needed in a model." D.R. Gadgil (from address[1] *Research in Social Science* delivered in the capacity of the chairman of the ICSSR at the inaugural function of the Indian Council of Social Science Research, New Delhi, May 12, 1969).

## संशोधन संस्था उभारणीचे उद्दिष्ट

" हिंदुस्थानच्या आर्थिक व राजकीय प्रश्नांच्या विविध पैलूंचा अभ्यास आणि असा अभ्यास करण्यासाठीचे प्रशिक्षण देण्याच्या हेतूने संस्थेची (गोखले अर्थशास्त्र संस्था) स्थापना करण्यात आली. संस्थेने हाती घेतलेल्या संशोधनाचा दृष्टिकोण व स्वरूप शास्त्रशुद्ध असेल पण संशोधन - विषय तत्कालीन व व्यावहारिक महत्त्वाचे असतील. गेल्या दोन दशकांमध्ये सरकारने नेमलेले विविध आयोग व समित्या यांमार्फत देशाच्या आर्थिक जीवनाची स्थूल रूपरेषा

मांडली गेली आहे. भारतीय विद्यापीठांमधून प्रकाशित अहवाल व माहिती याआधारे संशोधन चालते. परंतु विशिष्ट प्रश्नांच्या स्थानिक पातळीवरच्या तपशीलवार अभ्यासांची मात्र पूर्ण वाण आहे. याकारणाने या किचकट व प्रसिद्धी आणि मानमान्यता न देणारा म्हणून अनाकर्षक पण पायाभूत अशा संशोधनावर भर देण्याचे संस्थेने ठरविले. संस्थेतील संशोधनाचे स्वरूप मुख्यतः दोन प्रकारचे असेल : (1) पुण्याच्या आसमंतातील प्रदेशातील आर्थिक प्रश्नांच्या विविध पैलूंचे वस्तुनिष्ठ सर्वेक्षणद्वारा विश्लेषण ; (2) उपलब्ध आकडेवारीचे विश्लेषण करून महत्त्वाच्या प्रश्नांवर प्रकाश. स्थानिक सर्वेक्षणद्वारा केलेले अभ्यास आर्थिक धोरण आखण्यास मदतकारक होतील तर माहितीच्या विश्लेषणाच्या आधारे प्रचलित वादग्रस्त विषयांवरील आमची भूमिका पुढे येईल.''[2] 1936 साली गाडगीळ यांनी पहिल्या काळे स्मृतीमालेच्या उपोद्घाताच्या भाषणामध्ये त्यानी 1930 साली स्थापन केलेल्या संशोधन संस्थेचे उद्दिष्ट वरीलप्रमाणे थोडक्यात मांडले. यावरून त्यांची संशोधनाबाबतची भूमिका मूलतः धोरणात्मक दिशेवर भर देणारी होती हे स्पष्ट होते.

## गोखले अर्थशास्त्र संस्था

1930 जून मध्ये गाडगीळांनी गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संशोधन संस्थेची स्थापना केली. आर्थिक-सामाजिक प्रश्नांबाबत संशोधनाची गरज व संशोधन संस्था स्थापना करण्याची गाडगीळांची उत्कट मनीषा जाणून त्यांचे सासरे रा.रा. काळे यानी देणगी देण्याचा प्रस्ताव भारत सेवक समाजापुढे (Servants of India Society) मांडला. सोसायटीच्या ग्रंथालयाची सुविधा व एक चार खोल्यांची छोटी इमारत संशोधन संस्थेसाठी उपलब्ध करून देण्याचे सोसायटीने मान्य केले. संशोधन संस्थेला सोसायटीचे संस्थापक नामदार गोखले यांचे नाव काळे यानी आवर्जून दिले. 1936 साली काळे यांचे निधन झाले तेव्हा संस्थेने काळे स्मृती व्याख्यानमाला (प्रचलित जिव्हाळ्याच्या विषयावर जेष्ठ तज्ज्ञ व्यक्तींचे अभ्यासपूर्ण भाषण-हे भाषण छापले जाते )[3] सुरू केली. प्रथमवर्षी महाराष्ट्रातील अग्रणी अर्थशास्त्रज्ञ वा. गो. काळे हे व्याख्याते होते. गाडगीळ यांचे सर्व संशोधन गोखले अर्थशास्त्र संस्थेद्वाराच झाले. प्रारंभीच्या कालात संस्थेमध्ये दुसरे प्राध्यापकही नव्हते. त्यामुळे संस्थेतील संशोधन ते गाडगीळांचे संशोधन असे समीकरण होते. गाडगीळानी हाती घेतलेल्या आणि पुऱ्या केलेल्या संशोधनाचा आढावा घेण्यापूर्वी 1930 पूर्वीच्या त्यांच्या वैचारिक पार्श्वभूमीकडे धावती नजर टाकू.

## गाडगीळांची वैचारिक भूमिका

1916 साली गाडगीळ सिनियर केंब्रिज परीक्षा उत्तीर्ण झाले. युद्धकालीन परिस्थितीमुळे त्यांचे परदेशगमन लांबून ते उच्च शिक्षणासाठी केंब्रिजला 1918 साली पोचले. आई - वडिलानी त्याना इंग्लंडला पाठविले ते आय. सी. एस. परीक्षेसाठी. त्या कालात उच्चशिक्षित वर्गात आय. सी. एस. चा मानमरातब व आर्थिक सुबत्ता यांचे आकर्षण होते. परंतु गाडगीळाना अशा आत्मसंतुष्ट जीवनात रस नव्हता. ब्रिटिश सरकारची चाकरी करणे तर त्याना मान्यच नव्हते. तेव्हा आय.सी.एस. परीक्षेऐवजी अध्यापन व संशोधन या कार्यक्षेत्रात उतरण्याच्या दृष्टीतून त्यानी आपले पदवी अभ्यासक्रमाचे विषय निवडले. त्या दृष्टीने पायाभूत असे इतिहास व अर्थशास्त्र हे विषय घेऊन त्यानी केंब्रिज विद्यापीठात बी.ए. पदवी घेतली. त्या कालात अर्थशास्त्रामध्ये मुख्य प्रवाह होता तो मिल-मार्शल आदींचा निरंकुश (Laissez-faire) अर्थव्यवस्थेचा. परंतु रॉबर्टसन, पिगू, केन्स आदींचा सरकारी हस्तक्षेपाचा गुंतवणूक चालनाद्वारा वळण देण्याचा) विचारप्रवाहही पुढे येत होता. तो गाडगीळाना समुचित वाटला. अमूर्त सिद्धान्तन व आकड्यांची करामत करून डौलदार पण वास्तवाशी फारकत घेतलेली प्रारूपे बनविण्यात त्याना रस नव्हता. जिवंत प्रश्नांना भिडणारे समाज - अर्थशास्त्रातील संशोधन आणि त्याआधारे प्रश्न सोडविण्याच्या प्रयत्नांत त्याना स्वारस्य होते आणि म्हणूनच त्यानी एम.लिट. पदवीसाठी विषय निवडला होता. *हिंदुस्थानचा आर्थिक इतिहास : 1850-*

*1914*. शेती, कारागिरीचा ऱ्हास, कारखानदारीचा उदय व वाढ, व्यापार, वाहतूक, नागरीकरण, आदी अर्थव्यवहारांतील बदल याचा आढावा घेऊन भारताच्या अप्रगततेच्या कारणांची मीमांसा त्यांनी प्रबंधामध्ये केली. हिंदुस्थानच्या आर्थिक अवनतीचे महत्त्वाचे कारण होते ब्रिटिश शासनाचे ब्रिटिश हितसंबंधी धोरण. ब्रिटिश उद्योगांच्या भरभराटीसाठी कच्च्या मालाची भारतातून निर्यात व पक्क्या मालाचा बाजार असा भारताचा अनिर्बंध वापर ब्रिटिशांनी केल्याने हिंदी शेतकऱ्यांना व कारागिरांना टिकाव धरणे अशक्य झाले. यातून मार्ग काय याबाबत गाडगीळ सुचवितात की, ''छोट्या शेतीस उपयोगी अशा सुधारणा म्हणजे लहान तलाव आदी बांधून पाणी पुरवठा करणे, गुरांच्या पैदाशीकडे लक्ष पुरविणे, शेतकऱ्यांची लाकूडफाडा व गुरेचराईसंबंधी सोय करणे, सावकाराच्या कचाट्यातून सोडविणे, कृषीपद्धतीत, बियाणात त्यास झेपेल अशा सुधारणांचा प्रसार करणे, सहकार्याने विक्री - खरेदीस उत्तेजन देणे, याकडे सरकारने लक्ष पोचविले पाहिजे. कारागीर वर्गासंबंधी अनेक गोष्टी करण्यासारख्या आहेत. सरकारी खाती व राष्ट्रीय पैसा यांचा विनियोग या कार्याकडे झाला पाहिजे. राष्ट्राच्या आर्थिक घटनेचा व व्यवहाराचा सर्वांगीण विचार करून सरकारने व्यवस्थित धोरण आखून त्याचा नेटाने पिच्छा पुरविणे अवश्य आहे. आपला देश गरीब व अशिक्षित लोकांचा, आपला सर्व समाज विस्कळित आणि प्रत्येक उत्पादक घटक लहान व असहाय्य असा आहे. इतर देशांतही संघटना व सरकारी मदत याचे महत्त्व आजकाल फार वाढले आहे. मग आपल्यांकडे तर त्याशिवाय तरणोपाय नाही हे उघड आहे.''[4]

1923 साली हिंदुस्थानच्या आर्थिक इतिहासावरील आपल्या प्रबंधामध्ये गाडगीळ यांनी वरील प्रश्नांवर भर दिला. तेच त्यांचे पुढील कालातील संशोधनविषय होते. त्या संशोधनाधारे विविध प्रश्न सोडविण्यास अनुरूप धोरणे कोणती याबाबत सरकारला शिफारशी करणे, लोकांपर्यंत मार्गदर्शनासाठी अभ्यासाचे निष्कर्ष पोचविणे (यासाठी मराठीतून लिखाण व प्रकाशनावर त्यांचा भर होता) आणि शक्य तेथे त्याला व्यावहारिक पाया देणे असा त्यांचा प्रयत्न असे.

## गोखले अर्थशास्त्र संस्थेतील संशोधन (प्रथम कालखंड 1930 ते 1940)

त्या कालात संस्थेमध्ये प्रथम एक प्राध्यापक (गाडगीळ) व एक संशोधक सहायक (investigator) आणि नंतर दोन सहायक एवढेच मनुष्यबळ असल्याने संशोधन व्याप्ती मर्यादित होती. हिंदुस्थानात 70 टक्के जनता शेतीवर अवलंबून असल्याने शेती प्रश्नांवरच संस्थेने लक्ष केन्द्रित केले होते. पहिला (1931-32) अभ्यास *पुणे जिल्ह्यातील फळांची पैदास व विक्री* या विषयावर प्रत्यक्ष सर्वेक्षणाच्या आधारे पुरा करण्यात आला होता.[5] त्यावेळी हिंदुस्थानमध्ये सर्वेक्षणाचा अनुभव हाती नव्हता, सर्वेक्षण तंत्र विकसित नव्हते आणि शेतकरी अशिक्षित असल्याने कोणत्याही तऱ्हेचे लिखित हिशेब, नोंदी त्यांच्याजवळ नव्हत्या. त्यामुळे केवळ शेतकऱ्यांच्या स्मरणावर आधारित माहिती संकलन करण्याला पर्याय नव्हता. विविध प्रकारचे पडताळे व प्रमाणित निकष वापरून माहितीची विश्वासार्हता जोखून घेणे गरजेचे होते. शेतकऱ्यांच्या सर्वेक्षणाची पद्धती विकसित करण्यास फळांची पैदास व विक्रीच्या सर्वेक्षणापासून सुरुवात झाली. या अभ्यासात पैदास व विक्री या दोन्ही पैलूंचा समावेश होता. कारण शेतकरी लहान व गरीब असल्याने तो व्यापाऱ्यांवर कर्ज व विक्री व्यवस्था यासाठी पूर्णतया अवलंबून असल्याने व्यापारी त्याची मोठी पिळवणूक करीत. याबाबतचे वास्तव आकडेवारीसह पुढे आणून, विक्री व्यवस्थेचे व सावकारीचे विनियमन आणि पर्यायी सहकारी कर्ज व्यवस्थेची उभारणी हे धोरणात्मक निष्कर्ष पुढे आले.

त्यानंतर शेतीच्या एकंदरीत अर्थव्यवहाराचा अभ्यास करण्यासाठी खेड तालुक्यात प्रायोगिक अभ्यास हाती घेण्यात आला. तोपर्यंतचे अभ्यास निवडक पिकांसाठी मोजक्या कुटुंबांकडून उत्पन्न-खर्चाचा हिशेब नोंदविणे एवढ्यापुरतेच मर्यादित असत. शेतीच्या अर्थव्यवहाराचा

सर्वांगीण अभ्यास हाती घेतल्यावर शेतसारा वाढविण्याच्या हेतूने शासनाने सर्वेक्षण चालू केले काय अशी धास्ती शेतकऱ्यांना वाटली. तेव्हा शेतकऱ्यांचे शंकानिरसन करून त्यांचे सहकार्य मिळविण्यासाठी शेतकरी पुढाऱ्यांच्या सहीचे पत्रक, बैठका, सभाद्वारे संवाद साधून सर्वेक्षणाचा हेतू समजावून सांगून संपूर्ण विश्वास संपादन केल्यावर सर्वेक्षणाचे प्राथमिक काम हाती घेण्यात आले. काही नमुना प्रश्नपत्रिका भरून चाचपणी केली आणि जरूर त्या सुधारणा करून पक्का मसुदा तयार केला. ही प्रक्रिया वेळखाऊ पण अपरिहार्य होती. गाडगीळांनी हाती घेतलेल्या संशोधन प्रकल्पांमध्ये आणि सहकारी संस्था उभारणीच्या कामामध्ये स्वतः शेतकऱ्यांशी संवाद साधून विश्वास संपादनाबाबत त्यांचा विशेष कटाक्ष असे. कोणत्याही बैठकीत शांतपणे सर्वांना आपले मत मांडण्याची संधी देऊन सर्वसामान्यपणे मान्य निष्कर्ष काढूनच सभा संपे. त्यामुळे निश्चित प्रगती होई. शेतकऱ्यांबरोबर मिसळण्यात त्यांना कधीच अडचण आली नाही. धोतर, टोपी, कोट आणि चपला असा त्यांचा वेश असे. बैलगाडी, टांगा, सायकल ही त्यांची स्थानिक वाहन साधने. सोप्या, शुद्ध मराठी भाषेत (इंग्रजी शब्दांची अजिबात लुडबूड होऊ न देता) ते गुंतागुंतीचे प्रश्न उलगडून सांगत, पारिभाषिक संज्ञा ते टाळत नसत पण त्याचे सुबोध मराठीत विवरण करीत. शंकानिरसन करीत. त्यामुळे चांगले सहकार्य मिळे. शेती व्यवसायाचे समग्र सर्वेक्षण वाई तालुक्यातील निवडक खेड्यांत 1937-38 व 1938-39 अशी सलग दोन वर्षे करून पीकवार उत्पादन, जमाखर्च, विक्री व्यवहार, किंमती ही सर्व माहिती तपशीलात गोळा करून शेतीच्या अर्थव्यवहारांबाबत व अडचणींबाबत वस्तुनिष्ठ निष्कर्ष काढले आणि त्याआधारे धोरणात्मक शिफारसी मांडल्या.[6]

## सिंचित शेतीच्या लाभ-परिव्ययाचा अभ्यास

सिंचित व कोरडवाहू शेती यांचे तुलनात्मक सर्वेक्षण 1939 व 1940 साली गोदावरी-प्रवरा कालवा क्षेत्रामध्ये केले. त्या कालात सिंचनाबाबतचे अभ्यास शासनाने गुंतविलेल्या निधीवर प्रत्याय किती मिळतो (rate of return) आणि प्रकल्प तोटेशीर असेल तर उत्पन्न कसे वाढविता येईल अशा मर्यादित स्वरूपाचे होते. गाडगीळांनी हाती घेतलेला अभ्यास शासनाच्या दृष्टीतून नसून शेतकऱ्यांच्या दृष्टीतून घेतलेला होता. सिंचनाखाली आलेल्या जमिनीतून किती उत्पादन मिळते, किती खर्च येतो, इत्यादी माहिती प्रत्यक्ष सर्वेक्षण करून काढणे शक्य होते. पण त्या जमिनी जर कोरडवाहू राहिल्या असत्या तर किती उत्पादन आले असते आणि सिंचनामुळे उत्पादनवाढ किती झाली याचे गणित मांडणे अवघड होते. कारण त्याबाबत पूर्वी काही माहिती संकलन (bench-mark study झालेले नव्हते. हा प्रश्न तर्कशुद्ध मार्गे कौशल्याने हाताळून एकंदर फायदा तोट्याचे गणित (cost - benefit analysis) त्यांनी प्रथमच मांडले.[7] फायद्याचा विचार करताना शेतीतील उत्पादन वाढ, रोजगार वाढ असे प्रत्यक्ष फायदे आणि त्यामुळे अर्थव्यवहाराला एकूण चालना मिळून झालेली व्यापार वाढ, वाहतूक वाढ, रेल्वे उत्पादन वाढ, सरकारी उत्पन्न वाढ असे अप्रत्यक्ष फायदे यांचा साकल्याने अभ्यास केला. दख्खन पठारावरील दुष्काळी भागात सिंचनामुळे गुरांचा अधिक काल वापर व अधिक रोजगार, अधिक उत्पन्न यामुळे अर्थव्यवहारामध्ये केवढी लक्षणीय वाढ होते याचा अंदाज करता आला. धान्य, डाळी आदी पिकांपासून व्यापार, प्रक्रिया उद्योगास चालना मिळत नसल्याने रोजगारवाढ फारशी होत नाही तर कापूस, फळे, चारा (दुग्धव्यवसाय) आणि उसामुळे अप्रत्यक्ष फायदा मोठ्या प्रमाणात होतो. यावरून ग्रामीण भागातील विकासासाठी प्रक्रिया उद्योग ग्रामीण भागातच उभे करून तेथील कुंठित अवस्थेतून बाहेर पडता येईल पण हा प्रक्रिया उद्योग शेतकऱ्यांनी काढला तर त्याचा फायदा शेतकऱ्यांच्या हाती पडेल, या निष्कर्षामधून पुढे सहकारी साखर कारखान्याची मुहूर्तमेढ रोवली. त्यांनी 1940 साली केलेला सिंचनाच्या लाभ - परिव्ययाचा अभ्यास पथदर्शक ठरला. पुढे असे अनेक अभ्यास हाती घेतले गेले, त्याला गाडगीळांचे संशोधन पायाभूत होते.

तिशीच्या दशकामध्ये गाडगीळांनी बिगर-शेती क्षेत्रात पुरे केलेले अभ्यास म्हणजे 1932 साली केलेले मोटार वाहतुकीचे सर्वेक्षण[8] आणि 1936 - 38 मधील पुणे शहराचे आर्थिक सामाजिक सर्वेक्षण.[9] 1932 साली शासकीय पातळीवर मोटार वाहतुकीचा अभ्यास करण्यात आला तो रेल्वे वाहतूक मोटार वाहतुकीकडे वळल्याने रेल्वेचे उत्पन्न किती बुडते आहे याचा अंदाज बांधण्यासाठी. म्हणजे अभ्यासाचा केन्द्रबिंदू होता रेल्वेचा नफा, तर गाडगीळांच्या अभ्यासाचा हेतू होता मोटार वाहतूक व्यवसायाचे संघटन, भांडवलाची तरतूद, मिळकत-खर्चाचे गणित आणि शेती व एकूण अर्थव्यवहारास त्यामुळे मिळणारी चालना. वाहतूकदारांकडून प्रश्नपत्रिकेआधारे प्रत्यक्ष माहिती गोळा करून या सर्व पैलूंवरील सम्यक अहवाल त्यांनी तयार केला.

## पुणे शहराचे सर्वेक्षण

पुणे शहरातील सर्वेक्षण हे भारतातील पहिले नगर - सर्वेक्षण होते. त्यामध्ये कौटुंबिक पातळी, उद्योग, व्यवसाय, घाऊक व किरकोळ व्यापार, घरे, जाती संस्था, नगरपालिका, शिक्षण संस्था, आरोग्य, मनोरंजन, इत्यादी माहिती प्रत्यक्ष सर्वेक्षण करून गोळा करण्यात आली. यासाठी विविध घटकांसाठी प्रश्नावली तयार करण्यापासून तयारी करणे गरजेचे होते. प्रत्यक्ष सर्वेक्षणाद्वारा काटेकोर माहिती गोळा करून त्याचे वर्गीकरण व सांख्यिकीय मांडणी (यांत्रिक साहाय्याअभावी वेळखाऊ) हेही आव्हानात्मक होते. पुणे शहराच्या वाढीच्या ऐतिहासिक आढाव्यापासून शहरातील लोकसंख्येचे जातवार व व्यावसायिक वर्गीकरण, शैक्षणिक दर्जा, उत्पन्नपातळी, राहणीमान व गरिबीचे प्रमाण याची तपशीलवार, पेठवार माहिती तसेच उद्योग, व्यापार, कारागिरी, वाहतूक, आदी सर्व व्यवसायांबाबतही जातवार व पेठवार वर्गीकरण आणि उलाढाल, उत्पन्न-खर्च यांचे तपशील या सर्वेक्षणामधून उपलब्ध झाल्याने पुणे शहराच्या आर्थिक - राजकीय आकलनास ती पायाभूत बनली. या सर्वेक्षणामध्ये जनगणनेपेक्षा वेगळे असे वैशिष्ट्यपूर्ण व्यावसायिक वर्गीकरण गाडगीळांनी विकसित केले. त्यामध्ये अंगमेहनतीचे काम, उद्योग-व्यापार व नोकरीपेशा असे प्रमुख तीन गट सामाजिक दर्जा लक्षात घेऊन पाडले आणि त्यामध्ये कसब / उत्पन्नपातळी विचारात घेऊन श्रेणी लावण्यात आल्या. या वर्गीकरणामध्ये त्यांच्या सखोल सामाजिक व आर्थिक आकलनाचे प्रतिबिंब पडलेले आहे. दारिद्र्य रेषा ठरविताना पुणे शहरासाठी कौटुंबिक खर्चाचे सर्वेक्षण केलेले नसल्याने किमान उत्पन्नपातळी ठरविण्यासाठी आवश्यक पाया उपलब्ध नव्हता. तेव्हा कापड गिरणी कामगार चौकशी समितीने खर्चाच्या सर्वेक्षणाच्या आधारे तयार केलेले सोलापूर शहरासाठीचे निकष वापरून पुणे शहरातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या काढली. ती सुमारे 50 टक्के भरली. अपुरे वेतन हेच दारिद्र्याचे प्रमुख कारण असल्याने अकुशल व अर्धकुशल कामकरी आणि प्राथमिक शिक्षक, नर्सेस, आदी कनिष्ठ दर्जाचे नोकरदार व ज्योतिषी, भिक्षुक आदी पेशांमध्ये दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे मोठे प्रमाण आढळले. सामाजिक सर्वेक्षणामध्ये विविध जातीजमातींच्या सामाजिक संघटनांचे तपशील, शिक्षणाचा विकास, निवाऱ्याबाबतची पेठवार, जातवार माहिती यास ऐतिहासिक मूल्य आहे. 1931 नंतर जनगणनेमध्ये जातीबाबतची माहिती गोळा करणे बंद केल्यामुळे सर्वेक्षणाद्वाराच केवळ जातवार माहिती मिळू शकते, त्यामुळे असे सर्वेक्षण विविध निष्कर्ष काढण्यासाठी पायाभूत ठरते (उदाहरणार्थ, पेठवार मतदानाचा अंदाज). आर्थिक - सामाजिक सर्वेक्षणाच्या आधारे पुण्याच्या विस्कळित स्वरुपाचे मार्मिक विश्लेषण गाडगीळांनी केले आहे. बुद्धिमंतांचा वर्ग व शिक्षण संस्थांचा विकास पुणे शहराच्या आर्थिक विकासाशी संलग्नित नाही. व्यापारी वर्ग व कारागिरांमध्ये सामाजिक बंध नसल्याने व्यापाऱ्यांनी कारागिरीच्या वाढीमध्ये लक्ष घातले नाही तर ते वस्तू आयात करून व्यापार वाढवावयाच्या मागे राहिले आणि कारागिरी मागे पडत गेली. कोल्हापूरप्रमाणे पुण्याला सर्वमान्य राजकीय नेतृत्वही नव्हते. जात - व्यवसायवार विभागणीमुळे विशिष्ट जात - जमातीपुरती

सामाजिक बांधिलकी असली तरी विविध पेठांमध्ये सामाजिक विभागलेपणा आणि मोठे अंतर आहे. पुण्यामध्ये आर्थिक - सामाजिक - राजकीय कोणत्याच पातळीवर एकसंधता नाही. विकासाला निश्चित दिशा नाही. या दिशाहीनतेमुळे आज आपणास अनुभवास येत आहे की पुण्याच्या अनियंत्रित वाढीबरोबर पुण्याचे एकेकाळचे वैशिष्ट्य (समशीतोष्ण, उत्साहवर्धक हवा व निवांत जीवन) उध्वस्त होऊन प्रदूषण व अनारोग्याच्या सापळ्यात पुणेकर अडकले आहेत.

1936-38 नंतर 1954[10] साली पुण्याचे फेर सर्वेक्षण गोखले अर्थशास्त्र संस्थेद्वारा पुरे करण्यात आले. 1961 च्या पानशेत प्रलयानंतर त्याच्या परिणामांचे खास सर्वेक्षण[11] करुन पूररेषा, पुनर्वसनाची दिशा याबाबत विचारविनिमय सुरू होण्यासाठी गाडगीळानी पुढाकार घेऊन 'पुणे पुनर्वसन परिषद' आयोजित केली. गोखले अर्थशास्त्र संस्थेत पुणे विकास अभ्यास गट' स्थापन करून विकासाला दिशा देण्याचा प्रयत्न केला. 1966 मध्ये मुंबई-पुणे महानगरीय विकासाचे धोरण आखण्यासाठी शासनाने गाडगीळांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. समितीच्या अहवालात व्यापक अर्थविकासाच्या संदर्भामध्ये महानगरीय विकासाचे विनियमन व महानगरांचा नियंत्रित पद्धतीने विकास याबाबतच्या शिफारसींमागे आर्थिक इतिहास, नागरी अर्थव्यवस्थासंबंधीचे संशोधन याद्वारे विकसित झालेल्या त्यांच्या सखोल आकलनाचे प्रतिबिंब आढळते.

1939 पासून जागतिक परिस्थिती पूर्णतया बदलली. युद्धकाळामुळे पेट्रोलियम पदार्थ व अन्य आयात खंडित होऊन अतितीव्र टंचाई निर्माण झाली आणि महागाई भडकली. रेशनिंग व नियंत्रित पुरवठा व्यवस्था अनिवार्य झाली. त्यामुळे 1940 पासून गाडगीळानी युद्धकालीन विनियमन व किंमत धोरण यावर लक्ष केन्द्रित केले. 1945 नंतर स्वातंत्र्य समीप आले होते. स्वातंत्र्यानंतर संघराज्याचे स्वरूप, राज्यपुनर्रचना व घटनानिर्मिती या ज्वलंत प्रश्नांवर म्हणजे राजकीय प्रश्नांवरचे संशोधन गाडगीळानी हाती घेतले. 1946 पासून संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी राज्याची व्याप्ती ठरविण्याकरिता आकडेवारी, वस्तुनिष्ठ व तात्त्विक पाया पुरविण्याच्या दृष्टीने त्यानी अभ्यास हाती घेतला. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या कार्याचा वैचारिक पाया उभारण्याच्या कामात ते सहभागी होते.

## युद्धकालीन आर्थिक धोरण

युद्धकालीन आर्थिक धोरणावरील अभ्यासामध्ये[12] भावफुगवट्याची कारणमीमांसा करण्यासाठी चलनवृद्धी, उत्पादन, कराचे उत्पन्न, आयात-निर्यात, आदींची अधिकृत आकडेवारी त्यानी वापरली तर विविध धोरणांची योग्यायोग्यता स्पष्ट करण्यासाठी अन्य देशांतील युद्धकालीन धोरणे आणि त्यांचे यशापयश यांचे विश्लेषण वापरले. ग्रामीण व नागर लोकसंख्येवर होणाऱ्या परिणामांचा अंदाज घेण्यासाठी गोखले अर्थशास्त्र संस्थेने सर्वेक्षणाद्वारा गोळा केलेली माहिती बहुमोल ठरली. अन्यथा प्रश्नाचे स्वरूप स्पष्ट करणे शक्य झाले नसते. या माहितीच्या विश्लेषणातून त्यानी मांडले की युद्धासाठी आवश्यक पुरवठा करताना शासनाने भरमसाठ नोटा छापणे आणि त्यामुळे प्रचंड महागाई वाढू देणे हा मार्ग जो स्वीकारला त्यामुळे सामान्य शेतकरी व अन्य कष्टकरी महागाईच्या भाराखाली भरडून निघाले. हे अन्याय्य धोरण बदलून सधनांवरील आयकर व कंपनीवरील कर वाढविणे, कंपन्यांना सक्तीची बचत योजना लावणे, जीवनावश्यक वस्तूंव्यतिरिक्त अन्य वस्तूंवरील अबकारी कर वाढविणे, हे उत्पन्न वाढविण्याचे मार्ग चोखाळावे असे त्यानी सुचविले. याशिवाय आवश्यक वस्तूंच्या उत्पादनवाढीस उत्तेजन देण्यासाठी नगदी पिकांखालील जमीन धान्याकडे वळविल्यास शेतकऱ्याला त्याबद्दल भरपाई द्यावी, विणकरांना व्यवस्थित सूत पुरवठा करून कापड उत्पादवाढीस उत्तेजन द्यावे, रेल्वेने अग्रहक्काने धान्य, डाळी, साखर, आदी आवश्यक वस्तूंची वाहतूक करावी, वाहतूक व्यवस्थेवरील खर्च व ताण किमान करण्यासाठी ग्रामीण पातळीवरील प्रक्रिया-उद्योगाला



Vinayak

खास उत्तेजन देऊन स्वयंनिर्भरता वाढवावी. आवश्यक वस्तूंचा किमान पुरवठा सर्व कुटुंबांना रेशनद्वारा करावा. साठेबाजी, नवी गुंतवणूक व स्थावर मालमत्तेची सट्टेबाजी यावर कडक निर्बंध घालावे. अशा रीतीने सबंध अर्थव्यवस्था नियंत्रित केली तरच गरीब जनतेवर लादला जाणारा असह्य बोजा कमी करणे आणि त्याचे किमान जीवनमान राखणे शक्य होईल. युद्धकालीन समस्यांच्या संदर्भात अभ्यासाआधारे गाडगीळांनी जे निष्कर्ष मांडले त्याच मूलभूत चौकटीत नियोजनपर्व सुरू झाल्यावर धोरणाची दिशा राहावी अशी त्यांची भूमिका होती. 1950 नंतर त्यानी जे संशोधन विषय निवडले त्याचे स्वरूप सर्वेक्षणाद्वारा ग्रामीण पातळीवरील पायाभूत माहिती संकलन आणि अधिकृत आकडेवारी आधारे इतर क्षेत्रांचा अभ्यास आणि त्याच्या विश्लेषणातून पुढे आलेल्या वास्तवाच्या आधारे योजनेला दिशा देण्याचा प्रयत्न असे होते.

## पगाराची पातळी

तिशीच्या दशकामध्ये उपलब्ध आकडेवारीच्या आधारे घेतलेला सर्वात महत्त्वाचा अभ्यास म्हणजे सरकारी नोकरांचे पगार[13] (1931). गाडगीळांच्या दृष्टीने खाजगी मालमत्तेच्या चौकटीत पगार व किंमतपातळी याबाबत सूत्रबद्ध धोरण आखून त्याचे विनियमन केले तरच आर्थिक केन्द्रीकरणातील वाढ रोखणे आणि वंचित समाजाला किमान जीवनमान उपलब्ध करून देणे शक्य आहे.

ब्रिटिश कालात आय. सी. एस. अधिकाऱ्यांचे पगार इंग्लंडमधील वेतनपातळीशी जोडलेले होते. कारण प्रारंभीच्या कालात अनेक उच्चपदस्थ अधिकारी ब्रिटिश असत. त्यावेळी इंग्लंडमधील दरडोई उत्पन्न पातळी भारतातील उत्पन्न पातळीच्या 17 पट होती. त्यामुळे उच्च अधिकाऱ्यांचे पगार इंग्लंडच्या पातळीनुसार (वार्षिक रु. 40 ते 48 हजार) बेतल्याने ते एवढे ज्यादा होते की नागर अकुशल कामगारांच्या वार्षिक मिळकतीच्या ते 200 पट होते.

इंग्लंडमध्ये ही तफावत 30 पट तर जर्मनीत फक्त 13 पट होती. तिशीमध्ये इंग्लंडमधील अधिकारी भरती बंद होणार होती. त्याचा मोका साधून भारतातील पगार रचनेत आमूलाग्र बदल करणे शक्य होते आणि नितांत गरजेचे होते, कारण तरच श्रीमंतांच्या उच्च राहणीमानामुळे होणारी देशाची साधनसंपत्तीची प्रचंड उधळमाधळ थोपविणे शक्य आहे अशी गाडगीळांची भूमिका होती. शिक्षितांच्या उच्च पगार पातळीच्या पुष्ट्यर्थ दावे केले जात ते समर्थपणे खोडून आय. सी. एस. च्या उच्च पगारामुळे केवढी अनर्थमाला सुरू होते हे त्यानी दाखविले. त्यामुळे सर्वच उच्च शिक्षितांचे पगार उच्च पातळीवर ठेवले जातात आणि उच्च शिक्षित व श्रमिकांची उत्पन्न पातळी व राहणीमान यामध्ये रुंद दरी निर्माण होते. शिक्षितांमध्ये अहंगंड पोसला जातो. श्रमाचे अवमूल्यन केले जाते. शिक्षितांचा शिक्षणावर एकाधिकार टिकून श्रमिक जणू देशाचे दुय्यम नागरिक बनविले जातात. उच्च शिक्षितांसाठी काँग्रेसच्या ठरावानुसार (वार्षिक 6,000 रुपये) पगार पातळी सुचविली होती. अशी माफक पातळी ठेवल्यास शासनाला आवश्यक असा सेवाविस्तार मोठ्या प्रमाणात करणे शक्य होईल असे गाडगीळानी मांडले होते. 1946 ला पे - कमिशनला निवेदन (memorandum) [14] सादर करतानाही गाडगीळांनी तुलनात्मक आकडेवारी देऊन मांडले होते की, 1946 मध्ये पगाररचनेत आमूलाग्र बदल करण्याची संधी पुन्हा चालून आली होती. भारतामध्ये पारंपरिक जातीबद्ध समाजरचनेत शिक्षितांची उत्पन्न पातळी उच्च नव्हती आणि शासकीय सेवेतही जास्त पगार नव्हते. पण ब्रिटिश साम्राज्यकालातील धोरणामुळे भारतामध्ये शिक्षित-श्रमिकांत प्रचंड विषमता निर्माण केली गेली, ती दूर करण्याची संधी सोडू नये असे त्यानी सुचविले होते. पगार ठरविताना किमान जीवनवेतन लक्षात घेऊन किमान व कमाल वेतनातील तफावत निरुंद करण्याच्या दृष्टीने सरकारी नोकरांचे पगार माफक असावेत, तसेच सरकारी नोकरांचे प्रवास भत्ते, आलिशान बंगले, नोकर, श्रीमंती डामडौल कमी करावा. त्याचबरोबर कनिष्ठ सेवांमध्ये जीवन वेतनही दिले जात नाही ते वाढवावे.

परंतु ब्रिटिश सनदी अधिकारी भारतातून गेले तरी विदेशी खाजगी कंपन्यांच्या उच्च वेतन पातळीमुळे बड्या उद्योगांमध्ये उच्च वेतन पातळी राहिली आणि सरकारी नोकरीत तुलनात्मकदृष्ट्या त्याहून कमी पगार असले तरी किमान, कमाल वेतनात मोठी दरी टिकून राहिली. 1956-57 मध्ये खाजगी उद्योगांतील उच्च पदस्थांचे पगार ज्यूट गिरणीतील अकुशल कामगारांच्या 350 पट होते असे दाखवून[15] त्याबाबत धोक्याचा इशारा त्यांनी दिला होता.

1991 पासून बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतातील उच्चपदस्थांची पगारपातळी अधिकच वर उचललेली आढळते. 1931 साली अमेरिकेतील दरडोई उत्पन्न भारतातील दरडोई उत्पन्न पातळीच्या 25 पट होते. आज ते 100 पट आहे. पगार उच्च पातळीवर ठेवण्यामध्ये बहुराष्ट्रीय व बड्या भारतीय कंपन्या उत्पादन करीत असलेल्या मोटारगाड्या, मोटार सायकल, धुलाई यंत्रे, रंगीत टी.व्ही., वातानुकूलक, आदी चैनीच्या वस्तूंचा बाजार रुंदावणे हाही हेतू आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांतील पगार व युरोप - अमेरिकेतील चैनचंगळ व उधळपट्टीचे राहणीमान भारतातील उच्च शिक्षितांतील मूठभरांना मिळू लागल्याने येथील पगाररचना अधिकच विषम बनली. बहुराष्ट्रीय कंपन्यांतील उच्च पगारामुळे बड्या खाजगी कंपन्या, सरकारी अधिकारी, महाविद्यालये, आदींतील उच्च शिक्षितांचे पगार वर चढविले गेले. त्याबरोबर शिक्षितांची व इतर संघटित क्षेत्रांतील वेतन पातळीही वाढली. दुसऱ्या टोकाला शेतमजूर व इतर अकुशल श्रमिक आणि अर्धबेकार, बेकार, आदिवासी, आदींना जेवणाची भ्रांत पडत आहे. भारताची दरडोई उत्पन्न पातळी युरोप-अमेरिकेच्या तुलनेत अत्यंत निकृष्ट असतानाही भारतामधील उच्चभ्रूंची राहणी आंतरराष्ट्रीय दर्जाची आहे आणि भारतातील पेट्रोल, वीज, आदी दरपातळी आंतरराष्ट्रीय दरपातळीवर पोचविण्याचे शासनाचे धोरण आहे. परिणामी भारतातील श्रमिकांची ससेहोलपट वाढत आहे. तेव्हा भारतीय आर्थिक परिस्थिती, मनुष्यबळाची उपलब्धता, प्रत्येक नागरिकास किमान राहणीमान देण्याची जबाबदारी लक्षात घेऊन उच्च शिक्षितांची पगार पातळी ठरविली पाहिजे. आंतरराष्ट्रीय कंपन्यांमुळे भारतातील पगाररचना अधिकच विपर्यस्त बनली आहे. यासंदर्भात बहुराष्ट्रीय कंपन्यांना मुक्तद्वार या धोरणाचा व जागतिकीकरणाचा फेरविचार करणे ओघाने आलेच.

## राजकीय विषयांवरील संशोधन

राजकीय विषयांवरील त्यांचा सर्वात महत्त्वाचा संशोधन प्रबंध म्हणजे 1944 साली तयार करून 1945 साली *Federating India*[16] या शीर्षकाखाली प्रसिद्ध केलेला संघराज्यनिर्मितीचा अभ्यास. त्या कालात एका बाजूला फाळणी टाळावी म्हणून मुस्लिमांचा अनुनय चालू होता तर दुसऱ्या बाजूला मुस्लिमांच्या फाळणीच्या मागणीमुळे मुस्लिमद्वेष पोसला जात होता आणि मुस्लिम अधिकाधिक दुरावले जाऊन फाळणी अपरिहार्य बनत होती. अशा भावनाविवश वातावरणामध्ये अत्यंत वस्तुनिष्ठ पद्धतीने संघराज्यनिर्मिती, घटना व व्यवहार याचा जागतिक पातळीवरील अनुभवांचा साधकबाधक अभ्यास, भारतातील हिंदु-मुस्लिम संबंधांचा ऐतिहासिक परामर्श आणि संघराज्य निर्मितीमधील संस्थानांचा व राज्य पुनर्रचनेचा प्रश्न यांचा समन्वित अभ्यास करून अत्यंत तर्कशुद्ध व शास्त्रीय पद्धतीने फाळणी व संघराज्य स्थापनेचा प्रश्न गाडगीळांनी आपल्या अभ्यासात हाताळला. त्यातील पायाभूत तत्त्वांचा विचार आजच्याही संदर्भामध्ये प्रस्तुत आहे. या प्रश्नाला सामोरे जाताना लोकशाही चौकटीतच निर्णयप्रक्रिया पुरी झाली पाहिजे, प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार देऊन प्रत्येक प्रदेशातील नागरिकांच्या मतानुसारच राजकीय प्रक्रिया पुढे गेली पहिजे तरच ताणतणाव किमान होऊन प्रश्नांची सोडवणूक शक्य होईल, ही त्यांची भूमिका त्यांनी बिनतोड युक्तिवाद करून मांडली. प्राप्त परिस्थितीमध्ये (ब्रिटिश व संस्थानिक आणि मुस्लिम, बिगर-मुस्लिम नेते यांच्या हितसंबंधी कारवाया व हिंदू-मुस्लिम तणाव व संशयग्रस्तता) संघराज्य

संकल्पनेद्वाराच राजकीय प्रश्न सुटणे शक्य आहे आणि संघराज्य निर्मितीमध्ये प्रत्येक घटक राज्याला संघराज्यात सामील होण्या न होण्याचे स्वातंत्र्य ठेवले आणि हा निर्णय तेथील जनतेने सार्वमताने घेतला तर मुस्लिमांनी जरी स्वतंत्र राज्य स्थापन केले तरी ही फाळणी सामंजस्याने केल्यास या दोन राष्ट्रांमधील संबंध जोपासून अंतर कमी करणे आणि दोन राष्ट्रांचा संयुक्त संघ स्थापन करणेही कालांतराने शक्य हाईल. परंतु घटक राज्यांचे हक्क याबाबत सामंजस्य न दाखविता जुलुमजबरदस्ती केली तर दोन राष्ट्रांतील वितुष्ट वाढेल, असा स्पष्ट इशारा त्यांनी 1945 सालीच दिला होता.

संघराज्ये व घटकराज्ये यांची अधिकार क्षेत्रे व जबाबदाऱ्या यांच्या वाटपाबाबतही त्यांची भूमिका जागतिक अनुभव व भारतीय परिस्थितीची वैशिष्ट्ये यावर आधारित होती. घटक राज्यांना जी सत्ता प्राप्त होते ती स्वयंसिद्ध असून ती कोणत्याही वरिष्ठ सत्तेकडून प्राप्त होत नाही राज्यनिर्मितीचा जो क्रम त्यांनी मांडला तो तर्कशुद्ध होता. भाषा, इतिहास, सांस्कृतिक वारशातून विकसित झालेली राजकीय एकात्मता हा राज्यनिर्मितीचा पाया आणि सीमारेषा आखताना खेडे हा घटक धरून विवाद्य प्रदेशामध्ये सार्वमताच्या आधारे पण भौगोलिक सलगता लक्षात घेऊन सीमा आखाव्यात. अशा घटक राज्यांनी एकत्र येऊन संघराज्य बनविले जाते आणि आंतरराष्ट्रीय व्यवहार, संरक्षण, दळणवळण, संघराज्यीय स्तरावरील अर्थव्यवहार व नियोजन (खाणी, मोठे कारखाने, धरणे, चलनव्यवस्था, इत्यादी) हे संघराज्याचे अधिकारक्षेत्र, तर घटकराज्ये ही प्राय: स्वायत्त ठेऊन त्यामध्ये उपप्रांत (जसे मराठवाडा, विदर्भ, कोकण) पाडून त्यांना शेती, लघुपाटबंधारे, स्थानिक कामे, शालेय शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, आदी अधिकार असावेत असे त्यांनी सुचविले होते.

**भारतीय घटना**

भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार झाल्यावर त्याचा सखोल अभ्यास करून त्यावर आधारित प्रकाशन त्यांनी 1948 साली[17] केले. भारतीय राज्यघटना अन्य देशांतील संघराज्य घटनांच्या अभ्यासाआधारे तयार न करता ती मोठ्या प्रमाणात 1935 च्या कायद्यावरून बेतली. त्यामुळे ब्रिटिश राजवटीतील एकमुखी तरतुदी त्यामध्ये समाविष्ट दिसतात. उदाहरणार्थ, 1935 च्या कायद्याचा ढाचा अनुसरून राज्यपाल नेमण्याचा अधिकार भारतीय घटनेत राष्ट्रपतीला दिला गेला. अशा तऱ्हेची योजना कोणत्याही प्रजासत्ताक संघराज्यात आढळत नाही. त्यामुळे राज्याच्या स्वायत्ततेवर घाला बसण्याचा धोका आहे. विशेषत: केन्द्र व राज्य सरकारे वेगळ्या पक्षांची असल्यावर पक्षीय राजकारण मध्ये येऊन राज्यव्यवहारात खोडा घातला जाईल. याचा अनुभव आपणास गेल्या 45 वर्षांत वारंवार आला. आकस्मिक संकट जाहीर करण्याचे सर्व अधिकार राष्ट्रपतींवर अवलंबून असून त्या कालात कायदेकानूत बदल, राज्य सरकारला कोणतेही कृत्य करावयाला भाग पाडणे, कर लादणे असे अधिकार केन्द्रीय सरकारला प्राप्त होतात. (1975 साली या अधिकाराचा वापर करून एकाधिकारशाही स्थापन करण्यात आली होती.) अशी योजना अस्तित्वात असलेल्या एकाही संघराज्य घटनेत नाही. तसेच आंतरराष्ट्रीय तह, करार, धोरणे अगर सर्वराष्ट्रीय परिषदांत झालेले ठराव आदींच्या अमलबजावणीत घटनेतील केन्द्र - राज्य क्षेत्रविभागणी लक्षात घेतलेली नाही तर सर्व अधिकार केन्द्रीय सरकारला दिले आहेत. परराष्ट्रीय तह, ठराव यांच्या अमलबजावणीच्या मिषाने राज्यघटनेत नमूद केलेल्या राज्यांच्या अधिकार क्षेत्रावर अतिक्रमण करण्याचे अधिकार केन्द्र सरकारला दिल्यामुळे होणारे हानीकारक परिणाम डंकेल प्रस्तावावर सही व जागतिक व्यापार संघटनेचे सदस्यत्व भारत सरकारने स्वीकारल्यावर सर्वच क्षेत्रात तीव्रपणे जाणवू लागले आहेत.

भारतीय घटनेमध्ये गाडगीळांना विशेष आक्षेपार्ह तरतुदी आढळल्या त्या मूलभूत हक्कांबाबत.

अमेरिकेच्या घटनेतील तरतुदींची तपशीलात चर्चा करून मुक्त अर्थव्यवस्थेच्या अध्वर्यु अमेरिकेतील घटनेतील तरतुदींपेक्षाही भारतीय घटनेमध्ये खाजगी मालमत्तेचे हक्क व धंदा-व्यवसाय स्वातंत्र्य अधिक अमर्याद आहे आणि त्यामुळे स्वातंत्र्यापूर्वी केलेल्या समाजवादी समाजनिर्मितीच्या घोषणा फोल बनतात असे गाडगीळांनी मांडले होते. याउलट भाषण स्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य यामध्ये अधिक्षेप करण्याच्या बऱ्याच तरतुदी केल्या आहेत. त्याचा वापर कसा मनमानी पद्धतीने केला जातो याचा अनुभव आपण गेली 50 वर्षे घेत आहोतच. गाडगीळांच्या मते स्वतंत्र भारताच्या प्रगतीसाठी जरूर अशा आर्थिक नियोजन, नियंत्रणे व लोकाभिमुख विकास यामध्ये खाजगी मालमत्तेच्या हक्काचा मोठा अडसर बनणार आहे. मार्गदर्शक तत्त्वाखाली केवळ सदिच्छा यादी (न्यायालयीन प्रक्रियेतून जे प्राप्त करून घेण्यास वाव नाही) देऊन लोकहित कसे साधले जाणार ? 1944-48 या कालात हिंदुस्थानची फेररचना, संघराज्यनिर्मिती, भाषावार प्रांतरचना व भारताची घटना या विषयांवर त्यांनी केलेल्या अभ्यासातून मांडलेले ठळक निष्कर्ष तपासले तर हेच दिसून येते की, त्यांनी दिलेल्या धोक्याच्या सूचना, नोंदलेल्या त्रुटी, मर्यादा आणि त्यामुळे भारताची राजकीय व आर्थिक वाटचाल इच्छित दिशेने न होता अधिकाधिक लोकहितविरोधी कशी होत जाईल याबाबत त्यांनी जे इशारे दिले होते ते खरे ठरले. भारत-पाक वितुष्ट, काश्मीरची शोकांतिका, अर्थ-सत्तेचे केन्द्रीकरण व मानवी हक्कांची (मार्गदर्शक तत्त्वात उचलून धरलेल्या) पायमल्ली, निरक्षरांची विक्रमी संख्या या सर्वांतूनच ते कटु अनुमान आपणास अनुभवास येत आहे. जागतिक अनुभवाचा सखोल अभ्यास व भारतीय समाजाबाबतची ऐतिहासिक संशोधनातून आलेली प्रगल्भ जाण आणि विविध आकडेवारी, अनुभव यांचा एकत्रित विचार करून त्यातून निष्कर्ष काढण्यासाठी पायाभूत असलेली शास्त्रीय विश्लेषण पद्धती यामुळे त्यांच्या संशोधनाला विशेष खोली आणि भविष्याचा अंदाज घेण्याचे द्रष्टेपण आलेले आढळते. समाजशास्त्रामध्ये प्रत्यक्ष प्रयोग, पडताळा शक्य नसतो, परंतु पूर्वानुभव व वास्तव यांच्या एकत्रित विश्लेषणातून भविष्याबाबत अंदाज बांधण्याची प्रगल्भता येते. ही संशोधनपद्धती त्यांनी आत्मसात केलेली होती. हे त्यांच्या संशोधन कामाचे वैशिष्ट्य. मग ते कोणत्याही क्षेत्रातले असो - शिक्षण, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र. त्यांच्या तर्कशुद्ध निगमन पद्धतीमुळे ते बिनतोड विश्लेषण करीत.

## नियोजन पर्व

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आणि विशेषतः 1950 साली नियोजन पर्व सुरू झाल्यावर योजना आखण्यासाठी शासकीय पातळीवर माहिती संकलन, राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण यंत्रणेद्वारा (NSS) राष्ट्रव्यापी नमुना सर्वेक्षण आणि विविध संशोधन संस्थांद्वारा स्थानिक पातळीवरील तपशीलवार अभ्यासासाठी अर्थसाहाय्य योजना पुढे आल्या. गोखले अर्थशास्त्र संस्थेमध्ये कृषी, लोकसंख्या विषयक अभ्यासासाठी खास संशोधन विभाग स्थापण्यात आले. नागरीकरण, उद्योग, वित्त शिक्षण आदीविषयक विविध पैलूंवर संशोधन सुरू झाले. संस्थेतील संशोधक व संशोधक सहायकांची संख्या वाढली. या कालात प्रत्यक्ष संशोधन प्रकल्पांत गाडगीळ सहभागी नव्हते तर संशोधनकार्यात त्यांचे मार्गदर्शन असे. या विविध संशोधन प्रकल्पांधारे गोळा झालेल्या माहितीचा सखोल अभ्यास करून त्याआधारे आर्थिक बदलाची दिशा, बदलाला पोषक घटक व अडसर आणणारे घटक यांचे विश्लेषण व भारतीय समाजाचे त्यांचे सखोल आकलन यांच्या एकसंधीकरणातून ते धोरणात्मक निष्कर्ष मांडत.[18] नियोजन आयोगाच्या अर्थतज्ज्ञांच्या समितीचे ते उपाध्यक्ष होते. या नात्याने अनेक संशोधनपर शोधनिबंध ते समितीकडे पाठवीत. 1950 पासून त्यांची संशोधन लिखाणाची व्याप्ती अखिल भारतीय बनली आणि विशिष्ट पैलूंच्या सूक्ष्म अभ्यासाकडून ते अर्थव्यवस्थेच्या अंगप्रत्यंगांच्या समन्वित विचारांकडे वळले. पंचवार्षिक योजनांचे चिकित्सक समीक्षण, योजनेची दिशा, नियोजनासाठी आवश्यक नियंत्रण-

विनियमनाची चौकट, आदी व्यापक प्रश्न आणि त्यातील विविध पैलू - शेती विकास, शेती उत्पन्नाचे स्थिरीकरण, शेतमजुरांचे प्रश्न, वेतन व किंमत विनियमन, ग्रामीण उद्योगीकरण, सार्वजनिक हितसंवर्धनामध्ये बडी औद्योगिक घराणी व एकाधिकार यांचे अडसर, अन्नधान्य साठे व वितरण विनियमन, रोजगार, वित्तीय तरतुदी आदी विषयक संशोधनपर लिखाण केले.

## भारतीय सामाजिक वास्तवात समुचित विकास नीती

उच्चनीच श्रेणीबद्ध जातीभेदाधिष्ठित भारतीय समाजाची गाडगीळांच्या दृष्टीने वैशिष्ट्ये म्हणजे समानता व व्यक्तिस्वातंत्र्य या कल्पनांचा अभाव पण व्यक्तिगत मुक्तीच्या कल्पनेमुळे समाजधर्म व सामूहिक कर्तव्य विचारांचाही अभाव असा दुभंगलेला म्हणून अतिदुर्बल व गरीब समाज प्रगतीपथावर नेण्यासाठी जरी अर्थव्यवहार व संपत्तीसंचय यास आवश्यक ते स्थान दिले पाहिजे तरी भांडवली स्पर्धा व प्रलोभनाधारित व्यक्तिगत लोभ यास महत्त्व दिले तर सत्ता केन्द्रीकरण व विषमता अधिकच वाढेल. म्हणूनच स्वतंत्र, सात्विक, समताप्रधान व समाधानी समाजनिर्मितीसाठी समाजशिल्प व अर्थकारणास नैतिक अधिष्ठानाची जोड देण्याची निकड त्यांना वाटे. आपली गरिबी ही अपुरी निर्मिती व अत्यंत विषम वाटप यामुळे आहे. पावसाच्या व किमतींच्या अनिश्चिततेमुळे शेती व्यवसाय अस्थिर आहे. अशा परिस्थितीत मोठा दुष्काळ, पूर, लढाई, अशी आपत्ती आल्यास भिक्षांदेहीची वेळ येते. अशा परिस्थितीमध्ये उपलब्ध साधनसंपत्तीचा काटकसरीने व नियोजनबद्ध वापर, गुंतवणूक करताना व उत्पादनाचे अग्रक्रम ठरविताना जीवनावश्यक गरजांच्या वस्तू पुरवठा वाढीवर लक्ष, वेतन पातळी व किंमत नियंत्रण, श्रीमंतांवर उच्च दराने कर, प्रशासन व उद्योग यांचा थाटमाट, चैनचंगळ व उधळमाधळ याला फाटा, विकेन्द्रित नियोजन, नागरी केन्द्रीकरणाला आळा, जमीन सुधारणा, सिंचन व शेती विकास आणि लहान उत्पादकांचे सहकारी संघटन अशा योजनाबद्ध चौकटीत अर्थव्यवस्थेस दिशा देणे अगत्याचे आहे असे भारतातील अर्थ-सामाजिक परिस्थिती व समाजाचे गुणदोष विचारात घेऊन गाडगीळांनी मांडले होते. 1950 पासून त्याबाबत त्यांचे संशोधन, चिंतन व लिखाण चालू होते. 1967 साली देशाच्या अस्थिर राजकीय परिस्थितीत त्यांना जेव्हा नियोजन आयोगाची जबाबदारी स्वीकारण्यासाठी निमंत्रित करण्यात आले तेव्हा सर्व मर्यादा लक्षात घेऊनही कर्तव्यबुद्धीने त्यांनी ते पद स्वीकारले. त्यावेळी केन्द्रीय निधीच्या वाटपाबाबत राज्याराज्यांत तीव्र मतभेद व तंटे चालू होते. निधी वाटपाचे तर्कशुद्ध निकष पुढे ठेवून (गाडगीळ सूत्र) त्यांनी तो प्रश्न समाधानकारकरित्या सोडविला. परंतु अमेरिका व भारतातील बडे उद्योग यांच्या आर्थिक वर्चस्वामुळे नियोजन-नियंत्रणाच्या चौकटीत योजनेस लोकहितकारी दिशा देणे शक्य नव्हते. खाजगी मालमत्तेच्या चौकटीमध्ये सत्ताधारी-संपत्तीधारी-नोकरशहा यांच्या युतीतून धनिक-हितसंबंधी धोरण स्वीकारले जाऊन लोकहिताच्या दृष्टीने नियोजन - नियंत्रणाचा अवलंब करण्यामध्ये ते मोडता घालत असल्याबद्दल गाडगीळ प्रखर टीका करीत. आर्थिक - सामाजिक बदलाच्या प्रक्रियेमध्ये खाजगी मालमत्तेच्या हक्काच्या अडसराची पूर्ण जाणीव असूनही त्यांची उदारमतवादी भूमिका (इंग्लंडमधील वास्तव्यापासून आकारलेली) कायम का राहिली ? त्याबाबत त्यांची भूमिका होती की, हजारो जाती - धर्म- पंथियांमध्ये दुभंगलेल्या आणि कर्मयोग - दैववादाचा पगडा असलेल्या भारतीय समाजात क्रान्तिकारी बदलासाठी पेटून उठण्याची प्रेरणा प्रज्वलित करून वर्गीय एकजूट बांधणे हे आवाक्यातले वाटत नाही. अशा दुभंगलेल्या, विकलांग, रूढीबद्ध व बहुसंख्येने शेतकरी व छोट्या दुर्बल उत्पादक घटकांच्या बनलेल्या समाजामध्ये धुगधुगी आणण्यासाठी परस्पर साहाय्याचा विचार पोचविता आला, सहकारी संघटन बांधता आले, त्याच्या आधारे व्यापारी व सावकार या शोषक वर्गाला तोंड देत शेतकरी कारागिरांमध्ये आर्थिक व सांघिक बळ निर्माण करता आले आणि त्यातून स्थानिक

कार्यकर्त्यांची कणखर फळी निर्माण झाली तर सामाजिक बदलातील ते महत्वाचे पाऊल ठरेल, असे त्यांचे मत होते. भारतीय परिस्थितीत त्याना साम्यवाद स्वप्नील वाटे.

## सहकार

एका बाजूला राष्ट्रीय पातळीवरील व विकेन्द्रित नियोजनासंदर्भातील संशोधन तर दुसऱ्या बाजूला भारतातील उत्पादन व्यवस्था लक्षात घेता येथील लाखो विखुरलेले व लहान शेतकरी, कारागीर, मच्छीमार, आदिवासी, आदी उत्पादकांनी एकत्रित येऊन सहकारी संस्था उभारल्याविना व्यापक नियोजनाचा फायदाही श्रमिक जनेपर्यंत पोचणार नाही, यादृष्टीने आवश्यक ती सहकारी यंत्रणा निर्माण व्हावी त्यासाठी पायाभूत असा अभ्यास म्हणजे रिझर्व बँकेद्वारा ग्रामीण सर्वेक्षण (1951-54)[19] हाती घेण्यात गाडगीळांचा पुढाकार होता. या सर्वेक्षणाच्या आधारे ग्रामीण पतव्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल घडविले गेले. त्याचा आराखडा तयार करण्यामध्ये गाडगीळांनी 1930 पासून केलेला शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रश्नांचा सखोल अभ्यास, व्यापारी - सावकारांच्या कचाट्यामुळे शेतीची कुंठितावस्था आणि त्यातून बाहेर पडण्याची गरज लक्षात घेऊन त्यांनी सुचविलेली त्रिस्तरीय सहकारी पतपुरवठा व्यवस्था, पीक-कर्जयोजना, खावटी आदीद्वारा सावकारीचे सर्वस्व कमी करणे शक्य झाले. सरकारी मदतीद्वारे घातलेला हा संस्थात्मक पाया यशस्वी होण्यासाठी शेतीमालाच्या किमती स्थिर राखणे आणि व्यापाऱ्यांचे वर्चस्व कमी करणे हेही तितकेच महत्त्वाचे हे गाडगीळानी आपल्या अभ्यासातून निर्विवादपणे दर्शविले आणि त्यासाठी प्रयत्नही केले. परंतु बड्या व्यापाऱ्यांच्या हितसंबंधांमुळे किंमत पातळी विनियमनाचे धोरण स्वीकारले गेले नाही. परिणामी शेतकऱ्यांचे उत्पन्न अनिश्चित राहून पीककर्ज परत करण्यात अडचणी आणि वाढती बुडित कर्जे अशा चक्रात सहकारी कर्जयंत्रणा सापडली.

## सहकारी लोकराज्य

सहकारी संघटन सर्व उत्पादक घटक तसेच जंगललोड, खाणी, वाहतूक, बांधकाम आणि उत्पादक-ग्राहकांच्या परस्पर हितपोषक सहकारी खरेदी - विक्री संस्था अशा सर्व लहान अर्थव्यवहारांमध्ये पोचवून सहकारी लोकराज्य निर्मितीची संकल्पना गाडगीळानी मांडली होती. त्यांच्या मते सहकारी संघटनांतून लहान व दुर्बल घटकांचे रक्षण होऊन त्यांचे सामर्थ्य वाढावे एवढेच मर्यादित उद्दिष्ट नाही. ते भांडवलशाही व्यवस्थेतील केवळ एक राखीव क्षेत्र व्हावे असे नाही तर सहकार हा एका नवीन व परावर्तित समाजाची रचना व पाया बनणे हे उद्दिष्ट होय. जिथे उत्पादन साधनांची मालकी मोठ्या प्रमाणावर विखुरलेली किंवा लहान प्रमाणावर काम करणाऱ्यांच्या सहकारी गटांच्या हाती ती सुपूर्त करणे शक्य आहे असे सर्व उद्योग-- व्यवसाय सहकारी व्यवस्थापनेत ठेवता येतील.[20] मोठ्या प्रमाणावरील प्रचंड व्यापाचे सर्व उद्योगधंदे यांचे नियंत्रण सरकारी कक्षेत राज्यसत्तेच्या हाती ठेवणे सहकार पसंत करील. विकेन्द्रीकरण आणि संयुक्त संघात्मक संरचना व स्वयंप्रेरित यत्न यावर सहकाराचा विशेष भर असल्याने साहजिकच राज्यसत्तेला फार महत्त्व देण्याकडे त्याचा कल नसतो. न्यायाच्या आणि सामाजिक कर्तव्याबाबतच्या कल्पनांना समाजाच्या आर्थिक संरचनेत समाविष्ट करून घेण्यावर सहकाराचा भर असतो आणि आर्थिक जीवन व व्यवहार यापासून नैतिक मूल्ये अलग करता येत नाहीत अशी त्याची धारणा असते.

भारतीय समज - अर्थसंरचनेत अतीव विषमता, हक्कदारी व एकाधिकार घर करून आहेत. जातीबद्ध समाजरचनेमुळे मोजक्या जमातींच्या हातात जमीन - व्यापार - उद्योग केन्द्रित असून विकास योजनेचे फायदे त्यानाच मिळत आहेत. भारतातील आजची स्पर्धात्मक अर्थव्यवहाराची वाटचाल ही नैतिक अगर सामाजिकदृष्ट्या बिलकुल स्पृहणीय नाही. आर्थिकदृष्ट्या तिची क्षमता संशयास्पद आहे.

राजकारणी पुढारी, सरकारी अधिकारी, बुद्धिवंत व व्यावसायिक यांच्या भ्रष्टतेस आधुनिक व्यापारउदीम वर्गात केन्द्रित झालेली सत्ता हीच बऱ्याच अंशी कारणीभूत आहे. विशेषकरून भारतीय नागर समाज या भांडवलदारांच्या प्रभावामुळे अतिशय भ्रष्ट झालेला आहे. [21]

स्पर्धाशील पुंजीवादाची तत्त्वप्रणाली आपण स्वीकारण्यास तसे कोणतेच सयुक्तिक कारण दिसत नाही. स्पर्धाशील समाजव्यवस्था असली तरच तांत्रिक प्रगती करता येते अगर आर्थिक कार्यदक्षता वाढते असे मानण्याचे कारण नाही. विशेषत: जेथे साधनसंपत्ती व विस्तारसंधी मर्यादित आहेत आणि जो समाज विषमता व विभिन्नता यामुळे परस्पराबद्दल संशयग्रस्त आहे अशा समाजात स्पर्धाशील मनोवृत्तीला उत्तेजन देणे अतोनात धोक्याचे असते. भारतासारख्या समाजाचा सर्वसमावेशक विकास घडवून आणावयाचा तर परस्परांच्या हितसंबंधाची जपणूक व परस्पर सहकार्यावर सतत भर, इतरांचे हित डावलून स्वार्थ साधू पहाणाऱ्यांना कडक शासन हे सर्व केल्यासच तो साधू शकेल. भारताच्या आजच्या राजकीय व आर्थिक परिस्थितीत स्पर्धेच्या तत्त्वाचा व प्रवृत्तीचा पूर्णतया त्याग करून सहकाराचे अधिष्ठान मान्य केले पाहिजे. सहकार निव्वळ आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतो असे नव्हे तर राजकीय लोकशाही व संघराज्याच्या ध्येयवादास सहकार पोषक होतो.

### विकेन्द्रित आर्थिक विकास

आपला देश कृषीप्रधान असल्याने सर्वांगीण विकास खेड्याखेड्यांत विखुरलेल्या लाखो श्रमिकांपर्यंत पोचवावयाचा तर सहकारी संघटनांच्या पायावर विकेन्द्रित योजनांद्वाराच आर्थिक विकास साधणे शक्य आहे. विकास म्हणजे सर्वसामान्यांच्या गरजांसाठी स्थानिक निसर्गसाधने, मनुष्यबळ व इतर साधनसंपत्ती यांचा एकत्रित विचार करून सर्वांच्या सहकार्याने सर्वांगीण विकास (शेती व औद्योगिक उत्पादनवाढ, मनुष्यबळ, रोजगार वाढ, शिक्षण वाढ, इत्यादी). स्थानिक जीवनाचे पुररुत्थान हा स्थानिक विकासाचा आत्मा आहे. विकेन्द्रित लोकशासन व नियोजन यावर लोकशाहीचे व आर्थिक विकासाचे यश अवलंबून आहे. भारतामध्ये गरीब व दुर्बल शेतकरी व इतर गरीब श्रमिकांची संख्या मोठी असल्याने येथील प्रश्नांचा खास संदर्भ लक्षात घेऊन सहकाराच्या मान्यवर तत्त्वांना मुरड घालून सरकारने सहकारी चळवळीला भांडवलाची मदत व कायद्याने संरक्षण दिले पाहिजे, शेतीमालाची खरेदी-विक्री यात सहकारी संस्थांना एकाधिकार स्थान दिले पाहिजे, प्रशिक्षणाची तरतूद केली पाहिजे अशी गाडगीळांची भूमिका होती. सहकारी संघटनांचे जाळे विकेन्द्रित नियोजनाच्या अमलबजावणीस समुचित होईल. भारतामध्ये सामाजिक न्याय व आर्थिक विकास साधावयाचा असेल तर सहकार व जबाबदार सरकार याला पर्याय नाही अशी गाडगीळांची सैद्धान्तिक भूमिका होती.

गाडगीळानी आर्थिक विकासावरची तात्त्विक मांडणी मुख्यत: भारतीय संदर्भात विकसित केलेली असली तरी हे विश्लेषण पूर्ववासाहतिक अन्य देशांनाही लागू होण्यासारखे होते. 1951 साली यूनोने नेमलेल्या अप्रगत देशांच्या विकासासाठी दिशा दर्शविणाऱ्या तज्ज्ञ समितीच्या अहवालामध्ये त्यांच्या सखोल चिंतनाचे आणि चतुरस्त्र अभ्यासाचे प्रतिबिंब दिसते.

हिंदुस्थानातील व्यापारी व उद्योजक जाती व जमाती, त्यांची पारंपरिक व्यापार नीती, नवीन परिस्थितीशी त्यानी कसे जुळवून घेतले, नवीन कोणत्या गटांनी उद्योग व व्यापार क्षेत्रात प्रवेश केला या ऐतिहासिक उत्क्रान्तीचा आणि बदललेल्या संस्थात्मक संघटना व व्यवहार यांचे विविध पैलू यावरील संशोधन प्रकल्प त्यानी 1951 साली हाती घेतला. या संशोधनास भारतातील उद्योगीकरण व आर्थिक विकास या संदर्भात कळीचे महत्त्व होते. प्रत्येक प्रदेशातील व्यापारी जाती-जमातींचा उदय, विकास व वैशिष्ट्ये, भांडवलसंचय, त्यांचे सामाजिक स्थान आणि स्वतंत्र

भारतात त्यांचा आर्थिक विस्तार, राजकीय - आर्थिक धोरणांवरील त्यांची पकड व सत्ताविस्तार याचा सखोल अभ्यास तत्कालीन राजकीय परिस्थिती, शेती, नागरीकरण व उद्योगीकरण याबाबतच्या पार्श्वभूमीवर करण्याची त्यांची योजना होती. प्रत्यक्षात मात्र नियोजन, सहकार, विकेन्द्रीकरण आदी विषयक संशोधन आणि प्रत्यक्ष सहभाग यामध्ये गुंतल्याने गाडगीळांना या प्रकल्पासाठी निवांत वेळ काढणे शक्य झाले नाही. प्रारंभीच्या (1750 पर्यंत) कालखंडाबाबतचा अभ्यास प्रत्यक्ष प्रसिद्ध झाला. [22] पुढील कालखंडासाठी बरेच साहित्य गोळा केले. काही प्रकरणांचे कच्चे मसुदे तयार झाले. पण तो प्रकल्प पुढे जाऊ शकला नाही. संशोधक गाडगीळांची तो प्रकल्प पुरा करण्याची उत्कट इच्छा होती. 1971 साली नियोजन आयोगाच्या जबाबदारीतून बाहेर पडल्यावर ते काम पुढे नेण्याची त्यांची योजना होती. परंतु 3 मे, 1971 रोजी दिल्लीहून परतीच्या प्रवासात दिल्ली - मुंबई आगगाडी प्रवासात ह्रदयविकाराने त्यांचे आकस्मिक निधन झाल्याने ते संशोधन अपुरेच राहिले.

## संशोधन पद्धती

आज आपणास भारतामध्ये समाजशास्त्रीय संशोधनाचे संमिश्र चित्र दिसते. यामध्ये एका बाजूला वस्तुस्थितीला सोडून अवास्तव अशी गृहिते धरावयाची (उदाहरणार्थ, निखळ स्पर्धा) आणि त्याआधारे प्रारुपे बनवून विशिष्ट हितसंबंधी धोरणांना समर्थन द्यावयाचे (जागतिकीकरण, खाजगीकरण, इत्यादी). किंवा माहितीचे ढिगारे गोळा करावयाचे परंतु शास्त्रीय संशोधन पद्धतीच्या अभावी आकडेवारीच्या जंजाळात गुरफटून अर्थपूर्ण निष्कर्ष काढण्यास असमर्थ ठरून सर्वेक्षण फोल ठरावयाचे असे संशोधन बऱ्याच प्रमाणात चालते. अशा परिस्थितीमध्ये गाडगीळांच्या संशोधन पद्धतीचे आकलन महत्त्वाचे वाटते. ऐतिहासिक दृष्टीतून पूर्वानुभव व सामाजिक - आर्थिक बदलांच्या प्रक्रियेतील क्रिया - प्रतिक्रिया व विविध घटकांचे अन्योन्य संबंध यांचे विश्लेषण आणि प्रचलित वास्तवाच्या शास्त्रीय पद्धतीने आखलेल्या सर्वेक्षणाद्वारा सखोल अभ्यास यांच्या एकसंधीकरणातून निघालेल्या सैद्धान्तिक निष्कर्षांआधारे धोरणाची व कृती कार्यक्रमाची आखणी, त्याची प्रायोगिक चाचपणी करून त्यातील मर्यादा लक्षात घेऊन त्यात सुधारणा घडवून व्यापक प्रमाणावर नवीन धोरणाचा अवलंब अशा पद्धतशीर टप्प्याने धोरणात्मक समाजशास्त्राचे संशोधन पुढे गेले पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता. समाजशास्त्राच्या तरुण संशोधकांनी गाडगीळांकडून सम्यक् ऐतिहासिक दृष्टी, शास्त्रीय संशोधन पद्धती, सामाजिक अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची तयारी आणि अन्त्योदयाबाबत तळमळ उचलली तर ते भरीव कार्य करू शकतील.

## संदर्भ टीपा

1 Brahme, Sulabha (ed). (1981). *Writings and Speeches of Prof. D. R. Gadgil on Economic and Political Problems*, pp. 153-63.

2 टंकलिखित इंग्रजी भाषण (1936).

3 गोखले अर्थशास्त्र संस्थेने 1937 पासून रा. रा. काळे स्मृती व्याख्यानमालेतील 60 व्याख्याने छापलेली आहेत.

4 *The Industrial Evolution of India in Recent Times* हा प्रबंध ऑक्स्फर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने 1924 साली प्रसिद्ध केला. पुढील आवृत्ती 1929, 1933, 1942, 1971. मराठीमध्ये *हिंदुस्थानचा आर्थिक इतिहास इ. स. 1850 - 1930* लोकशिक्षण लघुग्रंथमालेने 1932 मध्ये प्रसिद्ध केला. त्याचे पुनर्मुद्रण *ध. रा. गाडगीळ लेखसंग्रह, खंड 1,* संपादक सुलभा ब्रह्मे, 1973 यामध्ये केलेले आहे. पृष्ठे 79-137.

5 *The Survey of the Marketing of Fruit in Poona* (Jointly with V. R. Gadgil) (1933); *पुणे जिल्ह्यातील फळांची पैदास व विक्री* 1936).

6 *A Survey of Farm Business in Wai Taluka* (Jointly with V.R.Gadgil)(1940).

7 *Economic Effects of Irrigation : Report of a survey of Direct and Indirect Benefits of the Godavari and Pravara Canals*, (1948).

8 *A Survey of Motor Bus - transportation in Six Districts of the Bombay Presidency* (jointly with L. G. Gogate), (1935) *महाराष्ट्रातील मोटार वाहतूक* (1936).

9 *Poona - A Socio - Economic Survey, Part I Economic*,(1945); *Part II* (1952).

10 Sovani, N.V., D. P. Apte, R.G. Pendse (1956),*Poona - A Resurvey.*

11 Brahme, Sulabha and Prakash Gole, (1967), *Deluge in Poona : Aftermath and Rehabilitation;* पानशेत प्रलय (1968).

12 *War and Indian Economic Policy* (jointly with N.V. Sovani) (1943).

13 *The Salaries of Public Officials in India* (1931).

14 *Writings and Speeches*, उपरोक्त, पृष्ठे 153-63.

15 तत्रैव, पृ. 165.

16 *Federating India*, (1945), *The Federal Problem in India*, (1947).

17 *Some Observations on the Draft Constitution*, (1948).

18 *Economic Policy and Development* ( A collection of writings) (1995); *Planning and Economic Policy in India* (1962).

19 *All India Rural Credit Survey, Report of the Committee of Direction*, Bombay (1954).

20 *सहकारी लोकराज्य*, (1967) पृ. 75.

21 तत्रैव, पृष्ठे 80-81.

22 *Writings and Speeches*, उपरोक्त, पृष्ठे 311-70.

(**टीप** : 2,4 व 19 सोडून सर्व प्रकाशनें गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे.)

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**प्रकाशन पाचवे व सहावे**

**मूल्य व वितरण (भाग 1 आणि 2)**

**लेखक : ग. प्र. पिंपरकर**

**बी.ए. आणि एम.ए. च्या अभ्यासक्रमासाठी उपयुक्त ग्रंथ**

या ग्रंथाचे भाग 1 आणि 2 स्वतंत्रपणे आता विद्यार्थी व अध्यापकांना पुनर्मुद्रित स्वरुपात उपलब्ध झाले आहेत. प्रत्येक भागाची किंमत रु. 200 आहे. पाच वा अधिक प्रती घेणाऱ्यांना विशेष सूट मिळेल. पुस्तकाच्या प्रतींसाठी वितरकांकडे मागणी करावी. कार्यवाहांकडेही मिळेल.

**वितरक : अनमोल प्रकाशन, अप्पा बळवंत चौक, पुणे 411 002**

**आ. गो. पुजारी**

**कार्यवाह - खजिनदार**

# गाडगीळ आणि गोखले अर्थशास्त्र संस्था

लतिका अरगडे *
संजीवनी मुळ्ये *

धनंजयराव गाडगीळ

- एक हाडाचे शिक्षक
- एक व्यासंगी बुद्धिवंत
- एक कृतिशील संशोधक
- सहकारी चळवळीचे प्रणेते
- नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष
- शैक्षणिक क्षेत्रात मोलाची भर टाकणारे शिक्षणयोगी
- सामाजिक बांधिलकी असलेले विचारवंत
- एक बद्धिवादी अभ्यासक
- समानतेचे तत्त्व आयुष्यभर आचरणारे एक उत्तुंग व्यक्तिमत्व
- संशोधनातून समाजाला विकासाची दिशा दाखवणारे

धनंजयराव गाडगीळांची अशी कितीतरी रूपे आहेत आणि त्या प्रत्येक रूपात त्यांची विद्वत्ता आणि नैतिक मूल्ये प्रतिबिंबित झाली आहेत. गाडगीळांच्या बरोबर काम केलेले किंवा त्यांच्याकडे शिकलेले अनेक लोक त्यांच्याबद्दल भरभरून लिहिताहेत. या पार्श्वभूमीवर आमचा हा लेख काहीसा वेगळा आहे. पहिली गोष्ट म्हणजे आम्ही दोघींनीही गाडगीळांना पाहिलेले नाही, कारण आम्ही संस्थेत 1968 मध्ये आलो तेव्हा ते दिल्लीला नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष म्हणून गेलेले होते. दुसरी गोष्ट म्हणजे, त्यांचे कार्य, संशोधन व

* गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे.

अध्यापन इत्यादींवर बोलावे अशी आमची पात्रताही नाही. परंतु गेली तीसाहूनही अधिक वर्षे गोखले अर्थशास्त्र संस्थेत घालविल्यामुळे अर्थातच संस्थेचे अंतर्बाह्य स्वरूप आम्ही अगदी जवळून पाहिलेले आहे. या संस्थेच्या विकासात परिवर्तित झालेले गाडगीळांचे विचार आम्ही इथे मांडण्याचा प्रयत्न करणार आहोत. ही संस्था उभी करण्यामागे त्यांचे उद्देश काय होते, त्यासाठी त्यांची कार्यपद्धती काय होती ? संस्थेची मूळ उद्दिष्टे पुढील कालात सफल झाली किंवा काय ? पुण्यासारख्या एका त्या काळी लहान असलेल्या शहरात सुरू केलेली आणि अवघ्या 30-35 वर्षांच्या कालात आंतरराष्ट्रीय पातळीवरही पोचलेली संस्था कशी वाढली, गाडगीळांची कोणती तत्त्वे या संस्थेच्या उभारणीत दिसून आली हे सर्व मांडण्याची आमची कल्पना आहे. थोडक्यात या लेखाचा मुख्य उद्देश असा की 'अर्थसंवाद' च्या वाचकांना, विशेषकरून तरूण वाचकांना, धनंजराव गाडगीळ 'संस्थाचालकाच्या रूपात' कळावेत आणि त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे चांगल्या तत्त्वांची बैठक असली आणि निष्ठेने काम करण्याची वृत्ती असली तर बदलत्या काळातही संस्था चांगल्या उभ्या राहू शकतात आणि चांगले काम करून दाखवू शकतात याचे उदाहरण म्हणून गोखले अर्थशास्त्र संस्थेकडे त्यांनी पाहावे.

## संस्थेविषयी थोडेसे

अर्थशास्त्रातील अध्यापन व संशोधन करणाऱ्या संस्थांमध्ये गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे ही सर्वात जुनी संस्था आहे. ही संस्था 1930 मध्ये स्थापन झाली. भारत सेवक समाज विश्वस्त आहे. 1949 पर्यंत ती मुंबई विद्यापीठाशी जोडली होती. 1949 मध्ये पुणे विद्यापीठ स्थापन झाल्यावर अर्थातच ती पुणे विद्यापीठाशी संलग्न संस्थांपैकी एक बनली. भारतीय अर्थव्यवस्थेसंबंधित अगदी मूलभूत असे संशोधन संस्थेने अगदी सुरुवातीपासून केलेले आहे. शेतीसंबंधीच्या संशोधनात मुख्यत्वे शेती व्यवस्थापनासंबंधी सर्वेक्षण (farm business and management surveys), सिंचनाचे अर्थशास्त्र (economics of irrigation), पाणलोट विकाससंबंधी अध्ययन (studies on watershed development), ग्रामीण पतपुरवठा सर्वेक्षण (All - India rural Credit Survey), पीक विमा योजना (crop insurance), भारतातील दारिद्र्य (poverty in India), ग्रामीण क्षेत्रातील वीजपुरवठा (rural electrification), रोजगार हमी योजना (Employment Guarantee Scheme), जमिनीवरील मालकीसंबंधीच्या नोंदींची तपासणी (record of land rights), सामाजिक प्रकल्पांमधील गुंतवणुकीच्या लाभांचे विश्लेषण (study of cost bnefits of a social investment project), अशा अतिशय महत्वाच्या विषयांवर येथे संशोधन झालेले आहे. याबरोबरच येथील लोकसंख्या संशोधन विभागातही बरेच महत्वाचे असे संशोधन झालेले आहे. या क्षेत्रातील सर्वेक्षण प्रकल्प हे भारतातील पहिल्यावहिल्या सर्वेक्षणांमध्ये गणले जातात. लोकसंख्याशास्त्रीय आकडेवारी इतरत्र उपलब्ध नसताना केलेल्या या सर्वेक्षणांचे महत्त्व वेगळे सांगावयाला नको. कुटुंब नियोजन कार्यक्रम सुरू झाल्यानंतर त्यातल्या प्रत्येक टप्प्यावरच्या प्रगतीचे मूल्यांकन या विभागाने केलेले आहे आणि त्याविषयीची निरीक्षणे सरकारदरबारी पोचती केलेली आहेत. देशातील 22 लोकसंख्या संशोधन केन्द्रांमध्ये गोखले अर्थशास्त्र संस्थेतील केन्द्र वाखाणले गेले आहे. याव्यतिरिक्त नियोजन आयोगाच्या अनुदानावर चालणारे एक संशोधन केन्द्रही संस्थेत आहे. या केन्द्रातर्फेही अतिशय मूलभूत अशा प्रकारचे संशोधन केले गेले आहे आणि अजूनही केले जात आहे. रिझर्व्ह बँक, फोर्ड फौंडेशन व विद्यापीठ अनुदान मंडळ अशा इतर संस्थांकडून मिळालेल्या अनुदानाच्या साह्याने आणखीही खूप बहुमोल असे काम संस्थेत चालते.

सुरुवातीच्या काळातील संस्थेचे शेतीसंबंधीचे संशोधन लक्षात घेऊन केन्द्रीय कृषी मंत्रालयाने 1954 मध्ये कृषी संशोधनाचे केन्द्र संस्थेत स्थापण्यास

अनुदान दिले. 1962 मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने कृषी अर्थशास्त्रातील प्रगत अध्ययनाचे केन्द्र म्हणून संस्थेला मान्यता दिली तर दोन वर्षांनी या केन्द्राची व्याप्ती वाढवून संस्थेला अर्थशास्त्रातील प्रगत अध्ययनाचे केन्द्र म्हणून मान्यता मिळाली. आरोग्य मंत्रालयाने 1964 मध्ये लोकसंख्या संशोधन केन्द्र स्थापण्यास अनुदान दिले. याच दरम्यान संस्थेत नियोजनासंबंधी संशोधन सुरू झाले होते. त्यात मुख्यत्वेकरून निविष्टी - उद्‌विष्टी तंत्राच्या (input-output technique) संदर्भातील संशोधन होते. या संशोधनप्रणालीचे प्रणेते लिऑंटिफ हे मार्गदर्शनासाठी संस्थेत आले होते. या संशोधनाचे महत्त्व ओळखून नियोजन आयोगाने 1971 सालापासून संस्थेत 'Centre for Research in Planning and Development' सुरू केले. देशातील चार केन्द्रांपैकी हे एक आहे हे अभिमानास्पद आहे. 1977 मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आर्थिक साह्याच्या आधारावर पूर्व युरोपीय अर्थव्यवस्थांचा अभ्यास करण्यासाठी एक विभाग सुरू करण्यात आला. 1993 मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशीवरून सरकारने संस्थेस अभिमत विद्यापीठाचा दर्जा दिला.

संस्थेने केलेले बहुमोल संशोधन फक्त निबंधात/प्रबंधातच न राहता त्यांचा प्रत्यक्ष उपयोग धोरणे ठरविण्यातही झाला आहे. 1933 मध्ये केलेल्या वाईच्या शेती व्यवसायाच्या सर्वेक्षणावर आधारलेली पद्धती राष्ट्रीय उत्पन्न समितीने राष्ट्रीय पातळीवर उत्पन्नाच्या अंदाजासाठी वापरली. आणखी एक विशेष उल्लेखनीय अध्ययन म्हणजे हिराकूड धरणाचे अर्थशास्त्र. सिंचनाच्या क्षेत्रातील अनेक अध्ययनांचा पाया हे अध्ययन ठरले. याच दरम्यान राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणासाठी (NSS) प्रश्नावली तयार करणे, सर्वेक्षणाचा आराखडा, विश्लेषण, इत्यादी क्षेत्रांत संस्थेने भरीव योगदान केले. शेतीसंबंधी व लोकसंख्याशास्त्रीय सर्वेक्षणाची पद्धती ठरवून देण्याचे मूलभूत काम संस्थेने केले. संस्थेतील प्राध्यापक वि.म. दांडेकर व नीळकंठ रथ यांचे *भारतातील दारिद्र्य* हे पुस्तक प्रसिद्ध झाले. या पुस्तकावरून बरेच वाद झालेले असले तरीही दारिद्र्य रेषा निश्चित करण्यासाठी या अध्ययनाचा उपयोग झाला. महाराष्ट्रातील रोजगार हमी योजना याच अध्ययनावर आधारलेली होती. दारिद्र्य मोजणारे हे पहिलेच अध्ययन होते.

नियोजनासंबंधी संशोधन करणाऱ्या केन्द्राने 1963 मध्ये 238 क्षेत्रांचा (sectors) निविष्टी - उद्‌विष्टी तक्ता (Input-Output Table) बनविला. या तक्त्यांचा उपयोग उद्योग क्षेत्रात तसेच नियोजन क्षेत्रातील व्यक्तींनी केलेला आहे.

समष्टीय अर्थशास्त्रामध्ये (macro-economics) महत्त्वाचे अध्ययन संस्थेत झालेले आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील तेजीमंदीच्या चक्रासंबंधीचे विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच रिझर्व्ह बँकेच्या सहकार्याने सरकारी रोख्यांच्या चलनवाढ प्रेरित किंमतीसंबंधीही संशोधन केले गेले आहे.

## धनंजयराव गाडगीळ – व्यक्ती आणि कार्य

आधी उल्लेख केल्याप्रमाणे आम्ही दोघींनीही धनंजयराव गाडगीळ यांना पाहिलेले नाही. त्यामुळे त्यांच्या लिखाणातून आणि त्यांच्याबद्दल त्यांच्या सहकाऱ्यांनी, विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या लेखातून त्यांचे जे काही व्यक्तिविशेष दिसले ते इथे मांडीत आहोत. नी.वि. सोवनी, क्षितिमोहन मुकर्जी, वि.म. दांडेकर, पद्माकर दुभाषी, इत्यादी अर्थतज्ज्ञांनी गाडगीळांना अगदी जवळून पाहिले होते आणि विशेष म्हणजे गाडगीळांनीच घालून दिलेल्या धड्यानुसार त्यांचेच अतिशय परखडपणे विश्लेषणही त्यांनी केलेले आहे. या लिखाणातून त्यांनी गाडगीळांच्या व्यक्तिविशेषांचे फार सुंदर चित्रण केलेले आहे. या सर्व मंडळींमध्ये सोवनी हे त्यांना अधिक जवळचे होते. त्यांनी लिहिलेल्या पुस्तकातील *(माझे गुरु धनंजयराव गाडगीळ)* काही परिच्छेद आम्ही जागोजागी उद्धृत केलेले आहेत.

धनंजयराव गाडगीळांच्या व्यक्तिविशेषांबद्दल

लिहिताना आपल्याला त्यातल्या दोन अंगांचा विचार करावा लागेल. एक त्यांची बुद्धिमता आणि दुसरे म्हणजे त्यांची मूल्ये.

## प्रज्ञावंत/बुद्धिमंत

गाडगीळांबद्दलचे विपुल लिखाण डोळ्याखालून घातल्यानंतर आम्हाला असे लक्षात आले की, फक्त त्यांचे चाहतेच नव्हे तर त्यांच्याशी मतभेद असलेल्या बुद्धिवंतांचेही त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेबद्दल दुमत नव्हते. एतद्देशीय नव्हे तर परदेशी अर्थतज्ज्ञांनीसुद्धा गाडगीळ यांच्या बुद्धिमत्तेबद्दल प्रशंसोद्‌गार काढले आहेत. नी.वि. सोवनी यानी गाडगीळ व सायमन कुझनेट्स या दोन मोठ्या अर्थशास्त्रज्ञांकडे काम केलेले आहे. 1951 मध्ये सोवनी प्राध्यापक कुझनेट्स यांच्याकडे काम करण्याठी गेले असताना कुझनेटस् म्हणाले होते,''तू गाडगीळांच्या हाताखाली काम केले आहेस हे तुझे फार मोठे सुदैव आहे. मी हिंदुस्थानच्या माझ्या भेटीत तिथल्या बहुतेक अर्थशास्त्रज्ञांना भेटलो. पण गाडगीळांच्या दर्जाचा बुद्धिमान माणूस मला भेटला नाही. फक्त त्यांच्याशी चर्चा करतानाच मला माझे, शब्द, माझी विधाने जपून व तोलून करावी लागत. इतर कोणाशीही बोलताना अगर चर्चा करताना मला तसे करण्याची गरज वाटली नाही.''

आपल्या असामान्य बुद्धिबद्दल गाडगीळांना पूर्ण जाणीव होती. स्वतःच्या कर्तृत्वाबद्दलही त्याना जबरदस्त आत्मविश्वास होता. या दोन्ही गुणवैशिष्ट्यांतून त्यांचे मन एका करारी व कठोर बुद्धिमंताचे बनले होते. सोवनींच्या म्हणण्यानुसार, ''त्यात भावनेला व भावनांना फार थोडा वाव होता. गरिबी, दारिद्र्य, विषमता, वगैरे गोष्टी समाजास घातक आहेत. त्या उपलब्ध ज्ञानाच्या जोरावर हद्दपार करता येतील. यादृष्टीने, त्या ज्या आहेत त्या बुद्धीचा वापर न केल्यामुळे आहेत. राज्यकर्ते, अग्रणी लोक जर बुद्धीची कास धरतील, आपला मूर्खपणा सोडतील तर हे सर्व नाहीसे करता येईल. सत्ताधीश मंडळी तसे करीत नाहीत, करू देत नाहीत याचा त्याना संताप होता. पण तो संताप बौद्धिक होता. गरिबांची अतीव करुणा, अनुकंपा यातून तो निर्माण झालेला नव्हता. या प्रश्नाची निकड त्यांच्या बुद्धीला जाणवत होती. भावनावेगामुळे ते त्याच्याकडे आकर्षित झालेले नव्हते.''

त्यांच्या प्रखर बुद्धिमत्तेचा प्रत्यय त्यांच्या प्रबंधातून प्रतीत झालेला आहे. वयाच्या विशीतच लिहिलेल्या या प्रबंधात, मुकर्जींनी म्हटल्याप्रमाणे, ''ज्या पद्धतीने त्यानी साऱ्या विषयाची हाताळणी केली आहे, त्यात काटेकोरपणावर व नेमकेपणावर भर दिसतो. गाडगीळांच्या ठिकाणी सूक्ष्म समाजशास्त्रीय समज असल्याचा प्रत्ययही या प्रबंधात मिळतो.''

गाडगीळांच्या असामान्य कर्तृत्वाला खरे तर अनेक क्षेत्रात वाव मिळाला असता परंतु ती संधी सोडून ते इथे राहिले हे खरे तर संस्थेचे भाग्य ! याबद्दल वि.म. दांडेकर आपल्या लेखात म्हणतात, "Professor Gadgil has thus behind him an uninterrupted academic career of over 40 years. I think this is unmatched by any other Indian academician who had comparable opportunities of deserting the academic life and joining either administration or politics. In the course of his long career, he naturally filled all the positions normal to an academician economist of this rank."

## गाडगीळांची मूल्ये

या लेखात आम्ही गाडगीळांकडे संस्थाचालक या दृष्टिकोनातून बघण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या संदर्भात त्यांची मूल्ये समजून घेणे महत्त्वाचे ठरते. कारण त्यांच्या संचालकांच्या मूल्यांनुसार संस्थेची जडणघडण, तिथले संशोधनाचे विषय आणि त्या विषयांची उकल करण्याची पद्धती बव्हंशी ठरते. आम्ही वाचलेल्या लेखांमधून आम्हाला त्यांची कर्तव्यनिष्ठा, कर्मयोग आणि निर्भिडता स्वच्छपणे दिसून आलेली आहे. सोवनी म्हणतात, ''गाडगीळांच्या विद्यार्थीदशेत जी विशिष्ट

तत्त्वे त्यांच्या पुढील सर्व विचारसरणीस, लिखाणास, विचारास पायाभूत म्हणून गाडगीळांनी स्वीकारली ती म्हणजे - गीतारहस्यातील कर्मयोगाचे तत्त्वज्ञान, आर्थिक व सामाजिक समता, मानवी व्यवहारांच्या नियंत्रणाची शक्यता व आवश्यकता आणि समाजधुरीणांनी हे अमलात आणण्याची शक्यता व आवश्यकता. ही तत्त्वे त्यानी विचारपूर्वक आपल्या मनात व वैचारिक भूमीत रुजविली होती. त्यांच्यावर त्यांची निष्ठा होती आणि ती शाश्वत होती. ही तत्त्वे सातत्याने त्यांच्या सर्वच लिखाणात दिसतात.'' गाडगीळानी ज्या दोन क्षेत्रांत अतिशय मोलाची कामगिरी केली ती क्षेत्रे म्हणजे सहकार व नियोजन. समतेचे तत्त्व हे तर सहकाराचे मूळच आहे. नियोजनातही विकेंद्रीकरणाचा पुरस्कार करून त्यानी हेच तत्त्व जतन केले. कृतिशील संशोधनातून त्यांची अमाप कर्तव्यनिष्ठाही दिसून येते.

काही वेळा आपल्याला अशीही बुद्धिमान मंडळी भेटतात की ज्यांच्यापाशी बुद्धी असते, कामावर निष्ठा असते, तरीही कामातून आलेले निष्कर्ष निर्भीडपणे मांडण्याची त्यांच्यात हिंमत नसते आणि त्यामुळे ते काम समाजाच्या दृष्टीने फारसे फलदायी न ठरण्याची शक्यता असते. गाडगीळांमध्ये मात्र हा स्पष्टवक्तेपणा पुरेपूर होता. सोवनी म्हणतात,'' त्यानी आपली मते निर्भयपणे व निर्भीडपणे जन्मभर मांडली. 'सामाजिक शास्त्रांच्या विद्यार्थ्याने लोकप्रियतेबद्दल उदासीन असले पाहिजे' हे मार्शल यांचे विधान गाडगीळाना संपूर्णपणे मान्य होते. कोणत्याही प्रश्नाचा सर्व बाजूंनी नि:पक्षपातीपणाने व शास्त्रीय दृष्टीने अभ्यास करावा, त्यासंबंधी आपली मते बनवावी व योग्य तो सल्ला द्यावा. तो सल्ला लोकाना पसंत पडो अगर न पडो, त्याच्याशी आपल्याला काय कर्तव्य नाही असेच संशोधक-पंडिताने मानले पाहिजे, असे गाडगीळ मानीत. त्यांचे स्वतःचे वर्तन या निकषावर घासून पाहिले तर संपूर्णपणे कसोटीस उतरेल. त्यानी आपली मते लोकांना आवडतील किंवा नाही याची कधीही पर्वा केली नाही.'' सोवनी आणखी म्हणतात, ''गाडगीळांच्याच परंपरेतील काहीशा परखड अशा या समीक्षेतूनसुद्धा गाडगीळांचे भव्य व्यक्तिमत्त्व आणि मोठेपण प्रकर्षाने उठून दिसते. त्यानी अंगीकारलेले देशसेवेचे जाज्वल्य व्रत, वैयक्तिक स्वार्थाचा संपूर्ण अभाव, स्वसुखाविषयी कमालीची निरभिलाषा, दृष्ट लागावी असे बुद्धिवैभव, अकलंकित चारित्र्य हे सर्व या समीक्षेत तावूनसुलाखून अधिकच तेजाने उसळून येतात. यापैकी एक एक गुणसुद्धा हल्ली इतका दुर्मिळ झाला आहे की त्या सर्वांचा समुच्चय असलेले गाडगीळांच्यासारखे पुरुष किती विरळा असतात याची तीव्र जाणीव होते व मन आदराने भरून येते.''

## गाडगीळांचे कार्य

पुनरुक्तीचा धोका पत्करून आम्ही इथे गाडगीळांच्या कार्याचा संक्षिप्त आढावा देत आहोत.

10 एप्रिल, 1901 ला जन्मलेले धनंजयराव गाडगीळ सोळाव्या वर्षी सिनिअर केंब्रिजची परीक्षा पास झाले आणि केंब्रिज विद्यापीठात पुढचे शिक्षण घेण्यासाठी गेले. ते 1923 मध्ये एम.लिट. ची पदवी घेऊन भारतात परत आले. त्या वेळेच्या त्यांच्या प्रबंधाचा विषय होता 'Industrial Evolution in India'. भारतात आल्यावर वयाच्या अवघ्या चोवीसाव्या वर्षी त्यानी सुरतच्या एका कॉलेजचे प्राचार्यपद भूषविले आणि 1930 मध्ये गोखले अर्थशास्त्र संस्थेचे संचालक म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. तेव्हापासून 1966 मध्ये निवृत्त होईपर्यंत त्यानी ही धुरा सांभाळली. संस्था मोठी करण्यात तर त्यांचा सिंहाचा वाटा होताच पण संस्थेबाहेरही त्यानी बहुमोल कार्य केले. अनेक क्षेत्रांत त्यानी पायाभूत पद्धतीचे काम केले. ग्रामीण अर्थव्यवस्था, विशेषकरून शेतीचे अर्थशास्त्र, नियोजन, सहकार, औद्योगिक विकास, दळणवळण, शिक्षण, नागरीकरण आणि इतर अनेक विषयांत त्यानी संशोधन केलेले आहे. त्यांच्या कितीतरी संशोधनाच्या आधारावर सरकारी धोरणांचे आराखडे रचले गेलेले आहेत. ते अनेक समित्यांचे पदाधिकारी होते.

## संशोधक गाडगीळ

वर नमूद केलेल्या बहुविध कार्यक्षेत्रांपैकी दोन क्षेत्रे त्यांच्या अतिशय जिव्हाळ्याची होती, नियोजन आणि सहकार. नियोजन मंडळाच्या उपाध्यक्षपदापर्यंतची त्यांची झेप त्यांच्या योगदानाबद्दल सर्व काही सांगून जाते. त्यांच्या कार्यकालात त्यानी केलेल्या कामातील एक लक्षणीय भाग म्हणजे 'गाडगीळ सूत्र.' 1969 पर्यंत केन्द्राकडून राज्यांना मिळणाऱ्या अनुदानासाठी वस्तुनिष्ठ असे निकष नव्हते. गाडगीळानीं त्यासाठी एक सूत्र सुबद्ध केले. त्यासाठी पाच प्रकारचे निकष वापरलें गेले. लोकसंख्या, मागासलेपण, सिंचन व विद्युत प्रकल्प, राज्याची करवसुली आणि राज्याच्या विशेष समस्या हे ते निकष होत. आयुष्यभराच्या अभ्यासावर आधारलेले आणि त्यांच्या तल्लख बुद्धिमत्तेतून तावूनसुलाखून निघालेले हे एक सूत्र 'गाडगीळ सूत्र' म्हणून ओळखले जाते आणि ते उचितच आहे. सहकाराच्या क्षेत्रातील त्यांचे काम इतके जबरदस्त होते की, त्याना 'असमर्थाला समर्थ करणारे सहकारी चळवळीचे प्रणेते' असे म्हटले जाते. सहकारी समाजवादाला नियोजनाची जोड देऊन भारतीय अर्थरचना मुळापासून मजबूत करता येईल. अशी त्यांची धारणा होती. एकात्मिक ग्रामीण विकासासाठी सहकार क्षेत्राला आधुनिक व्यावसायिक व्यवस्थापनाची जोड देण्याची गरज असल्याचे त्यानी ओळखले होते. म्हणूनच स्वतंत्र प्रशिक्षणाची यंत्रणा उभी करण्याच्या कार्यक्रमासही त्यानी तितक्याच तातडीने हातभार लावला. (गो.स. कामत, *सकाळ* रविवार, 9 एप्रिल, 2000). याचीच परिणती म्हणजे 'वैकुंठलाल मेहता इन्स्टिट्यूट ऑफ को-ऑपरेटिव्ह मॅनेजमेंट' या संस्थेची स्थापना. त्यांचे इतरही क्षेत्रातील काम अतिशय भरीव स्वरुपाचे आणि उल्लेखनीय आहे. त्याचा निर्देश लेखाच्या पुढील भागात येणार आहे.

## शिक्षक गाडगीळ

संशोधनाच्या बरोबरीने त्यानी ज्ञानदानाचेही काम अखंडपणे केलेले आहे. अर्थशास्त्राचे पदव्युत्तर शिक्षण व पीएच.डी. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन या दोन्ही क्षेत्रांतील त्यांची कामगिरी उत्तुंग स्वरुपाची होती. त्यांच्या विद्यार्थ्यांकडून त्यांच्या अध्यापन शैलीबद्दल तोंड भरून प्रशंसाच ऐकावयाला मिळते. वेळ सांभाळण्यातील शिस्त, ओघवती वाणी आणि विषयातील सखोल ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्याची आकर्षक शैली यामुळे विद्यार्थी त्यांच्या शिकविण्याने भारावून जात.

त्यांचे एक विद्यार्थी पद्माकर दुभाषी म्हणतात, ''गाडगीळांच्या मागे अनेक व्याप होते. संशोधन प्रकल्प होतेच. परंतु सहकारासारख्या क्षेत्रात त्यांचा सक्रीय सहभाग असे. परंतु असे असतानासुद्धा आपल्या ज्ञानदानाच्या क्षेत्रात त्यानी यत्किंचितही हयगय केली नाही. क्लास चुकविला, असे कधीही झाले नाही. त्यांच्या व्याख्यानात सातत्य असे. त्यांची व्याख्याने म्हणजे एका माळेत गुंफलेले मणी. त्यामुळे विषयाचे साकल्याने व परिपूर्णतेने आकलन होत असे.'' (पद्माकर दुभाषी, 'माझे गुरू', *सकाळ,* रविवार, 9 एप्रिल, 2000). गाडगीळांचे दुसरे विद्यार्थी नी.वि. सोवनी म्हणतात, ''संशोधनातील पद्धती, त्यातील बारकावे, परिश्रमाचे महत्व, पूर्वग्रहदूषित दृष्टी कशी टाळावी, कोणतेही विधान कसे पारखून घ्यावे, वगैरे गोष्टी शिकविण्यात गाडगीळ आदर्श शिक्षक होते. स्वतःच लिहिलेल्या मजकुराकडे दोषैक (त्यांचा आवडता शब्द) पद्धतीने आपणच कसे पाहण्यास शिकले पाहिजे हे ते स्वतःच्या लिखाणाचे उदाहरण देऊन विद्यार्थ्यांना दाखवीत. अशा प्रसंगी त्यांच्याशी चर्चा करणे हा एक मोठा बौद्धिक आनंद असे.''

## गाडगीळानी संस्थेला काय दिले ?

त्या काळी (1920-30) केंब्रिजमध्ये शिक्षण घेतलेल्या हुशार विद्यार्थ्यांपैकी गाडगीळ एक होते. परदेशी शिक्षण घेऊन आय.सी.एस. सारखी परीक्षा देऊन ब्रिटिश सरकारात लठ्ठ पगाराची नोकरी घेणे हा त्या काळच्या हुशार विद्यार्थ्यांमध्ये प्रचलित प्रघात होता. परंतु अशा वेळी हे सर्व मोह टाळून हिंदुस्थानात

परत येणे आणि त्यातही फारसे आकर्षण नसलेल्या शिक्षणासारख्या क्षेत्रात पाऊल टाकणे हेच थोडेसे आगळे होते. पैशाचा, प्रसिद्धीचा, वैयक्तिक उत्कर्षाचा मोह सहज पडेल अशा त्या पंचविशीत गाडगीळानी अतिशय वेगळा मार्ग आचरण्याचे धाडस दाखविले होते. यातून त्यांची निःस्वार्थी वृत्ती ठळकपणे दिसून येते.

भारतात आल्यानंतर त्यानी पहिली पाच वर्षे सुरतेच्या कॉलेजचे प्राचार्य म्हणून काम केले. इतक्या लहान वयात प्राचार्यपदाची धुरा सांभाळण्यात त्यांची असामान्य बुद्धिमत्ता आणि क्षमता दिसून येते. परंतु गाडगीळ तेवढ्यावर थांबले नाहीत. 1930 साली रा.रा. काळे यानी दिलेल्या एक लाख रुपयांच्या निधीतून गोखले अर्थशास्त्र संस्थेची स्थापना झाली. गाडगीळ तिचे पहिले संचालक झाले. ते भारत सेवक समाज संस्थेचे विश्वस्त होते. संस्थेच्या नावापासूनच समाजाभिमुख काम करण्याचे बाळकडू संस्थेला मिळाले. ज्या कालात सामाजिक संशोधनाची जाणही कित्येकांना नव्हती अशा कालात त्या विषयातील एक संस्था उभी करणे हेच एक अतिशय धडाडीचे आणि त्याचबरोबर त्यांचा प्रबळ आत्मविश्वास आणि जिद्द दाखविणारे कार्य होते.

संस्था सुरू करण्यामागे देशातील राजकीय व आर्थिक प्रश्नांचा अभ्यास करणे हे मुख्य उद्दिष्ट होते. समाजाच्या विकासासाठी प्रेरित होऊन काम करण्याच्या या पद्धतीतून गाडगीळांची सामाजिक बांधिलकी प्रकर्षाने दिसून येते. हे काम त्या वेळेची परिस्थिती पाहता तितकेसे सोपे नव्हते. एकीकडे परदेशी मिळालेले सैद्धान्तिक शिक्षण आणि दुसऱ्या बाजूला आपल्या देशातील अगदी मूलभूत समस्यांची उकल करण्याची महत्त्वाकांक्षा या दोन्हींची सांगड घालणे अतिशय कठीण होते. यात गाडगीळ यशस्वी झाले ते त्यांच्या प्रखर सामाजिक जाणीवेमुळे आणि अंगी असलेल्या असामान्य प्रतिभेमुळे.

कुठलीही संस्था जेव्हा उभी राहते तेव्हा संस्थेच्या संस्थापकाची मूल्ये त्या संस्थेच्या घडणीत परिवर्तित होतात. गाडगीळांची एकूण कारकीर्द पाहता आम्हाला असे वाटते की, स्वातंत्र्य, समता यासारखी लोकशाही मूल्ये त्यानी जतन केली तसेच आपल्या कामावरची निष्ठा व कृतिशीलता या त्यांच्या गुणांमुळे संस्थेच्या कार्यपद्धतीत व संशोधनाची दिशा ठरविण्यास बहुमोल मदत झाली.

आज संस्था स्थापन झाल्यानंतर 70 वर्षांनंतरही संस्थेची कार्यपद्धती व संशोधनाचे स्वरूप हे गाडगीळांच्या पद्धतीशी बरेच मिळतेजुळते आहे. सध्याच्या परिस्थितीत सामाजिक संशोधन करणाऱ्या संस्थांचे पेव फुटले आहे. बदलत्या कालानुसार नव्याने स्थापन झालेल्या संस्थांची कार्यपद्धती वेगळी असणे अपेक्षितच आहे. तसेच संशोधनाच्या दिशेसंबंधी बोलावयाचे झाले तर बरेचदा असे आढळून येते की, संशोधन अमुक एका विषयात करणे आवश्यक आहे म्हणून नव्हे तर त्या संशोधनासाठी अनुदान उपलब्ध आहे म्हणून केले जाते. अशा पार्श्वभूमीवर समाजाभिमुख विषयात काम करण्यातील सातत्य आणि लोकशाही तत्त्वे जपणारी कार्यपद्धती या दोन्ही गोष्टी जपणे अतिशय कठीण आहे. परंतु संस्थेने या दोन्ही गोष्टी प्रामाणिकपणे सांभाळल्या आहेत. अर्थात एवढ्या कालावधीत काहीतरी बदल होणे अपरिहार्य आहे. परंतु मूळ स्वरूप कायम ठेवण्यात संस्था यशस्वी झाली आहे हे नक्की.

## संस्थेची कार्यपद्धती

1993 साली संस्थेला अभिमत विद्यापीठाचा दर्जा मिळाला त्यामुळे संस्थेच्या कार्यपद्धतीत थोडे बदल करण्यात आले आहेत. परंतु संस्थेची बव्हंशी कार्यपद्धती तीच ठेवण्याचे शक्यतोपरी प्रयत्न करण्यात आले आहेत. काही मोजक्या उदाहरणातून संस्थेची कार्यपद्धती कोणत्या तत्त्वांवर उभारलेली होती ते कळून येईल.

(1) संस्थेतील शिक्षक/संशोधक व शिक्षकेतर कर्मचारी याच्या सेवाशर्तीत फरक नाही. उदाहरणार्थ, कामाची

वेळ आणि सुट्ट्या सारख्या आहेत. तसेच निवृत्तीचे वयही एकच आहे. संस्थेला अभिमत विद्यापीठाचा दर्जा मिळाल्यानंतरही संस्थेने यात फरक केलेला नाही. इतर विद्यापीठातील शिक्षकांना सुटी असताना (उदाहरणार्थ, उन्हाळ्यातील सुटी) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कामावर जावे लागते. या संस्थेत असे होत नाही. कामाचे दिवस दोघांनाही सारखेच असतात.

(2) संस्थेतील उपस्थिती नोंदविणाऱ्या हजेरीपटावर सगळ्यांना सही करावी लागते आणि त्यासाठी शिक्षक/इतर कर्मचारी आणि संचालकसुद्धा रांगेत उभे राहतात. नुकतेच एकदा *India Today* च्या एका अंकात Infosys चे संचालक जेवणाच्या रांगेत ताट घेऊन उभे असल्याचा फोटो छापला होता. सध्याच्या वातावरणात, अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणाऱ्या लोकांच्या जगात संपादकाला हा फोटो छापणे आवश्यक वाटले असेल आणि ते उचितच आहे. परंतु तो फोटो पाहिल्यावर आम्हाला मात्र खचितच वाटले की, आमच्याकडे तर गेल्या 70 वर्षांपासून हीच प्रथा चालू आहे आणि आजपर्यंतच्या कोणाही संचालकाने तीत्र मोडता घातलेला नाही.

(3) संस्थेच्या संशोधनाच्या, विशेषतः सर्वेक्षणावर आधारलेल्या प्रकल्पांच्या संदर्भात कामाची पद्धती अशी होती. समजा काही गावांचे सर्वेक्षण केलेले असेल तर एका गावाचे सर्व काम एका माणसाने करावयाचे. म्हणजे असे की प्रश्नावल्यांचे coding, punching, sorting आणि tabulation एकाच माणसाने करावयाचे. यात उद्देश असा की, कामाच्या सर्व पातळ्यांवरचे काम आपल्याला समजते आणि कामामध्ये कप्पे करावयाचे नाहीत हा त्यातला महत्त्वाचा भाग. कोणतेही काम कमी लेखू नये ही एक अतिशय चांगली प्रथा त्यांनी घालून दिली. यातून माणसांमधील दऱ्या बुजावयाला मदत होते. आणखी एक म्हणजे, सहकाऱ्यांच्या कामातील अडचणी कळू शकतात, तसेच आकडेवारीतील खाचाखोचाही कळू शकतात.

(4) या संस्थेत एक अतिशय चांगली प्रथा प्रचलित आहे. काम करावयाचे पूर्ण स्वातंत्र्य येथील प्रत्येक संशोधकाला आहे. कोणत्या विषयात काम करावयाचे, कामाची पद्धती याविषयी संचालक चर्चा करतात, परंतु आपला निर्णय ते संशोधकांवर लादत नाहीत. अर्थात संस्थेच्या मूळ उद्देशाशी संबंधित असेच काम प्रकल्पांतून होते किंवा नाही याचे भान मात्र राखले जाते. ठराविक साचेबंद विषयांच्या पलीकडच्या क्षेत्रात काम करण्यासही प्रोत्साहन दिले जाते. येथे विशेष नोंद अशी करावीशी वाटते की, इथे येणारे संचालक भिन्न व्यक्तिमत्वाचे असूनही कोणीच या प्रथेला धक्का पोहोचविलेला नाही.

## संशोधनाची दिशा व संशोधनाची प्रणाली

आधी नमूद केल्याप्रमाणे संस्थेने कायमच समाजाभिमुख विषयांमधील संशोधनाला प्राधान्य दिलेले आहे आणि या संशोधनाचा उपयोग प्रत्यक्ष धोरणे ठरविण्यातही झालेला आहे. संस्थेच्या संशोधनाला दिशा देण्याचे बहुमोल काम अर्थातच गाडगीळ यांनी केलेले आहे.

### संशोधनाची दिशा

ज्या वेळी गाडगीळ केंब्रिज सोडून भारतात परतले त्याचवेळी अप्रत्यक्षरीत्या त्यांच्या कार्याची दिशा ठरली होती. आल्यानंतर थोड्याच कालावधीनंतर त्यांनी संस्थेची स्थापना केली. संस्थेच्या उद्दिष्टांनुसार संस्थेने समाजातील प्रचलित राजकीय/आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे अपेक्षित होते. अर्थात राजकीय विषयांत गाडगीळ यांनी काही काम जरूर केलेले आहे, परंतु पुढे संस्थेने फक्त सामाजिक - आर्थिक विषयांतच संशोधन केले आहे.

कोणत्याही संस्थेच्या कार्याची (विशेषकरून संशोधन) सुरुवात तीन घटकांवर अवलंबून असते. गोखले अर्थशास्त्र संस्थेविषयी बोलावयाचे झाल्यास, त्या काळच्या संशोधनाची निकड असलेल्या सामाजिक-आर्थिक समस्या, संस्थेच्या संचालकांची

(गाडगीळ) विचारप्रणाली आणि आर्थिक पाठबळ यांचा एकत्रित परिणाम या स्वरुपात आपल्याला संशोधनाच्या स्वरूपाकडे पाहावे लागेल.

संस्थेच्या पहिल्या दशकातील (1930-40) कामात तीन महत्वाचे प्रकल्प मोडतात. ते खालीलप्रमाणे

A Survey of Fruit Marketing (1933)

A Survey of Motor Bus Transportation (1935)

A Survey of Farm Business (1940)

याशिवाय Current economic thought, economic history, salaries of public officials, gold standard, population problem, tenancy laws, swadeshi, वगैरे विषयांवरही संशोधन झाले. सुरुवातीच्या कालात संस्थेचा सरासरी खर्च दरवर्षाला 11,000 रुपये इतका होता. वर निर्देश केलेले पहिले दोन प्रकल्प संस्थेने स्वत:च्या बळावर केले. या अध्ययनांचे महत्त्व लक्षात घेऊन Indian Council of Agricultural Research या संस्थेने 1936 साली शेती व्यवस्थापन (farm management) या क्षेत्रात संशोधन करण्यासाठी अनुदान दिले. तसेच पुणे, सोलापूर व कोल्हापूर महानगरपालिकांनी सामाजिक-आर्थिक सर्वेक्षणासाठी अनुदाने देऊ केली. या सर्व प्रकल्पांद्वारे संस्थेने त्या त्या क्षेत्रातील पायाभूत (मूलभूत) काम केले म्हणून त्यांचे महत्त्व अधिक आहे. विशेषकरून वर निर्देशित केलेला तिसरा प्रकल्प (A Survey of Farm Business, Wai) शेतीतील परिव्यय लेखांकनाच्या (cost accounting) दृष्टीने अतिशय महत्त्वाचा ठरला. या प्रकल्पात गोळा केलेल्या माहितीची व्याप्ती विस्तृत होती आणि त्यातील बारकावे अतिशय काळजीपूर्वकपणे टिपण्याची आवश्यकता होती. त्यामुळे त्या काळी या प्रकल्पाला 17,000 रुपये खर्च आला. त्यातील फक्त 7000 रुपये अनुदान मिळाले होते आणि 10,000 रुपये संस्थेने पदरमोड करून घातले होते. यावरून विषयाचे महत्त्व, संशोधनातील गुणवत्ता राखण्यासाठी करावे लागणारे प्रयत्न, आर्थिक झळ सोसण्याची वृत्ती या सर्व गुणांचा पडताळा आपल्याला मिळतो. या प्रकल्पासाठी विकसित केलेली लेखांकनाची (accounting) पद्धती ज्या प्रमाणात पुढील कालात अनेक वर्षे वापरली गेली त्यावरून गाडगीळांना या संशोधनाविषयीचे [illegible] खूप अगोदरच ध्यानात आले होते हे कळून येते.

संस्थेच्या संशोधन प्रकल्पांशिवाय गाडगीळांच्या मार्गदर्शनाखाली काही प्रबंधही लिहिले गेले. त्या प्रबंधांचे विषयही त्या काळी संस्थेत चाललेल्या प्रकल्पांशी निगडित असत. उदाहरणार्थ, आर. जी. काकडे (संस्थेच्या संचालक मंडळाचे सध्याचे अध्यक्ष) यांचा प्रबंध सोलापुरातील विणकर जमातीसंबंधी होता.

या पहिल्या दशकातील आपल्या कामाचे मूल्यांकन गाडगीळांनी स्वत: असे केले आहे. ''या काळात प्रसिद्धी व कीर्ती या सर्वांपासून पराङ्मुख होऊन मी जो अज्ञातवास पत्करला तो पत्करला नसता तर पुढची संधीही मला मिळाली नसती. या काळात संशोधन, लिखाण वगैरे शिवाय मी काहीही करू शकलो नाही. माझ्या लिखाणामुळे संशोधनात काय भर पडली असेल ती किंवा *Servant of India* पत्राचा दर्जा काय वाढला असेल तो. एवढेच माझे श्रेय होते. कार्य करण्याची संधी मला या अज्ञातवासानंतरच मिळाली'' (नी.वि. सोवनी, पृ. 27). संशोधनात आणि त्यासाठी नवीन पद्धती विकसित करण्यात व्यग्र असूनही ते प्रचलित समस्यांवर *लोकशिक्षण* आणि *Servant of India* मध्ये लिहून सामान्य वाचकांशी संवाद साधत असत. यातूनही त्यांची समाजासाठी काही ना काही रुपाने काम करण्याची वृत्ती दिसते.

यापुढचे दशक म्हणजे 1941-50. या दशकात संस्था संशोधनाच्या क्षेत्रात थोडी ओळखली जाऊ लागली तसेच वेगवेगळ्या [illegible]साठी अनुदाने मिळावयाला सुरुवात झाली. बदलत्या कालाबरोबर विषयांची व्याप्ती वाढली. नवीन विषय आले आणि

गाडगीळांच्या मार्गदर्शनाखाली संस्था अधिक जोमाने काम करू लागली. या कालात शेती/उद्योग क्षेत्रातील कामगार, सिंचन, प्राथमिक शिक्षण व त्यातील गळती, पीक विमा योजना, पशू (cattle) विमा योजना, भावफुगवटा, इत्यादी विविध विषयांवर संशोधन झाले. शेती विषयातील या कालातील संशोधन विशेष उल्लेख करण्यासारखे आहे. संस्थेच्या सुरुवातीच्या कालात शेतीच्या तेव्हाच्या परिस्थितीचे विश्लेषण नवीन पद्धतीने केलेले होते. या दशकात शेतीच्या विकासाबद्दलचे विचार मांडले गेले. सिंचनाद्वारे उत्पादन वाढ व शेतकऱ्यांचा विकास आणि पीक, पशू विमा योजना याद्वारे त्याला आपत्कालीन संरक्षण या अतिशय महत्त्वाच्या विषयांमध्ये संस्थेने योगदान केले. विशेष म्हणजे पीक विमा योजना, जी आजही राबविली जाते, तिची मूळ संकल्पना 50 वर्षांपूर्वी या संस्थेने विकसित केली याचा संस्थेला अभिमान वाटतो.

मुंबई इलाखा सरकारने संस्थेला सिंचनाचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम मोजण्यासाठी/आजमावण्यासाठी सर्वेक्षण करण्यासाठी अनुदान दिले होते. हे सर्वेक्षण नगर जिल्ह्यात केले गेले. हे काम विश्लेषणप्रणालीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे होते. या कामाच्या आधारावरच हिराकूड धरण प्रकल्पाचे सामाजिकदृष्ट्या होणारे लाभ व परिव्यय तपासण्याच्या दृष्टीने संस्थेला एक मोठा संशोधन प्रकल्प देण्यात आला. नियोजन आयोगाच्या संशोधन कार्यक्रम समितीने असे अनेक संशोधन प्रकल्प करून घेतले पण त्याचा मूलाधार हिराकूड संशोधन प्रकल्प होता हे लक्षात घेतले पाहिजे.

थोडेसे विषयांतर करून आम्ही एका गोष्टीचा इथे उल्लेख करू इच्छितो. त्या वेळच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी टी.ए. ॲन्ड्र्यूज यांनी गाडगीळांनी हा प्रकल्प (सिंचन प्रकल्प, अहमदनगर) स्वत: संशोधनासाठी घ्यावा असे सुचविले होते. त्यावर गाडगीळांनी लिहिले होते, " While it will not be possible for me to undertake the proposed enquiry personally, I could undertake it on behalf of the Institute." व्यक्तीपेक्षा संस्था मोठी असते हे मानणाऱ्यातील गाडगीळ असल्याने त्यांनी हा अतिशय महत्त्वाचा प्रकल्प संस्थेकरवी करून घेतला. अजूनही येथे स्वत:च्या नावापेक्षा संस्थेचे नाव मोठे व्हावयाला पाहिजे या वृत्तीनेच लोक काम करीत असतात. अशी वृत्ती रुजविण्यामागे असलेले गाडगीळांचे योगदान आपल्याला विसरता येणार नाही.

शेती संदर्भातील विविध विषयांतील संस्थेचे काम पाहून दोराबजी टाटा ट्रस्टने सलग दहा वर्षांकरिता शेतीच्या अर्थशास्त्रातील संशोधनासाठी भरीव देणगी दिली.

गाडगीळांनी याचबरोबर संयुक्त महाराष्ट्र समितीचेही काम केले. घटना लिहिण्यातही त्यांचा सहभाग होता. संस्था मात्र त्यांच्या या कामात सहभागी नव्हती. 1951-61 हे दशक गाडगीळांच्या व संस्थेच्या दृष्टीने आणखी नव्यानव्या विषयांत भरीव कामगिरी करणारे ठरले. याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे संस्थेस आर्थिक स्थैर्य लाभले. मुंबई सरकार, भारत सरकार, टाटा ट्रस्ट, रॉकफेलर फाँडेशन या सर्वांनी देणग्या देऊन संस्थेला भरघोस मदत केली. याबरोबरच वि.म. दांडेकर, कुमुदिनी दांडेकर, नी.वि. सोवनी, माथूर, नीलकंठ रथ यांच्यासारख्या तज्ज्ञ मंडळींचा सहभाग वाढला आणि संस्थेच्या कामात बहुमोल भर पडली. साहजिकच आर्थिक स्थैर्य व कर्तबगार सहकारी असल्यामुळे संस्था गाडगीळांच्या मार्गदर्शनाखाली परंतु काहीशा स्वतंत्रपणे काम करू लागली आणि गाडगीळ नवी क्षितिजे पार करावयाला सज्ज झाले. या दशकात देशात मोठ्या प्रमाणावर सर्वेक्षणाद्वारा माहिती गोळा करण्याची सुरुवात होत होती. संस्थेने गेल्या वीस वर्षांत केलेल्या विविध तऱ्हेच्या सर्वेक्षणाच्या अनुभवामुळे संस्था देशपातळीवरच्या सर्वेक्षणांशी प्रत्यक्षरीत्या निगडित झाली होती. यातील दोन मोठी सर्वेक्षणे म्हणजे भारत सरकारने घेतलेले राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने घेतलेले ग्रामीण पतपुरवठा

सर्वेक्षण. एन.एस.एस. च्या पाहिल्या फेरीत संस्था प्रत्यक्षपणे सहभागी झाली होती. एकूण नमुन्याच्या 1/3 भागात संस्थेने विकसित केलेल्या प्रश्नावलीचा वापर केला गेला. संस्थेच्या या कामातील सहभागाच्या आधारे सरकारने आपल्या सर्वेक्षण पद्धतीत योग्य तो बदल केला. रिझर्व्ह बँकेतर्फे घेण्यात आलेल्या ग्रामीण पतपुरवठा सर्वेक्षणाचे काम संस्थेने सात जिल्ह्यात केले.

लोकसंख्येसारख्या महत्त्वाच्या विषयातील संशोधनही संस्थेत याच दशकात जोरात सुरू झाले. 1949 मध्ये त्यासाठी एक केन्द्रही सुरू झाले होते. कुटुंब नियोजन कार्यक्रम नव्याने सुरू झालेल्या त्या कालात संस्थेने एक कृती-कार्यक्रम करून पुढाकार घेतला. 1953 साली संस्थेने कुटुंब नियोजन कार्यक्रमांतर्गत शस्त्रक्रियेचे एक शिबिरही आयोजित केले होते. देशातील पहिल्यावहिल्या शस्त्रक्रिया शिबिरांपैकी हे एक होते. पुढेही या केन्द्राने लोकसंख्या धोरणाशी संबंधित असे बरेच काम केले आणि ध्येयधोरणे ठरविण्यास साहाय्य केले.

याच दशकाच्या सुरुवातीपासूनच सहकार व नियोजन या दोन महत्वाच्या विषयांकडे गाडगीळांचे लक्ष वळले आणि त्यात पुढे जाऊन त्यांनी मोलाची कामगिरी बजाविली.

मागेही म्हटल्याप्रमाणे कालानुरूप जशा समस्या बदलत गेल्या तसे गाडगीळांचे व संस्थेचेही काम त्या त्या दिशेने वळू लागले. 1947 साली देश स्वतंत्र झाला, देशाच्या विकासाच्या दृष्टीने पंचवार्षिक योजनांची आखणी करण्यात आली आणि नियोजनासारख्या आव्हानात्मक विषयाकडे गाडगीळांचे लक्ष वेधले गेले. या संदर्भात त्यांचा नियोजनाबद्दलचा एक प्रातिनिधिक विचार त्यांच्या पुढील विधानावरून स्पष्ट होतो : "Recent history in India and other countries would thus indicate that the formulation and the execution of a plan of economic development is, at least as much a political and sociological problem as an economic one. The formulation of such a plan involves a minimum agreement among rulers regarding social and economic policy. Its execution requires a minimum of control over economic activity and a minimum of co-operation and understanding on the part of the public at larg. None of these conditions obtain in India today. Moreover, the very state of economic stability, which is the necessary starting point of any planning, is being found diffcult of attainment. In the circumstances, efforts of all thinking and sincere people must immediately turn in a large measure to bringing about the social and political pre-conditions required for planning." (N.V. Sovani, *Planning of Post-war Economic Development in India* या पुस्तकातील Foreword मधील उतारा.)

यावरून स्पष्ट होते की, गाडगीळांनी आर्थिक नियोजनाकडे फक्त आर्थिकदृष्ट्याच न पाहता सामाजिक परिस्थितीचेही महत्त्व जाणले होते. कोणत्याही समस्येचे विश्लेषण करताना झापडे न लावता तिच्या सर्व अंगांनी विचार करण्याची जी वृत्ती संशोधकाकडे असावी लागते तिचे हे मूर्तिमंत उदाहरण आहे. नियोजनाच्या क्षेत्रात सातत्याने काम केल्यानंतर गाडगीळांच्या कामाची दखल सरकारने घेतली नसती तरच नवल. 1959 साली दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या निमित्ताने नेमलेल्या अर्थशास्त्रज्ञांच्या गटाचे गाडगीळ उपाध्यक्ष झाले. यानंतर 1967 साली नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष म्हणून त्यांना नियुक्त करण्यात आले. 1930 साली लहान प्रमाणावर सुरू केलेल्या संस्थेपासून दिल्लीच्या नियोजन मंडळापर्यंतचा पल्ला गाठणे हे केवळ गाडगीळांच्या अलौकिक बुद्धिमत्तेमुळेच शक्य झाले. इतक्या असामान्य व्यक्तिमत्वाच्या प्राध्यापकाच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याचे भाग्य संस्थेच्या इतर संशोधकांना लाभले आणि संस्थाही प्रसिद्धी पावू लागली. संस्थादेखील शहरातून आंतरराष्ट्रीय पातळीवर जाऊन पोचली. गाडगीळांच्या जिव्हाळ्याचा आणखी एक विषय म्हणजे सहकार.

ग्रामीण क्षेत्रातील परिस्थिती अगदी सूक्ष्मपणे न्याहाळल्यानंतर गाडगीळांच्या मनात सहकाराची कल्पना रुजली असावी. तिचा पाठपुरावा दीर्घकाल केल्यानंतर या कल्पना मूर्त स्वरुपात पुढे येऊ लागल्या. ग्रामीण पतपुरवठा सर्वेक्षणाने त्यांना योग्य ती माहिती पुरविली आणि त्यांच्या कल्पनांना आधार मिळाला. या सर्वेक्षणात संस्थेने सहभाग घेतला आणि या क्षेत्रात संस्थेने पुढील कालात संशोधन चालू ठेवले.

## गाडगीळांची संशोधन पद्धती

गाडगीळानी जेव्हा संस्थेतून संशोधन करावयाला सुरुवात केली त्यावेळी मुख्यत्वे सैद्धान्तिक दृष्टिकोनातून काम होत असे. तसेच परदेशस्थ अर्थतज्ज्ञांचे सिद्धान्तच आपल्याही अर्थव्यवस्थेला लागू केले जात. श्री. व्यं. केतकर यानी त्यावेळी याला कडाडून विरोध केला होता. केतकरांच्या म्हणण्यानुसार ''हिंदुस्थानातील सामाजिक परिस्थिती इतकी निराळी आहे की तिच्या स्थितीचे आणि गतीचे नियम इतर समाजापेक्षा व अर्थातच प्रचलित अर्थशास्त्रात सांगितल्यापेक्षा सर्वस्वी निराळेच असणार. उदाहरणार्थ, आमची जातीव्यवस्था. जातीव्यवस्थेमुळे श्रमविभागाचे तत्त्व आमच्या समाजात अमलात येत नाही. कारण आर्थिक उत्पादनासाठी बुद्धी, श्रम व भांडवल ही एकत्र यावी लागतात. परंतु आमच्याकडे बुद्धी ब्राह्मणांजवळ, भांडवल गुजर-मारवाड्यांकडे व श्रम शूद्रांकडे अशी व्यवस्था आहे व त्यांचे एकत्र येणे जातीव्यवस्थेमुळे घडतच नाही. या व अशा प्रकारच्या अनेक सामाजिक बंधनांमुळे पाश्चात्य अर्थसिद्धान्त आमच्या समाजास कसे लागू होणार ? आमचे नियम निराळे व स्वतंत्रच असणार. म्हणूनच स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्राची उभारणी करण्याची आवश्यकता आहे व तसे झाल्याखेरीज आपणास फलदायी असे आर्थिक धोरणही आपल्याला ठरविता येणार नाही'' (नी.वि.सोवनी, *माझे गुरू धनंजयराव गाडगीळ*, पृ. 91). यावर प्रतिक्रिया म्हणून गाडगीळानी *विद्यासेवक* या मासिकात एक लेख लिहिला, यात ते लिहितात, ''स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्र उत्पन्न करण्याची बिलकुल जरूरी नाही.'' 1924 सालच्या गाडगीळांच्या या अननुभवी प्रतिक्रियेनंतर 18 वर्षांनी त्यानी या विषयाबद्दलचे आपले मत बदलले. 18 वर्षातल्या त्यांच्या संशोधनाचा हा परिपाक असावा. 1942 साली 'हिंदी अर्थशास्त्राचा पाया' या मथळ्याच्या *सह्याद्री* मध्ये प्रसिद्ध केलेल्या लेखात त्यानी आपली परिणत मते मांडली आहेत. ते म्हणतात, ''येथे एक गोष्ट प्रांजलपणे नमूद करणे आवश्यक आहे. प्रस्तुत लेखक जेव्हा सुमारे 18 वर्षांपूर्वी विलायती पदवी संपादून हिंदुस्थानास परत आला त्या वेळी त्याचे विचार भिन्न होते, त्यामुळे त्यानी (डॉ. केतकरांनी) ज्ञानकोशात स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्र स्थापण्याची आवश्यकता प्रतिपादिली असता तीस *विद्यासेवकात* आपला मराठीतील पहिला लेख लिहून त्याने कसून विरोध केला. आज मात्र त्याचे विचार स्वतःच्या जुन्या लेखापेक्षा डॉ. केतकरांशीच जास्त जुळते आहेत '' नी.वि. सोवनी, *माझे गुरू धनंजयराव गाडगीळ*, पृ. 94). वेगवेगळ्या क्षेत्रातील संशोधन व अभ्यास यातून त्यांच्या परिपक्व झालेल्या विचारामागे त्यानी स्वतः विकसित केलेली एक संशोधनप्रणाली होती. विकसनशील देशांतील अर्थव्यवस्था कशा आहेत, त्या समजून घेण्यासाठी आपल्याला कशा तऱ्हेची माहिती गोळा करावी लागेल, तिचे विश्लेषण कसे करावे याबद्दलची गाडगीळांची एक विशिष्ट प्रकारची पद्धती होती.

वि.म. दांडेकर गाडगीळांच्या संशोधन पद्धतीबद्दल म्हणतात, "If I may say so, Professor Gadgil is not a subject-specialist but a method-specialist, What distinguishes him from other social scientists is his method and approach to a problem. His method is marked by a rigorously logical framing of the issues, an objective assessment of the available evidence and a vigorous formulation of conclusions within a broad framework of social values and objectives' (*Making of the Man*, पृष्ठे, 2-3). गाडगीळानीच स्थापलेल्या या संस्थेतील संशोधनाची

पद्धती आजपर्यंत हीच आहे. आजही येथील संशोधन मुख्यत्वे आकडेवारीच्या विश्लेषणाच्या आधारावरच केलेले असते आणि त्यामुळेच त्यातून निघालेले निष्कर्ष सद्यपरिस्थितीचे स्वरूप स्पष्ट करणारे असतात.

गाडगीळांच्या संशोधन पद्धतीची दोन अंगे होती. कुठलाही सिद्धान्त आकडेवारीवर आधारलेला असला पाहिजे ही त्याची एक बाजू आणि त्यामुळेच सुरुवातीच्या कालात त्यानी अचूक माहिती गोळा करण्याकडे आपले लक्ष वळविले. त्यांच्या संशोधनाची दुसरी आणि नंतरची बाजू अशी की, गोळा केलेल्या अचूक माहितीचे विश्लेषण करून त्यातून अर्थपूर्ण निष्कर्ष काढणे. या त्यांच्या पद्धतीचे एक उत्तम उदाहरण म्हणजे वाई तालुक्यातील शेतकऱ्यांचे आर्थिक सर्वेक्षण. शेतीतील नक्त उत्पन्न आजमवण्यासाठी गाडगीळानी एका नवीन पद्धतीचा विकास केला. ही पद्धती Double Deflation Method म्हणून आजही ओळखली जाते आणि कितीतरी वर्षे ही पद्धती नक्त उत्पन्न काढण्यासाठी वापरली गेली. मुकर्जी म्हणतात, ''राष्ट्रीय उत्पन्नाचे नेमके मोजमाप करण्यासाठी समिती नेमावी या विचाराचा स्पर्शही झालेला नव्हता त्या दूरच्या भूतकाळात गाडगीळानी सर्वेक्षण केले होते आणि ही अत्यावश्यक प्रमाणके काढून ठेवली होती. गाडगीळांच्या बौद्धिक कामगिरीची ही जी एक बाजू तिचा आश्चर्यकारक प्रत्यय मला नंतरच्या वर्षांत पुनःपुन्हा येत राहिला'' (क्षितिमोहन मुकर्जी, 1972).

गोखले अर्थशास्त्र संस्थेने आज सत्तरी ओलांडली आहे आणि अमृतसिद्धीच्या वाटेवर आहे. सर्व संस्थांच्या वाट्याला येणारे चढउतार तिच्याही आयुष्यात येऊन गेले आहेत. परंतु भक्कम पाया असलेली इमारत जशी वाऱ्या-वादळाला तोंड देऊ शकते, तसे या संस्थेबद्दल म्हणता येईल. गाडगीळांसारखे अलौकिक व्यक्तिमत्व लाभणे आता दुरापास्त आहे. पण त्यानी घालून दिलेल्या तात्त्विक बैठकीच्या आधारावर आजही संस्था संशोधकार्यात अतिशय प्रामाणिकपणे काम करीत आहे आणि आपल्या अनुभवसिद्ध कार्याचा लाभ इतरांनाही देत आहे.

## संदर्भ सूची


1 काकडे, आर. जी. (1947), *A Socio-Economic Survey of Weaving Communities in Sholapur.*

2 कामत, अ. रा. (29 जून, 1974), 'D. R. Gadgil : The Last Phase,' *Economic and Political Weekly.*

3 कामत, गो. स. (2000), 'सहकारी चळवळीचे प्रणेते' *सकाळ,* 9 एप्रिल.

4 गाडगीळ,डी. आर.व गाडगीळ,व्ही.आर. (1933), *A Survey of the Marketing of Fruitin Poona,* गोखले अर्थशास्त्र संस्था, प्रकाशन 3.

5 गाडगीळ, ध. रा. व गोगटे, ल. वि. (1936), *महाराष्ट्रातील मोटार - वाहतूक,* गोखले राजकारण- अर्थशास्त्र संशोधन मंदिर, प्रकाशन2.

6 गाडगीळ, डी. आर. व गाडगीळ, व्ही. आर. (1940), *A Suvey of Farm Business in Wai Taluka,* गोखले अर्थशास्त्र संस्था, प्रकाशन 7.

7 गाडगीळ, ध. रा. (1948), *Economic Effects of Irrigation,* गोखले अर्थशास्त्र संस्था, प्रकाशन 17.

8 डांगे, श्री. अ. (1971), *Gadgil and the Economics of Indian Democracy,* Peoples' Publishing House.

9 दांडेकर, वि. म. (1967), *Dhananjay Ramchandra Gadgil : Making of the Man,* Gokhale Institute of Politics and Economics, Pune.

10 दुभाषी, पद्माकर, (2000), 'माझे गुरु,' *सकाळ,* 9 एप्रिल, 2000.

11 *Fifty Years of Gokhale Institute*

of Politics and Economics, Pune, Gokhale Institute of Politics and Economics, Pune.

12 मुकर्जी, क्षितीमोहन, (1972), 'प्राध्यापक धनंजय रामचंद्र गाडगीळ,' *समाज प्रबोधन पत्रिका*, मे - जून.

13 सोवनी, नी. वि. (1951), *Planning of Post - War Economic Development in India*, गोखले अर्थशास्त्र संस्था, प्रकाशन 22.

14 सोवनी, नी. वि. व रथ, नीळकंठ (1960), *Economics of a Multiple Purpose River Dam, Report of an Enquiry into the Economic Benefits of Hirakud Dam*, गोखले अर्थशास्त्र संस्था, प्रकाशन 38.

15 सोवनी, नी. वि. (1974), *माझे गुरु धनंजयराव गाडगीळ*, देशमुख आणि कंपनी.

16 Singh, R.P. (ed.) (1998), *Indian Universities Towards Nation Building*, University Grants Commission, New Delhi.

## मराठी अर्थशास्त्र परिषद

**आंतरराष्ट्रीय व्यापार – सिद्धान्त व धोरण (लेखक : भ.ग. बापट)**

एम. ए. अर्थशास्त्र अभ्यासक्रमांतर्गत आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र विषयासाठी उपयुक्त आणि दर्जेदार म्हणून प्रशंसा लाभलेला वरील ग्रंथ वाचकांना उपलब्ध झाला आहे.

किंमत रु. 160/- आणि सूट 10 टक्के. सूट वजा जाता रक्कम म. ऑ. ने / डिमांड ड्राफ्टने ('मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने आणि मंगळवेढा येथील बँक शाखेवर देय) कार्यवाहांकडे पाठवावी. ग्रंथ आमच्या खर्चाने रजिस्टर्ड बुक पोस्टाने पाठविला जाईल.

**पत्ता: डॉ. आ. गो. पुजारी, किल्ला भाग, मंगळवेढा (जि. सोलापूर) 413 305.**

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### अंक परत आल्यास

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांचा पत्ता बदललेला असेल त्या सदस्यांनी आपला बदललेला पत्ता कार्यवाहांना लेखी कळवावा. म्हणजे कार्यालयातील दप्तरात आवश्यक तो बदल करून घेऊन त्या पत्त्यावर पत्रव्यवहार / 'अर्थसंवाद' चे अंक पाठविले जातील. पत्ता बदलल्यामुळे अथवा अन्य कोणत्याही कारणाने 'अर्थसंवाद' चा अंक परत आल्यास त्यापुढील अंक पाठविण्याचे बंद केले जाते. सर्व आजीव सदस्यांनी कृपया याची नोंद घ्यावी.

**आ. गो. पुजारी**
**कार्यवाह – खजिनदार**

# गाडगीळांच्या सहकार - विषयक दृष्टिकोनामागे फलप्रामाण्यवाद प्रभावी होता काय ?

राम देशपांडे ✲

अनुवाद

रवीन्द्र दोशी ✲

विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या वर्षात विकासविषयक लिखाणात दोन परस्पर संघर्षात्मक रुपालोकांची (paradigm) व्यापक चर्चा चालू होती. एका बाजूला पाश्चिमात्य भांडवलशाही प्रारुप आणि दुसऱ्या बाजूला मार्क्सप्रणीत विचारसरणी असे ते द्वंद होते. त्या कालात ऑक्सफर्ड व केंब्रिज विद्यापीठातून शिकून बाहेर पडणाऱ्या व्यक्ती तसेच शिक्षणासाठी उपलब्ध असणारे साहित्य यांचा अर्थशास्त्राच्या अध्यापनावर प्रभाव होता. बऱ्याच वेळा सैद्धान्तिक अर्थशास्त्राच्या या मक्कांनी विकसनशील जगताच्या विचारधारेवर आणि त्यायोगे आर्थिक धोरणांवर आपला ठसा उमटविला होता. भारताच्या बाबतीत मात्र, न्यायमूर्ती रानड्यांपासून बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत विचारांची प्रक्रिया ही त्या व्यक्ती समाज जीवनाच्या ज्या परिस्थितीतून पुढे आल्या त्या परिस्थितीशी निगडित होती. न्यायमूर्ती रानडे आणि त्यांच्या समकालीनांच्या लिखाणामुळे ती सघन बनली. धनंजराव गाडगीळ या परंपरेतील होते. कोणत्याही आर्थिक समस्यांच्या विश्लेषणाच्या बाबतीतील त्यांचा दृष्टिकोन मौलिक (original) व मूलगामी होता, मग त्या कालातील आर्थिक परिभाषेचा दावा कोणताही असो. त्यामुळे जेव्हा ते सहकाराच्या अभ्यासाकडे वळले तेव्हा त्यांचे लेखन म्हणजे केवळ विद्वत्तेची कसरत न राहता कालाची गरज तसेच विशिष्ट हेतूच्या आकलनाने व बांधिलकीने भारलेले होते. याची सुरुवात साधारणत: 1946 मध्ये झाली. त्यावेळी गाडगीळ मुंबई राज्य सहकारी बँकेच्या संचालक मंडळाचे सदस्य झाले होते. वैकुंठलाल मेहता यांच्यासारखे दिग्गज हयात असताना, महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे अग्रदूत म्हणून गाडगीळांचा उल्लेख करता येणार नाही हे खचितच.

✲ प्राध्यापक व प्रमुख, कृषी विकास व ग्रामीण संक्रमण विभाग, इन्स्टिट्यूट फॉर सोशल अॅन्ड इकॉनॉमिक चेंज, बेंगलोर.

✲ प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद', कोल्हापूर.

भारतात निकोल्सन यानी 1904 चा सहकार कायदा संमत करून घेतला तरी स्वातंत्र्यापर्यंत सहकाराविषयी सरकारी धोरण अस्तित्वात नव्हते. सन 1950 चा सहकार कायदा हा देशातील सहकारी संस्थांचा आधार बनला. हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या विश्वसनीय सहकारी संस्था वगळता, देशात सहकारी चळवळ अशी फोफावलेली नव्हती, कारण सहकाराला सरकारी धोरणांचे पाठबळ नव्हते. या अनुषंगाने 1960 च्या सुरुवातीलाच गाडगीळांनी लिहिले आहे की, ''एकंदरीत संपूर्ण ग्रामीण जीवनाच्या संदर्भात सर्वच राज्यांत सहकारी चळवळ दुर्लक्षणीय स्वरुपाचीच राहिली आहे आणि कृषी, पतपुरवठा, पुरवठा व विक्री या अधिक आवश्यक बाबींसंदर्भात तर सहकारी चळवळीचा परिणामकारक सहभाग नगण्य होता'' (गाडगीळ, 1961, पृ. 32). स्वातंत्र्याची 50 वर्षे उलटून गेली तरी या परिस्थितीत फारसा फरक पडला नसल्याचेच आढळले.

स्वातंत्र्यापूर्वी, मुंबई राज्य सहकारी बँकेचे तेव्हाचे अध्यक्ष सर विठ्ठलदास ठाकरसी आणि सदस्य गोपाळ कृष्ण गोखले यानी सहकाराच्या प्रारंभीच्या विचारांना आकार दिला तर जी.के. देवधर यानी ग्रामीण सहकारी संस्थांचे जाळे उभे करण्यात पुढाकार घेतला. राज्य पुरस्कृत सहकारी चळवळीकडून सुरुवातीच्या कालात प्रोत्साहन मिळाले. तथापि, दक्षिणेकडील बंडाळीचा (Deccan Riots) इतिहास ध्यानात घेऊन आणि अनौपचारिक पैसा बाजारातील अव्याहत शोषणामुळे सहकारी चळवळीचे विशेष लक्ष पतपुरवठ्याच्या उपलब्धतेवर केन्द्रित झालेले होते. सहकारी संस्थांशी गाडगीळांचा पहिला संपर्क आला तो ते मुंबई इलाखा सहकारी बँकेचे सदस्य झाल्यानंतर आणि पुढे ग्रामीण पतपुरवठा सर्वेक्षणासाठीच्या निर्देशक समितीचे सदस्य राहिल्यामुळे. महाराष्ट्रातील सहकारीकरणाच्या संदर्भात गाडगीळांच्या योगदानाचे दोन अपरिहार्य पैलू आढळतात. बौद्धिक पातळीवर, गाडगीळांनी महाराष्ट्रातील सहकारी संस्थांच्या विकासाची संरचना आणि आराखडा पुरविला. त्याना सहकारी संस्थांच्या सर्व उपयोजित अंगांची कल्पना होती आणि म्हणून त्यानी त्यावर वादविवाद घडवून आणण्यात खूप रस घेतला. याचबरोबर, एक सक्रिय सहकारी कार्यकर्ता म्हणूनही त्यानी आपले योगदान दिले. सहकारी चळवळीला उत्पादकांच्या सहकाराकडे वळविण्यात त्यांचे योगदान विशेष महत्त्वाचे होते. या प्रक्रियेत प्रवरानगर सहकारी साखर कारखान्याला वैचारिक अधिष्ठान देण्याचे महत्त्वपूर्ण काम त्यानी केले. हा साखर कारखाना म्हणजे महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीची मुहूर्तमेढ होती. आर्थिक विकासाचा अत्यावश्यक घटक म्हणून ते सहकाराकडे वळले. याला कारण म्हणजे तत्कालीन मुंबई राज्यातील सहकारातील वैकुंठभाई मेहता, द.गो. कर्वे, सर विठ्ठलदास ठाकरसी, देवधर यासारख्या अग्रगण्य व्यक्तींशी गाडगीळांचा संपर्क खूप जवळचा होता. गाडगीळांच्या पंजाब विद्यापीठातील ब्रिजनारायण स्मृती व्याख्यानांतून व्यक्त झालेल्या विचारांमधून देशातील सहकारीकरणाच्या बाबतीतील त्यांच्या त्रिमिती परिप्रेक्ष्याची स्पष्ट जाणीव होते. पहिले, त्यानी सहकाराचे सैद्धान्तिक अधिष्ठान काय आहे याचे विश्लेषण केले आहे, कारण त्यांच्यादृष्टीने तो विकासाचा पर्यायी मार्ग होता. ते म्हणतात, '' समाजवादासोबत विशेष वैचारिक व इतर संबंधित बाबी येतात. सहकाराच्या बाबतीत असे नसते आणि 'सहकारी लोकराज्य' या शब्दप्रयोगाच्या लक्ष्यार्थाची (implications) निश्चित स्वरुपातील चर्चा क्वचितच घडते. समाजवादाचे लक्ष प्रामुख्याने उत्पादनसाधनांच्या मालकीबद्दलच्या समस्या आणि उत्पन्नाचे वाटप याकडे असते. या दोन्हीही संदर्भात, गरीब आणि नियोजनबद्ध विकासाचा प्रयत्न करणारी न्यूनविकसित राष्ट्रे यांची स्थिती खूपच अवघड जाणवते '' (गाडगीळ, 1961, पृ. 1). यावरून स्पष्ट होते की, गाडगीळांनी मध्यम मार्गाचा पुरस्कार केला होता ; यामध्ये एका बाजूला समाजवादी तत्त्वे होती तर दुसऱ्या बाजूला पाश्चिमात्य भांडवलशाही होती. सहकारामध्ये एका बाजूने भांडवलाला तर दुसऱ्या बाजूने निर्माण झालेल्या आधिक्याचे सहकारात सामील होणाऱ्या सर्वांमध्ये समान हिश्श्याने वाटप करण्याची व्यवस्था असते.

वास्तव उत्पादनाच्या प्रक्रियेत सह-मालकीचा अंतर्भाव केला जातो. अर्थात, सहकारी व्यक्तींकडे उत्पादन साधनांची मालकी राहते, मात्र त्यांनी उत्पादनाच्या प्रक्रियेत आपला वाटा उचलण्याची गरज नसते. एकंदरीत, गाडगीळांनी स्वीकारलेल्या सहकारी उत्पादनाच्या मार्गात साधनांचा मालकी हक्क अबाधित राहून वर्धितमूल्याचे समानप्रमाणात वाटप होते. गाडगीळांनी अशा मार्गाला प्राधान्य दिले. सहकारी शेतीसंबंधीच्या त्यांच्या टिपणातून हाच दृष्टिकोन ध्वनित होतो. या त्यांच्या निबंधवजा टिपणात गाडगीळांनी सहकारी शेतीच्या चिनी प्रारूपाला भारतीय पर्याय सुचविला आहे.

रॉशडेल पायोनियर्स या सहकारी संस्थेची तत्त्वे पुढीलप्रमाणे होती : लोकशाही नियंत्रण, खुले सभासदत्व, संस्थेत गुंतविलेल्या भांडवलावर निश्चित/मर्यादित मोबदला, वाढावा व्यवहाराचे रोखीने वाटप, विशुद्ध व भेसळविरहित वस्तूंचीच विक्री, सभासदांचे शिक्षण, राजकीय व धार्मिक तटस्थता. गाडगीळांच्या सहकारावरील व्याख्यानांचा आणि लिखाणांचा रॉशडेल पायोनियर्सच्या या तत्त्वांच्या अनुषंगाने मागोवा घेतल्यास, त्यांनी सामान्यतः या तत्त्वांविषयी आस्था दाखविली होती, मात्र वेळप्रसंगी भारतीय परिस्थितीच्या संदर्भात त्यामध्ये सुधारणाही केल्या होत्या. त्यांनी चीन, युगोस्लाव्हिया, मेक्सिको, वगैरे देशांतील प्रयोगांची दखल घेऊन भारतीय परिस्थितीला अनुरूप होईल अशा पद्धतीच्या सर्वसाधारण प्रारूपांची मांडणी केली. गाडगीळ लिहितात, '' सहकारी प्रशासकीय संरचना ही देशातील सर्वसाधारण प्रशासकीय संरचनेच्या पद्धतीनेच साकारलेली आहे; म्हणजेच, तिच्यातही स्थान, जिल्हा, राज्य आणि महासंघ अशी संघटन व्यवस्था आहे'' (गाडगीळ, 1961, पृ. 18). कित्येकदा प्रस्थापित सहकार सिद्धान्तापासून दूर जाऊन स्थानिक परिस्थितीनुरूप गाडगीळांनी आपल्या लेखनात मुरड घातल्याचे ठायीठायी जाणवते.

यापुढील मांडणीत, गाडगीळांच्या सहकारविषयक दृष्टिकोनाच्या पुढील दोन पैलूंचे आपण विश्लेषण करणार आहोत : सरकार - सहकारी संस्था परस्परसंबंध आणि उत्पादकांच्या सहकारी संस्थांचे संघटन.

## सरकार – सहकारी संस्था परस्परसंबंध

गेल्या तीन दशकांमध्ये सरकारच्या सहकारी संस्थांवरील नियंत्रणाविषयी वेगवेगळ्या व्यासपीठांवरून आपण सातत्याने चर्चा करीत आलो आहोत. या प्रश्नावर गाडगीळांचा फलप्रामाण्यवादी विचार (pragmatism) समजून घेणे उद्‌बोधक होईल. सहकाराची संरचना ही मूलतःच स्व-साहाय्य आणि पूर्ण लोकशाही नियंत्रण या अधिष्ठानांवर निर्माण झालेली आहे. निकोल्सन यांनी आटोपशीरपणा (compactness) आणि संयुक्त जबाबदारी यावर आधारलेल्या रैफिसन पद्धतीच्या ग्रामीण सहकारी संस्थांची शिफारस करताना सहकारी पतसंस्थांची प्रस्थापित संरचना ध्यानात घेतली होती. या शिफारशींमध्ये अत्यंत काळजीपूर्वक पुढील शब्दरचना केलेली होती.: ''सरकारने प्रथमतः या उदयोन्मुख बँकांना आर्थिक साहाय्य वा हमी या पद्धतीने मदत करणे युक्त ठरावे, आवश्यकच असावे '' ( ICA 1971, पृ. 65). त्यापुढे जाऊन म्हटले होते की, भारताच्या संदर्भात, सरकारने सरळसरळ आर्थिक साहाय्य देणे म्हणजे एका परीने सहकारी पतसंस्थांना सरकारची मान्यता देणे होय ; याकरिता असे सरळ दिलेले आर्थिक साहाय्य सरकारने धीमेपणानेच काढून घ्यावे. ग्रामीण पतपुरवठा सर्वेक्षण समितीचे गाडगीळ सदस्य होते ; या समितीनेही साधारणतः असाच दृष्टिकोन मांडला आहे. गाडगीळांनी म्हटले आहे की, जरी शुल्टझ् - डेलिटझ् बँका सरकारी आर्थिक साहाय्याच्या विरोधी होत्या तरी रैफिसन बँका या मताशी पूर्णपणे सहमत नव्हत्या. या संदर्भातील सरकारच्या भूमिकेबाबत अन्न व कृषी संघटनेच्या FAO 'आशिया व अतिपूर्वेकडील देशांमधील सहकारी संस्था' या विषयावरील तांत्रिक बैठकीने 1949 मध्ये संमत केलेल्या ठरावांचा गोषवारा लक्षात घेतला पाहिजे.

तो ठराव म्हणतो, "सहकारी संस्थांच्या संबंधातील सरकारची भूमिका ही सहकारी उपक्रमांना चालना देणे, त्यांना मार्गदर्शन करणे आणि त्यांना बळकट पायावर उभे करणे अशा हेतूप्रीत्यर्थ सक्रिय उपयुक्ततेची असावी ; हे करताना स्थानिक पुढाकार व स्वसाहाय्य यांना धक्का लागू नये वा त्यांच्यावर सक्ती होऊ नये" ( ICA 1971, पृ. 73). आंतरराष्ट्रीय सहकारी महासंघाने (ICA) द.गो. कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने सहकाराच्या तत्त्वांचे सखोल परीक्षण करून वेगळ्याच पद्धतीचे मतप्रदर्शन मान्य केले होते. त्यातून ध्वनित होणारा विचार म्हणजे, सहकारी संस्था या स्वतंत्र घटक म्हणून राहाव्यात, लोकसहभाग हा त्यांच्या विकासाचा आधार असावा आणि त्यांचे सरकारवरील अवलंबित्व किमान असावे (कर्वे, 1967). या संदर्भात, द.गो. कर्वे यांचे प्रतिपादन त्यांच्याच शब्दांत मांडणे उचित होईल. ते म्हणतात, "सरकारी आर्थिक साहाय्याच्या कुबड्या फेकून देण्यासाठी तसेच समाधानकारक कामगिरीच्या आधारे देशातील लोकमताचा पाठिंबा मिळविणे यासाठी आम्ही पुरेसे प्रयत्न करीत नाही अशी भावना आहे; एक गट म्हणून सहकारी संस्थाच पुरेसे प्रयत्न करीत नाहीत असे आढळते" (कर्वे, 1967, पृ. 32).

गाडगीळांनी आपल्या ब्रिजमोहन स्मृती व्याख्यानातील दुसऱ्या व्याख्यानात सरकारच्या सहभागाबद्दल आणि सहकारी संस्थेच्या आकाराबद्दल वेगळी भूमिका घेतली. ते म्हणतात, "सुरुवातीच्या काळात स्वतःची साधनसंपत्ती वाढविण्यासाठी आणि विकासाला चालना देण्यासाठी सरकारी सहभागाची गरज आहे. यामुळे सरकारचा प्रभाव राहील किंवा नाही ते स्थानिक अधिकाऱ्यांची परंपरा व वृत्ती आणि बिगर - सरकारी कार्यकर्त्यांचे बळ व दर्जा यावर अवलंबून राहील. जिथे यातील दुसरी बाब अपुरी असेल तिथे सरकारी आर्थिक साहाय्य अल्पसे असो वा काहीही नसो, सरकारचा प्रभाव राहणारच" (गाडगीळ, 1961, पृ. 36). या ठिकाणी एका गोष्टीची नोंद घेणे आवश्यक आहे. भारताच्या, आणि विशेषतः महाराष्ट्राच्या, सहकारी चळवळीच्या प्रगतीचा इतिहास ध्यानात घेतला तर आपल्याला स्पष्टपणे जाणवते की, सहकारी संस्थांमध्ये सहभागी होणाऱ्यांच्या नैसर्गिक दुर्बलतेच्या कारणाने सरकारने सहकारी संस्थांवर आपली घट्ट पकड बसविली आहे. (त्याला सरकार व संबंधित क्षेत्राचा गट यांचा सहयोगी गट असे स्वरूप आले आहे.)

गाडगीळांना सरकारची सकारात्मक भूमिका अभिप्रेत होती. त्यादृष्टीने अर्थव्यवस्थेच्या ज्या क्षेत्रांत प्रत्यक्षात सहकारी संस्था स्थापन होण्याचा संभव नाही अशा क्षेत्रांमध्ये सहकारी मूल्यांचे बीजारोपण करण्याची जबाबदारी सरकारने घ्यावी असे गाडगीळांचे मत होते (गाडगीळ, 1960, पृ. 62). आणखी दुसऱ्या ठिकाणी गाडगीळ स्पष्ट करतात की, भाग भांडवल खरेदी करण्याच्या पद्धतीतून सरकारचा सहभाग म्हणजे सरकारचे वर्चस्व अशी गल्लत केली जाऊ नये. यापुढे जाऊन ते म्हणतात, " सद्यःस्थितीत, भारतातील सहकारी संस्थांच्या प्रगतीतील मोठा अडथळा म्हणजे केन्द्र सरकारचे सहकारविषयक धोरणाची दिशा. हे धोरण दंडेलीचे व कुमार्गगामी आणि त्याचबरोबर कमकुवत व डळमळीत आहे. या परिस्थितीचा सर्वात महत्त्वाचा विशेष म्हणजे सहकारासंबंधीच्या धोरणाची निश्चिती सहकाराच्या पद्धतीने केली जात नाही " (गाडगीळ, 1961,पृ. 43). गाडगीळांच्या या आरंभीच्या मतांमधून सरकारच्या भूमिकेबद्दल सावधगिरीचाच पवित्रा घेतलेला आढळतो, तथापि नंतरच्या घटनांमधून अनिष्ट प्रवृत्तीच दृग्गोचर होतात. या संदर्भात लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे, विद्यानिष्ठ गोटामध्ये देखील सरकार-सहकार यांच्या संबंधाविषयीची मते कालौघात बदललेली आहेत. सुरुवातीला, सरकारची भूमिका सहकारी संस्थांचा श्रीगणेशा करण्याची आणि त्यांना आर्थिक साहाय्य देण्याची होती ; परंतु नंतरच्या टप्प्यात सरकारची भूमिका अधिक कठोर व हस्तक्षेपाची झाली. स्वातंत्र्योत्तर कालातील पहिल्या तीन दशकांदरम्यानच्या सहकारी संस्थांचा अनुभव लक्षात घेता, भारतातील सहकारी संस्थांची कामगिरी

असमाधानकारक असल्याची टिप्पणी गाडगीळांनी केली होती. त्यांच्या मते, खऱ्याखुऱ्या सहकारी संस्थांना पूरक अशा चैतन्यमय सरकारी धोरणांचे पाठबळ हवे तसेच विकेन्द्रित स्थानिक नेतृत्व पुढे आले पाहिजे. आपल्याकडे सहकारविषयक धोरणाचा चांगला ढाचा होता हे खरे, परंतु भारतीय समाजाच्या संस्थात्मक स्वरुपामुळे भारतात खरेखुरे विकेन्द्रीकरण घडून आलेच नाही. बिहार, उत्तर प्रदेश, ओरिसा, राजस्थान, मध्य प्रदेश ही विकेन्द्रीकरणाच्या संपूर्ण अपयशाची उदाहरणे होत. भारतीय राज्यघटनेच्या त्र्याहत्तराव्या दुरुस्तीमधून विकेन्द्रीकरणाचे स्वप्न साध्य करणे जरूर आहे.

## प्रवरा : आरंभीचा प्रयोग

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीचे शिल्पकार म्हणून गाडगीळांची ख्याती आहे. विठ्ठलराव विखे पाटलांच्या सहकार्याने त्यांनी केलेले प्रयत्न ही उत्पादकांच्या सहकारी संस्थांच्या निर्मितीची नांदी होती. सासवड माळी साखर कारखाना हा महाराष्ट्रातील पहिला साखर कारखाना होय. माळी समाजातील शेतकऱ्यांच्या पुढाकाराने तो स्थापन झाला. मात्र, अगदी काटेकोरपणे पाहू गेल्यास, तो सहकारी प्रयत्न म्हणता येणार नाही, ऊस पिकविणे आणि त्यापासून गुळाऐवजी साखर बनविणे एवढाच विचार या कारखान्याने पुढे आणला. दक्षिणेकडील कालव्यांच्या पाण्याच्या वापरासंबंधी अहवाल तयार करण्याकरिता नेमलेल्या पाणी उपयोग समितीने (Committee on Water Utilisation) या प्रदेशातील पाण्याचा वापर पूर्णपणे व्हावा यासाठी साखर कारखान्यांना निमंत्रित करावे अशी शिफारस केलेली होती. त्या अनुषंगाने सिंचनासाठी कालव्याच्या पाण्याचा वापर करणाऱ्या शेतकऱ्यांची एक परिषद होऊन साखर कारखाना स्थापन करण्यासाठीची काही पाउले टाकण्यात आली. तशा तऱ्हेचा ठरावही संमत झाला (गाडगीळ, 1952). विठ्ठलराव विखे पाटलांच्या पुढाकाराने सहकारी साखर कारखाना स्थापन करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. अल्प भूधारकाच्या कुटुंबामध्ये त्यांचा जन्म झालेला असल्यामुळे एकत्र येऊन साखर उत्पादनासाठी सहकारी तत्त्वावर प्रयत्न करण्यातील लाभांची दृष्टी त्यांना होती. म्हणूनच या प्रयोगाचे वर्णन गाडगीळांनी 'मुंबई राज्यातील शेतकऱ्यांच्या मालकीचा साखर कारखाना' असे केले (गाडगीळ, 1952).

उत्पादकांची सहकारी संस्था स्थापन करण्यासाठीचे प्राथमिक काम खूप कठीण असते असे मत या प्रवरा साखर कारखान्याच्या पहिल्या व्यवस्थापकीय संचालकांनी व्यक्त केले होते. प्रवरा कारखान्याचे बव्हंशी सभासद अत्यल्प व अल्प भूधारक होते ; 20 एकरांपेक्षा अधिक जमीन असणारे सभासद थोडकेच होते. सर्व सभासदांच्या मिळून धारणक्षेत्राचा सरासरी आकार 1.6 एकर होता (जोशी व सिंग, 1989). त्यामुळे हा प्रयोग खऱ्या अर्थाने त्या प्रदेशातील शेतकऱ्यांचा प्रातिनिधिक होता. हा कारखाना स्थापन करण्याची प्रत्यक्ष हालचाल 1947 मध्ये सुरू झाली. त्यावेळी संपूर्ण योजनेची मुंबई प्रान्त सहकारी बँकेशी चर्चा करण्यात आली. सन 1949 च्या अखेरपर्यंत आरंभीच्या रु. 2 लाख भांडवलाची जुळवाजुळव झाली. संस्था नोंदविली गेली. व्यवस्थापकीय संचालक व मुख्य अभियंता या दोन महत्त्वाच्या पदांवर नेमणुका झाल्या. जडणघडणीच्या या कालखंडात करखान्याचे चेअरमन या नात्याने गाडगीळांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या प्रकल्पाचा एकंदर खर्च सुमारे रु. 25 लाख होईल अशी सुरुवातीची अटकळ होती. परंतु 1949 मधील रुपयाचे अवमूल्यन आणि परिणामी यंत्रसामग्रीचा वाढलेला परिव्यय यामुळे कारखान्यासाठीच्या आरंभीच्या भांडवली खर्चात जवळजवळ 50 टक्क्यांनी वाढ झाली. सभासदांकडील भाग भांडवलाचा भरणा रु. 6 लाख योजिला होता त्यापैकी रु. 5 लाखच होऊ शकला. या कालखंडात भांडवल धारण करण्यावर राज्य सरकारने रु. 10,000 ची कमाल मर्यादा घातलेली होती ; कारखान्याने कष्टपूर्वक ही व्यक्तिगत मर्यादा रु. 15,000 पर्यंत वाढवून घेतली. अर्थात अशी क्षमता असणारे शेतकरी हाताच्या बोटावर मोजण्याइतके होते.

या वित्तीय अडचणीमुळे कारखान्याच्या भागभांडवलाला हातभार लावण्यासाठी राज्य सरकारला आवाहन करण्यात आले. गाडगीळ लिहितात, " मुंबई सरकारकडे एक निवेदन पाठविण्यात आले. त्यामध्ये या प्रयोगाचे वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप, शेतकऱ्यांच्या साधनसंपत्तीच्या पार्श्वभूमीवर या प्रयोगाचा असणारा मोठा आकार आणि याच्या यशस्वी कामगिरीमधून सहकार चळवळीला सर्वांगाने मिळू शकणाऱ्या लाभाची मोठी शक्यता यावर प्रकाश टाकण्यात आला. संस्थेच्या दृष्टीने भाग्याची बाब म्हणजे राज्य शासनात वित्तमंत्री असलेले आणि त्याचबरोबर सहकार मंत्रालयाचे खाते सांभाळणारे मंत्री वैकुंठलाल मेहता हे स्वतःच सहकाराचे खंदे पुरस्कर्ते होते (गाडगीळ, 1952, पृ. 206). काही महिन्यांच्या अवधीतच राज्य सरकारने आपली अनुकूलता दर्शविली. सहकारी साखर कारखानदारीमध्ये राज्य सरकाच्या सहभागाची एक दीर्घकालीन वाटचाल नंतरच्या कालखंडात झाली तिचा पाया सरकारच्या या निर्णयाने घातला गेला. असे असले तरी, प्रवरानगर साखर कारखान्याच्या दृष्टीने मात्र आपल्या बाल्यावस्थेतील कालखंडात राज्य सरकार आणि वित्तीय संस्था यांच्याशी व्यवहार करणे सहजसुलभ नव्हते. कठीण प्रसंगांची साखळीच तयार होती. प्रथमतः संस्थेच्या नोंदणीला आणि वित्तीय प्रबंध करण्याला बराच विलंब झाला. सर्व सभासदांच्या जमिनी तारण म्हणून मिळाल्यानंतर औद्योगिक वित्त महामंडळाने (IFC) कर्ज दिले. उसाची किंमत संचालक मंडळ ठरविणार, या मंडळावर सहकार प्रबंधक, मुंबई प्रान्तिक सहकारी बँक, औद्योगिक वित्त महामंडळ आणि राज्य सरकार यांचे प्रतिनिधी असणार. अशा रीतीने सहकारी क्षेत्रात सरकारच प्रवेश झाला आणि कालौघात विविध धोरणांच्या माध्यमातून सरकारची पकड घट्ट झाली. उत्पादकांची सहकारी संस्था स्थापण्याच्या आरंभ कालातील गाडगीळांचे योगदान काय आहे हे प्रवरा साखर कारखान्याच्या दप्तरावरून अधिक स्पष्ट होते. तेव्हाचे राज्य सरकार आणि बँका यांच्याकडे केलेली प्रतिपादने गाडगीळांच्या मार्गदर्शनाखाली साकारली होती.

## उपसंहार

खरे तर, गाडगीळांच्या सहकारविषयक विचारांचा विस्तृत आवाका एका लहानशा लेखात बंदिस्त करणे हे अवघड काम आहे. या लेखात काही मोजक्याच अंगांचा विचार केला आहे. गाडगीळ हे द.गो. कर्वे यांचे समकालीन. परंतु त्यामुळे गाडगीळांच्या लेखनातील कर्व्यांच्या संदर्भाकडे आपले दुर्लक्ष होते. या दोन धुरंधरांनी वैकुंठभाई मेहतांचा राजकीय पाठिंबा मिळवून महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीचा इतिहास घडविला.गाडगीळ भारतीय परिस्थितीशी सुसंगत होईल अशा तऱ्हेने सहकारीकरण घडवून आणण्यासाठी कटिबद्ध होते. मात्र त्याचवेळी रॉशडेल पायोनियर्सच्या सहकाराच्या तत्त्वांना तिलांजली दिली जाणार नाही याबद्दल दक्ष राहिले. सहकारातील प्रारंभीचे अडथळे दूर व्हावेत या उद्देशानेच त्यानी राज्यपुरस्कृत सहकाराचा ठामपणे आग्रह धरला. दुर्दैवाने, नंतरच्या कालात सरकारी हस्तक्षेपाने भयानक स्वरूप धारण केले. प्रवरानगर साखर कारखाना हा उत्पादकांच्या सहकारी संस्था निर्माण करण्याचा गाडगीळांचा एक प्रयोग होता. याच प्रयोगाने महाराष्ट्रात सहकारी साखर कारखानदारीचे युग बहरले. मात्र सहकारी संस्थांना सरकारकडून दिल्या जाणाऱ्या आर्थिक पाठबळामुळेच नंतरच्या वर्षांत सहकारी साखर कारखाने राजकीय जोडपट्टीचे भक्कम बुरुज बनले. सहकारी क्षेत्राच्या अपयशाला आणि सरकारी भांडवलाच्या नुकसानीला सरकारचे साखर कारखानदारीला मिळालेले आर्थिक पाठबळ/साखर कारखानदारीवरील नियंत्रण कारणीभूत ठरले आहे. अगदी सहकारी संस्थांतील तळाच्या सभासदांच्या आर्थिक उद्धाराच्या दृष्टिकोनातून पाहिले तरी या संदर्भात साखर कारखान्यांनी भरीव असे काही साधले नाही असेच म्हणावे लागते. काही थोड्या लोकांचे आर्थिक हित खूप मोठ्या प्रमाणावर साधले आहे हे निःसंशय. तथापि विचित्र लीला अशी आहे की, ज्यानी सहकारी साखर कारखानदारीच्या यशात सारखाच सहयोग दिलेला आहे त्यांच्या वास्तव परिस्थितीत अत्यल्प बदल झालेला आहे. अर्थात, कुणी

साखर कारखान्यांच्या यशाचे मूल्यमापन यापेक्षा वेगळ्या दृष्टिकोनातून करू शकेल. असा दृष्टिकोन ग्रामीण महाराष्ट्राचा प्रादेशिक विकास आणि साखर कारखान्याच्या भोवताली व परिसरात आधारभूत संरचनांची निर्मिती हा असू शकेल. परंतु गाडगीळांनी मनाशी रेखलेले स्वप्न अपूर्णच राहिले. त्याचे एक संभाव्य कारण म्हणजे ज्या प्रशासकीय विकेन्द्रीकरणाचा त्यांनी पाठपुरावा केला होता त्याबाबतीतील सरकारची उत्साहरहित कृती होय.

## संदर्भ टीपा


1 Baviskar, B.S. (1968).' Co - operatives and Politics', *Economic and Political Weekly,* Vol. 3, No. 12.

2 Brahme, Sulabha (1984).*'Producers' Co - operatives: Experience and Lessons from India'* ISS Occasional Papers, Institute of Social Change, Hague.

3 Gadgil, D.R.(1952), 'Peasant - Owned Sugar Factory in Bombay State: A Unique Experiment in Co-operative Enterprise', *Indian Labour Gazette.* May.

4 Gadgil, D. R. (1961), *The Pravara Sahakari Sakhar Karkhana : An In terpretative Account',* Written on the occasion of the visit of Pandit Jawaharlal Nehru to the Karkhana on 15th May 1961.

5 Gadgil, D.R. (1961).' *Towards a Co-operative Commonwealth',* Prof. Brij Narayan Memorial Lectures, Punjab University Publications Bureau, Chandigarh.

6 Gadgil, D. R. (1965), 'Co-operation in India : Retrospect and Prospect', *In dian Co - operative Review,* pp. 481-488.

7 Gokhale Institute of Politics and Eco nomics (GIPE) (1975), *Writings and Speeches of Professor D. R. Gadgil on Co-operation,* GIPE, Pune.

8 International Co - operative Alliance (ICA) (1971), *Professor D.G. Karve Commemoration Volume,* Regional Office and Education Centre for South East Asia, Delhi.

9 International Co - operative Alliance (ICA) (1971), *State and Co - operative Development,* Regional Office and Education Centre for South East Asia, Calcutta. Allied Publications, Delhi.

10 Joshi, S.N. and Singh, B.S. (1989), *A Typical Paradigm of Integrated Rural Development: A Case Study of Padmashri Dr. Vithalarão Vikhe Patil Sahakari Sakhar Karkhana, Pravaranagar,* Pravara Institute of Research and Education in Natural and Social Sciences, Loni.

11 Karve, D. G. (1968), *Co-operation : Principles and Substance,* Gokhale Institute of Politics and Economics, Pune.

# गाडगीळ : समन्वयवादी अर्थशास्त्रज्ञ

दि.व्यं. जहागीरदार *

## 1 प्रास्ताविक

धनंजयराव गाडगीळानी इंग्रजी व मराठी या दोनही भाषेतून अर्थशास्त्रीय व अन्य विषयांवर लिखाण केले आहे. पण एक महत्त्वाची बाब अशी की, त्यांचा पहिला लेख मराठीतून 'इंग्लंडातील हिंदी खलाशांची स्थिती' केसरीत दि. 22 मार्च, 1923 मध्ये प्रसिद्ध झाला होता. त्यांच्या मराठी आणि इंग्रजी लेखांचे व भाषणांचे संकलन करून स्वतंत्र ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. तथापि प्रकर्षाने जाणविणारी एक गोष्ट म्हणजे गाडगीळांवर व त्यांच्या विचारांवर लिहिलेली पुस्तके वा प्रसिद्ध झालेले लेख तौलनिकदृष्ट्या संख्येने कमी आहेत. *नवभारत* मध्ये 1949 मध्ये गाडगीळांच्या विचारांवर भा.शं. भणगे यानी लेख लिहिला होता. गाडगीळांच्या मृत्यूनंतर *Economic and Political Weekly* (Vol. VI, 19, 8 May) 'D.R. Gadgil' या शीर्षकाखाली आणि *Artha Vijnana* (Vol. XIII, No 2, June 1971) मध्ये 'Dhananjaya Ramchandra Gadgil (1901-1971)' या शीर्षकाखाली वि.म. दांडेकरानी लेख प्रसिद्ध केले. या दोनही लेखांमधील मुद्दे जवळपास सारखेच आहेत. नंतर 1974 मध्ये त्यांचे शिष्य व निकटचे सहकारी नी.वि. सोवनी यांचे *माझे गुरु धनंजयराव गाडगीळ* हे आकाराने लहान पुस्तक प्रसिद्ध झाले. हे पुस्तक नेहमीच्या पठडीप्रमाणे शिष्याने गुरुसंबंधी लिहिलेले पुस्तक नाही. सन 1996 च्या डिसेंबर मध्ये ग्वाल्हेर येथे भरलेल्या *Indian Economic Association* च्या 79 व्या वार्षिक अधिवेशनात *The Economic Ideas of D.R. Gadgil* हा विषय चर्चेसाठी होता. त्यावेळी बऱ्या संख्येने त्यावर शोधनिबंध सादर झाले. 3-4 महिन्यांपासून वृत्तपत्रांमधून गाडगीळांवर लेख

* *सह-संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र शासन, कोल्हापूर*

प्रसिद्ध होत आहेत.

प्रस्तुत निबंधात गाडगीळांच्या पूर्वीच्या व समकालीन अर्थशास्त्रज्ञांच्या संदर्भात त्यांच्या विचारांची थोडक्यात माहिती दिली असून त्यानंतर त्यांची वैचारिक भूमिका स्पष्ट केली आहे. गाडगीळानी जे विपुल लिखाण केले त्याच्या अनुषंगाने त्यांचे भारतीय अर्थशास्त्रावरील विचार, त्यांच्या पहिल्या ग्रंथाचा आढावा आणि त्याना अत्यंत प्रिय असणाऱ्या विषयांमध्ये भारताच्या पंचवार्षिक योजनेपैकी चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या संदर्भात विवेचन केले आहे. हे तीन विषय प्रातिनिधिक मानून त्यांची जाणीवपूर्वक निवड केली आहे.

## 2 गाडगीळांच्या पूर्वीचे आणि समकालीन भारतीय अर्थशास्त्रज्ञ

अभिमत अर्थशास्त्राचा आणि विशेषत: जर्मन ऐतिहासिक विचारप्रणालीचा प्रभाव तत्कालीन भारतीय अर्थशास्त्रज्ञांवर झाला होता. या संदर्भात महादेव गोविंद रानडे आणि धनंजयराव गाडगीळ यांचा उल्लेख करावा लागेल. जॉन स्टुअर्ट मिल यानी प्रतिपादिलेल्या संरक्षणाच्या धोरणाचा गाडगीळानीही पुरस्कार केला. निर्हस्तक्षेपाचे धोरण सर्व प्रकारच्या अर्थव्यवस्थांना अनुरूप वा योग्य ठरू शकत नाही. एकसारख्या वाढत्या उत्कर्षाच्या स्थितीत, अर्थव्यवस्थेचे एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत संक्रमण होत जाईल त्यावेळी हे धोरण अनुरूप ठरेल. एकोणिसाव्या शतकातील इंग्लंडमध्ये साधनसंपत्ती विपुल असल्याने तेथे हे धोरण योग्य होते असे गाडगीळांचे स्पष्ट मत होते. अन्य देशांच्या अर्थव्यवस्थेसाठीही हे धोरण योग्य ठरू शकणार नाही. मात्र गाडगीळानी अभिमतपंथीयांच्या, विशेषत: मिल यांच्या, सर्वच धोरणांचा पुरस्कार केला नाही. विकसनशील अर्थव्यवस्थेत विदेशी भांडवलाबाबत मिल याना असे वाटत होते की, अल्पकालात विदेशी भांडवल हे जीवनस्तर उंचावू शकणार नाही. मात्र दीर्घकालात आर्थिक प्रगतीमध्ये विदेशी भांडवल हे उत्तेजक म्हणून कार्य करू शकेल. दादाभाई नौरोजी यांचेही असेच मत होते. गाडगीळ याना मिल व नौरोजी यांचे हे मत अमान्य होते. मिलच्या ग्रामीण-विरोधवादाचे (anti-ruralism) गाडगीळ यानी खंडन केले आहे.

दादाभाई नौरोजी यांच्याप्रमाणेच गाडगीळानी भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध पैलूंवर लिखाण केले आहे. महत्वाचा मुद्दा असा की, दादाभाईनी ज्याप्रमाणे भारतीय अर्थव्यवस्थेच्या काही समस्यांचे आंतरराष्ट्रीय प्रमाणाच्या आधारे तौलनिक विवेचन केले आहे तसाच प्रयत्न गाडगीळानीही केला. इंग्लंड, स्कॉटलंड व भारतातील प्रतिव्यक्ती कराचे मापन करून भारतीय सर्वात अधिक कर देतात असे दादाभाईनी दाखवून दिले होते. गाडगीळानी ब्रिटिश भारतात पगारातील भिन्नता ही 1920 मध्ये 1:133 तर ब्रिटनमध्ये 1:32, जर्मनीत 1:44 होती हे दाखवून दिले. अन्य देशांतून भारतात उच्चविद्याविभूषित श्रमिक यावेत म्हणून सरकारी अधिकाऱ्यांचा पगार फार अधिक ठेवला जातो. ब्रिटिश शासनाकडून भारतात जो रेल्वे विकासाचा कार्यक्रम राबविला गेला त्याबाबत दादाभाई नौरोजी आणि राधाकमल मुखर्जी यांच्यापेक्षा गाडगीळांची मते वेगळी होती. नौरोजी आणि मुखर्जी या दोघांनीही या कार्यक्रमाला विरोध दर्शविला होता. त्यांच्या मते यामुळे भारतातील अंतर्गत साधनसंपत्तीचे केवळ शोषण होईल. गाडगीळानी मात्र रेल्वेच्या विकास कार्यक्रमामुळे शेतीचे व्यापारीकरण होईल, दुष्काळाच्या स्थितीत मदतकार्य करणे सुलभ होईल, अंतर्गत व बाह्य व्यापार वाढेल, इत्यादी अनुकूल बाबी विचारात घेऊन अशा विकासाला अनुकूल ठरणाऱ्या कार्यक्रमांना अनुकूलता दर्शविल्याचे दिसते. रानडे यांच्याप्रमाणे गाडगीळानाही भारतीय अर्थव्यवस्थेच्या समतोल विकासासाठी उद्योगीकरणाची आवश्यकता भासत होती.

औद्योगिक श्रमिकांच्या अत्यंत सविस्तर व विश्लेषणात्मक अध्ययनात गाडगीळानी श्रमाच्या पुरवठ्याचा प्रश्न हाताळला आहे. भारतीय उद्योगांना श्रमिकांच्या कालिक तुटवड्याचा (periodic scar-

city) प्रश्न भेडसावत असतो. हीच बाब गाडगीळ यांच्यानंतर 60 वर्षानंतर अधिक परिष्कृत पद्धतीने प्रणवकुमार बर्धन यानीही दर्शविली आहे. दोघांनीही लग्नाचा मोसम व उत्सवासारख्या कारणांचा उल्लेख केला आहे.

## 3 गाडगीळांची वैचारिक भूमिका

गाडगीळांच्या वैचारिक भूमिकेबाबत सुलभा ब्रह्मे यानी गाडगीळांच्या लेखसंग्रहाच्या पहिल्या खंडास जी प्रस्तावना लिहिली आहे त्यात विवेचन केले आहे. गाडगीळांची वैचारिक भूमिका विघटित समाजाचे एकसंधीकरण, राज्यसत्तेचे विकेन्द्रीकरण आणि लोकाभिमुख आर्थिक विकास व विकासात लोकांचा सहभाग या त्रिसूत्रीवर अधिष्ठित होती.

भारतीय समाजात जशी एकात्मतेची भावना आहे तसेच सर्व प्रकारच्या भिन्नत्वाच्या कल्पनाही प्रभावी आहेत. त्यामुळे विघटनवादी प्रवृत्ती वाढतात. अशा विघटित समाजातील जाती, धर्म, भाषा, इत्यादी भेदांचे महत्त्व कमी होण्यासाठी एकतेचे महत्त्व पटणे आवश्यक आहे. आर्थिक सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी राज्यसत्तेचे विकेन्द्रीकरण आणि लोकाभिमुख आर्थिक विकास आवश्यक आहे. विकास प्रक्रियेत समाजातील बलशाली गटास मोठा वाटा मिळत जातो आणि दुर्बल गटाची स्थिती अधिक कमकुवत बनते. अशा वेळी विकास हा लोकाभिमुख असला पाहिजे आणि विकास प्रक्रियेत लोकांचा अधिकाधिक सहभाग असावयास हवा.

विकासाच्या वाटचालीत असणाऱ्या अडथळ्यांपैकी आपल्या समाजातील ऐहिक जीवनास गौण मानण्याच्या प्रवृत्तीचा त्यानी उल्लेख केला आहे. तसेच व्यक्तिगत मुक्तीला दिलेल्या महत्त्वामुळे सामूहिक कर्तव्ये आणि समाजधर्म यावर भर नव्हता. समाजात अलिप्तपणा असून सामूहिक जीवनास गौण मानण्याची प्रवृत्ती दिसून येते. या बाबी विकासाच्या प्रक्रियेतील अडचणी मानल्या पाहिजेत. जपानमधील आर्थिक प्रगतीचा इतिहास गाडगीळ याना आपल्या संदर्भात मोलाचा वाटत असे. समाजजीवनातील शिस्त आणि संयम यांचा आर्थिक प्रगतीत मोठा वाटा आहे.

मानवी जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या महात्मा गांधी तसेच कार्ल मार्क्स यांच्या विचारांचा गाडगीळांवर प्रभाव होता का, असा प्रश्न अनेकजण विचारतात. याबाबत असे म्हणावे लागेल की, गांधीवादी विचारांचा त्यांच्यावर परिणाम झाला नव्हता. मात्र गांधीच्या विचारांचे पाईक असणाऱ्या विनोबा भावे यांच्या ग्रामदानाकडे ते आकर्षित झाले होते. गाडगीळांवर मार्क्सवादाचा प्रभाव जाणवत नाही. त्यानी आपल्या सर्व वैचारिक व अभ्यासी जीवनात मार्क्सवादाची उपेक्षा केली आहे असे परखड मत पां.वा. गाडगीळ यानी नोंदविले आहे. (पाहा : *समाजप्रबोधन पत्रिका,* सप्टें. - ऑक्टो. 1974, पृष्ठे 44-47). गाडगीळानी समता, उत्पादक साधनांचे राष्ट्रीयीकरण यासारखे विषय जरी हाताळले असले तरी ते त्याना ब्रिटिश उदारमतवादातून प्राप्त झाले असावेत. त्यांचे मार्क्सवादावाचून काही अडले का ? याला पां.वा. गाडगीह नाही असे उत्तर देतात. पण उदारमतवादी भांडवलशाहीत विषमता का निर्माण होते याचे उत्तर मार्क्सवादाचा आधार घेतल्याशिवाय सापडू शकत नाही.

लोकमान्य टिळकांप्रमाणे ज्यांच्याविषयी गाडगीळाना नितांत आदर होता त्या व्यक्ती म्हणजे बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील. या दोघांनीही तळागाळातल्या समाजासाठी जे भव्य कार्य केले त्याने गाडगीळ प्रभावीत झाले होते. मॅथ्यू यानी लिहिलेल्या *कर्मवीर भाऊराव पाटील* या चरित्रास जी दीर्घ प्रस्तावना गाडगीळ यानी लिहिली आहे त्यावरून ही बाब लक्षात येईल. त्यात ते लिहितात, ''पहिली गोष्ट ही की, जाती - उपजातींच्या उत्तरंडीने ग्रासलेल्या समाजाला भेडसावणारा मुख्य प्रश्न कसा सोडविता येईल हे भाऊरावांनी अनेक वर्षे परिणामकारक कार्य करून दाखवून दिले आहे.'' गाडगीळांची दुर्बल गटांच्या बाबतीत असणारी भूमिका या दोन विभूतींच्या जीवनाचा परिणाम आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये.

## 4 भारतीय अर्थशास्त्र

भारतीय अर्थशास्त्राची आवश्यकता मान्य करून त्यादृष्टीने पाठपुरावा करणारे पहिले अर्थतज्ज्ञ म्हणून महादेव गोविंद रानडे यांचा उल्लेख केला जातो. तरीदेखील ज्ञानकोशकार केतकर यानी भारतीय अर्थशास्त्र या संकल्पनेचा शास्त्रीयदृष्ट्या अधिक खोलवरर विचार केला. त्याना भारतीय अर्थशास्त्र म्हणजे भारताच्या आर्थिक प्रश्नांचा अभ्यास करणारे अर्थशास्त्र हा अर्थ अभिप्रेत नव्हता. समाजात जे विविध घटक असतात की जे समाजात कार्यान्वित असून समाजात बदल घडवून आणतात त्यांचे सर्वांगीण अध्ययन करून, त्या घटकांमधील संबंध विचारात घेऊन संबंधित समाजाच्या संदर्भात सांगितले जाणारे सिद्धान्त हे जर भारतीय समाज, अर्थव्यवस्थेच्या संदर्भात मांडण्यात आले तर त्याला भारतीय अर्थशास्त्र म्हणण्यात यावे. भारताच्या संदर्भात नवीन, वेगळे आर्थिक सिद्धान्त कसे काय मांडता येतील असा प्रश्न गाडगीळांना सुरुवातीस पडला होता. सन 1924 मध्ये 'स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्राची आवश्यकता' हा लेख प्रसिद्ध करून त्यानी ज्ञानकोशकार केतकरांच्या मतास विरोध केला होता. मात्र महादेव गोविंद रानडे यांच्या जन्मशताब्दीच्या वर्षात त्यानी आपले जुने विचार बदलले आणि केतकरांच्या संकल्पनेस मान्यता दिली. साधारणपणे असे मानले जाते की, वेगवेगळ्या देशांमधील स्थितीत फारसा फरक नसतो, त्यामुळे विकसित देशांच्या परिस्थितीवर आधारलेले आर्थिक सिद्धान्त हे न्यूनविकसित देशांसाठीही लागू पडतात. प्रत्यक्षात असे दिसते की, विकसित आणि न्यूनविकसित अशा देशांच्या आर्थिक व आर्थिकेतर स्थितीमध्ये बरीच तफावत असते. अशा स्थितीत, विकसित भांडवलवादी अर्थव्यवस्थेच्या संदर्भात सांगितले जाणारे आर्थिक नियम-सिद्धान्त हे न्यून विकसित, मागासलेल्या देशांच्या अर्थव्यवस्थेलाही कसे लागू पडतील ? विकसित देशांतील अर्थशास्त्रज्ञ असे मानतात की, आर्थिक जीवनातील मुख्य प्रश्न हा उत्पादनाचा नसून विभाजनाचा आहे. असे मानणे न्यून विकसित देशांच्याबाबत योग्य नाही. अशा देशांमध्ये उत्पादनाचा प्रश्न महत्त्वाचा आहे. न्यून विकसित देशाचे अर्थशास्त्र हे मागासलेपणाचे व गरिबीचे अर्थशास्त्र आहे.

गाडगीळांनी 1924 मध्ये केतकरांच्या मतास जरी विरोध केला तरी तब्बल 18 वर्षांनी त्यानी आपले पूर्वीचे मत कसे चुकीचे होते हे अत्यंत प्रांजळपणे कबूल केले यात त्यांच्या मनाचा मोठेपणा तर दिसतोच पण त्यातून त्यांची वैचारिक परिपक्वता अधिक प्रगट होते. 1924 मध्ये ते नुकतेच ब्रिटनमधून उच्च विद्याविभूषित होऊन परतले त्यामुळे त्यांच्यावर ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञांच्या विचारांचा प्रभाव होता. त्यानी स्वत:वरच टीका करताना रानडे यांच्या जन्मशताब्दी निमित्त लिहिलेल्या 1942 मधील लेखात म्हटले की, ''विलायतेहून नुकत्याच आलेल्या ताज्या पदवीधारकास आपणास येथील मुरलेल्या अभ्यासकापेक्षाही जास्त कळते असे वाटत असते.''

इंग्लंडच्या अर्थशास्त्रज्ञांनी सांगितलेले आर्थिक सिद्धान्त आपण का स्वीकारले ? अजूनही का स्वीकारतो ? असे प्रश्न उपस्थित करून गाडगीळानी या प्रश्नांना दिलेले उत्तर अतिशय प्रांजळ व मर्मग्राही आहे. स्वत:ला कमी लेखण्याची प्रवृत्ती याला जबाबदार आहे. भारतीय समाजातील न्यूनगंड याला जबाबदार आहे. तसेच याला आणखी दुसरे कारणही तेवढेच जबाबदार आहे. आपल्याकडील अभ्यासकांवर पाश्चिमात्य विचारांचा असणारा पगडा, या विचारांचे असणारे ओझे. त्यामुळे आपण असे आर्थिक सिद्धान्त फारशा खोलात जाऊन विचार न करताच आंधळेपणाने स्वीकारत जातो. भारतीय संदर्भात, येथील आर्थिक-सामाजिक व अन्य परिस्थितीत लागू करता येतील असे सिद्धान्त शोधून काढण्याची नितांत गरज आहे हे गाडगीळाना पटले. न्यूनविकसित वा विकसनशील अर्थव्यवस्थेचे स्वरूप समजावून घेण्यासाठी काही तात्त्विक आधार तयार करणे सर्वप्रथम आवश्यक आहे. तसेच अशा अर्थव्यवस्था कशा कार्यान्वित होतात, त्या कार्यान्वित होण्यामागे कोणते नियम आढळून येतात याचे अध्ययन झाले पाहिजे. थोडक्यात, अर्थव्यवस्थेचे स्वरूप समजावून घेणे आणि तिच्यामधील विविध

घटकांच्या संबंधांचे अध्ययन करणे की ज्यामुळे आपल्याला न्यून विकसित देशांच्या संदर्भात काही आर्थिक नियम सांगता येतील यादृष्टीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे असे गाडगीळाना वाटत होते. यासाठी सर्वप्रथम भारताच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचे अध्ययन झाले पाहिजे या भूमिकेतून त्यानी सन 1930 मध्ये गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेचे संचालकत्व स्वीकारल्यापासून प्रयत्न केले आहेत. नी.वि. सोवनी यानी आपल्या पुस्तकात *(माझा गुरु धनंजयराव गाडगीळ)* याबाबत गाडगीळांची भूमिका स्पष्ट करणारे चांगले व उपयुक्त विवेचन केले आहे.

गाडगीळानी स्वत: तसेच गोखले अर्थशास्त्र संस्थेच्याद्वारा केलेल्या वेगवेगळ्या सर्वेक्षणांमधून भारतीय अर्थव्यवस्थेतील काही महत्त्वाच्या क्षेत्रांबाबत आवश्यक व उपयोगी आकडेवारी प्राप्त करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. या प्रयत्नातून त्याना न्यायमूर्ती रानडे, ज्ञानकोशकार केतकर याना अभिप्रेत असणारे भारतीय अर्थशास्त्र निर्माण करता आले का ? भारताच्या संदर्भात त्याना काही सिद्धान्त सांगता आले का ? हे महत्त्वाचे प्रश्न शिल्लक राहतात. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की, असे काही सिद्धान्त सांगता येतील या सुप्त जाणीवेतून त्यानी अत्यंत काळजीपूर्वक आणि हिरिरीने प्रयत्न केले असले तरी प्रत्यक्ष सिद्धान्त मांडण्याच्या प्रयत्नात त्याना यश आले नाही. त्यासाठी त्याना पुरेसा वेळ देता आला नसावा. गाडगीळांचे बुद्धीसामर्थ्य आणि त्यांची वैचारिक बैठक लक्षात घेता हे कार्य त्याना करता आले असते हे मात्र निर्विवाद सत्य आहे. गाडगीळांप्रमाणे त्यांच्या समकालीन तसेच नंतरच्या भारतीय अर्थशास्त्रज्ञांकडे पाहिले तर हे जाणवते की अन्य अर्थशास्त्रज्ञांना या 'भारतीय अर्थशास्त्राच्या ' विचाराने फारसे प्रभावित केलेले नाही. विकासाच्या अर्थशास्त्रात, आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रात न्यूनविकसित अर्थव्यवस्थेच्या संदर्भात काही नव्याने मांडणी होत असली तरी पूर्णपणे अशा अर्थव्यवस्थेच्याबाबत सिद्धान्त मांडण्यात अत्यल्पच यश प्राप्त झाले आहे. यासाठी अधिक प्रयत्नांची आवश्यकता आहेच पण त्याबरोबरच आर्थिक व आर्थिकेतर घटकांना एकत्रित करून , त्यांच्यात समन्वय साधून जाणीवपूर्वक गाडगीळ यानी घालून दिलेल्या पाऊलवाटेवरून पुढे जाण्याची आवश्यकता आहे.

## 5 अलीकडील कालातील भारताची औद्योगिक उत्क्रान्ती

गाडगीळानी जी अनेक पुस्तके लिहिली त्यामध्ये 1924 मध्ये प्रसिद्ध झालेल्या *Industrial Evolution of India* या प्रबंधाचे महत्त्व आजतागायत टिकून आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या आगमनापासून भारतात उद्योगीकरणाची प्रक्रिया कशा प्रकारे थांबली आणि ब्रिटिश सरकारच्या धोरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील ही प्रक्रिया खंडित झाली याचे विवेचन न्यायमूर्ती रानडे आणि रमेशचंद्र दत्त यानी एकोणिसाव्या शतकात केले. भारतात लघु उद्योगांच्या अवनतीबरोबरच दुसऱ्या बाजूने सुती कापड, ताग उद्योगांचा विकासही सुरू झाला. याचा अभ्यास होणे गरजेचे होते. 1918 च्या औद्योगिक आयोगाच्या अहवालात जरी या बाबींचा उल्लेख असला तरी भारतात नव्याने स्थापन झालेल्या आणि विकसित झालेल्या उद्योगांच्या अधिक व्यापक व शास्त्रीय अध्ययनाची गरज होती. ही गरज गाडगीळांच्या प्रबंधाने दूर केली. पहिल्या आवृत्तीत 1860 ते 1914 हा कालखंड अंतर्भूत केला आहे. त्यानंतरच्या आवृत्त्यांमध्ये मूळ मजकूर तसाच ठेऊन नवीन कालखंडाचा समावेश केला आहे. जसे, दुसऱ्या आवृत्तीत 1914 ते 1928 या कालखंडासाठी स्वतंत्र प्रकरण आहे. नंतरच्या आवृत्तीत 1929 ते 1939 हा कालखंड अंतर्भूत केला.

प्रस्तुत पुस्तकात अध्ययनाच्या दृष्टीने 1860-80, 1880-95 आणि 1895-1914 हे तीन मुख्य कालखंड केलेले आहेत. हे कालखंड उत्कर्ष व त्यानंतर अधोगती असे एकानंतर दुसरे येणारे कालखंड आहेत.

1860 ते 1880 हा कालखंड शिपायांच्या बंडानंतरचा कालखंड असल्याने अर्थव्यवस्थेत दुरुस्ती सुरु झाली होती. दक्षिणेतील प्रांतांमध्ये शेतकऱ्यांची परिस्थिती बिघडल्यामुळे असंतोषाची स्थिती निर्माण झाली. एका बाजूने दुष्काळाची प्रतिकूलता तर दुसऱ्या बाजूने जागतिक स्थितीत झालेले बदल (जसे, सुएझ कालवा सुरू होणे) या घटनांचा प्रभाव त्यांनी स्पष्टपणे मांडला. 1870-80 या दशकात शेतीची प्रगती समाधानकारक वाटली तरी हस्तोद्योगाची अवनती झाली. भारतीय अर्थव्यवस्थेत 1880-95 या कालखंडात कापूस व ताग या व्यापारी पिकांचे महत्त्व वाढले. अन्नधान्याच्या उत्पादनात मात्र फारशी वाढ झाली नाही. या कालात शासनाचे शेतीविषयक निश्चित धोरण नव्हते. कापड व ताग गिरण्या तसेच चहा लागवड व्यवसाय इत्यादींमध्ये सावकाश वाढ झाली पण नवीन उद्योग स्थापन झाले नाहीत. सन 1881 मध्ये पहिला निर्माणी कायदा संमत झाला. औद्योगिक श्रमिकांच्या स्थितीबाबतचे वर्णन गाडगीळांनी फार चांगल्या प्रकारे केले आहे. तिसऱ्या कालखंडाची (1895 ते 1914) सुरुवात भयानक अशा दुष्काळापासून झाली. शेती व्यवसाय आणि औद्योगिक क्षेत्रावर त्याचे विपरित परिणाम झाले. शेती व्यवसायातील मंदीचा परिणाम औद्योगिक क्षेत्रावर कशा प्रकारे झाला याचे विश्लेषण गाडगीळांनी केले. शेतीच्या क्षेत्रातील ही मंदी 1905 नंतर कमी व्हावयास लागली. या कालखंडातील रेल्वे, सिंचन आणि शहरांच्या वाढीबाबत गाडगीळांनी चांगल्या प्रकारचे विवेचन केले आहे.

या शेवटच्या कालखंडातील विवेचनात स्वदेशी आंदोलन आणि त्याच्या परिणामांचा विचार झाला नाही. आणखी महत्त्वाची बाब म्हणजे अभ्यासकांना विदेशी विनिमय दराबाबतच्या समस्येबाबत यात कोणताही उल्लेख नसल्याचे खटकते. शासनाच्या राजकोषीय धोरणाचा आर्थिक अभिवृद्धीशी कोणता संबंध आहे या प्रश्नाकडेही लक्ष दिले गेले नाही. पहिल्या आवृत्तीनंतर पुढील आवृत्तीत केवळ कालखंडातील वाढ नसून गाडगीळांच्या दृष्टिकोनात झालेला बदलही जाणवतो.

दुसऱ्या आवृत्तीतील 1914 ते 29 या कालखंडाशी संबंधित प्रकरण बरेच मोठे आहे. त्यांना आता कोणत्यातरी पदवीसाठी लिखाण करावयाचे नव्हते. यावेळी त्यांनी ग्रामीण भागासाठी सहकारी पतपुरवठा कसा आवश्यक आहे याचे समर्थन केले आहे. त्यांनी विकासाला चलनविषयक धोरण अंशतः जबाबदार असल्याचे स्पष्ट केले. प्रशुल्क मंडळाच्या अहवालावरून त्यांनी हेही स्पष्ट केले की, प्रशुल्काचे धोरण हे ब्रिटिश उद्योगपतींच्या इच्छेनुसार ठरत होते.

या पुस्तकाची चौथी आवृत्ती काही बाबतीत महत्त्वाची आहे. सन 1929 ते 39 या कालखंडाचा त्यात अंतर्भाव केला आहे. त्याला नवीन प्रस्तावनाही जोडली आहे. जागतिक महामंदीसारख्या महत्त्वाच्या व गंभीर प्रश्नाचा विचार फार त्रोटकपणे केल्याची उणीव काही अभ्यासकांना जाणवते. भारतीय उद्योग-व्यापारावर जागतिक मंदीचा जो अल्प प्रभाव पडला त्यामुळे बहुधा गाडगीळांनी थोडक्यात विवेचन केले असावे. हा 1929 ते 39 चा कालखंड संक्रमणाचा कालखंड आहे असे गाडगीळ नमूद करतात. हा संक्रमण काल दुसरे महायुद्ध संपवेल. त्यानंतर मात्र भारताचा सर्वसाधारण आर्थिक इतिहास लिहिणे अवघड जाईल असे त्यांना वाटते.

हा संक्रमण काल संपल्यावर देशाच्या आर्थिक विकासासाठी नियोजनाची गरज आहे का, नियोजनाद्वारे विकास कसा साधता येऊ शकेल, कोणत्या तंत्राचा वापर करता येईल, अशा मूलभूत बाबींवर या पुस्तकात तरी गाडगीळांनी मत प्रदर्शित केले नाही. (सन 1938 मध्ये काँग्रेसने राष्ट्रीय नियोजन समिती स्थापन केली होती.) स्वातंत्र्यानंतर भारताच्या आर्थिक नियोजनाबाबत या पुस्तकात सूतोवाच का केले नसेल?

गाडगीळांचे हे पहिले पुस्तक आदर्श प्रबंधाचा नमुना आहे असे मत अभ्यासकांनी वेळोवेळी या पुस्तकावर भाष्य करतांना व्यक्त केले आहे. विषयाची नेमकी मांडणी, तर्कसंगत विचारपद्धती, भाषा व विवेचनाचा

भारदस्तपणा या सर्व दृष्टीनीं ही एक 'कलाकृती' होती.

## 6 चौथी पंचवार्षिक योजना

गाडगीळ आणि भारतीय नियोजन यांचे अतूट नाते आहे. अर्थशास्त्रज्ञ मंडळाचे सभासद आणि नंतर योजना आयोगाचे उपाध्यक्ष म्हणून त्यानी केलेले कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. दुसरी पंचवार्षिक योजना म्हटली की जसे महालनविस यांची आठवण होणे अनिवार्य ठरते तसेच भारताची चौथी पंचवार्षिक योजना विचारात घ्यावयाचे ठरविले तर त्या योजनेच्या शिल्पकाराचा, गाडगीळांचा, प्रथम उल्लेख करावा लागतो.

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या कालात योजना आयोगापुढे सप्टेंबर 1951 मध्ये सविस्तर अशी टिपणी गाडगीळांनी सादर केली होती. पहिल्या योजनेचे परीक्षण त्यानी (1) गुंतवणुकीचा कार्यक्रम आणि त्याचे निर्धारण, (2) निर्धारित केलेली लक्ष्ये साध्य करण्यासाठी सुचविलेले उपाय आणि त्यांची पर्याप्तता व कार्यदक्षता आणि (3) भारताच्या राज्यघटनेतील सामाजिक निर्देशन (directives) आणि योजनेचे संभाव्य आर्थिक व सामाजिक परिणाम या मुद्यांच्या आधारे केले. त्यांच्या मते नियोजनाने एका बाजूने उत्पादनाच्या क्षेत्रात गुंतवणूक झाली पाहिजे आणि दुसऱ्या बाजूने अधिक रोजगार संधी निर्माण झाल्या पाहिजेत. अर्थव्यवस्थेत संपत्ती व उत्पन्नाचे योग्य वाटप झाले पाहिजे. या योजनेत या पैलूकडे दुर्लक्ष झाल्यामुळे सध्या असणाऱ्या आर्थिक शक्तीच्या या केन्द्रीकरणाच्या प्रवृत्तीवर मात करण्यासाठी उपायही सुचविले. आर्थिक विकास घडवून आणणाऱ्या योजनेकडून जी अपेक्षा असते ती अपेक्षा पूर्ण करण्यास पहिली योजना उपयोगी ठरणार नाही असे सांगताना पहिल्या पंचवार्षिक योजनेवर गाडगीळानी प्रश्नचिन्ह उमटविले. नवी दिल्ली येथील बुक क्लब या संस्थेतर्फे 1966 मधील डिसेंबर महिन्यात आयोजित एका परिसंवादासाठी गाडगीळांनी एक शोधनिबंध लिहिला. त्यात त्यानी पहिल्या तीन पंचवार्षिक योजनांचा परामर्श घेतला. या तीन योजनांमुळे प्राप्त यश हे तसे सीमित असून अपयश मोठे असल्याचे स्पष्ट केले. त्यात त्यानी अपयशाची काही कारणेही सांगितली ती कारणे अशी : (1) नियोजनास अनुरूप आर्थिक धोरण सरकारने आखले नाही ; किंबहुना असे धोरण आखण्याची टाळाटाळ करण्यात आली. (2) योजना प्रत्यक्षात उतरविताना ज्या देखरेखीची आवश्यकता असते तशी देखरेखीची यंत्रणा उभी केली नाही. मात्र विविध प्रकारचे निर्बंध लादून लाचलुचपत व वशिलेबाजी बोकाळली. विकासाचे फायदे त्यामुळे मूठभर व्यक्तींना प्राप्त झाले. (3) योजना मोठ्या प्रमाणावर विदेशी आर्थिक मदतीवर विसंबून राहात आहे. गाडगीळांनी याच वेळी आर्थिक स्थिती अनुकूल करण्यासाठी चलनवाढीच्या प्रवृत्तीला आळा घालून किमती स्थिर ठेवणे, उत्पन्नाच्या धोरणात बदल करून दुर्बल घटकांचे उत्पन्न वाढविणे आणि श्रीमंतांच्या उत्पन्नावर नियंत्रण ठेवणे असे महत्त्वाचे उपाय सुचविले.

गाडगीळानी 1 सप्टेंबर, 1967 रोजी योजना आयोगाचे उपाध्यक्षपद स्वीकारले. त्यावेळी कार्यदृष्ट्या आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात ते होते. भारताच्या तिसऱ्या योजनेच्या सुरुवातीपासूनच भारतीय अर्थव्यवस्थेत अनेक अडचणी निर्माण झाल्या होत्या. चीनशी झालेले युद्ध, पाकिस्तानशी 1965 मध्ये व तत्पूर्वी ही सुरू असलेला संघर्ष, 1965 व 1966 मध्ये असलेली दुष्काळाची स्थिती, किमतीत झालेली भरमसाठ वाढ, विदेशी विनिमयाचे निर्माण झालेले संकट आणि त्यामुळे 1966 चे रुपयाचे अवमूल्यन. परिणामतः तिसरी योजना संपल्यावर 1 एप्रिल, 1966 पासून चौथी पंचवार्षिक योजना सुरू न करता एकएक वर्षाच्या योजना आखाव्या लागल्या. याच कालात राजकीय अस्थैर्याचा परिणाम दिसू लागला होता. नियोजन चालू ठेवावे की नाही अशी परिस्थिती उद्‌भवली होती. भारतातील बडे भांडवलदार नियोजनाला रजा द्यावी असेही सुचवीत होते. काँग्रेसला 1967 च्या निवडणुकीत अपेक्षित यश मिळू शकले नाही. इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या. नियोजनावर डळमळलेला विश्वास निर्माण करण्याची आवश्यकता त्याना वाटत होती. असा विश्वास निर्माण करण्यासाठी नेहमीच्या

राजकारणाबाहेरील व्यक्तीस योजना आयोगाचे उपाध्यक्षपद द्यावे असा विचार बळावू लागला. उपाध्यक्षपदाची प्रतिष्ठा सांभाळणारा, भारतीय अर्थतज्ज्ञांमध्ये ज्यांच्या शब्दाला प्रतिष्ठा आहे, सामान्यांविषयी ज्याला सहानुभूती आहे आणि ज्याचे स्वत:चे वर्तन आदर्श आहे अशा गाडगीळांची या उच्च पदाकरिता निवड केली. गाडगीळांना विकास प्रक्रियेतून उत्पन्न व संपत्तीच्या न्याय्य वितरणाची अपेक्षा असली तरी ते सिद्धान्तनिष्ठ डावे विचारवंत नव्हते. योजना आयोगाच्या चौकटीत राहून ते कार्य करतील अशीही त्यांच्याविषयी खात्री होती.

गाडगीळ उपाध्यक्ष असताना त्यांच्या नावाने प्रसिद्ध असलेल्या गाडगीळ सूत्राचा (Gadgil Formula) प्रथम विचार करू. भारतात राज्यघटनेतील तरतुदींनुसार केन्द्राकडून राज्य सरकारांकडे वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार वित्तीय अंतरण होत असते. याव्यतिरिक्त पंचवार्षिक योजनेसाठी योजना आयोगाकडून राज्यांना मदत दिली जाते आणि केन्द्राकडून राज्यांना अन्य प्रकारचे अंतरण (transfer) होत असते. पहिल्या पंचवार्षिक योजनेत केन्द्राकडून सर्व राज्यांना या तीनही मार्गांनी जे एकूण अंतरण झाले त्यापैकी योजना आयोगाकडून होणाऱ्या मदतीचे प्रमाण 62.3 टक्के होते. हे प्रमाण दुसऱ्या योजनेत 46.9 टक्के तर तिसऱ्या योजनेत 48.9 टक्के होते. अन्य मार्गांपेक्षा योजना आयोगाकडून सर्व राज्यांना दिलेल्या मदतीचे प्रमाण सर्वात जास्त होते आणि तसे असणे स्वाभाविकच मानले पाहिजे. योजना आयोगाकडून दिल्या जाणाऱ्या मदतीचे निकष हे वस्तुनिष्ठ नव्हते. राज्यांच्या गरजेबाबत केन्द्र शासन व योजना आयोगाला काय वाटते यावर राज्यांना योजना आयोगाकडून मदत दिली जात असे. त्यापुढे बऱ्याचदा आर्थिकदृष्ट्या चांगल्या राज्यांना अधिक वाटा मिळत असे. या प्रक्रियेत ज्या निश्चित नियमांची आणि निकषांची आवश्यकता असते तिचा अभाव होता. इतक्या महत्त्वाच्या प्रक्रियेत लहरी निर्णय असू नयेत हे स्पष्ट होते. हा लहरीपणा गाडगीळांनी दूर केला.

सन 1969-70 पासून योजनेसाठी राज्यांना द्यावयाच्या मदतीत वस्तुनिष्ठ निकष वापरले जाऊ लागले. त्यासाठी जे सूत्र वापरले गेले त्याला 'गाडगीळ सूत्र' असे संबोधले जाते. या सूत्रानुसार 60 टक्के लोकसंख्या, राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी असल्यास दरडोई उत्पन्नास 10 टक्के, 10 टक्के चालू मोठे व मध्यम जलसिंचन प्रकल्प, 10 टक्के प्रत्येक राज्यांच्या स्वत:च्या विशेष समस्या आणि दरडोई उत्पन्नाच्या संदर्भात कर गोळा करण्याच्या प्रयत्नांना 10 टक्के असे भार देण्यात आले. तसेच राज्यांना योजनेसाठी द्यावयाच्या एकूण रकमेपैकी 30 टक्के रक्कम मदतीच्या स्वरुपात आणि 70 टक्के कर्जाच्या स्वरुपात दिली जाईल. ऑगस्ट 1980 मध्ये राष्ट्रीय विकास मंडळाने या सूत्रात काही दुरुस्त्या मान्य केल्या आहेत. या सूत्रात त्यापुढेही काही बदल झाले आहेत.

चौथ्या पंचवार्षिक योजनाकालात गाडगीळांच्या या सूत्राची सुरुवात झाली. त्याचप्रमाणे योजनेतील आणखी एका प्रश्नाची योग्य चर्चा होऊन दिशा देण्याचेही कार्य झाले. त्याचाही जाताजाता उल्लेख करावा लागेल. तो प्रश्न म्हणजे प्रादेशिक असमतोल.

भारताच्या पहिल्या व दुसऱ्या योजनेत विकेन्द्रीकरणाचे तत्त्व जरी मान्य झाले असले तरी विकेन्द्रीकरण अमलात आणणारी योग्य व प्रभावी पद्धती त्यावेळी नसल्याने नियोजनाच्या पहिल्या दशकात विकेन्द्रीकरण नुसते कागदोपत्रीच राहिले. तिसऱ्या योजनाकालात जिल्हा परिषदांच्या यंत्रणेतून विकेन्द्रीकरण सुरू झाले. नियोजनात विकेन्द्रीकरणाची चर्चा ही गाडगीळांनी 1966 मध्ये पुणे येथील काळे स्मृती व्याख्यानात दिलेल्या *District Development Planning* या व्याख्यानामुळे विशेषत्वाने चर्चिली जाऊ लागली. तळापासून नियोजन सुरू करण्याच्या दृष्टीने जिल्हा नियोजनाचे महत्त्व आहे. जिल्ह्याचा विकास आराखडा करताना त्यासाठी स्थानिक परिस्थितीचे पूर्ण ज्ञान आवश्यक आहे आणि स्थानिक समूहाचा सहभाग महत्त्वाचा आहे. जिल्ह्याचा विकासाचा

आराखडा नैसर्गिक साधनसंपत्तीवर आधारलेला हवा. त्यांचे दोहन (शोषन नव्हे !) व त्यांच्या विकास यामध्ये अभिप्रेत आहे. जिल्हा नियोजनाचे तंत्रही त्यांनी सांगितले. त्यांच्या जिल्हा नियोजनाला मंडीसंबंधित जिल्हा नियोजन म्हणता येईल. व्यूह, सविस्तर कार्ये व कार्यक्रम जिल्हा पातळीवर ठरवावी लागतील आणि त्यातील विस्तृत व बारकाव्याने कराव्या लागणाऱ्या गोष्टी (उदाहरणार्थ, नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन, उत्पादन मंडीच्या पातळीवर ठरवावे लागतील. चौथ्या योजनेत जिल्हा नियोजनाला सुरुवात झाली. 1969 मध्ये जिल्हा नियोजन करण्याच्या दृष्टीने योजना आयोगाने मार्गदर्शनात्मक बाबी स्पष्ट केल्या.

चौथ्या पंचवार्षिक योजनेत जो व्यूह वापरला त्याला 'गाडगीळांचा व्यूह' म्हटले जाते. 'स्थैर्यासह विकास' हा चौथ्या योजनेचा मुख्य उद्देश होता. गाडगीळांचा हा व्यूह तीन वैशिष्ट्यांवर आधारला आहे: (1) नवा शेतीविषयक व्यूह; (2) औद्योगिक नियोजन आणि (3) विदेशी व्यापार व मदतीच्या बाबत नवीन धोरण. विकासाबरोबरच अनिश्चितता कमी करण्याचा प्रयत्न केला गेला. विदेशी मदतीवर पुढील कालात अवलंबून न राहण्याचे धोरण स्वीकारले. प्रादेशिक विषमता दूर करण्यासाठी निश्चित उपाययोजना केली गेली. सरकारी क्षेत्राची क्षमता वाढावी म्हणून विशेषज्ञांना आणि तंत्रज्ञांना महत्त्व दिले गेले. अशी काही महत्त्वाची वैशिष्ट्ये या योजनेची सहजपणे दृग्गोचर होतात. मात्र ही योजना निश्चित करण्यास अधिक वेळ लागला, उत्पादनाची लक्ष्ये अपेक्षेपेक्षा कमी ठेवण्यात आली, श्रमशक्तीचे योग्य नियोजन केले नाही, किंमत धोरण निश्चित केले नाही अशा काही प्रमुख उणीवा सांगताना काही अभ्यासकांनी या योजनेत अर्थव्यवस्थेची आर्थिक-सामाजिक संरचना बदलविण्याचा काही प्रयत्न झाला नाही म्हणून नाराजी व्यक्त केली होती. समाजवादी समाजरचनेच्या उद्दिष्टापासून ही योजना दूर जात आहे असेही म्हटले गेले.

या सर्व प्रकारात एक मुद्दा अभ्यासकांनी विचारात घेण्याजोगा आहे. योजना आयोगाचे उपाध्यक्ष होण्यापूर्वी गाडगीळांनी योजना आयोगाच्या कामकाजावर जी टीका केली आणि नियोजनातील ज्या त्रुटी दाखविल्या त्या सर्व टीका पूर्णांशाने बरोबर नव्हत्या असे त्यांना आढळून आले. त्यांनी त्यामुळे आपली आग्रही भूमिका कमी केली आणि अर्थव्यवस्थेच्या वास्तव्याशी मिळते घेतले असे मत अ.रा. कामत (1974) यांनी व्यक्त केले आहे. उपाध्यक्षपदाचा त्यांना राजीनामा द्यावा लागला. ज्या इराद्याने त्यांनी हे पद स्वीकारले त्यात त्यांना यश मिळाले का ? वि.म. दांडेकर (1974) यांनी या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी देऊन त्याबाबतची काही कारणेही सांगितली आहेत. य.दि. फडके (1974) यांनी गाडगीळांनी ज्या परिस्थितीत राजीनामा दिला त्याची अस्सल कागदपत्रे पाहिल्याशिवाय निश्चित मत देणे व कारणे सांगणे कठीण आहे असे लिहिले. याबाबत जिज्ञासूंनी कामत (1974) यांचा 'प्रा. ध.रा. गाडगीळ: अखेरची चार वर्षे' हा दीर्घ लेख अवश्य वाचावा.

## 7 समारोप

या शतकातील थोर भारतीय अर्थशास्त्रज्ञांमध्ये धनंजयराव गाडगीळ यांचे नाव प्राधान्याने घ्यावे लागेल. सतत 45 वर्षे विविध आर्थिक प्रश्नांचा अभ्यास करणे आणि त्यावर आपले स्वतःचे मत नोंदविणे असे कोणत्याही सच्चा पंडिताला शोभेल असे कार्य गाडगीळांनी केले आहे. त्यांची प्रखर बुद्धिमत्ता, विषयाकडे विविध दृष्टीने बघण्याचे कसब आणि विषयाच्या अध्ययनासाठी आणि त्याद्वारे सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी निःस्वार्थी बुद्धीने झटण्याची त्यांची तयारी या बाबी विलक्षण आहेत. ते केवळ अर्थशास्त्राचे विद्वान नव्हते तर कृतीशील होते. महाराष्ट्रातील सहकार चळवळीचे ते प्रेरक होते. गाडगीळांना 'क्रान्तिकारक' हे विशेषण देता येणार नाही. तत्कालीन व्यवस्थेतच, त्या व्यवस्थेला धक्का न देता, सामाजिक परिवर्तनाची आणि आर्थिक विकासाची प्रक्रिया समजाऊन घेत तिच्यात बदल कसे करता येतील हे सांगणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी कोणताही 'वाद' स्वतःभोवती चिकटून घेतला नाही.

कोण्या एका वादाचे त्यांनी नेतृत्व केले नाही. त्यांची भूमिका समन्वयाची व शुद्ध आणि सात्विक आचरणाची होती.

सन 1923 मध्ये गाडगीळांनी पहिला लेख मराठीतून लिहिला. मजूर म्हणून ब्रिटनला गेलेल्यांचे तेथे कसे हाल होतात हे सांगताना त्यांनी लिहिले आहे, ''हल्लीची आर्थिक स्थिती ज्या पायावर उभी आहे तो पायाच बदलल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही.'' ही परिस्थिती समाजाला समजावून सांगण्याचे व परिस्थितीत सुधारणा करण्याचे कार्य न थांबता, न दमता गाडगीळांनी केले. माझ्यासारख्या अनेकांना वाटून जाते की गाडगीळ हा पाया बदलविण्याच्या मूलभूत प्रश्नांकडे वळले असते, स्वत:च्या बुद्धीसामर्थ्याच्या जोरावर त्याची त्यांनी शास्त्रीय पद्धतीने छाननी केली असती तर अधिक ठोस व नवीन तत्त्वज्ञान त्यांना देता आले असते का ? पण तसे होणे नव्हते. शेवटी ज्या परिस्थितीतून आणि विचारधारेतून ते आले त्यातील समन्वय, समतोलाची भूमिका त्यांनी कसोशीने, धीरगंभीर वृत्तीने आणि धीरोदात्त नायकाप्रमाणे पार पाडली.

## संदर्भ सूची


1 Dandekar, V.M. (1971), 'D.R.Gadgil', *Economic and Political Weekly,* Vol. VI. 19.

2 Dandekar, V. M. (1971),' Dhananjaya Ramchandra Gadgil,' *Artha Vijnana,* 13,2.

3 Gadgil, D. R. (1959), *The Industrial Evolution of India in recent Times,* Oxford University Press, Calcutta.

4 Gadgil, D. R. (1972), *Planning and Economic Policy in India,* GIPE, Pune.

5 Gadgil, D.R. (1967), *District Development Planning,* GIPE, Pune.

6 Government of India, Planning Commission, *Fourth Five - Year Plan (1969-74).*

7 Jahagirdar, D.V. & M. D. Jahagirdar (1996),' Professor D. R. Gadgil's Thoughts on Indian Economics and Planning,' *IEA Conference Volume.*

8 Jahagirdar, D. V. & M.D. Jahagirdar (1998),' A Case for District Planning,' *IEA Conference Volume.*

9 Nagranjan and Sangamitra (1996), Economic Ideas of D.R. Gadgil,' *IEA Conference Volume.*

10 Kamat, A.R. (ed.) (1973), *Writings & Speeches of D. R. Gadgil on Planning and Development,* GIPE, Pune.

11 सोवनी, नी.वि. (1974), *माझे गुरू धनंजयराव गाडगीळ.*

12 ब्रह्मे, सुलभा (संपा.) (1973), *ध. रा. गाडगीळ लेखसंग्रह,* खंड 1 व 2, गोखले अर्थशास्त्र संस्था.

13 गाडगीळ, पां. वा. (1974),' ध. रा. गाडगीळ लेखसंग्रह (खंड 1)' (परीक्षण), *समाज प्रबोधन पत्रिका,* सप्टेंबर-ऑक्टोबर.

14 कामत, अ. रा. (1974) 'प्रा. ध. रा. गाडगीळ : अखेरची चार वर्षे,' *समाज प्रबोधन पत्रिका,* मे-जून.

# हिंदी अर्थशास्त्राचा पाया*

धनंजय रामचंद्र गाडगीळ **

*(धनंजयराव गाडगीळ यांचे विचार किती निश्चित स्वरुपाचे होते, त्यांच्या लिखाणात किती काटेकोरपणा व खोली होती आणि विषय मांडणीत व्यापकपणा कसा होता याची कल्पना यावी यासाठी हा लेख पुनर्मुद्रित केला आहे. याचबरोबर आणखी दोन बाबी समयोचित आहेत. पहिली, ज्ञानकोशकार श्री.व्यं.केतकर यांनी **'महाराष्ट्रीय ज्ञान कोश'** (पुणे,1924) मध्ये 'हिंदी अर्थशास्त्र' असण्याची आवश्यकता स्पष्ट केली आहे (पृष्ठे 463-73). त्याचा प्रतिवाद करणारा लेख गाडगीळांनी 'स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्राची आवश्यकता' या शीर्षकाखाली **'विद्यासेवक'** मासिकात (नोव्हें.-डिसें., 1924, पृष्ठे 11-17) प्रसिद्ध केला. या संदर्भात गाडगीळांचा दुसरा (1942) व केतकरांच्या मताला पुष्टी देणारा लेख आम्ही इथे छापत आहोत. दुसरे, भारतीय अर्थशास्त्राचे जनक म्हणून ज्यांचा उल्लेख होतो त्या न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे 2001 हे मृत्यूशताब्दी वर्ष आहे. त्यांच्या (प्रस्तुत विषयाच्या संबंधातील निबंधाचा) गाडगीळांच्या प्रस्तुत लेखात विस्ताराने ऊहापोह केलेला आहे. यास्तव गाडगीळांच्या या लेखाच्या पुनर्मुद्रणामुळे केतकरांच्या विचाराची ओळख, रानड्यांच्या मृत्यूशताब्दीनिमित्त त्यांना आदरांजली आणि गाडगीळांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या वैचारिक पैलूला स्पर्श करण्याचे तिहेरी उद्दिष्ट साधले जात आहे. प्रस्तुत लेख या विशेषांकात छापण्याची परवानगी दिल्याबद्दल आम्ही संचालक, गोखले अर्थशास्त्र संस्था यांचे आभारी आहोत.*

***– प्रमुख संपादक)***

एकोणीसशे बेचाळीस साली न्यायमूर्ती रानडे यांच्या जन्मास 100 वर्षे लोटतात व त्याच साली त्यांनी 'हिंदी

** सह्याद्री (रानडे विशेषांक), दिनांक 1 जानेवारी, 1942, पृष्ठे 31-38 मध्ये प्रथम प्रसिद्ध झालेला लेख. पुनर्मुद्रण ब्रह्मे, सुलभा (संपा.) (1973), ध.रा. गाडगीळ लेखसंग्रह, खंड 1, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे.*

*** भूतपूर्व संचालक, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे आणि भूतपूर्व उपाध्यक्ष, राष्ट्रीय नियोजन आयोग, नवी दिल्ली.*

अर्थशास्त्र' या विषयावर केलेल्या विवेचनाला 50 वर्षे पुरी होत आहेत. 'हिंदी अर्थशास्त्र' या विषयावरील निबंधातील विचार न्यायमूर्तींनी प्रथम 1892 साली डेक्कन कॉलेजातील एका व्याख्यानप्रसंगी पुढे मांडले. याच्या आधी विशिष्ट आर्थिक विषयावर जरी त्यानी बरेच लेख लिहिले होते व नंतरही काही विवेचने केली, तरी वरील व्याख्यानात ज्या पद्धतीने त्यानी अर्थशास्त्र व आर्थिक धोरण यांच्या मूलतत्त्वांचा विचार केला आहे ती पद्धत इतरत्र आढळत नाही. या निबंधात आपल्या अर्थशास्त्राच्या व्यापक वाचनाचे व हिंदी आर्थिक परिस्थितीच्या अभ्यासाचे व अवलोकनाचे सर्व सार रानडे यांनी ओतले आहे. यामुळे त्यांच्या अर्थशास्त्रविषयक विचारांची बैठक या लेखावरून समजून येते. तसेच नवीन पद्धतीच्या हिंदी आर्थिक प्रश्नांच्या विचाराचा उगमही येथूनच झाला असे म्हणण्यास हरकत नाही.

रानडे यांच्या या लेखाची व्याप्ती आणि त्यातील विचारांचे मूलगामित्व इतके आहे की त्याचे विस्ताराने विवेचन एका लेखात करणे अशक्य आहे. म्हणून या निबंधातील प्रमुख विचार सारांशाने देणे व त्यांचे आजतागायत महत्त्व थोडक्यात दाखविणे एवढेच करण्याचे आम्ही योजले आहे.

## रानड्यांचा मुख्य निष्कर्ष

या निबंधाच्या सुरुवातीसच रानडे यांनी एकंदर भूमिका स्पष्ट केली आहे. सर्व प्रकारच्या समाजशास्त्रांस निश्चित, सनातन, सर्व काळी व सर्व स्थळी लागू पडणारी प्रमेये कोणासही मांडता येणार नाहीत, हाच या लेखातील पहिल्या परिच्छेदात मांडलेला सिद्धांत होय. समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र या सर्व शास्त्रांतर्गत प्रश्नांचा कालपरिस्थित्यनुरूप सापेक्षतेने विचार करावा लागतो. म्हणून इंग्रज अर्थशास्त्रज्ञांच्या पुस्तकातून प्रतिपादिलेल्या तत्त्वांचा पुरस्कार आपल्याकडे बिनधोक करता येणे शक्य नाही. कारण इंग्लंडमधील परिस्थिती व हिंदी परिस्थिती यांत अनेक दृष्टींनी जमीन-अस्मानाचे अंतर आहे. हिंदुस्थान व इंग्लंड यांमधील या भिन्नत्वामुळे समाजविकास किंवा समाजधारणेची तत्त्वे या दोन देशांत एक असणे शक्य नाही, असे रानडे यांनी अनेक उदाहरणे देऊन दर्शविले. ज्यांचे मूलभूत सिद्धान्त त्रिकालाबाधित आहेत अशा पदार्थविज्ञान अथवा खगोलशास्त्राप्रमाणे जर अर्थशास्त्र असते तर गोष्ट निराळी. परंतु वेळ, परिस्थिती, व्यक्तींची कुवत व त्यांच्या आकांक्षा, समाजसंस्थांची व शासनसंस्थांची बंधने या सर्वांचा जेथे निकट संबंध येतो, तेथे सर्वच ठिकाणी व नेहमीच सारखे सिद्धांत लागू पडणे शक्य नाही. या प्राथमिक विवेचावरूनच रानडे यांची भूमिका किती व्यापक आणि त्यांची विचारसरणी किती शुद्ध होती हे दिसून येईल. यानंतरच्या विवेचनात तपशिलात शिरून एकंदर इंग्रजी अर्थशास्त्राचा इतिहास व त्या शास्त्रातील सिद्धांताची ग्रहीत प्रमेये यांची छाननी त्यांनी केली आहे.

जरी सुरुवातीचे काही इंग्रज लेखक आपले सिद्धांत मांडताना प्रत्यक्ष परिस्थितीचा सतत विचार आपण करीत आहो असे समजत तरी मिल्ल, केरन्स इत्यादी आधुनिक लेखकांस या बाबतीतील उणेपणा काहीसा कळून आला आहे, असे रानडे यांनी दर्शविले आहे. परंतु या सर्वच इंग्रज अर्थशास्त्रज्ञांनी आपल्या विवेचनात काही गोष्टी स्वतःसिद्ध मानल्या आहेत. या बाबी जरी इंग्लंडपुरत्या गृहीत धरणे योग्य वाटले, तरी हिंदुस्थानात त्यांचे अस्तित्व केव्हाही गृहीत धरता येणार नाही. बेझट, जेव्हन्स, सिजिक इत्यादी आधुनिकांना सनातन इंग्रजी अर्थशास्त्राची बैठक सदोष वाटते व तिची व्याप्ती प्रचलित इंग्रजी परिस्थितीपुरतीच आहे हेही त्यांस कळून चुकले आहे. परंतु इंग्रजेतर लेखकांतच एकंदर सनातन इंग्रजी विचाराविरुद्धचा प्रवाह इंग्रज लेखकांपेक्षा अधिक स्पष्ट दिसतो. ॲडम स्मिथ व त्याचे समकालीन लेखक यांच्या विचाराच्या ओघाची दिशा ज्याप्रमाणे पूर्वकालीन परिस्थितीविरुद्ध प्रतिक्रिया अशा स्वरूपाचीच उघड दिसते, त्याचप्रमाणे नवीन जर्मन-विशेषतः लिस्ट- व अमेरिकन अर्थशास्त्रज्ञांच्याही भूमिकेचे स्वरूप आहे. सर्व प्रकारे नियंत्रित व निर्बंधित आर्थिक व्यवस्थेचे

दुष्परिणाम जेव्हा विशेष भासू लागले तेव्हा निसर्गसिद्ध हक्क व वैयक्तिक स्वातंत्र्य यांचे महत्त्व प्रत्येक क्षेत्रातील तत्त्वज्ञ प्रतिपादू लागले. याच्या उलट अनिर्बंध व्यवहार, खुला व्यापार, पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य ही जेथे देशकालपरिस्थितीस पोषक नाहीत असे दिसून आले, तेथे त्यांच्याविरुद्ध राष्ट्रव्यवस्थेवर जोर देण्यात येऊ लागला. इंग्रज अर्थशास्त्रज्ञांनी आपले सिद्धांत काही गृहीत प्रमेये धरून त्यापासून परिस्थितीचा विचार न करता केवळ तर्काने काढले, तर आता इतर अर्थशास्त्रज्ञ इतिहास, परिस्थितीचा अभ्यास व आकडेशास्त्र यांची जोड घेऊनच अर्थशास्त्रीय सिद्धांत बसविले पाहिजेत असे प्रतिपादू लागले आहेत. हे सर्व विवेचन रानडे यांनी निरनिराळ्या अर्थशास्त्रज्ञांची नावे देऊन व त्यांचे प्रमुख सिद्धांत त्रोटकपणे सांगून सजविले आहे. या सर्व विवेचनाचा पुढीलप्रमाणे निष्कर्ष रानडे यांनी काढला आहे. अर्थशास्त्र हे व्यापक समाजशास्त्राचेच एक उपांग असल्यामुळे त्याचा विचारही मुख्यत: मानवेतिहासदृष्ट्या प्रत्यक्ष परिस्थिती अभ्यासून केला पाहिजे. त्यांतील सिद्धांतांची सापेक्षता सतत लक्षात ठेवली पाहिजे व या सर्व अभ्यासाचे ध्येय मुख्यत: समाजहित साधणे हे आहे हेही विसरता उपयोगी नाही. म्हणूनच आपणांस हिंदुस्थानच्या परिस्थितीस अनुरूप असाच विचार करणे प्राप्त आहे.

## काही रूढ सिद्धांतांची विचिकित्सा

रानडे यांनी हिंदी परिस्थितीबद्दल विचार करताना मुख्यत: दोन-तीन सिद्धांत परिक्षिले. भूपृष्ठाच्या भिन्न खंडाखंडातील आर्थिक व्यवसाय-विभागणी-बाबतचा सिद्धांत हा त्यांतील पहिला होय. उष्ण प्रदेशांतील लोकांनी कृषिव्यवसाय नेहमी करावा व समशीतोष्ण प्रदेशातच आर्थिक धंदे चालावे, असे यांत्रिक युगातील काही इंग्रज अर्थशास्त्रज्ञ प्रतिपादीत. त्यांच्या मते हा जणू एक निसर्गसिद्ध नियमच होता. रानडे यांनी याविरुद्ध जुना इतिहास व पुढील शक्यता यांकडे बोट दाखवून सद्य:कालीन परिस्थिती ही कशी तात्कालिक आहे हे स्पष्ट केले आहे. केवळ अलीकडील यांत्रिक उत्पादनाच्या स्पर्धेमुळे व तेही परकीय राज्यकर्त्यांनी या देशाच्या हिताचा दूरदृष्टचा विचार न केल्यामुळे हिंदुस्थान व तत्सम देश हे फार मोठ्या प्रमाणात शेतकीप्रधान झाले. कोणाचाही तात्पुरता फायदा कितीही असला तरी ज्यात सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवसायांचे अस्तित्व योग्य प्रमाणात टिकून राहते अशा प्रकारचीच व्यवस्था शाश्वत व हितावह आहे; आणि म्हणून नवीन परिस्थितीमुळे जुने व्यवसाय बुडाले, काही जुनी पिके बिनफायदेशीर झाली तर हा परिस्थितीचा दोष असे मानून असहायपणे स्वस्थ न बसता, नवीन वसाहती वसविणे व कृषिव्यवस्थेस पद्धतशीर नवीन वळण लावणे हे शासनसंस्थेचे कर्तव्य आहे, असेच केव्हाही खरे अर्थशास्त्र मानील. तसेच खंड हा जमीनदाराचा निसर्गसिद्ध हक्क आणि त्याचे व कुळाचे किंवा धनकोचे व ऋणकोचे संबंध हे नेहमी अनियंत्रित असले पाहिजेत असे न मानता, व्यापक समाजहिताचा विचार करून संपत्तीची न्याय्य विभागणी करणे व जेथे शिरजोर जुलूम करीत आहेत तेथे गरीब व दुबळ्यांचे संरक्षण करणे हेच सरकारचे खरे कर्तव्य ठरते. यापुढे जाऊन एकंदर सरकारी अधिकाराच्या अगर जबाबदारीच्या मर्यादेचा विचार केला असता त्याबद्दल कोणताच शाश्वत सिद्धांत मांडता येत नाही असे रानडे स्पष्ट लिहितात. हा प्रश्न व्यक्तिगत हक्क अगर आचारस्वातंत्र्य यांबद्दलचा विचार करून सुटण्यासारखा नाही. काल व परिस्थिती, युक्तता व व्यवहार्यता यांकडे पाहूनच तो सोडवावा लागेल. इंग्लंडांतही सरकारने बऱ्याच नवीन जबाबदाऱ्या अलीकडे पत्करल्या आहेत व हिंदुस्थानात तर त्यास अनेक क्षेत्रांत प्रवेश करणे प्राप्त आहे. या बाबतीत अमेरिका व युरोप खंडांतील काही देश यांतील परिस्थितीशी हिंदुस्थानचे इंग्लंडपेक्षा पुष्कळच जास्त साम्य आहे, म्हणून तेथील अनुभव व तेथील विचार आपणांस जास्त लागू पडतात असे समजून आपले राष्ट्रीय धोरण आखणे आवश्यक आहे.

## 'हिंदी राष्ट्रीय अर्थशास्त्र'

रानडे यांच्या या लेखाचा मथळा 'इंडियन

पोलिटिकल इकॉनमी' असा आहे. याचे भाषांतर 'हिंदी अर्थशास्त्र' असे केले तर ते पूर्णपणे यथार्थ होत नाही. अ‍ॅडॅम स्मिथच्या ग्रंथाचा प्रमुख विषय राष्ट्राच्या संपत्तीची वाढ असा होता व त्याच्यानंतर जवळजवळ 100 वर्षेपर्यंत या स्मिथप्रणीत शास्त्रास नुसते 'अर्थशास्त्र' किंवा 'संपत्तीशास्त्र' न म्हणता 'राष्ट्र-संपत्तीशास्त्र' (पोलिटिकल इकॉनमी) असेच म्हणण्याचा प्रघात होता. त्यावेळी अर्थातच एकंदर राष्ट्र-संपत्तीचा साकल्याने विचार करणे व सरकारी धोरणाचा विशेषाने ऊहापोह करणे हे शास्त्राचे प्रमुख अंग समजले जात असे. अलीकडे समाज, राष्ट्र व सरकार यांवर जुन्या काळी देण्यात येणारा भर कमी करण्यात आला असून सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवहारांचा सर्वसामान्य विचारच विशेषाने केला जातो. म्हणूनच राष्ट्र-संपत्तिशास्त्राचे ऐवजी केवळ संपत्तिशास्त्र अथवा अर्थशास्त्र हे नाव आज या शास्त्रास जास्त अन्वर्थक वाटते. हे अलीकडील नाव रानड्यांच्या काळी तितकेसे रूढ झालेले नव्हते. शिवाय रानड्यांची दृष्टी समाजहित व राष्ट्रहित यांजवरच जास्त होती. त्यामुळे त्यांनी आपल्या निबंधास 'इंडियन इकॉनॉमिक्स' - हिंदी अर्थशास्त्र - असे नाव न देता, 'इंडियन पोलिटिकल इकॉनमी' - हिंदी राष्ट्रीय अर्थशास्त्र- असे नाव दिले असावे. या निबंधात रानडे यांनी ज्याप्रमाणे हिंदी परिस्थिती ध्यानात घेतली असता आर्थिक व्यवहाराबाबत कोणत्या प्रकारचे सिद्धांत बांधता येतात याचा विचार केला, त्याचप्रमाणे हिंदी राष्ट्रास कोणते आर्थिक धोरण स्वीकारणे युक्त ठरेल याबद्दलही आपले विचार मांडले आहेत. अलीकडे इंग्लंडातही कारखाने, मजूरसंघ इत्यादींच्या व्यवहारांवर सरकारी निर्बंध घालण्यात येऊन निर्भेळ, अनिर्बंध व्यवहाराच्या तत्त्वास बाध आला आहे. हिंदुस्थानातील परिस्थिती फार मागासलेली. तेथे स्वयंस्फूर्तीने नवीन गोष्टी करण्याची एतद्देशीयात प्रथा नाही. तेव्हा येथील शासनसंस्थांना - विशेषतः इंग्रज सरकारला - स्वतःला पुष्कळच बाबतीत पुढाकार घेणे जरूर आहे. कापूस, कोळसा, चहा इत्यादिकांच्या उत्पादनाविषयी सरकारने थोडे प्रयत्न केले आहेतच ; पण या देशाचे एकंदर क्षेत्र व येथील विविध उत्पादनसाधने यांच्या मानाने ते फारच अपुरे पडतात. जरी राजकीय कारणांमुळे संरक्षक जकाती लादणे सरकारास शक्य नसले तरी नवीन धंद्यांचा उपक्रम अगर त्यांना हरतऱ्हेने मदत करणे हे सरकारास खचित करता येईल. त्याचप्रमाणे आधुनिक पद्धतीची राष्ट्रीय पतपेढी व्यवस्था (banking system) उभारणे किंवा सरकारास लागणाऱ्या सर्व जिनसांच्या पुरवठ्यासाठी स्थानिक मालाचा उपयोग करून घेणे, या गोष्टी सरकारी कर्तव्याच्या मर्यादेत येतात.

रानडे यांनी या निबंधात मांडलेल्या प्रमुख विचारांचे येथवर दिग्दर्शन झाले. हे मुद्दे 50 वर्षांनंतर पारखले असता त्याबाबत काय म्हणता येईल एवढेच आता थोडक्यात सांगावयाचे.

## विचारांची काल - परिस्थिति - सापेक्षता

रानड्यांची दृष्टी फार व्यापक होती. त्यामुळे त्यांनी आपल्या विचारांची बैठक अशी मांडली आहे की, एवढ्या कालावधीनंतर तीत कोठेही जुनेपणा दिसून येत नाही. जो लेखक केवळ आपल्या काळापुरता अगर परिस्थितीपुरता विचार करून लिहितो त्याचे लिखाण तात्कालिक परिणामी ठरले तरी ते पुढील पिढीस उद्बोधक वाटत नाही. रानड्यांच्यासारख्या द्रष्ट्यांचे असे नसते. एखाद्या केवळ तात्पुरत्या महत्त्वाच्या बाबीसंबंधी जरी त्यांनी लिहिले तरी ते असे मूलभूत सिद्धांत मांडून लिहिलेले असावयाचे की त्यांचे सिद्धांत परिस्थिती पूर्ण बदलल्यावरही भावी पिढीस मार्गदर्शक व्हावे. हा निबंध लिहिताना तर रानडे बुद्ध्याच मूलभूत सिद्धांताबद्दल लिहीत होते. तेव्हा त्यातील लिखाण आजही मौलिक ठरल्यास आश्चर्य नाही. या निबंधातील सिद्धांत क्रमाक्रमाने घ्यावयाचे तर पहिला सिद्धांत समाजशास्त्राच्या मूलभूत विचाराची काल-परिस्थिती-सापेक्षता हाच घ्यावा लागेल. 19 व्या शतकात भौतिकशास्त्राची जी अद्भूत प्रगती झाली त्यामुळे सर्व लोकांचे डोळे दिपून गेले व त्या शास्त्रात अवलंबिलेल्या पद्धतीने समाजविषयक प्रश्नांचा विचार केल्यास

निरनिराळ्या समाजशास्त्रांतही अशीच प्रगती होऊन आपणांस मूलगामी सिद्धांत शाश्वत बसवता येतील असे कित्येकांस - विशेषतः इंग्रज शास्त्रज्ञांस - वाटत होते. हा ग्रह आता फार दिवसांच्या अनुभवाने बदलला आहे. भौतिकशास्त्राने अवलंबिलेली विचारपद्धतीही खरे पाहता काही नवीन नाही. पाश्चात्य विचारौघातही ग्रीक तत्त्ववेत्त्यांनी अवलंबिलेल्या विवेचनपद्धतीहून निराळे असे तीत काहीच नव्हते. फक्त इतक्या व्यापक क्षेत्रात व सतत इतका कालपावेतो या पद्धतीचा उपयोग पूर्वी करण्यात आला नव्हता, एवढाच त्यातील फरक होय. 15 व्या शतकापासून पुढे विशिष्ट अनुकूल परिस्थितीमुळे युरोपात सृष्ट जगाच्या निरीक्षणाबाबत तो करण्यात आला व त्याचे फळही फार चमत्कृतिजनक असे आले.

भौमिकशास्त्राची करामत आणि त्यातील शास्त्रज्ञांनी आपापल्या क्षेत्रात मिळविलेला निर्विवाद अधिकार ही पाहून समाजशास्त्रज्ञांस आपणही तसेच प्रगत व्हावे असे वाटणे साहजिक होते. परंतु अनेक मूलभूत अडचणींमुळे त्यांस ते शक्य झाले नाही व आजही शक्य होईलसे वाटत नाही. अर्थशास्त्र हे सर्वसामान्य अर्थव्यवहाराबद्दलचे त्रिकालाबाधित सिद्धांत बांधणारे शास्त्र आहे असा आव अगदी अलीकडील काही अर्थशास्त्रज्ञ आणतात. परंतु या त्यांच्या प्रतिपादनाचा फोलपणा त्या सर्वांच्या लिखाणाकडे पाहिले असता सहज दिसून येतो. भौतिक शास्त्रांतील प्रगतीची मुख्य साधने म्हणजे व्यापक निरीक्षण व नियंत्रित प्रयोग. यांपैकी दुसरे साधन समाजशास्त्रास उपलब्धच नाही असे म्हटले तरी चालेल. व्यापक निरीक्षणाबाबतही अनेक अडचणी आहेत. केवळ माहिती मिळविण्याच्या अडचणी जरी सोडून दिल्या तरी निर्हेतुक व निर्विकार निरीक्षणाच्या शक्यतेची अडचण ही खरोखर मूलगामी आहे. विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट लोक विशिष्ट रीतीने वर्ततात याबद्दल त्यांच्या बाह्य वर्तनाचे सूचक म्हणून जरी काही माहिती व आकडे गोळा केले, तरी जेव्हा कार्यकारणसंबंध दाखविण्याची वेळ येते तेव्हा त्यांचे मनोव्यापार कसे चालतात याचा विचार केल्याशिवाय गत्यंतर उरत नाही. कारण मनुष्याची वागणूक ही निर्जीव पदार्थासारखी किंवा बहुतेक सजीव प्राण्यांसारखी अमुक परिस्थितीत अमुकच असावयाची असे गृहीत धरून चालणे शक्य नाही आणि या मनोव्यापारांबद्दल विचार केला म्हणजे एक तर निरीक्षकाच्या स्वतःच्या मनोवृत्तींचा निरीक्षणावर परिणाम होत नाही असे निश्चित सांगता येत नाही. कोणी कितीही म्हटले तरी त्याचे परीक्षण अगर निरीक्षण हे निर्हेतुक असते म्हणजे स्वतःच्या मनोवृत्तीशी त्याचा काही संबंध नसतो असे म्हणणे कठीण आहे.

### ताजे उदाहरण

याचे एक ताजे उदाहरण म्हणजे नवीन निरपेक्ष सिद्धांतपक्षीय अनेक इंग्रज अर्थशास्त्रज्ञांच्या विचारांचेच देता येईल. अर्थशास्त्रज्ञास इष्ट अगर साध्य काय याचा विचार कर्तव्य नाही, त्याने फक्त निर्हेतुक निरीक्षण करावे व त्यावरून निरपेक्ष सिद्धांत बांधावे असे यांतील बहुतेक जण नेहमी म्हणतात. पण या सर्वांचे लिखाण पाहिले म्हणजे ते सगळेच इतके पूर्वग्रहयुक्त प्रमेयांनी दूषित दिसते की, ज्या गोष्टी टाळाव्या असे ते म्हणतात त्या टाळणे त्यांना स्वतःलाच शक्य नाही हे उघड होते. अनिर्बंध व्यवहार, व्यक्तिस्वातंत्र्य, खुला व्यापार इत्यादी इंग्रज रक्तात मुरलेल्या सिद्धांतांचा प्रच्छन्न पुरस्कार शास्त्रीय लिखाणाचे नावाखाली केलेला पाहिला म्हणजे या शास्त्रीयतेच्या संभाव्यतेची मर्यादा चटकन कळून येते. निर्विकार व निर्हेतुक निरीक्षण हे जसे दुरापास्त आहे तसेच आजच्या परिस्थितीतील व्यक्तींचे आचरण अथवा समाजाची वृत्तीही पूर्वी अशीच होती अगर पुढे अशीच राहील असे समजणेही योग्य नाही. मनुष्याच्या मनोव्यापारावर बाह्य परिस्थितीइतकीच त्याच्या डोक्यातील कल्पनांची पकड असते. वैचारिक चळवळीच्या या काळात हा सिद्धांत जास्त स्पष्ट करावयास नको. पण त्याचा समाजशास्त्रीय सिद्धांतांच्या शाश्वतेशी फार निकट संबंध आहे. एवंच रानडयांनी समाजशास्त्रांतील सिद्धांताच्या मर्यादा ज्या 50 वर्षांपूर्वी निर्देशिल्या त्या

त्या वेळेस जरी अनेकास पटण्यासारख्या नव्हत्या तरी आज बहुतांशी सर्वमान्य झाल्या आहेत. जरी मानवी मनोव्यापाराबद्दलच्या थोड्या प्रमेयांवर अगदी तर्कशुद्ध रितीने मोठी इमारत उभारली तरी ती शुद्ध पायावर रचलेली व स्थिर आहे किंवा नाही हे वेळोवेळी व ठिकठिकाणी प्रत्यक्ष परिस्थितीशी पडताळून पाहिल्याखेरीज ठरविणे शक्य नाही हा विचार नवीन पक्षातील काही अर्थशास्त्रज्ञसुद्धा आज मान्य करू लागले आहेत.[2]

## डॉ. कॅनन यांचा दुजोरा

समाजशास्त्रातील सिद्धांतांच्या सापेक्षतेस धरूनच रानडे यांनी इंग्रजी अर्थशास्त्राच्या विकासाबद्दल विस्तृत विवेचन केले आहे व इंग्रज लेखकांचे विचार कसे परिस्थितीजन्य होते हे त्यात दाखविले आहे. ऐतिहासिकदृष्ट्या विचार करणारे इंग्रज लेखकही ही गोष्ट आज कबूल करतात. रानडे यांच्या या व्याख्यानानंतर चार वर्षांनीच डॉ. कॅनन यांनी आपला 'उत्पादन व विभाजन विचारांचा इतिहास' हा मोठा ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यात मालथस, रिकार्डो, मिल्ल इत्यादिकांचे बरेच सिद्धांत ठिकठिकाणी कसे तर्कदुष्ट आहेत हे त्यांनी विस्तृतपणे दाखविले आहे. त्याबरोबरच त्यांनी जे सिद्धांत मांडले ते सभोवारच्या परिस्थितीस कसे अनुरूप होते व त्या लेखकांच्या स्वतःच्या आर्थिक धोरणाबद्दलच्या ग्रहांना कसे अनुकूल होते, हेही त्यांनी स्पष्टपणे दाखविले आहे. आज अर्थातच मार्क्सवादाची पकड जिकडे तिकडे एवढी बसलेली असता मनुष्याचे विचार हे त्याची परिस्थिती, त्याचे हितसंबंध व त्याचे पूर्वग्रह यांच्याशी कसे निगडीत असतात हे विशेषाने सांगण्याची जरुरी नाही. विचारवंतांची भूमिका ही परिस्थितीजन्य असते व त्यांच्या विचारांचा रोख हा त्यांच्या भोवतालच्या घडामोडीवरून बहुतांशी ठरतो असे मार्क्सवादांतील आत्यंतिक सिद्धांतांचा पुरस्कार न करणाऱ्यासही सहज म्हणता येईल. यांत्रिक युगाच्या आर्थिक परिणामाविषयी जी मीमांसा युरोपीय अर्थशास्त्रज्ञांनी केली तिचा इतिहास या दृष्टीने फार उद्बोधक आहे. यांत्रिक युगाच्या अगदी सुरुवातीस उत्पादनामुळे जुन्या कारागिरीच्या धंद्यांवर अनिष्ट परिणाम घडून बेकारी व असंतोष यांची काही दृश्ये दिसली; परंतु थोड्याच काळात यांत्रिक उत्पादनाच्या खपाची मर्यादा जशी जगभर वाढू लागली तसतसे या अनिष्ट परिणामांऐवजी वाढते उद्योग व वाढती मजुरी ही जास्त ठळकपणे डोळ्यात भरू लागली. त्यामुळे जरी प्रारंभी प्रत्येक युरोपीय देशात अर्थशास्त्रज्ञांनी यांत्रिक उत्पादनाच्या प्रसाराच्या अनिष्ट परिणामाकडे लक्ष दिले तरी शेवटी सर्वांचा भर त्याचे हितावह परिणाम काय झाले याजवरच मुख्यतः राहिला. यांत्रिक उत्पादनाच्या प्रसाराचे अनिष्ट परिणाम पुढारलेल्या औद्योगिक देशात फार थोडा काल आणि अत्यल्प प्रमाणात भासल्यामुळे संक्रमणावस्थेतील परिस्थितीचा विचार फारसा महत्त्वाचा नाही असेच सर्व अर्थशास्त्रज्ञांनी मानले. यांत्रिक उत्पादनाने बेकारी होतच नाही, झाली तरी ती तात्पुरतीच असते आणि तिच्याबरोबरच उद्योगधंद्यांची वाढ फार होते असे सिद्धांत इंग्लंड, जर्मनी, अमेरिका या देशांतून मांडले गेल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. कारण तेथील परिस्थिती व सिद्धांत यांत विशेष विरोध दिसून येत नव्हता. पण त्याचे उलट एखाद्या हिंदी अर्थशास्त्रज्ञाने जर या प्रश्नाचा विचार केला तर त्यास अनिष्ट परिणामच प्रामुख्याने दिसतील व संक्रमणावस्था ही अल्पकालीन नसून आपल्या देशापुरती तरी निदान कायमचीच आहे की काय असा भास होईल. तेव्हा या बाबतीतील त्याचे सिद्धांत हे निराळेच असणार. अगदी सर्वसामान्य असे काही थोडे सारखेच लिहिले तरी आर्थिक धोरणाबाबतचे विचार व एकंदर विवेचनाचा भर याविषयी या निरनिराळ्या परिस्थितीमुळे युरोपीय व हिंदी अर्थशास्त्रज्ञांचे लिखाणांत महदंतर पडणारच. (येथे एक गोष्ट प्रांजलपणे नमूद करणे आवश्यक आहे. प्रस्तुत लेखक जेव्हा सुमारे 18 वर्षांपूर्वी विलायती पदवी संपादून हिंदुस्थानात परत आला तेव्हा त्याचे विचार याहून भिन्न होते ; त्यामुळे डॉ. केतकर यांनी ज्ञानकोशात स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्र स्थापण्याची आवश्यकता प्रतिपादली असता तीस विद्यासेवकात आपला

मराठीतील पहिला लेख लिहून त्याने कसून विरोध केला. आज मात्र त्याचे विचार स्वतःच्या जुन्या लेखापेक्षा डॉ. केतकरांशी जास्त जुळते आहेत.)

## समाज नियंत्रण हीच प्रकृती

ऐतिहासिकदृष्ट्या विचार करता अर्थशास्त्रज्ञांचे सिद्धांत कसे प्रतिक्रियारूप असतात हे पटले, म्हणजे कोणत्याही एका सिद्धांताची महती व युक्तता ही सदैव टिकणे शक्य नाही हे उघड होते. 19 व्या शतकात इंग्रज अर्थशास्त्रज्ञांचे सर्व लिखाण अनिर्बंध व्यवहाराच्या तत्त्वाच्या पायावर उभारलेले होते. अनिर्बंध व्यवहार ही आर्थिक व्यवस्थेची मूळ प्रकृती, व तो सुटला म्हणजे ती विकृती झाली असे हे अर्थशास्त्रज्ञ प्रतिपादीत. या प्रतिपादनाचा फोलपणा रानडे यांनी ऐतिहासिक व व्यावहारिक विवेचन करून दाखविला. ऐतिहासिकदृष्ट्या स्मिथ व तत्कालीन लेखकांचे सिद्धांत हे तत्कालीन परिस्थितीजन्य होते हे आज सर्वच कबूल करतात. यांत्रिक क्रांतीच्या आघाडीवर असलेल्या, विशेषतः इंग्लंडसारख्या, राष्ट्रांच्या प्रगतीस अनिर्बंध व्यवहार पोषक ठरला हेच त्याची पकड इतका वेळ टिकण्याचे मुख्य कारण होय. अर्थात इंग्रजांनी अनिर्बंध व्यवहाराचा पुरस्कार केला, म्हणून तो सर्वांनाच सर्व काळी हितावह होईल असे म्हणणे केवळ हास्यास्पद आहे. किंबहुना रानडे यांनी लिहिल्याप्रमाणे आत्यंतिक अनिर्बंध व्यवहाराचा पक्ष धरणे, म्हणजे मूलतः समाजधारणेचे फायदे घालविणे असेच ठरेल. कोणत्याही समाजाच्या अस्तित्वास व प्रगतीस ज्या अर्थी समाजनियंत्रण हे आवश्यक असते, त्या अर्थी नियंत्रणास प्रकृती मानणे हेच केव्हाही श्रेयस्कर होय. अर्थात नियंत्रणाची शक्यता व त्याची व्याप्ती हे देशकालमानास अनुसरूनच ठरवावे लागते. पण नियंत्रणाच्या मर्यादा ठरवावयाच्या त्या केव्हाही शाश्वत सिद्धांतांच्या रूपाने मांडता येत नाहीत. एकंदर परिस्थितीचा विचार करून इष्ट काय व शक्य काय या दृष्टीने त्या दर वेळी निश्चित कराव्या लागतात. असे म्हटले म्हणजे या मर्यादा वेळोवेळी बदलतील व त्या प्रत्येक देशाच्या परिस्थितीवर अवलंबून राहतील, हेही कबूल करावे लागते. मागे उल्लेखिलेल्या नवीन इंग्रज अर्थशास्त्रज्ञांच्या गटापैकी काही आग्रही लेखक वगळल्यास आज हे सिद्धांत सर्वमान्य झालेले आहेत. रानड्यांनी दर्शविल्याप्रमाणे इंग्रज अर्थशास्त्रज्ञ नेहमी अनिर्बंध व्यवहाराचा पुरस्कार करीत आलेले आहेत. परंतु गेली 15-20 वर्षे त्यांच्यातील प्रमुखांसही अनिर्बंध व्यवहाराबद्दलच्या जुन्या सिद्धांतातील उणेपणा दिसून आला आहे. जगभर नाणावलेले इंग्रज अर्थशास्त्रज्ञ मि. केन्स यांनी सुमोर 15 वर्षांपूर्वी 'अनिर्बंध व्यवहाराची इतिश्री' या नावाचे एक पुस्तक प्रसिद्ध केले. त्यात सरकारने काय करावयाचे अथवा काय करावयाचे नाही याबाबत अर्थशास्त्रज्ञ काही चिरकालिक नियम घालू शकत नाहीत असेच मुख्यतः प्रतिपादिले आहे. अलीकडे प्रा. व्हायनर यांनी अमेरिकन अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष या नात्याने भाषण करताना या प्रतिपादनासच निराळ्या तऱ्हेने पुष्टी दिली. अनिर्बंध व्यवहार इत्यादी गेल्या शतकात उदारमतवादी मानलेल्या सिद्धांताबद्दल ते म्हणाले की, त्यांचा पुरस्कार करताना ते शास्त्रीय सिद्धांत असे म्हणून चालणार नाही ; त्यांस विचारांची अगर मनाची एक प्रवृत्ती असेच मानावे लागेल. तेव्हा आज तरी रानडे यांच्या याबाबतच्या सिद्धांतातील अचूकपणा व दूरदर्शीपणा याविषयी जास्त लिहावयास नको.

## इंग्रजी सिद्धांतांचे दडपण

या निबंधात रानडे यांनी मांडलेल्या व्यापक व सूचक सिद्धांतांपैकी एक महत्त्वाचा सिद्धांत अगदी जाता जाता व ओझरता मांडला आहे. या सिद्धांताची व्याप्ती त्यांनी सर्व क्षेत्रांत विशद करून दाखवली नाही, तरी त्या सिद्धांताचे महत्त्व फार मोठे असल्यामुळे त्याकडे येथे विशेष लक्ष दिले पाहिजे. इतर अनेक ठिकाणी इंग्रजी राज्यापासून झालेले फायदे रानडे यांनी विवेचले. या निबंधात मात्र त्यांचे लक्ष तोट्यावरही गेलेले आहे. इंग्रजी विचार व इंग्रजी अनुभव हे हिंदुस्थानास गैरलागू आहेत; त्यांचा पुरस्कार केला व सर्व बाबतीत इंग्रजी

उद्दिष्टेच आपल्या डोळ्यासमोर ठेवली तर अनर्थावह परिस्थिती उत्पन्न होते. इंग्लंडसारख्या संपन्न, बलवान व जगन्मान्य राष्ट्राचे अनुकरण करणे आपणांस साधावयाचे नाही व तसे करणे योग्यही नाही. रानडे यांच्या या मताची सत्यता पटण्यास आर्थिक धोरणाचा विचार केला पाहिजे असे नाही. सर्व समाजजीवनात त्याची यथार्थता वेळोवेळी पटते. आपल्याकडे आज जे अनेक प्रश्न बिकट होऊन बसले आहेत, त्यांची उकल इंग्रजी उद्दिष्टे व इंग्रजी साधने यांचे आपल्या मनावरील दडपण काढून टाकल्याविना व्हावयाची नाही. प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराचाच प्रश्न घेतला, तरी तेथेही जोपर्यंत इंग्रजी उद्दिष्टे आपल्या डोळ्यासमोर आहेत, तोपर्यंत आपणास कधीच काहीही करता येण्यासारखे नाही असेच वाटेल. पण जपानसारख्या राष्ट्राचा अनुभव लक्षात घेतला, म्हणजे ही गोष्ट तितकी दुःसाध्य वाटत नाही. किंवा नवीन प्रांतरचनेच्या प्रश्नाच्या चर्चेतही विचार असाव नेहमी उलट्या दिशेने चाललेला आढळून येतो. पगाराचे व एकंदर नोकरसंख्येचे प्रमाण हे आधी गृहीत धरून मग प्रांतमर्यादा ठरवावयाच्या की इष्ट मर्यादा ठरवून मग त्यात आपणांस कास पगारमान वगैरे झेपेल हे पाहावयाचे ? पण आपल्याकडे सर्वांचीच इंग्रजी सिद्धांत व अनुभव यांनी दिशाभूल झालेली आढळते. त्यामुळे अनेक क्षेत्रांत खाईन तर तुपाशी नाही तर उपाशी, अशा अविचारी धोरणाचा पुरस्कार विचारवंतही करताना आढळतात. इंग्लंडसारख्या संपन्न राष्ट्राचे अनुकरण आमच्यासारख्या दरिद्र्यांनी करणे हे बैल-बेडून न्यायाने किती हास्यास्पद आहे हे आपण नेहमी लक्षात बाळगणे जरूर आहे.

हिंदी आर्थिक धोरणाबाबत रानडे यांनी उल्लेखिलेल्या बाबी आज नवीन वाटणार नाहीत. त्यांच्या काळापासून ह्या गोष्टींचा पुरस्कार बहुतेक हिंदी पुढारी व लेखक करीत आले व त्यांपैकी बहुतेक आज सरकारने तत्वतः स्वीकारल्या आहेत. किंबहुना आजचे लेखक रानडे यांच्याही बरेच पुढे जात आहेत असे वाटण्यासारखे आहे. पूर्ण अनिर्बंध व्यवहाराच्या साम्राज्याच्या काळात मांडलेले हे विचार आजच्या पूर्ण नियोजित व्यवस्थेच्या पुरस्काराच्या काळात काहीसे अपुरेही वाटतील. परंतु आम्ही वेळोवेळी म्हटल्याप्रमाणे खरा मुद्दा तपशिलाचा नसून तात्त्विक भूमिकेचा आहे आणि त्याबाबत रानडे यांनी स्वीकारलेला पक्ष आज ही निर्दोष वाटतो. अनिर्बंध व्यवहार किंवा पूर्ण नियोजन या दोनही पक्षांत आत्यंतिक आग्रह हा आढळतोच. तो टाळावयाचा असल्यास रानडे यांनी घालून दिलेल्या व्यवहार्यतेच्या कसोट्याच योजल्या पाहिजेत.

## हिंदी अर्थशास्त्राची रानड्यांच्या नंतरची प्रगती

शेवटी हिंदी अर्थशास्त्राची रानडे यांच्यानंतरची प्रगती याविषयी दोन शब्द लिहिणे आवश्यक आहे. ही प्रगती बरीच व अनेक दिशांनी झाली आहे. आज अर्थशास्त्र महत्त्व पावले असून, त्याचे अध्यापक व अभ्यासक ठिकठिकाणच्या शिक्षणसंस्थात असतात. विशिष्ट हिंदी आर्थिक प्रश्नांकडे या अर्थशास्त्रज्ञांचे लक्ष गेले असून, गेल्या 20-25 वर्षांत याबाबतचे संशोधन व लिखाण पुष्कळच बाहेर पडले आहे. तसेच सरकारी कमिट्या व कमिशने यांनी हिंदी आर्थिक परिस्थितीची निरनिराळी अंगे अभ्यासिली. एकंदर हिंदी आर्थिक जीवन व धोरण यांबाबत बराच विचार झाला, व झाला त्याहूनही बारकाव्याचा विचार चालू आहे. हे सगळे झाले, तरी रानडे यांनी या निबंधात स्वीकारलेल्या भूमिकेवरून अर्थशास्त्रीय विचारांची स्वतंत्र मांडणी करण्याचा उपक्रम केलेला मात्र कोठे दिसून येत नाही. क्वचितच प्रसंगी हिंदी समाजरचना अगर संस्था यांचा पुरस्कार करण्याच्या अभिनिवेशाने काही लिहिले गेले असले, तरी ते केवळ आग्रही दिसते. अशा लिखाणात शास्त्रीयतेचा बहुशः अभावच असतो. हा उणेपणा आजतागायत राहण्याची कारणे अनेक असू शकतील. एक तर, हिंदुस्थानाचे अफाट क्षेत्र व विविध परिस्थिती या मानाने अभ्यासकांची संख्या आजही अपुरी आहे आणि अभ्यासकांस उपलब्ध असलेली साधने व वेळ हीही फार मर्यादित आहेत. परंतु खरे महत्त्वाचे कारण, म्हणजे हिंदी अभ्यासकांच्या मनावर बसलेली इंग्रजी विचारांची पकड हेच असावे. इंग्रजी विश्वविद्यालयीन

पदव्यांस सर्वच क्षेत्रात जो विशेष मान अलिकडे प्राप्त झाला आहे, त्याचा हा परिणाम असावा. स्वतंत्र विचाराचा प्रवाह काय तो तिकडेच चालणार व तेथील सिद्धांतनास अनुसरूनच आपल्या परिस्थितीप्रमाणे आम्ही लिहिणार असेच बहुतांशी अलीकडे होऊन बसले आहे. प्रत्यक्ष विलायतेहून नुकत्याच आलेल्या ताज्या पदवीधरास येथील मुरलेल्या अभ्यासकाहूनही जास्त कळते अशा प्रकारची वृत्ती अनेक ठिकाणी दिसून येते. यामुळे येथील अभ्यासकांचा निरुत्साह होतो. इतकेच नव्हे, तर इंग्लंडामधून शिकून आलेल्यांतही तेथील किनारा सुटला की आपली वाढ थांबते अशी भावना उत्पन्न होते. रानडे यांच्या इतक्या स्वतंत्र प्रज्ञेची माणसे केव्हाही विरळच असणार. परंतु शिवाय आपल्या अभ्यासकांत विचारांचा व्यापकपणा व आत्मविश्वास ही दोन्ही कमी पडतात, असे कष्टाने म्हणावे लागते. नाही म्हणावयास आपल्याकडे स्वतंत्र रीतीने विचार करून धडाडीने सिद्धांतन करण्याचा प्रयत्न म्हणजे समाजशास्त्रात डॉ. श्री. व्यं. केतकर यांचाच समजावयाचा. त्यांनी आर्थिक व्यवहाराबद्दलही थोडे सूचक असे लिहिले, याबद्दल मागे एका ठिकाणी उल्लेख केलाच आहे. केतकरांच्या कार्यक्षेत्राचे स्वरूप व त्यातील अनेक अडचणी यांमुळे त्यांस नवीन सिद्धांतनाकडे विशेष लक्ष देता आले नाही व त्यात तितकेसे यशही आले नाही. परंतु रानड्यांनी दाखविलेल्या व डॉ. केतकरांनी अंशत: आक्रमिलेल्या मार्गानेच आपणांस पुढे जावयाचे आहे. आपले अर्थशास्त्र हे केव्हाही गरीब व मागासलेल्यांचे अर्थशास्त्र आहे. त्याचे एकंदर रूप व रंग ही केव्हाही संपन्न व प्रगत राष्ट्रांच्या अर्थशास्त्रापेक्षा निराळी असणार[3] आणि या दृष्टीने हिंदी अर्थशास्त्राचा विकास झाल्यावरच आपल्या राष्ट्रीय आर्थिक धोरणाबाबत भरीव कामगिरी अर्थशास्त्रज्ञांस करता येईल.

### संदर्भ टीपा

1 या नवीन पक्षाचे प्रातिनिधिक लेखक म्हणून प्रो.रॉबिन्स यांचे सर्वच लिखाण परीक्षणीय आहे.

2 Hicks, 'Value and Capital' या ग्रंथाची प्रस्तावना पाहा.

3 याच्या पुष्ट्यर्थ एकच उदाहरण पुरेसे आहे. गेली दहाबारा वर्षे आर्थिक जीवनात मुख्य प्रश्न उत्पादनाचा उरलेला नसून, केवळ विभागणीचाच उरला आहे, असे सर्व पाश्चात्य अर्थशास्त्रज्ञ - मि. केन्स धरून - प्रतिपादितात. त्यांना हिंदुस्थान व चीन यांमधील अर्धपोटी असलेल्या असंख्य जनतेची दखलच नाही असे दिसते.

■■■■


**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**अर्थमीमांसा - वैज्ञानिक की कलात्मक ?**

**नी.वि.सोवनी**


**किंमत रु. 250 (सूट 10 टक्के)**

अर्थशास्त्राच्या पदवी आणि पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी आणि प्राध्यापक याना उपयुक्त संग्राह्य ग्रंथ.

**: मिळण्याचे ठिकाण :**

**डॉ. व्यं.सु. पाटणकर, फ्लॅट क्र. 1, कपिल अपार्टमेंटस्, सर्व्हे क्र. 29, तेजस सोसायटीजवळ, कोथरुड, पुणे – 411 029.**

# धनंजय रामचंद्र गाडगीळ: व्यक्तिपरिचय



## (अ) जीवनपट

10 एप्रिल 1901: नाशिक येथे आजोळी जन्म.

1916: नागपूर येथे शालेय शिक्षण होऊन सिनियर केंब्रिज परीक्षा उत्तीर्ण.

1918: इंग्लंडला प्रयाण व केंब्रिज विद्यापीठात अर्थशास्त्र व इतिहास हे विषय घेऊन पदवी अभ्यासक्रम तीन वर्षांत पुरा.

1921-23: केंब्रिज विद्यापीठातून एम्.ए.,एम्. लिट. पदवी संपादन करून भारतात परत.

1923: इंग्लंडमधून मराठी भाषेतील पहिला लेख केसरीत प्रसिद्ध.

1924: 'हिंदुस्थानातील औद्योगिक विकास' हा एम.लिट. पदवी प्रबंध ऑक्सफर्ड प्रकाशनाने प्रसिद्ध केला.

1924-25: अर्थखात्यात अतिरिक्त सहायक सचीव, मुंबई.

1925-30: प्राचार्य, म.ठा.बा. महाविद्यालय, सुरत.

1927-52: सिनेट सदस्य व फेलो, मुंबई विद्यापीठ.

1930: गाडगीळ यांच्या पुढाकाराने रा.रा. काळे यांच्या देणगीच्या आधारे भारत सेवक समाजाच्या सहकार्याने गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संशोधन संस्थेची स्थापना.

1930-66: संचालक, गोखले अर्थशास्त्र संस्था, (G I P E) पुणे

1930-37: जागतिक व भारतीय प्रचलित आर्थिक घडामोडी आणि समस्या यांचे विस्तृत विवेचन.

1931-40: सिनेट, सिंडिकेट सदस्य - ना.दा.ठा. महिला विद्यापीठ.

1936-37: पुणे शहराचा नागरी विकास, तेथील उद्योगधंदे, व्यापार व अन्य अर्थव्यवहार आणि सामाजिक संस्था इत्यादींच्या तपशीलवार अभ्यासासाठी संशोधनपर सर्वेक्षण.

1937-38: वाई तालुक्यामध्ये शेती व्यावसायिकांच्या आर्थिक जीवनाचा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा व समाज व्यवस्थेचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने संशोधनपर सर्वेक्षण.

1937: आर्थिक व्यवहाराचे नियोजन या विषयावरील प्रदीर्घ लेख प्रकाशित.

1937-40: सदस्य - मुंबई गिरणी कामगार चौकशी समिती.

1937-42, 1947-48: सदस्य, संचालक मंडळ, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक.

1938: अध्यक्ष, डेक्कन कॉलेज पुनर्रचना समिती.

1938-39: अध्यक्ष, माध्यमिक शिक्षक फेडरेशन, मुंबई प्रांत.

1939-40: प्रवरा व गोदावरी कालव्यांच्या क्षेत्रातील सिंचित शेती व्यवसायाचा व त्या भागातील कोरडवाहू शेतीचा तौलनिक अभ्यास.

1940: अर्थव्यवस्थेचे विनियमन आणि नियंत्रणाची आवश्यकता प्रतिपादन केली.

1940: अध्यक्ष, इंडियन इकॉनॉमिक असोसिएशन.

1941-42: सदस्य, महाराष्ट्र विद्यापीठ समिती.

1942,1952-53: अध्यक्ष, दुष्काळ निवारण समिती.

1942-47 : सदस्य, अर्थ सल्लागार समिती, भारत सरकार.

1942-52 : सदस्य, पश्चिम विभागीय मंडळ, रिझर्व बँक ऑफ इंडिया.

1945-50 : अध्यक्ष, पुणे जिल्हा खरेदी - विक्री संघ.

1945-47 : संघराज्य घटना आणि घटक राज्यरचना या विषयाचे चिकित्सक विवेचन. भारतीय संघराज्याच्या निर्मितीविषयीचे प्रश्न व 1948 मध्ये भारतीय राज्य घटनेच्या मसुद्यातील तरतुदी याबद्दल विस्तृत लिखाण.

1946-60 : सदस्य, संयुक्त महाराष्ट्र परिषद - संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या तात्त्विक अधिष्ठानाबाबत पायाभूत लिखाण.

1946 : बॉम्बे स्टेट को-ऑप. बँकेचे संचालक.

1947-48 : अध्यक्ष, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक.

1947 : स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अर्थशास्त्रज्ञ या नात्याने सार्वजनिक क्षेत्रातील वाढता सहभाग.

1947 : 'युद्धकालीन नियंत्रणे व युद्धोत्तर योजना' या विषयावरील लेखनामध्ये युद्धकालीन नियंत्रणांच्या आधारे भारतामध्ये नियोजित अर्थव्यवस्था उभारण्यास कसा प्रारंभ करता येईल याचे विवेचन.

1948 : शेतकऱ्यांच्या सहकारी प्रक्रिया संस्थेची कल्पना मांडली.

1948 : 'पीक कर्ज' योजना विस्ताराने मांडली.

1948-53 : सदस्य, संचालक मंडळ, औद्योगिक वित्तीय महामंडळ.

1949 : महाराष्ट्रातील पहिला साखर कारखाना 'प्रवरानगर सहकारी साखर कारखाना' उभारण्यात पुढाकार.

1949-58 : सदस्य, विधिसभा व कार्यकारिणी, पुणे

विद्यापीठ.

1949-60 : अध्यक्ष, प्रवरानगर सहकारी साखर कारखाना.

1950-71 : नियोजनाचे पर्व सुरू झाल्यानंतर भारतातील नियोजनविषयक विविध प्रश्नांवर वेळोवेळी विस्तृत लिखाण.

1950-52 : सदस्य, राष्ट्रीय उत्पन्न मापन समिती.

1950-54 : अध्यक्ष, कार्यक्रम समिती, इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पॅसिफिक रिलेशन्स.

1951-54 : सदस्य, ग्रामीण पत पुरवठा सर्वेक्षण, रिझर्व बँक ऑफ इंडिया.

1952-62 : सदस्य, संचालक मंडळ, रिझर्व बँक ऑफ इंडिया.

1952-71 : अध्यक्ष, डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशन.

1952-71 : अध्यक्ष, महाराष्ट्र मध्यवर्ती दुष्काळ निवारण समिती.

1955 : सदस्य, योजना आयोग, अर्थतज्ज्ञ सल्लागार समिती.

1954 : अध्यक्ष, इंडियन सोसायटी ऑफ ॲग्रिकल्चरल इकॉनॉमिक्स कॉनफरन्स.

1956-59 : संस्थापक अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना महासंघ, मुंबई.

1959-67 : अध्यक्ष, संशोधन कार्यक्रम समिती, (पश्चिम विभाग),योजना आयोग.

1960-67 : अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक.

1960-67 : अध्यक्ष, सहकारी साखर कारखान्याचे राष्ट्रीय फेडरेशन.

1961 : सदस्य, विसनशील देशांच्या विकासासाठी उपाययोजना विषयक यूनोने नेमलेली तज्ज्ञ समिती.

1962 : सदस्य, व्यापार मंडळ (वाणिज्य - उद्योग मंत्रालय).

1963-65 : अध्यक्ष, सहकारी शेती चौकशी समिती.

1963 : सदस्य, कृषी पुनर्वित्त महामंडळ.

1964-67 : अध्यक्ष, राष्ट्रीय सहकारी संघ, दिल्ली.

1965 : सदस्य, भारतीय अन्न महामंडळ.

1965-66 : अध्यक्ष, मुंबई-पुणे प्रादेशिक नियोजन समिती.

1966 : सदस्य, अन्नधान्य धोरण समिती, भारत सरकार.

1967-71 : सदस्य, विश्वस्त मंडळ, गोखले अर्थशास्त्र संस्था.

1966-67 : कुलगुरू, पुणे विद्यापीठ.

1966-67 : सदस्य, राज्यसभा.

1967-71 : उपाध्यक्ष, योजना आयोग.

सदस्य, विश्वस्त मंडळ : महाराष्ट्र राज्य साहित्य परिषद, रयत शिक्षण संस्था, केसरी - मराठा.

3 मे 1971 : मृत्यू : दिल्ली ते मुंबई आगगाडी प्रवासात पालघर नजिक.

## (आ) प्रकाशित ग्रंथ

1 *Industrial Evolution of India in Recent Times*, Edn. 1, London : Oxford University Press 1924 ; Edn. 5, Bombay : Oxford University Press, 1971.

2 *The Salaries of Public Officials in India*, 1931.

3 *Imperial Preferences for India (The Ottawa Agreement Examined)*, 1932.

4 *हिंदुस्थानचा आर्थिक इतिहास, अर्वाचीन विभाग, 1850-1930,* पुणे : लोकशिक्षण लघुग्रंथमाला, 1932.

5 *A Survey of the Marketing of Fruit in Poona,* (Jointly with V.R. Gadgil), 1933 (मराठी : *पुणे जिल्ह्यातील फळांची पैदास व विक्री,* 1936).

6 *A Survey of Motor Bus Transportation in Six Districts of the Bombay Presidency,* (jointly with L.V. Gogate), 1935, (मराठी : *महाराष्ट्रातील मोटार वाहतूक* 1936).

7 *A Survey of Farm Business in Wai taluka,* (jointly with V.R. Gadgil), 1940.

8 *Regulation of Wages and other Problems of Industrial Labour in India,* 1943

9 *War and Indian Economic Policy,* (jointly with N.V.Sovani), Edn. 1, 1943; Edn. 2, 1944.

10 *Poona - A Socio-Economic Survey : Part I - Economic,* 1945.

11 *Federating India,* 1945.

12 *The Federal Problem in India,* 1947.

13 *Economic Effects of Irrigation* (Reort of a Survey of Direct and Indirect Benefits of the Godavari and Pravara Canals), 1948.

14 *Some Observations on the Draft Constitution,* 1948.

15 *आर्थिक घडामोडी* (1930-50), (प्रा. नी.वि. सोवनी यांच्यासह), 1951.

16 *पंचवार्षिक योजनेचे समीक्षण,* 1951.

17 *Poona - A Socio-Economic Survey : Part II,* 1952.

18 *Economic Policy and Development* (A Collection of Writings), 1955.

19 *Primary Education in Satara District-Reports of Two Investigations,* (jointly with V.M. Dandekar), 1955.

20 *Towards Co-operative Commonwealth,* Chandigarh : Punjab University, 1961 (मराठी : *सहकारी लोकराज्य* : 1967).

21 *Planning and Economic Policy in India,* Edn. 1, 1961 : Edn. 4, 1972.

22 *पुणे शहरातील महाजन व नगरशेठ,* 1962.

23 *Sholapur City : Socio-Economic Studies,* 1965.

24 *Women in the Working Force in India,* *Delhi* : University of Delhi, 1965.

25 *Human Rights in a Multi-National Society,* 1968.

*(पुस्तक क्र. 1,4,20,24 सोडून इतर सर्व पुस्तकांचे प्रकाशक : गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे.)*

■■■■